म. ग्रं. सं. ठाणे.
विषय मू. प्रवास
सं. क्र. ३२५

चंक्रमण



# चंक्रमण

-0013676

मधुकर जावडेकर

[illegible]
[illegible] ৩৫৯৮৩ [illegible]
[illegible] ৩০.৫.৮৩

# चंक्रमण

३४८७३.

मधुकर जावडेकर

संयोजक
चंद्रकुमार डांगे

प्रथमावृत्ती १९६३

प्रकाशन ता. २६।३।६३ वर्षप्रतिपदा,

प्रकाशक
दे. श्री. जोशी
म. द. लोखंडे
चिरंजीव ग्रंथ प्रकाशन,
२०११ सदाशिव पेठ,
टिळक रस्ता, पुणे २.

मुद्रक
प्र. भा. काळे
प्रतिभा मुद्रणालय,
२०११ सदाशिव पेठ,
टिळक रस्ता, पुणे २.

किंमत चार रुपये पन्नास नवे पैसे

मराठी ग्रं.
अनुक्रम 38803 वि: भू-प्रवास
क्रमांक 324 नों. दि. 30/8/63

मेधा आणि वासंती

यांना—

REFBK-0013676
REFBK-0013676

## अनुक्रम


| | |
|---|---|
| १ मन भटकतेच आहे | १ |
| २ आदिवासी आणि एक प्रवासी | २० |
| ३ ' गीर ' कुहरातील अनिद्रित ' हरि ' | २७ |
| ४ दिल्लीच्या परिसरात चार घटका | ३५ |
| ५ पाटणा, प्रयाग, ' ताज ', चंदिगड | ४८ |
| ६ ' श्रियेची राउळे ' | ५६ |
| ७ आणि ' ज्ञानाची वेळाउळे ' | ६६ |
| ८ उटि, एक सौंदर्यगुटि | ७६ |
| ९ तीन व्यक्ती, चार रस्ते | ८३ |
| १० दगड बोलले ! | ९१ |
| ११ दक्षिणेश्वरचा एक फकीर | १०१ |
| १२ विजयदुर्गचा खाडीकाठ | १०९ |
| १३ ' त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं ' | ११५ |
| १४ माड डुलले ! | १२३ |
| १५ भरतवाक्य | १३१ |

वेग पिऊन उन्मनी अवस्था यावी यासाठी सोमनाथ ते दक्षिणेश्वर आणि हरिद्वार ते रामेश्वर पिसाटासारखे भटकलो. अनेक दिवस मनात होते की, देशभर घुमावे आणि महाराष्ट्रात पायी फिरावे. अशा भ्रमंतीत एका संवेदनशील विमनस्कास जे जाणवले, स्फुरले, भावले ते तसेच इथे अवतरले आहे. पाहिलेल्या प्रदेशाचा इतिहास–भूगोल इथे सापडणार नाही. तसा सुसंगत तो कुठे दिसलेलाच नाही. ‘ लाल किल्ला ’ पहाताना ‘ लोकसभे ’तील खळबळाट कानाआड होईना; आणि ‘ ताज ’ पाहू म्हटले तर शामल यमुना काही पाहूच देईना ! वृन्दावनाचा बगीचा समोर खरा, पण श्रावण–भाद्रपदात ओलेत्याने डुलणारी घरची रोपटीच मनांत डुलत राहिली. गंगा आसेतुहिमाचल पाहिली पण इंद्रायणीचा खळखळाट ‘ त्या ’ समाधीचा विसर पाडू शकेना. हाच सारा धुमाकूळ इथे अवतरला आहे. डोंगर, झाडे, सागर, सरिता यांनी सदैव साथ दिली म्हणूनच केवळ प्रदेशाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख. अथवा पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांच्या सान्निध्यात सशब्द झालेला अंतरातला आक्रोश इतकाच या भारुडाचा आशय आहे !

यातील काही प्रकरणे प्रथम ‘ साधने ’तून प्रसिद्ध झाली. त्यांचे आभार. मा. रावसाहेब पटवर्धन यांनी पुरस्कार लिहून दिला म्हणून कृतज्ञता. एक मित्र श्री. शंकरराव बर्डे यांनी या लिखाणाने मूर्त रूप घ्यावे म्हणून फार मेहनत घेतली. प्रा. चंद्रकुमार डांगे यांचेमुळेच ग्रंथावर प्रकाश पडला. ते, श्री. जोशी व श्री. लोखंडे आणि चित्रकार श्री. सालकर यांचे आभार.

**मधुकर जावडेकर**

# प्रस्तावना

*

श्री. मधुकर जावडेकर यांनी लिहिलेल्या पंधरा लेखांचा हा संग्रह आहे. चंक्रमण म्हणजे भ्रमण. भारताच्या कोनाकोपऱ्यात त्यांनी प्रवास केला आहे. पण हे प्रवासवर्णन नाही. प्रवास करीत असता त्यांचे मन अंतराळात निःसंकोचपणे भराऱ्या मारीत होते किंवा खोल पाताळात दडी घेऊन काहीतरी शोधीत होते, असे त्यांच्या प्रत्ययास आले. त्यांची वृत्ती अंतर्मुख आहे. त्यांचे मन संवेदनाक्षम आहे. अशा हळूवारपणाला वरदान म्हणावे की शाप असा त्यांना प्रश्न पडतो. त्यांचा पेशा साहित्यिकाचा नाही. पण त्यांनी कवि-हृदयाने मराठी, इंग्रजी व संस्कृत काव्याचा आस्वाद घेतलेला आहे. कालिदासापासून मर्ढेकरापर्यंत कविवचने त्यांना मुखोद्गत आहेत. अर्थशास्त्र हा त्यांचा खास विषय आहे. रिझर्व्ह बँकेच्या संशोधन खात्यातील ते एक अधिकारी आहेत. पण त्यांचे मन तेवढ्यावर संतुष्ट नाही. हरपलेल्या श्रेयासाठी त्यांची तळमळ आहे. ते म्हणतात, " देशाच्या कोनाकोपऱ्यांत भ्रमंती सुरू केली ती अलीकडेच. पण फार पूर्वीपासून मन वेगाने भटकते आहे. त्याला बंध नाही, मर्यादा नाही, विधिनिषेध नाही, शक्याशक्यतेचा विवेक नाही. स्थैर्य त्याला ठाऊक नाही; स्वास्थ्य त्याच्या नशिबी नाही. कस्तुरीच्या शोधात धावताना प्रतिक्षणी तिच्यापासून दूर-दूर पळणाऱ्या हरिणशावकाप्रमाणे शांतीपासून ते दूर-दूर पळते आहे." पुढे ते म्हणतात, " मानवी जीवित म्हणजे एक छाया आहे. कशाची ? एखाद्या अश्वत्थाची की एखाद्या जयस्तंभाची ? नव्हे. ती छाया आहे एका उडत्या विहंगमाची. पक्षी दूरवर भरारी मारतो आणि मग तिथे पक्षीही उरत नाही आणि त्याची छायाही सापडत नाही."

श्री. जावडेकर यांनीच कथन केलेली या लेखांची ही पार्श्वभूमी पाहिली की, बुद्ध धर्माच्या झेन संप्रदायांतील ते एक साधक असावेत अशी वाचकांची स्वाभाविक कल्पना होते. " डोंगर, झाडे, सागर, सरिता, कवी, महात्मे, संत यांच्या परिसरात " त्यांचे मन भटकते आहे; काहीतरी गूढ शोधण्यासाठी तडफडते आहे असे आपल्याला दिसते.

हे लेख वेदान्त किंवा तत्त्वज्ञानावर नाहीत. ललित साहित्यिकाची त्यात ठाकठीक शैली नाही. भाषा विशेष घासूनपुसून तयार केलेली नाही. आत्म-संवादाचा हा एक प्रकार आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे या लेखनाच्या मागे कोणताही हेतू नाही.

" दूर नभाच्या खाली
तुडवित धरणी, ठेचित वाटा—
भिरभिरणारा प्रमत्त वारा
प्राशुनी हावऱ्या भावे—
मला वाटते, असेच आपण
अविरत चालत जावे. "

" या सृष्टीच्या विशाल आत्म्याची एक सहज संवेदना एवढीच स्वतःची जाणीव वा नेणीव ते पाहात असतांना उरली होती. ती अनुभवली आणि तेव्हाच सारे संपले. " कवी, तत्त्वज्ञ व साधक अशी श्री. जावडेकरांची तिहेरी भूमिका आहे. ते म्हणतात, " मी एक प्रवासी आहे. सोमनाथ ते दक्षिणेश्वर, मदुरा ते हरिद्वार वाटचाल केली. देशोदेशींचे लोक पाहिले. राने, अरण्ये तुडविली; कधी कोणी तपस्वी शोधून त्याच्याबरोबर राहिलो, कधी कोणी मनस्वी दिसताच थांबून कानोसा घेतला. एकांतात वा लोकांतात विश्वरूप पाहाता पाहाता आत्मरूपाची ओळख पटली."

" ...या साऱ्या लाभास खरा रंग भरला तो कृष्णमूर्तींच्या त्या पावन प्रेमळ वाणीने. त्यांच्या प्रवचनांतून बरसणारी शांतिसुखाची ती धार आणि प्रत्यक्ष सहवासातून मिळणारी ती खरी माया. आता जे जे करावे, पाहावे, बोलावे, ते ते निरर्थक वाटते. ही नैराश्यता खचित नाही. ते वैफल्यही नाही. " भरतवाक्य या त्यांच्या अखेरच्या लेखात ते म्हणतात, " अशी ही एका विमनस्काची यात्रा आहे. यात हेतू नव्हता. त्यातून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न नाही. प्रदेश पाहावा ही आस नाही. हेतुशून्य असे चंक्रमण आहे." ' आत्मा वा अरे श्रोतव्यः मंतव्यः द्रष्टव्यः ' असा श्री. जावडेकरांना निदिध्यास आहे.

या पुस्तकातील काही लेख पूर्वी ' साधना ' साप्ताहिकात क्रमशः प्रसिद्ध झालेले आहेत. साधनेच्या वाचकांना ते पसंत पडले. त्यात नव्या लेखांची

भर घालून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. अर्थशास्त्राच्या संशोधनाचे किचकट काम पाठीशी असता असे लेखन-वाचन-चिंतन करण्यास श्री. जावडेकर कटाक्षाने फुरसत काढतात हे कौतुक करण्यासारखे आहे. निरपेक्षता हाच या लेखांचा विशेष आहे.

खरोखरी या लेख-संग्रहाला प्रस्तावनेची आवश्यकता नव्हती. पण श्री. जावडेकर यांनी तशी इच्छा व्यक्त केली अन् त्यांना नाही म्हणणे मला अशक्य होते. " मी आपल्या चाउन शुद्ध दाते " हे लेख वाचनीय व मननीय आहेत असा निर्वाळा वाचकांना देऊ इच्छितो. हा लेख-संग्रह प्रसिद्ध होत आहे याबद्दल मला आनंद वाटतो.

' सीताराम '
प्रभात रोड, पुणे ४.

पु. ह. पटवर्धन

३४८७३.
३२५
मू-प्रयाग
३०।८।६३

# चंक्रमण

९३६५५

१

★

## मन भटकतेच आहे

नव्या दिल्लीतील ११ क्लाइव्ह रोड. या बंगल्यातील प्रशांत हिरव्या कुरणावर एकटाच खुर्ची टाकून बसलो आहे. मनात नेहमीच कालवाकालव करणारी ही धूसर संध्याकाळ. कुठूनतरी लांबून बासरी घुमू लागली. बासरीचे स्वर मला नेहमीच अंतर्मुख करतात. क्षणात काळ-वेळ-ठिकाण ओलांडून माझे मन मागे मागे जाऊ लागले. सुमारे ३५ वर्षांचा काळ ओलांडून मागे...आठवणींचा मागोवा घेत घेत मी ती स्मरावलि ओढू लागलो. चांगला पस्तीस वर्षांपूर्वीचा काळ.

माणसाची पिंडप्रकृति पिढ्यान्पिढ्या होणाऱ्या संस्कारांवर अवलंबून असतेच, पण मनःप्रकृतीहि अशा संस्कारसंचयातून आकार घेते. नाहीपेक्षा एकाच मुशीतून आकार घेणारी माती काया-वाचा मनाने इतकी परस्परभिन्न असण्याचे कारण ? मला कळू लागले तेव्हापासून मला आठवते की, माझे मन विशिष्ट गोष्टीतच रस घेते; काही विशिष्ट परिस्थितीतच ते फुलून येते, मोहरते.

शांत, निवांत रस्त्यावरून, गावाबाहेर कुठेतरी क्षितिजाकडे लक्ष केंद्रित करून एकटा, एकस्थाने, एकांतात चालत राहण्याची माझी आवड कोणी उत्पन्न केली ?

> "या इथे तरुतळी सुरई एक सुरेची
> खावया भाकरी आणि वही कवितेची"

ही आवड पुष्कळांच्यात असते, पण रानामाळातून त्या शापित शिला–

पाषाणाशी हितगुज करीत घटकान् घटका दवडाव्या ही प्यास कशी बरे निर्माण झाली ? गावठाणाच्या बाहेरील घोडविहिरीवर मनःपूत जलक्रीडा केल्यावर नुकत्याच नांगरलेल्या काळ्याशार वावरातील ढेकळावर दृष्टि खिळून का राहावी ? आज हजार मैल दूर असा या परप्रांतात आलो आहे, पण काळ्या आईची ओळख इथेहि पटतेच. 'ही माझी माती' असे निःसंशय प्रत्ययास येते. आकाशाच्या निळ्या घुमटाखाली आणि क्षितिजापर्यंत चौफेर नजर जाईल अशा विस्तीर्ण, निवांत भूमीवर एकाग्रता फार लवकर होते. काहीतरी शोधून काढावे असा एकच कोलाहल आत सुरू होतो. समोर दिसणारा आणि पाहता पाहता अदृश्य होणारा तो आशय झेप घेऊन कवळून घ्यावा अशी ऊर्मि वाटते. कुठून तरी घंटानाद कानावर येऊ लागतो आणि कोणाची तरी साद स्पष्ट ऐकू येते... ...असा सूर लागला की, पुनःप्रत्ययाचा आनंद दुपटी–तिपटीने त्याच त्या जुन्या कथा–काव्यातून अनुभवास येतो.

'आषाढाच्या प्रथम दिवशी'च मेघदूताच्या रसास्वादाला सुरुवात केली होती. महाविद्यालयाच्या गहिऱ्या जीवनास सुरुवात करतानाच एका पंडितकवीच्या मुखातून कविकुलगुरूंच्या त्या थोर काव्यावर प्रवचने ऐकण्याचा योग आला. आषाढाचा प्रथम दिवस. तशीच मेघाच्छादित थंडगार वेला. जाणत्यांच्या आणि नेणत्यांच्याहि पोटात कुठेतरी विरहव्यथेची आच उमटविणारा वर्षाऋतु. आणि किती सहजपणे कालिदासाचा प्रत्येक शब्द, प्रत्येक ओळ मनात घर करून राहिली. आता ती वेळ, तो काळ, तो प्रसंग प्रत्यक्षात पुढे आला की, सहजपणे ते शब्द बाहेर पडू लागतात.

कालिदासाचे 'मेघदूत' आणि 'रघुवंश', माझ्या आयुष्यातील ज्या काळात मी त्याचा रसास्वाद घेतला, त्या काळाशी इतके निगडीत आहेत की, कथाभागातील तो प्रसंग मनश्चक्षूसमोर उभा करण्याच्या त्यांच्या सामर्थ्यापेक्षाहि कितीतरी अधिक सामर्थ्याने गतकालातील अनेक प्रसंग ते माझ्या डोळ्यासमोर आणून ठेवतात. शब्दांचे सामर्थ्य अवर्णनीय खरेच ! '**रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय**' या आप्तवचनाने मला कितीतरी विशाल सत्य सांगितले आहे. '**याच्ञा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा**' या पंक्तीने मला फार मोठा कानमंत्र दिला आहे. '**त्वामासारप्रशमितवनोपप्लवं साधुमूर्ध्ना**' इत्यादि श्लोकानी मला फक्त आठवते, खूप खूप आठवते. क्षणभर अचंबाहि वाटतो की, खरेच का या ओळी इतक्या पुष्कळ वर्षांपूर्वी लिहिल्या गेल्या आहेत ? '**अमुं पुरः पश्यसि देवदारुं पुत्रीकृतोसौ वृषभध्वजेन**' म्हटल्याबरोबर मला समोर सारे काही स्वच्छ, स्पष्ट दिसू लागते. 'उत्तररामचरिता'चा उत्तरभाग, रघुवंशाचे सर्गामागून सर्ग, मेघदूताची काव्यगंगा, मोर्लेचे 'ऑन

कॉम्प्रमाइज ', लास्कीचें ' राज्यशास्त्र ', मर्ढेकरांच्या ' आणखी काही कविता ' इत्यादीतील प्रत्येक ओळ आणि शब्द गतायुष्यातील बलवत्तर आशय घेऊन पुनः पुन्हा माझ्या भेटीस येतात.

—दिल्लीच्या या शांत, स्तब्ध संध्यासमयी या आठवणी मनात गर्दी करताहेत. मघाची ती बासरी आता अधिक आर्ततेने घुमू लागली आहे. अशा अनेक गंभीर संध्या आता मनासमोर आकार घेऊ लागल्या आहेत...

...त्या दुष्काळी जन्मग्रामात राहात असताना हिंदुस्थानच्या प्रस्थापित आर्थिक सामाजिक परिस्थितीचा अभ्यास मुद्दाम करण्याची जरूरच पडत नसे. खेडेपाडी राहणारी आणि विचार करू शकणारी प्रत्येक व्यक्ति या देशातील परंपरागत परिस्थितीचे संपूर्ण ज्ञान घेऊनच मुळी जन्मास येते. तेच ते चौफेर पसरलेले जीवघेणे दारिद्य ! आयुष्यात ऊर्जितावस्था येण्याची शंकासुद्धा न घेणारे ते दुःखजर्जर खेडूत ! मिणमिणत्या जीवनात, जाणीव जागृत आहे तोपर्यंतच सांदीकोपऱ्यात असलेल्या अडगळीतून काहीतरी चाचपडणारे सारे कर्मवीर ! ना कुठे उभारी, ना महत्त्वाकांक्षा, ना गतायुष्यातील रम्य स्मृति, ना भविष्याविषयी काही अपेक्षा.

अशा खेड्यातहि निसर्ग मात्र अगदी खूष असायचा. पावसाळ्यात लहर लागली तर काळीभोर राने तो पाहता पाहता झोडून काढायचा. श्रावणाच्या ऊन-पावसातून शिरव्यामागून शिरवे येत आणि मृत्तिकेवर नवी नव्हाळी चढे. वैशाखाची रणरणती दुपार आणि पौषांतील कुडकुडणारी सकाळ दोन्ही सारख्याच अस्सल. गावाबाहेर पडून त्या एका विशिष्ट रस्त्यानें एकटाच मी लांबवर चालत जाई. रक्तरंजित संध्याकाळी सूर्याचे अस्ताचलीचे खेळ पाहत वाटचाल करावी आणि पिठूर चांदण्यात कधीकधी चंद्रमा बरोबर घेऊन घरी परतावे ! उभ्या वाटेत, तीन एक तासांच्या रम्य पायपिटीत भेटणारी माणसे आणि प्रसंग अगदी थोडे आणि ठराविक असत. एरव्ही, सातत्याने सोबत करणारा एकमेव सखा म्हणजे डोक्यातला विचार !

त्या वैराण वाटेने क्वचित् एखादी बैलगाडी दारिद्र्यातून येऊन दारिद्र्याच्या वाटेनेच अंतर तोडीत जात असे. बैलसुद्धा त्या ठराविक चाकोरीस कंटाळलेले दिसत असत आणि तरीहि एक न संपणारी वाट त्याना पुढे दिसे. ती कोणत्यातरी चिवट जीवनेच्छेने ते तुडवीत जात. अमळशाने सूर्य आणखी खाली जाई आणि संधि-प्रकाश उजळून येई. मग एक शेळ्या-मेंढ्यांचा तांडा गावाकडे परतत असे. त्या तांड्याकडे पाहिले की, असंख्य पाय एकमेकांत गुंतल्यासारखे दिसत ! ते दिवसभर गावाबाहेर असत ते फक्त वेळ काढण्यासाठी. बाकी गावात काय

आणि गावाबाहेर काय त्याना अन्नांशाची अपेक्षा सारखीच असे आणि नसे ! आणखी थोडा वेळ जाई आणि या तमाम 'नेटिवा'वर धुळीचा एकच लोट ओतून एक सर्व्हिस मोटर गावाकडे धावे. त्या गतानुगतिक जीवन–डोहात आधुनिकाची निदर्शक अशी हीच काय ती एक लाट उसळे आणि क्षणात विरे !

या प्रसंगात वर्णन करावे किंवा आवर्जून ध्यानात ठेवावे असे नवलाईचे दृश्य काहीच नसे, पण विचारचक्रे जोमाने फिरवण्याचे सामर्थ्य मात्र या सतत दिसणाऱ्या दृश्यात भरपूर असे. समाजजीवनांतील महत्त्वाच्या पेशी म्हणजे ही खेडी आणि या चिमुकल्या खेडूत गटांचे आपापल्या विटाळ्यात आळून बसलेले जीवन ! कसे सकस, जोरकस, रसरशीत असे असावयास हवे ! या खेड्याच्या भोवताली दिसणारी ही विस्तृत जमीन भराभर नव्या शास्त्राने आणि शस्त्राने नांगरली जात आहे, कालवे आणि पाटबंधारे बांधून पाण्याचा व्यवस्थित संचय केला जात आहे; वीज घरोघर खेळत आहे, तिच्या साहाय्याने अगदी घरगुती उद्योगधंदे आटोपशीर पद्धतीने काम करीत आहेत; शेतकरी हा प्राणी दिसावयास कसा दमदार, शास्त्रीय दृष्टीचा, चौकस, जीवनाविषयी दुर्दम्य अपेक्षा बाळगणारा आणि स्वप्ने पाहाणारा असा आहे—अशी दृश्ये मनासमोर खेळू लागत. गेली कित्येक शतके समाजजीवनात जागजागी गाठाळून राहिलेले हे सर्वंकष दारिद्र्य दूर होईल म्हणून जनता वाट पाहत आहे आणि धुरीण आडाखे बांधत आहेत, योजना आखीत आहेत. पण गावसीमेच्या ठराविक चाकोरीतून रे रे करीत जाणारी ही बैलगाडी अजून वेग घेत नाही, की त्या बैलांना चाकोरीबाहेरचे विश्व पाहावयास मिळत नाही. का हे असे ?

अजूनहि आपल्या गावी गेलो की, मी त्या रस्त्यावरून एक फेरफटका मारतो. बाहेर केवढे उत्पात होऊन राहिलेत; पण त्या जुन्या रस्त्यावरील ती सारी मंडळी सूर्यास्ताच्या आडोशाने अगदी परवाहि मला भेटून गेली. गेल्या दहा-बारा वर्षांच्या घडामोडीत त्यांची यत्किंचितहि झोपमोड झालेली नाही. या काळात त्यांचे दारिद्र्य दूर करण्याचे कंकण बांधून रिंगणात उतरलेले काही म्होरके कदाचित् गबर झाले असतील; पण या कृषिवलांच्या कपाळीचे प्रश्नचिन्ह किंचितहिं लहान झालेले नाही.

अगदी विश्रब्ध वातावरणात मी त्या मैलाच्या दगडावर बसलो. माझ्या शेजारीच तारेचा एक खांब उभा होता. पलीकडे पसरलेल्या विशाल विश्वाशी या खेड्याचा संबंध जोडणारी तीच एक खूण. लहानपणची आठवण झाली. मी त्या खांबाला कान लावून आत 'शिजणाऱ्या भाता'चा खद्खद् आवाज ऐकला. आसमंतात चिटपाखरूही नव्हते. एक टिटवी डोक्यावरून ओरडत

पसार झाली. माझ्या बराच काळ परिचयाची असलेली ती तीन वडांची झाडे आता अगदी म्हातारी झालेली दिसली. अमळशाने शेळ्या-मेंढ्यांचा तो कळप पुढून आला आणि गेला. तोहि आता बराच रोडावलेला दिसला! त्यामागून दोन-चार शेतकरी अधिक ओढलेल्या चेहऱ्याने आले, गेले. पाऊस कमी झाल्याची ओरड, झाडी तुटत चालल्याची तक्रार, काम मिळत नसल्याची फिर्याद आणि गरजा वाढत असल्याची आपत्ति. सारे पूर्वीचेंच रोग आणि आजार...

**'अजून येतो वास फुलांना**
**अजून माती लाल चमकते**
**खुरट्या बुंधावरी चढून**
**अजून बकरी पाला खाते!'**

...माझ्या त्या चिरपरिचित सहलीचे भरतवाक्य मी म्हटले आणि गावाकडे तोंड करून चालू लागलो.

...आता आठ वाजत आले. हा कसला गोंगाट? ही दिल्लीच्या परिसरातील खेडूत मंडळी. रंगीबेरंगी लेहंगे आणि पैरणी पांघरून रोज सकाळी आणि संध्याकाळी या रस्त्याच्या पलीकडे ही मंडळी गटागटाने जातात. ती कदाचित् गवंडी काम करणारी असतील. कदाचित् शेतमजूरहि असतील. त्यात स्त्रिया, पुरुष, मुले सर्वजण आहेत. एक चमत्कारिक पद्धतीचे संघगीत म्हणत ते जातात. त्या शब्दांचा अर्थ मला सुतराम् समजत नाही. पण त्या गाण्यात वेग आणि ओघ कमालीचा आहे. त्या जिवंत काव्याने त्यांचे अंतर तुटत असेल की श्रमपरिहार होत असेल? त्या ओळीत विनोदहि भरपूर असावा आणि तो शृंगाराधिष्ठित असावा, हे अधूनमधून त्यांच्यात उसळणाऱ्या हास्यस्फोटाने व त्याबरोबरच तोंडभर पदर ओढून लाजणाऱ्या त्यातील स्त्रीवर्गाने स्पष्ट केले आहे.

...आणि याउलट विलासी नगरांच्या परिसरात काढलेल्या त्या संध्या. त्याहि आता आठवत आहेत. याच दिल्लीच्या कॅनॉट सर्कसमधील रंगीत बारमधून जीवन 'फेसाळ'त आहे, उधाणत आहे. तेथे ना उद्याची चिंता, ना कालच्या कमाईची जाणीव. हातात असलेला क्षण पुरेपूर भोगणे हेच इथे जीवित-तत्त्वज्ञान! आणि त्या भोगमय व्यापारासाठी ज्या किमान आवश्यक गोष्टी त्या म्हणजचे जीविताचा आशय!

... सात लाखांहून अधिक खेड्यातील ते प्राथमिक जीवन आणि दहा-पाच राजविलासी शहरात—वळचणीला टांगून ठेवलेल्या एखाद्या दुर्मिळ वस्तू-

सारखे—अडकून पडलेले हे भोगप्रवण जीवन ! आम्ही कुणाची फसवणूक करीत आहोत ? आणि आमच्या गाठी जमा असलेल्या 'त्या' अनुभवाचे काय ? समाजजीवनावरचा दाब किंचित् सैल होण्याचा अवकाश की, फार काल दडपले गेलेले ते सारे पिसाट कसा हैदोस घालतात ते काय आम्ही पाहिलेले नाही ? माणसाची तथाकथित सुसंस्कृतता किती तकलुपी असते ते आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात तसेच राष्ट्रीय जीवनात चौफेरचा सारा देखावा क्षणिक आहे, फसवा आहे, हे पटले आहे. व्यक्तीसारखीच समाजालाहि अकस्मात् 'ब्रेन-वेव्ह' येते आणि सारे उलटेपालटे होऊन जाते. माणसाची ही प्रगति की परागति म्हणायची ?

पहिल्या महायुद्धाच्या संहार प्रारंभकाली लिहिताना डीन इंग माणसाच्या प्रगति-अभ्युदयाबद्दल लिहितो की, माणूस प्रगति करीत असला तरी ती प्रायः परिस्थितीविषयक आहे, प्रगति त्याच्या साधनात आहे, माणसात विशेष नाही. तो लिहितो की, "माणूस आणि त्याचे परिस्थितीशी नाते यात झपाट्याने व आश्चर्यकारक बदल होत आहे. माणूस ! एकेकाळी हा क्षुद्र जीव जमिनीवर वळवळत होता. वस्त्रहीन आणि करुणास्पद. पंचमहाभूतांचा केवळ खेळ. मोठ्या प्राण्यांचे भक्ष्य. आज पहा त्याच्याकडे. ज्ञानाची केवढी संपदा त्याच्या घरी आहे ! ज्या भूतलावर एकेकाळी स्वतःचा जीव कसा वाचवावा या एकाच विवंचनेत तो सरपटत होता, त्याच ठिकाणी आपल्या प्रतिभेची मुक्तहस्ताने उधळण तो आता करतो आहे. पाताळाच्या पोटी तो आता घरकुले करतो; पृथ्वीच्या पाठी अशा वेगाने धावतो की, चपळात चपळ असा प्राणीहि त्यापुढे गतिशून्य वाटावा; साता समुद्रांच्या अंतर्यामी तो सागराचा ठाव घेण्यासाठी घुसतो; गरुड-भराऱ्या खुज्या वाटाव्या अशा उंच अंतराळी तो उड्डाण करतो. शांततेच्या साम्राज्यात या सर्व शोधाबोधाबद्दल आम्ही आमची पाठ थोपटली. पण आज आम्हाला पटते की, या प्रगतीच्या आवरणाखाली आदिमानवाचा रानटीपणा केवळ सुप्तावस्थेत आहे आणि पडघमची टिपरी पडण्याचा अवकाश की, तो पुन्हा उफाळून वर येतो आणि थयथयाट करतो." डीन इंग याच सूत्राने मानवी संस्कृति आज भोगीत असलेल्या चक्रापत्तीचे वर्णन करतो आणि येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, डीन इंग लिहितो ते पहिल्या महायुद्धाच्या काळात, विसाव्या शतकातील पहिल्या-दुसऱ्या दशकात. मानवी प्रगतीचे आजचे झेंडे तेव्हा अजून अज्ञातच होते. तो लिहितो तेव्हा चार विमाने कुठे डोक्यावर घिरट्या लागली होती. दुसरे महायुद्ध, त्यानंतरची देशोदेशीची सत्तांतरे, दलितांची वाढती स्वातंत्र्य-भूक आणि त्यांचा त्यासाठीचा प्रयत्न व त्याचा परिणाम डीन इंगने अद्याप पाहिला नव्हता. माणसाच्या अंतर्यामी काहीहि बदल न होता

केवळ त्याच्या साधन-सामग्रीत भरभराट झाली की काय होते ते आज चारी दिशाना जसे दिसते तसे यापूर्वी कधीच दिसले नव्हते ! चोरट्याना भिवविण्यासाठी एखादा बंदुकधारी जसे हवेत बायबार काढतो तसे शक्तिशाल्यांचे बायबार आज प्रत्यही हवेत उडत आहेत आणि त्या शस्त्रास्त्रांचे तोंड मानवी संस्कृतीवर व जातीवर केव्हा रोखायचे एवढाच काय तो विलंबाचा विषय आहे. या दिशेने माणसाने आवरत आणलेली माणसाची प्रगति आणि ज्ञानवृद्धि माणसाला आज विमनस्क करीत आहे. ह्यूम लिहितो की, मानवी व्यवहाराकडे तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून पाहिले म्हणजे अचंबा वाटतो की, मूठभर माणसे सहस्रावधि लोकावर अशी निर्वेध सत्ता कशी बरे चालवतात? शासनीय सत्तेचे एक क्षणभर असो, अधिक आश्चर्यमय करणारी घटना ती ही की, उभ्या जगाखाली राजरोसपणे या जनतेने मूठभराना सुरुंग पेरू दिले आहेत आणि त्याची वात आणि मशाल मूठभर सत्तांधांच्या हाती सुखेनैव बहाल केली आहे ! आणि या सत्ताधीशांची नशा दिन-प्रतिदिन ताळतंत्र सोडत आहे. वात व मशाल यातील अंतर कमी कमी होत आहे. एकंदर मानवी जीवनाच्या या सद्यस्थितीत तिच्या भाली उद्याच्या जगात अधिक बरे दिवस लिहिले आहेत अशी आशा करण्यापलीकडे आज तरी आपल्या हाती काही दिसत नाही. या आशेचा चक्काचूर झालेला कालच्या भूतकाळात आम्ही पाहिला खरा, पण तरीहि तशी आशा मनात घोटाळते. डीन इंगच्याच शब्दात म्हणावेसे वाटते की, कोणतीहि शुद्ध कल्याणकारी आशा कधी नाश पावत नाही आणि पावलीच तर तिच्या मुळातून अधिक कल्याणप्रद आशा जन्मास येते. "न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति।" असेच म्हणू या. म्हणा. म्हणायला आपले काय खर्च होते? एमिल ब्रॉंटेचे शब्द आठवतात—

**—"येते आशा सायंकाळी**
**वहात वेड्या वाऱ्यावरती**
**उदासवाणे येथे वारे,**
**वरती तारे लुकलुकती—**
**—अशाच वेळी दिसती चित्रे**
**रंगावरती गंधफुलासम**
**मेली आशा पुनश्च फुलते**
**आणि भारते मेलेले मन !"**

"Cold upon the dead volcano sleeps the gleam of the ying day."

देशाच्या कोनाकोपऱ्यातून भ्रमंति सुरू केली ती अलिकडेच. पण याच्या फार पूर्वीपासून मन वेगाने भटकते आहे. त्याला बंध नाही, मर्यादा नाही, विधिनिषेध नाही, शक्याशक्यतेचा विवेक नाही. वृन्दावनाच्या बागेत बसले तर ते धावतें घरामागील चिंचेच्या वृक्षाकडे; लोकसभेत चर्चा ऐकत बसले तर ते घोटाळते ज्ञानेश्वराच्या समाधीशेजारी. स्थैर्य त्याला ठाऊक नाही, स्वास्थ त्याच्या नशिबी नाही, आणि कस्तुरीच्या शोधात धावताना प्रतिक्षणी तिच्यापासून दूरदूर पळणाऱ्या हरिणशावकाप्रमाणे शांतीपासून ते सारखे दूर दूर पळत आहे !

केवळ निरनिराळी ठिकाणेच पहात ते हिंडते असे नाही. एका ठिकाणावर बसूनहि अनेक व्यक्तींच्या सान्निध्यात ते वावरते, विहरते. घरच्याच वाचनालयांत त्याला अनेक सुहृद भेटतात. डेहराडूनच्या कारागृहातून भाई मानवेंद्र रॉय यांनी पत्नीस लिहिलेली पत्रे. त्यांच्या पत्रातील पानापानांवर त्यांस भेटतो एक प्रामाणिक व समर्थ साधक. क्वचित् ते कविवर्य मर्ढेकरांच्या घरात एकट्याने त्यांच्याबरोबर फेऱ्या मारूं लागते. मूकपणाने, शांतपणाने तासन् तास तो ' वेडा ' म्हणे एकटाच शतपावली करीत असे. त्या एकाकी चंक्रमणातून कशा रसरशीत ओळी स्रवल्या आहेत. जीवनाचा वेध घेणाऱ्या, हृदयाला जाऊन भिडणाऱ्या. आणि मग लगेच पलीकडे दिसतो तो दुसरा एक कन्नड महाकवि टी. पी. कैलासम्. असामान्य प्रतिभा आणि विद्वत्ता आपल्या अभ्यासिकेत आपलाच स्वाहाकार करीत होती ! एक अलौकिक कवि आणि नाटककार. पण सामान्यांना मात्र ' टीपिकल ॲसम् ' भासणारा. जगातील सारे वैभव, रूप, सौंदर्य—सारे असार आहे, झूट आहे असे सांगणारी त्याची ती मुद्रा. तो म्हणालाच होता की, ' There never is Teaching, Learning, Reading ! It is all Searching, Spurning and Brooding ! ' विनोबा, रॉय, गांधी, शेक्स्पियर, कालिदास, हेमिंग्वे, ज्ञानदेव, तुकोबा, गुरुदेव रानडे असे अनेक साधक मनात आकार धरू लागतात. कोणी कवि, कोणी मत्त जीवनप्रेमी, कोणी केवळ संन्यस्त, तर कोणी असीम महत्त्वाकांक्षी. साऱ्यांच्या जीवनयात्रेवर अमळ नजर फिरविली तरी संभ्रम आणि व्यामोह पदरी पडतो. शतशतकांच्या मानवी धडपडीचे सार चारच शब्दात सांगता येते. एखादा महामना प्रामाणिक साधक हाती प्रेमाची दिवटी घेऊन मार्ग आक्रमू लागतो. त्याला चारी बाजूंनी समाजांतील विषवल्ली घेरतात. समोरचे ' श्रेय ' त्याला कार्यरत करते. अनेक संकटांनी त्याच्या अगदी हाताशी आलेल्या श्रेयाचे लचके तुटतात. शेवटी साधकावस्थेत त्याचा अंत होतो. समोर क्रॉसवरील खिस्त दिसू लागतो. जीवनाच्या अथांग दर्यावर डुचमळणाऱ्या एखाद्या एकाकी होडग्याप्रमाणे अनंत अवकाशात वेडा मानव आज धडपडतो आहे. दिशाहीन, संभ्रमित, केविलवाणा ! !.....

...... " He was an old man who fished alone in a skiff in the Gulf stream and he had gone eighty four days now without taking a fish . .... "

निळ्याभोर दर्यावर 'चुबुक' 'चुबुक' खळाळणाऱ्या किनाऱ्यांवरच्या लाटांत त्याने होडगे ढकलले तेव्हाच दिशा मंदमंद हसल्या होत्या. त्यावेळी त्यांना उत्तर दिले होते; पांढऱ्या केसांनी, भरड्या हातांनी आणि संथ डोळ्यांनी. त्याचा प्रवास सुरू झाला. किंचित् डगमगणाऱ्या पायाना त्या एकाकी सायंकाळी दूरवरून आवाज ऐकू आला,

" I am a strange old man. "

निश्चयाचे बल त्या सफरीत होते पण हटवादी प्रवृत्तिपरता मात्र नव्हती. ते तसेच व्हायचे होते ! त्या म्हाताऱ्याचा आणि त्या होडग्याचा एक दिवस त्या विस्तीर्ण दर्यावरच अंत होणार होता. अथवा अंत तरी कसला ? समुद्राचा पुत्र समुद्राशीं एकजीव होणार होता. खारा वारा नेहमी लाटांशी बोले आणि आतले रुपेरी मासे म्हाताऱ्याची रोज मार्गप्रतिक्षा करीत. प्रथमप्रथम एक मुलगा म्हाताऱ्यावरोबर होता. म्हातारा बरोबरच्या मुलाशी बोले. पक्व अनुभव अधीर उत्साहाशी घोटाळत राही.

" Good night then. I will wake you in the early morning. "

" You are my alarm clock " the boy said.

" Age is my alarm clock " the old man said, " Why do old men wake so early ? is it to have one longer day ? "

' I don't know' the boy said.

अशी यात्रा सुरू झाली. काही दिवसानी मुलगा परतला. म्हातारा एकटाच पुढे निघाला. त्याची अंगभूत निष्ठा त्याच्यासह होती. त्याची कार्य-तत्परता त्याला हाकारीत होती. जीवनाच्या प्रशांत दर्यावर त्याच्या जीविताची एकाकी होडी अत्यंत निरपेक्ष अशा कर्तव्यतत्परतेने पुढेपुढे जात होती.

अवचित त्याला माशाच्या ओढीची जाणीव झाली. पण तो अजून गळाला लागला नव्हता. लहानसहान, किरकोळ मासे त्याला नको होते. म्हणजे मोठ्या माशाच्या व्यवहारी अभिलाषेने त्याची महत्त्वाकांक्षा चाळवली होती असे नव्हे. छे. छे. महत्त्वाकांक्षा त्याने केव्हाच जिंकली होती. जिथे प्रवृत्तीच उरली नव्हती तिथे महत्त्वाकांक्षा उरणार कशी ? पण वाटे की, श्रेय हाती लागावे. किंबहुना 'नेऽति' 'नेऽति' हा अनुभव दीर्घकाल आल्याने हाती

काय लागते ते पहाण्याची केवळ तटस्थ पण असीम उत्कंठा उरली होती. मासा आमिषाजवळ येई, दूर पळे. वाटे, आता हाती आलाच ! पुनः पहावे तर काही नाही.

"Come on the old man said aloud." "Make another turn. Just swell them. Eat them good now............Don't be shy, fish. Eat them."

हा सुखसंवाद निळा सागर ऐकतो आहे आणि पहतो आहे. म्हाताऱ्याची आणि माशाची झटापट चालली आहे. जवळ येणे, दूर जाणे, हुलकावणे. म्हातारा अंमळ थकला. हात काम देईनात......

पुनः पुनः त्याला वाटे. 'I wish I had the boy.'

'But you haven't got the boy, he thought. You have only yourself......' निष्काम कर्मयोग चाललाच होता. त्यातून सुटका नाही. 'Fish' he said softly, aloud, "I will stay with you until I am dead."

हे व्हायचेच होते. पण ते माशाबद्दलच्या प्रेमापोटी. दर्या, वारा, लाटा, होर्डी, मासा आणि म्हातारा यांच्या प्रेमापोटी हे व्हायचे होते.

म्हातारा माशाला म्हणतो की, बाबा रे, मी तुझ्यावर खूप प्रेम करतो आणि माझ्या मनात तुझ्याबद्दल आदरहि आहे. पण I will kill you dead before this day ends ! ईप्सिताविषयी भरपूर आसक्ति असूनहि ही निरीच्छता ! हा अलिप्तपणा ! पुढे पुढे तर म्हातारा त्या अथांग दर्यावर केवळ एक अदम्य पण हेतुशून्य जीवितेच्छा इतकाच उरतो. तो आपल्या हाताशी बोलतो, डोक्याला ठिकाणावर रहाण्यासाठी विनवतो. आत्म्याला आळवतो.

'Fish' the old man said, 'Fish, You are to have to die anyway. Do you have to kill me too?'

म्हाताऱ्याचे माशावर असे विलक्षण प्रेम. पाण्याची खळबळ, माशाची प्रत्यक्ष गैरहजेरी, पण म्हाताऱ्याच्या मुखातून बाहेर पडणारे माशाच्या वर्तनाचे वर्णन, माशाची प्राप्ति, मग शार्क माशाचा त्यावर हल्ला, सायासाने (पण निरिच्छतेने) मिळविलेल्या श्रेयाचा परिहार आणि या सर्वच प्रसंगावर म्हाताऱ्याची होणारी अवाक् टीका—जीवनोपनिषद् आणखी निराळे ते काय ?

...अर्नेस्ट हेमिंग्वेचे 'The old man and the sea !' अत्यंत आटोपाने, आणि विनापाल्हाळ सांगितलेली ही एका कोळ्याची जिवंत जीवनगाथा

माणसास अन्तर्मुख करते. वाऱ्यापाण्याच्या संगतीत खळाळणाऱ्या लाटांवर एकच एक आवाज ऐकू येत रहातो—

‘You think too much’ said the old man.

‘I am a strange old man.’

‘I am a strange old man.’

तसे पाहिले तर माणसाचे आयुष्य किती तोकडे असते ? आणि दैनंदिन रगाड्यात तुडवली जात असलेली असंख्य मिनिटें किती तऱ्हेच्या व किती कमी-अधिक शक्तीच्या बंधनांनी जखडलेली असतात ! नैमित्तिकामुळे मन मरगळते, पोटाच्या चिंतेने जागृतीचे तमाम क्षण व्यापले जातात आणि याच गदारोळात परस्परवैर, असूया, द्वेष यांची निपज होते. एका अर्थहीन उथळ अशा शाब्दिक पातळीवरच समाजातील परस्परावलंबी घटक घुसळले जात राहातात. “मानवी जीवित म्हणजे एक छाया आहे. कशाची ? एखाद्या अश्वत्थाची की एखाद्या जयस्तंभाची ? नव्हे. ती छाया आहे एका उडत्या विहंगमाची. पक्षी दूरवर भरारी मारतो आणि मग तिथे पक्षीहि उरत नाही आणि त्याची छायाहि सापडत नाही !”

कितीतरी थोर विचारवंतांना आपले उणेपुरे जीवित कारागृहांच्या भिंती-मागेच व्यतीत करावे लागले आहे. जाणूनबुजून, स्वेच्छेने आणि पुनः निर्वैर-वृत्तीने. कोणती अज्ञात शक्ति त्यांना सहनशक्ति पुरवीत होती ? कोणत्या सर्वंकष हेतूने त्यांना मानवी जीवनाच्या विश्वौघांत गोवले होते की, ज्यायोगे आपल्या मोलाच्या जीवनाचा एक एक सुवर्णकण त्यांनी आपल्या हाताने काळाच्या दाढेत स्वाहा केला आणि मातीचे जीवन जगणारे त्यांचे सहस्रावधि भाईबंद जी पार्थिव सुखे, शांति आणि समाधान भोगून गेले, त्यांच्या वाऱ्यालाहि ते उभे राहिले नाहीत ? ज्यांनी मानवतेचा पुकारा केला त्यांची मानवता त्यांना चार क्षणहि शांति-सुखाचे देऊन जाऊ नये काय ? जगाच्या संसाराची मुळी वाटणीच अशी झाली आहे काय की, हजारोंनी पशुतुल्य जीवन जगत इंद्रियसुखांच्या गिरद्या-वर लोळत रहावे आणि त्यांच्या मानवी जीवितांशांचा प्रगल्भ परिपोष हाच चिंतन-विषय करून काही थोड्यांनी लौकिकार्थाने जाचणारी सारी दुःखे हाका-रून आपल्या धामी आणावीत ? ज्या काही कारणासाठी थोर सॉक्रेटिस शांत होत्साता मृत्यूस कवटाळून गेला ते कारण तरी किती मोलाचे होते ? आणि ज्या मृत्यूस करोडो जीव हरघडी घाबरत आहेत तो अंत अत्यंत शांत, धीरोदात्त व निर्वैर वृत्तीने पत्करूनहि सॉक्रेटिसाच्या काळापासून आजवर जगात काय फरक पडला ? हौतात्म्याचे काव्य कोणा प्रतिभावंतांनी सवडीने आळवीत रहावे इतकाच या साऱ्या घटनांचा एक परिपाक ! एकाने असे मरणे जितके अर्थशून्य तितकेच

दैनंदिनीत लवमात्रहि फरक न करता पिढयान् पिढयांनी त्या मरणाचे पवाडे गात जगणे अर्थशून्य ! नव्हे हास्यास्पदहि...

—हे गणित काय ते सुटतच नाही. आणि ते सुटावे हा व्याप का करायचा तर वाट्यास आलेल्या जागृतीच्या क्षणांची संगति कशी लावायची"ते समजत नाही म्हणून. ...अशा साशंकतेत हा अविरत प्रवास सुरू आहे ! खळखळ वहाणाऱ्या अनेक सरितांचे स्तब्ध तीर भोवती वर्तुळ काढतात; वज्रासारखे निश्चल गिरीराज समोर उभे राहून मनाच्या चंचलतेस हसतात; आक्षितिज पसरलेला निळा सागर कधी पोटींचा वडवानल कसा पोळतो आहे, ते सांगतो; तर कधी त्रस्त लाटांच्या धडका क्षितिजावर आदळत राहातो. अशा अनेक ठिकाणांची स्मृति मनात गर्दी करते. डोंगर, झाडे, सागर, सरिता, कवि, महात्मे, संत यांच्या परिसरात मन भटकतेच आहे...

त्या दिवशीं मद्रास एक्सप्रेसमध्ये मी होतो त्याच डब्यात दोन आंध्रवासी, दोन तामिळ आणि एक बंगाली सद्‌गृहस्थ प्रवास करीत होते. सुसाट वेगाने गाडी पळत होती. घासून-पुसून व टर्पेंटाईनने लख्ख पॉलिश केलेला तो नऊ जणांचा डबा चोवीस तासाकरता आमचे घर झालेला होता. आमचे सामान तेवढयात आम्ही लावले होते. मी शुभ्र खादीधारी. यातून दक्षिणेकडे प्रवास करायचा म्हटले की, मी नेहमीच लुंगी आणि नेहरूशर्ट पसंत करतो. तिकडील उष्णता कपड्यांची अधिकाई अनावश्यक ठरवते. चालण्या-बसण्याचे स्वातंत्र्य या पोषाखात अधिक मिळते. आणि मुख्य म्हणजे जे मी मला आवडते म्हणून करतो त्यामुळेच ज्यांच्यात हिंडाय-फिरायचे त्या दाक्षिणात्यांची केवढी आपुलकी मी संपादतो ! एखाद्या तामिळ किंवा केरळीय सद्‌गृहस्थाने धोतराचा पुणेरी पद्धतीचा दुहेरी काचा मारला तर आपणास काय वाटेल बरे ! पण जी आपुलकी मला वाटेल ती दुसऱ्यास आपणाविषयी वाटण्यासाठी आपण काय करावे, काय बोलावे त्याचा जाता जाता, ओझरताहि विचार करण्याचे श्रम आम्ही घेत नाही. ‘ भावनिक ऐक्य ’ आणि ‘ राष्ट्रीय तादात्म्य ’ या गोष्टी बडया सभा भरवून आणि लंब्या-चवडया गप्पा मारून साधतील त्याहून अधिक प्रमाणात आणि सहजतेने दैनंदिन जीवनातील अनेक बारीकसारीक गोष्टींकडे आवर्जून लक्ष दिले व दुसऱ्यांच्या भावनांसाठी थोडी कसर सोसली, आपुलकी दाखविली तर साधतील. पण पर्वा करतो कोण ! आणि इतरांच्या भावना जपतो कोण ?

आम्ही दीड हाताच्या त्या जागेत आमची घरकुलें थाटून त्याविषयी आत्मीयताहि निर्माण केली आहे. माझ्या बर्थवर क्षणभर बसायचे आणि माझे

पुस्तक घ्यायचे तर माझा तामिळ डबा-बंधु नम्रतेने परवानगी मागतो. आणि केळी किंवा फळे घेतली तर त्यांचा आस्वाद सर्वांनी घ्यावा अशी इच्छा मी करतो. जन्मात प्रथमच भेटलेलो आणि उभ्या जन्मात पुन्हा भेटण्याचा संभव नसलेले, तरी आमची संस्कृति आणि प्रगति आमच्यात एक स्नेहबंध निर्माण करते. आमचा सहप्रवास चालू होतो.

पण हीच भावना जरा स्थिर झाली की, लगेच आमच्यातील भेद डोके वर काढू लागतो. माणसाची अस्मिता इतकी बलवत्तर असते की, जो जो दुसऱ्याशी मतैक्य व तादात्म्य होते, तो तो प्रत्येकास स्वतःविषयी असमाधान व कंटाळा वाटू वागतो. मग तो आपले वेगळेपण हुडकून काढतो. ते अन्यास पटवून देतो आणि त्याचे सर्वतोपरी समर्थनहि करतो. मग त्याचे गुणावगुण तेच त्याच्या जमातीचे, त्याच्या गटाचे, त्याच्या प्रांताचे. मग त्याच्या प्रांतातील कोणीहि भेटो, आम्ही त्याला एका ठरीव साच्यात घातलाच आणि त्याच्या अंगी ठोकळ गुणावगुण चिकटविलेच ! ही आमची एकमेकांविषयी जाण. ही दुसऱ्याची माहिती हा आमचा ठाम पूर्वग्रह ! आणि याच गैर पायावर आमचे परस्पर संबंध उभे राहिलेले !

हातातील ‘ टाइम्स ’ बाजूस सारून तामिळ बंधु उद्गारले, “ उत्तर भारतीयांच्या हिंदीविषयक हटवादीपणामुळे देशाची शकले पडतील ! हा भाषिक साम्राज्यवाद आहे. कोण म्हणतो, हिंदी ही देशातील बहुसंख्य जनतेची भाषा आहे ? उत्तर भारतीयांची ही जुलमशाही कदापि चालणार नाही. ”

आमचे वंगबंधु म्हणाले, “ तुमचे भाषाविषयक विचार आहेत ते खरेच विवाद्य आहेत. त्यांचा नीट विचार व्हावयास हवा. पण भाषेवरून तुम्ही एकदम सरसहा उत्तर भारतीयांना कसा दोष देता ? ते तुमचे म्हणणे अमळ धाष्ट्याचे नव्हे का ? ”

आता तामिळ आणि आंध्रवासी दोघांनीहि एक फळी बांधून उत्तर-वासीयांना धारेवर धरण्याची आघाडी उघडली. “ उत्तरवासी मवाली आहेत, असंस्कृत आहेत, स्वार्थी आहेत, ” असा एकच धोशा त्यांनी त्यांच्या विरुद्ध चालवला. केंद्र सरकारात त्यांचे मंत्री किती, अधिकारी किती, त्यांची मोजदाद झाली. वंगवासी म्हणाले, “ अहो असे कसे म्हणता ? दिल्लीच्या परिसरात मेनन, कृष्णन्, रामन् पावलोपावली आहेत. तसे म्हणाल तर बंगाली आणि महाराष्ट्रीय यांचीच उणीव आहे ! ”

यावर मग विनोदी उत्तर असे की, “ ते दाक्षिणात्य आहेत म्हणूनच राज्यकारभार चालला आहे. ”

भाषेवरून सुरुवात झाली आणि सर्व ग्रह, पूर्वग्रह व संशय यांच्या आधाराने प्रांताप्रांतावर ‘ लेबले ’ लावून त्यांना चांगलेवाईट ठरवून झाले. आणि हे सारे बुद्धिवान, जबाबदार, सुज्ञ म्हणवणाऱ्या लोकांकडून ! असल्या वादात भाग घेऊन हिरीरीने बोलणे जमत नाही. नसता अभिनिवेश, वृथाभिमान आणि चुकीची माहिती यावर आधारलेली वचने यामुळे ठाम बोलण्याचा धीरच होत नाही. पण वाद ‘ चढला ’ की, नकळत आपण त्यात ओढले जातो. मी म्हणालो की, “ जास्तीत जास्त लोकांना हिंदी समजते हे विधान आपण कसे अव्हेरता ? आणि शिवाय, इंग्रजी ही परकी भाषा आहे. ती हिंदीपेक्षा आपणास अधिक जवळची वाटण्याचे कारण तरी काय ? हिंदीचा अंधपणे दुराग्रह धरू नये हे मान्य करण्याच्या भरात प्रत्यक्ष वस्तुस्थिति नाकारणे शहाणपणाचे आहे काय ? ”

“ तुम्हां सर्व औत्तरीयांची हीच चुकीची समजूत आहे. आम्हांस हिंदीपेक्षा इंग्रजी निश्चित् जवळची वाटते ! ”

“ मला वाटते, यात इंग्रजीप्रेमापेक्षा हिंदीद्वेषच अधिक आहे. आणि दुसरे असे की, मी उत्तरवासी नाही, मराठी आहे. ”

“ म्हणून काय झाले ? महाराष्ट्र मद्रासच्या उत्तरेसच आहे की ! ”

येथे वाद माझ्यापुरता संपला ! अंतर्मुख होऊन विचार करावा लागला. पूर्वग्रहांचे विचारसणीवर केवढे हे अतिक्रमण ! कसे सत्य समजावे ? कसा समझौता व्हावा ? सुख व समाधान कसे नांदावे ? महाराष्ट्रीय म्हटला की, तो असा, मद्रासी म्हटला की, तसा ! पंजाब्यास डोके कमी आणि बंगाली भावनाप्रधान ! ही आमची मुळी गृहीतकृत्येंच. येथूनच सुरवात व्हायची. मराठी माणसांच्या मेळाव्यात मद्रासी वा कानडी बोलणे ऐकले की, तीहि एक भाषा आहे, काव्य-वाङ्मयसमृद्ध आहे; निदान ती चांगली, ही वाईट असा भेदभाव करण्याचे कारण नाही, हे आम्हांस सुचतच नाही. एकदम उपहासाने हसण्यासच सुरवात ! मात्र येथे कोणी कोणास बोल लावावा समजत नाही. वास्तविक गेल्या पन्नासएक वर्षात गांधीजींसारखे युगपुरुष होऊन गेले. विनोबा आज आमच्यात वावरताहेत. त्यांचे तत्त्वज्ञान, विचारसरणी शंभरटक्के पटली पाहिजे असे कोणी म्हणत नाही. पण केवळ समर्थ राज्यकर्ते, शूर सेनापति, असामान्य बुद्धिमान अशा श्रेणीतील हे पुरुष नव्हते. त्याहून अधिक काही ते होते व त्यांचा समाजमनावर परिणाम व्हायला पाहिजे होता. असे असताना अगदी याच काळात नीतिभ्रष्टता, विघातक वैयक्तिकता, परस्पर प्रेमाचा अभाव ही प्रकर्षाने वाढीस लागली, हे का बरे ?

याच विचाराच्या तंद्रीत एकदा अड्यारला त्या महान् वटवृक्षाखाली बसलो होतो. समाजजीवनाची अनुभवलेली अनेक अंगे दृष्टीसमोर तरळत होती. एकदोन राजकीय पक्षात बौद्धिक विभागात काम केले. त्या सन्मित्रांस त्यांच्या पक्षांच्या विचारसरणीसह कायदेमंडळात स्थान मिळावे म्हणून प्रचलित राजकीरण केवळ मतदारांच्या दृष्टिकोणातून मतदारांसमोर उलगडून दाखविले व त्याचा बुद्धिवादी निष्कर्ष आमच्या सन्मित्रांस मते मिळण्यात झाला. त्या श्रमांची जनतेने बूज राखिली होती. लोक समजू लागले होते. आदर्शाची निर्मिति होत होती. इतक्यात आमच्या सन्मित्रांनी प्रत्यक्ष निवडून न आल्याने अन्य पक्षांशी धंदेवाईक व्यवहार केला आणि ते शहाणे ठरले ! विश्वविद्यालयाच्या परिसरातहि सत्तेचे राजकारण धुमाकूळ घालत होते आणि विद्यार्थ्यांची जिमखाना निवडणूकहि त्याच तत्त्वप्रणालीप्रमाणे होत होती ! सामाजिक जीवनाचा एकहि भाग असा राहिला नव्हता की, ज्यात शीलभ्रष्टता, खोटेपणा, लाचखाऊ वृत्ति, सद्‌गुणदमन व दुर्गुणदिमाख यांचा वडेजाव होत नव्हता ! आणि यांचे पर्यवसान कशात होणार आहे ते कोणासहि कळत नव्हते.

मी त्यांना म्हणालो, "मला असे वाटते की, असे काही जीवन जगावे की, ज्यांपासून स्वतःस समाधान मिळेल आणि इतरांस उत्साह वाटेल."

आणि ते म्हणाले, "समाधान म्हणजे काय ?"

मी त्यांना म्हणालो, "चला, आपण एकजीव प्रयत्न करू. माणूस बुद्धिवैभवाने जगावा. निरपेक्ष प्रीति करू. साहाय्य देऊ."

ते म्हणाले, "बुद्धिवैभव ते कोणते ? साहाय्य कसले, कशास्तव ?"

मी त्यांना म्हणालो, "प्रामाणिकता तर ओळखता ना ? मग मी एक प्रामाणिक तपस्वी आहे. स्खलनता कोणास चुकली आहे ? एकमेक विचार करू. अखिलांची सर्वांगीण प्रगति !"

आणि त्यांनी शंका घेतली, "प्रामाणिकता हवी कोणास ? इथला कायदा निराळा. इथे संधि पकड, खोटे चाल, फसवी वागणूक ठेव. नाहीतर नीघ इथून. आम्ही हाकलू तुला."

मी त्यांना म्हणालो, "असे नको. हृदये जोडू. मने मिसळू. विचारांची साथ करू. एकजीव प्रगति !"

ते म्हणाले, "आम्हांस वेळ नाही. सवड नाही. येणार तर हे असे या. नाहीतर आपोआप बाजूला पडालच की !"

आणि मी **मला** म्हणालो, "संभाळ. असे मोकळे कुठे बोलू नको.

हृदय उघडे करू नको. फसवे हास्य असू दे—चौकस कान, चाणाक्ष डोळे, कर एक, सांग दुसरे. अथांग हो. नेटाने पुढे चल. ”

आणि ते आपसात म्हणाले, “ हा माणसात आला. ”

पहाटे एक वाजता पंढरपुरास पोचलो. स्टेशनचा लांबलचक फलाट निर्मनुष्य होता. दूरवर एक रेल्वे-एंजिन ‘ सुंई सुंई ’ आवाज करीत होते. विजेचे दिवे भकासपणे जळत होते. मी सामान स्टेशनवरच ठेवले आणि टांगा करून गावात गेलो. पहाटे-पहाटेच देवालयासमोर उभा राहिलो. पांडुरंगाच्या मंदिराचे दरवाजे अद्याप उघडावयाचे होते. इतक्यात नामदेव पायरीजवळच एक शेतकरी भेटला. मी कोण, कुठला हे त्यानेच प्रथम विचारले. देऊळ उघडायचे आहे म्हणून चंद्रभागेवर प्रथम जाऊ म्हणाला. अंधारातच आम्ही नदीवर पोचलो. समोर प्रवाह दिसत नव्हता. सगळा अंधार ! तसेच पुढे घुसलो.

“ थांबा. पाय बुडवू नका गा. आधी हाताने तीर्थ घ्या. डोळ्याना पाणी लावा. मग शिरा आत ” शेतकरी मित्र म्हणाला. आणि हे म्हणताना त्याने चार आणे काढून पाण्यात फेकले ! ही गोष्ट त्याने मला सांगितली नव्हती. आणि दुसरेहि सांगितले ते मला सांगण्यापेक्षा तो पुटपुटला. लगेच त्याने वाक्य पुरेहि केले. “ सांगणे आमचे काम आहे. जे ठावं आहे ते सांगितलंच पाहिजे. ”

चंद्रभागेस वंदन केले. आता जरा फटफटले होते. चंद्रभागेचे वाळवंट दिसत होते. प्रयागला गंगा—यमुना—सरस्वतीच्या काठी असाच उभा होतो. पाटण्यास गंगामाई मोठमोठी जहाजे वाहत नेताना पाहिली होती. अलाहाबादला द्रौपदी-घाटावर गुरुवर्य रानडे यांची आठवण काढीत बसलो होतो. बनारसला दशाश्वमेध घाटावर गंगेत स्नान केले होते. मैसूर घाटावर सर्वोदयाच्या लहानशा मेळाव्यात गंगामाईस समोर ठेऊन समतेची गाणी गाइली होती. नाशिकाला गोदावरी ओळखीची झाली होती. वाईला कृष्णाकाठी केवलानंद सरस्वतींच्या अंताची ती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीजींनीं लिहिलेली करुण गंभीर कथा आळवीत, आठवीत राहिलो होतो. इंद्रायणीकांठी देहू-आळंदीस अनेकदा विसावलो होतो. भारतीय लोकमातांचे सारे दर्शन, स्नान झाले होते. पण या उजाडत्या सकाळी चंद्रभागेतील वाळवंट जेवढे बोलले तेवढे दुसरे कोणी बोलले नव्हते ! निपाणीच्या अर्धवट कानडी-मराठी मुलखातील तो शेतकरी मित्र आणि एक अर्थशास्त्राचा प्राध्यापक भक्तीच्या त्या ज्येष्ठ व श्रेष्ठ विद्यापीठात चंद्रभागेचे तीर्थ प्राशून विसावले होते. कृषीवलाचा समज माझ्या ज्ञानास हसत होता. त्याची श्रद्धा आणि आत्मविश्वास मला ‘ मी काय मिळवले आहे ’ ते विचारीत होता.

" तुमची ज्ञाति कोणती ? " मित्र म्हणाला.

" मी ब्राह्मण आहे. " शरमेने काळा ठिक्कर झालेल्या चेहऱ्याने मी उत्तरलो.

" मग मी काय सांगू तुम्हाला ? हे मंदिर आणि ही नदी आमचं माहेर आहे, तुकोबा आठवले म्हणजे बापाची याद येते मनात. गेली वीस सालं आमच्या वडिलांनी वारी चुकवली नाही. देहान्त झाला त्यांचा. अस्थि घेऊन आलोय नदीत सोडायला. " त्या चाळिशीच्या पुढे गेलेल्या कष्टकरी कृषिवलाचा चेहरा भावनेने ओथंबला. मळक्या धोतरात बांधून आणलेली वडिलांची ' पांडुरंगनिष्ठा ' त्याने नदीस वाहिली. मी हात जोडले. प्रथम नमस्कार कुणास करावा कळेनासे झाले !

" ही सुळावरची पोळी आहे, देवा. पण नांगर हातात धरला तरी समोर तुकोबा दिसतात. कधी मनाला जाच झाला तर देवळाची पायरी जवळ करावी वाटते. तुम्हास समदी माहिती आहेच म्हणा. "

" होय, तुकोबाच्या अभंगांचे साहेबानं इंग्रजी भाषांतर करून नेलेय. मोठ्या शाळेत गाथेचा अभ्यास करावा लागतो. ' ज्ञानबातुकाराम ' ही आपल्या मराठी रक्ताची खूण आहे. "

आम्ही तेथून उठलो. मित्र अधिक धीराने आता सारे दाखवू लागला. समजावून सांगू लागला. देवळात शिरलो. तो आपल्याशीच मोठ्याने बोलत होता, " ठेवा चपला त्या कोपऱ्यात. गेल्या तरी पर्वा नाही. " त्याच्या दुसऱ्या वाक्यातील समाधान व उत्साह पाहून मी अचंबित झालो. गाभाऱ्यात शिरलो. अनेक कोळणी, माळणी आणि श्रमिक बायका एकत्र बसून जनाईचे अभंग म्हणत होत्या. माझ्या मित्राने मला पुढे पुढे घुसविले. समोर येताच मी वर मान करून पाहिले. काळ्याभोर दगडाची कटीवर हात ठेवलेली ती उंचीपुरी ज्ञानमूर्ति. चेहऱ्यावर म्हणाल तर हास्य, म्हणाल तर दरारा. पण भक्तावर जीव ओतणारा जिव्हाळा मात्र खचित. किती वर्षे झाली ! किती सहस्र जीवांनी आपला माथा पुढे नमविला ! भक्तशिरोमणि संतवृंदांची ती माला. आजच्या केवढ्याहि मोठ्या विद्यापीठाचे कुलगुरुपद सहजपणे भूषवू शकले असते असे ते कवि-महाकवि. माझे देहभान हरपले. देवाला पाहून मी प्रथमच रडलो. कसे अगदी शुद्ध, स्वच्छ, मोकळे झाल्यागत वाटले. त्या पंढरीनाथाच्या पायी डोके टेकवले आणि वाटले की, त्या देवश्रेष्ठाच्या लक्षावधि भक्तांचा आशीर्वाद माथी पडत आहे.

तो शेतकरी मित्र नंतर मला घेऊन देऊळभर हिंडला. केवळ भाबडे अज्ञान तो बोलत नव्हता. तो सुज्ञ होता. मानदार असामी होता. वाचले नसेल त्याने. पण विचार केला होता. त्याचा विचार त्याच्या रोमारोमात होता आणि मुख्य म्हणजे भक्तीच्या गंगेत त्याचे अखंड अवगाहन चालले होते. हीच मुक्ति. "गंडकीच्या पाण्यांत राहून शालग्राम वाटोळा गुळगुळीत होतो; पण भिजत नाही. तसे सत्संगतीत राहून आम्ही सदाचरणी होऊ, पण एवढे पुरेसे नाही. भक्तीने भिजले पाहिजे" विनोबा म्हणतात.

पसरणीच्या घाटमाथ्यावर सूर्यास्ताची वाट पहात एका डोंगरकड्यावर बसलो आहे. हिरवीगार झाडी चौफेर आहे. दूरवरच्या दऱ्याखोऱ्यातील झाडीची दाटीवाटी काळीच दिसते आहे. निळसर झाक डोंगरमाथ्यावर पसरली आहे. शांति आहे. काय करावे समजत नाही. त्या विशाल सृष्टिरूपाच्या सान्निध्यात अतिशय बेचैन वाटते आहे......

कधी कधी वाटते की, त्यांना हाक मारून समोर बसवावे. एक, दोन, तीन असे मुद्देसूद विवेचन त्यांच्यापुढे करावे. कुणाचे दोष विवरावे. कुणाचे गुण टिपून घ्यावे. शेवटी तात्पर्यरूपाने त्यांना काही ऐकवावे. चर्चाचर्वण झाल्यावर सभा आटोपती घ्यावी!

कधी कधी वाटते की, छे! तसे काहीच करू नये. त्यांची बोलणी सुरू झाली, गलगा कर्णरंध्रे फाटतील अशा पंचमात शिरला की, हळूच पाय न वाजता तेथे जाऊन बसावे. एकेकाचे बोलणे सर्वांगाचे कान करून ऐकावे. एकेकास आमूलाग्र पिऊन घ्यावे. गिळून घ्यावे. स्वतःशीच हसावे. आपल्याशीच चर्चा करावी. आपला कोनाकोपरा बऱ्यावाईटाच्या विवेकाने उजळून घ्यावा. आणि ते सारे उठले की, आपण आपल्याच नादात तिथून उठावे आणि निघून जावे!

कधी कधी वाटते की, ते काही नकोच. ते नकोत, त्या सभा नकोत, चर्चा नकोत. आपण आपले तिकडे दूर दूर जाऊन बसावे. समोरच्या अचेतनाशीच सहानुभूत व्हावे. त्यांना खेळवावे. त्याशी हसावे. त्याबरोबर रडावे. आणि खेळून ते सारे गुंगले की, हलक्या पावलांनी तेथून उठावे!

कधी कधी वाटते की, बंड पुकारावे. हे पहाड आणि डोंगर लाथेने उडवून द्यावेत. समुद्रात नेऊन ओतावेत आणि तो बुजवून टाकावा. अवखळ आणि उनाड एकसारखा खिदळत असतो! पण तेवढ्याने काय झाले! त्याच्या पोटातील ते रुपेरी मासे ओंजळीनी भरभरून बाहेर फेकून द्यावेत. आणि श्वास

कोंडल्याने ते तडफडू लागले की, त्यांच्या नरडीवर पाय रोवावा. तुडवावे. मग सारी रत्ने बाहेर काढावीत आणि कुटून कुटून त्यांची माती करावी. मग माचणावर उभे राहून ती वावडीवर धरावी आणि दाही दिशांना विखरून विखरून टाकावी !

आणि शेवटी वाटते की, आता पुरे. थकलो ! आता उठावे आणि चालू लागावे. कुणाचा निरोपसुद्धा घेऊ नये. ती बारीक पाऊलवाट दिसते ना तिने आपले सरळ सरळ चालू लागावे. दूरवर तिथे बसून राहावे आणि बसून बसून आळून जावे आणि वाळून जावे.

जाताना मात्र हे काहीसे खरडलेले कागद आहेत ना ते सारे घ्यावेत आणि पाठीशी बांधून न्यावेत. मग तेथून ते काढावेत आणि पोटाशी धरावेत. आणि आपण बसून बसून वाळून गेलो म्हणजे ते आपले वाऱ्यावर डोलत डोलत तेथून निघतील आणि इथे येऊन पडतील.

आणि ते मघाचे सारे त्याच्या पोथ्या बांधतील !

आणि अशीच त्यावर चर्चा करतील, गलगा करतील आणि भांडून भांडून थकतील.

आणि ती कोपऱ्यांतील समई तेव तेव तेवेल !

• • •

३८८०३ ४२-५५१५७.
३०/८/६३.

२

*

# आदिवासी आणि एक प्रवासी

मुंबईहून निघालो तो डहाणू रोड स्टेशनवर उतरलो आणि जीपमध्ये बसलो. जीपमध्ये दुसरे दोघेजण स्थानिक समाजसेवक होते. शिक्षणतज्ज्ञ आणि ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजात काम करणारे. जीप वेगात जाऊ लागली. कासे या खेडयाच्या दिशेने आम्ही चाललो होतो. दोन्ही अंगांस घनदाट जंगल. उंच आणि सरळसोट साग हे त्या जंगलाचे खरे रहिवासी ! पण जंगल म्हटले की डोळ्यांपुढे उभे राहाणारे प्रचंड वृक्ष, हिरव्या झुडपांच्या जाळ्या आणि तऱ्हे-तऱ्हेच्या वृक्षराजींनी परस्परांशी केलेली ती सलगी—असा काही प्रकार दिसेना ! एक धूसर, मलिन, उदास वातावरण ! मन अंतर्मुख करणारे. अमळशाने कासे या खेडयात आलो. विस्तीर्ण जंगलात मलिन झोपड्या, त्यांत वावरणारे ते अर्धनग्न खेडूत. मुले आणि मोठी माणसे यांच्या वेशात फारसा असा फरक कपड्याच्या अधिकउणेपणाच्या बाबतीत नव्हताच. पण पुरुष आणि स्त्री हाहि भेदभाव, अष्टौप्रहर केवळ निसर्गजीवन जगणारे ते आदिवासी फारसा जाणीत नव्हते. गरजा कमी. शिक्षण म्हणजे काय ? आणि ते हवे असते कशासाठी ? सामूहिक जीवनाचे प्रश्न होते खरे; पण नागरी सुसंस्कृत समाजाचे असतात त्यांहून अगदी निराळे. जीवनाची सारीच अगदी प्राथमिक अवस्था.

हेच आदिवासी सातपुडयाच्या गिरिकुहरात पाहिले, उत्तर गुजराथच्या उत्तर सीमेवर 'सणाली'च्या चतुःसीमेत पाहिले. जिथे संसृतीचा दिनप्रतिदिन चढतावाढता आविष्कार दिसायचा आणि आजच्या छापील सुधारणांचा वापर उद्याच्या प्रातः-काळी वेषभूषेत आणि वागण्याबोलण्यात पुरस्कृत व्हायचा, त्या या गतिमान संसारात हे भूमिपुत्र अजूनहि ' स्वरूपी ' च राहात आहेत.

कासे खेड्यातील ती संध्याकाळ. गवताच्या विस्तीर्ण मांडवाखाली आम्ही बसलो. आदिवासी मुले एका ओळीत बसली. शेजारीच काही प्रौढहि रांगेने बसले. धरतीची ती लेकरें आपली मानवनिर्मित लक्तरें सावरीत आणि चेहऱ्यावर कुतूहल पांघरीत बसून राहिली. पुढे काय होणार याची वाट पाहात. शेजारील शहरातून धूतवस्त्रे पांघरून येणारी ही सोज्वळ मंडळी त्यांच्या परिचयाचीच होती. ती येतात, काही उपदेशामृत पाजून निघून जातात, हे त्यांच्या अंगवळणी पडलेलेच होते. त्यामुळे चेहऱ्यावर पांघरलेले निरागस कुतूहल आतून कुठून तरी ढवळून निघत होते. 'वाट पाहाणे' हाच त्यांचा स्थायीभाव. आज कित्येक शतके ते वाटच पाहात आहेत! काही होत नाही. काही घडत नाही. कोणी सेवेचा मार्ग सांगावा, कोणी हिंसेचा आग्रह करावा. म्हणाल तर दोघेहि तळमळीने बोलणारे. दोघेहि पदरास खार लावून इथे धडपडणारे. पण प्रकाश अद्याप दिसत नव्हता. दोन्ही वेळची चूल अजून थंडच होती. एखादा अंगभर कपडा अजूनहि दुरापास्तच होता. एखादा जमिनीचा तुकडा मिळावा तर त्याची उसाभर करण्यास लागणारा पैसा नव्हता. हाती थोडा पैसा असलाच तर सर्वस्व विसरवू शकणारा ताडीगुत्त्याचा रस्ताच अधिक जवळचा वाटत होता. अधिक शांति देणारा. अधिक सुख देणारा.

शतकांच्या उपेक्षेने, मानवी देहधारी, पण पशूंचे जिणे जगणारा तो विशाल समाज आणि शेजारी पुढारलेले, सुसंस्कृत, पुरोगामी असे आम्ही. आमच्यामधील अंतर फार मोठे खरे, पण ते दूर करण्यास बद्धपरिकर झालेले आम्ही. आम्ही आता त्यांची सुधारणा करणार. त्यांना आमच्या रांगेत आणून बसवणार! आदिवासी प्रवासी बनवणार! प्रगतीच्या मार्गावर त्यांची घोडदौड सुरू होणार! असे एक जगत् तयार होणार की, जिथे कोणी उंच नाही, नीच नाही; कोणी नतमस्तक नाही, कोणी उन्मत्त नाही. ('भुकेपेक्षा भ्रम बरा!')

निमिषार्धात सारी सभा शांत झाली. सर्वांनी डोळे मिटले. क्षणभर चित्त एकाग्र केले. साऱ्या प्रौढ, बाल, सुधारलेल्या, मागासलेल्या कंठातून एकाच स्वरात घनगंभीर आणि खोल लकेर उमटली—

**"ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्**
**तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्यस्विद् धनम्"**

पाहाता पाहाता चित्त एकाग्र झाले. सारे विसरले. त्या घनदाट जंगलात डोंगर आणि वृक्षराजी यांना साक्ष ठेवून—नव्हे त्यांच्याच साथीने आम्ही केलेले समाजपुरुषाचे ते आवाहन. पण त्याहिपेक्षा मन मोहोरले, बधिर झाले, ते या

विचाराने की, हजारो मैल दूर असलेली ही आदिवासी मने प्रथमच संस्कृतीशी संबंध जोडीत आहेत. त्यांच्या मुखीचे ते वेद आणि उपनिषदे ऐकून भोवतालची ही झाडे पळभर निश्चल झाली. डोंगराच्या खड्या रांगा पाषाणवत् उभ्या राहिल्या. माणसा ! तूच माणसांचे काय हे केलेस ? या इथे पहा. चारी बाजूस नजर टाक. काय दिसले तुला ? झाडे आणि झाडे. होय. अरे, तुझ्या जगात काय भेदाभेद असतील असे भेदाभेद तुला या विश्वात दिसतील ! पाहिलीस ही उंच सरळसोट झाडे ? आणि चौफेर धाव घेणारे हे वृक्ष ? काहींची पाने मोजशील तर दोन्ही हातांची बोटे मुडपलीस की काम झाले ! आणि या चिंचेच्या गार वृक्षाच्या छायेत बसलास तरी वरील पर्णराजी मोजण्याची कल्पनाच तुला हास्यास्पद वाटेल. पानांचे गणित राहू दे. रूप-गंधाचा विचार कर. रंगाचा तलास लाव. तुझे नेत्र विविधता पाहून थकतील. तुझे मानस ओळख पटविता पटविता मरगळेल. पण तरी तुला या निसर्ग-विश्वाचा ठाव लागणार नाही. पण हे सारे वैविध्य किती एकवट झालेले आहे ! इथे लतावेलींनी खुशाल आपल्या माना वृक्षराजींवर टाकाव्यात. सागाची सोबत करीत वड-पिंपळ उभे असतील आणि पिंपळावरचे मुंजे गुलमोहराच्या रंगीत लीला पहात राहतील. कशाचीहि ना खंत ना खेद ! हेही एका अर्थी आदिवासीच नव्हेत का ? यांचा उद्धार कोणास करावा लागला नाही आणि यांची संस्कृति कोणास सुधारावी लागली नाही. संस्कृतीच आपल्या गळ्यात बांधण्यासाठी दसरा-दिवाळीला या आम्र-वृक्षाची पाने तोडून नेते. तुझ्या घरातील परमार्थवाट या इथल्या काळ्या मातीने अनेकदा होमकुंड होऊन सावरली आहे. ही तुझ्या अलिशान बंगलीतील कापून-छाटून आणि घासून-पुसून तयार केलेली रोपटी नव्हत की, जी सुधारणेचा वारा पिऊन ‘ माणसात आली ’ म्हणावीत. हा निसर्गाचा रोखठोक मामला आहे. डोंगरकपारीतून पाणी वाहावे आणि स्वयंभू बी रुजून त्याचा वृक्ष बनावा. जसा एक तसे अनेक. आणि त्यांचे हे विस्तीर्ण, भयानक, घनदाट जंगल !

पण ते जंगल पाहा आणि हे जंगल पाहा. इथे माणसामाणसावर नावे आहेत. कारण आम्हाला बुद्धि आहे आणि आम्ही विचार करू शकतो. तिथे देवाने दिलेले साऱ्यांनी घेतले आहे. जेवढे आवश्यक तेवढे आणि जेवढी शक्ति तेवढे. इथे आम्ही हातात सोटा घेऊन फिरतो. असा चालू नको, तसा वागू नको; इतके काम कर आणि साराच आराम कर. मग काही आदिवासी, अप्रगत; काही शहरवासी प्रगत, उच्चभ्रू. मग काही परोद्धाराचे कंकण बांधून स्वतःची एक जमात बनवतात; जमात फुगत जाते आणि तिलाहि स्वतःचे कायदे आणि विशिष्ट फायदे उपलब्ध होतात. सारा धंदा. एक फायदेशीरपणे चालणारा निव्वळ व्यापार, अव्यापारेषु व्यापार......

...माझी आह्निके आटोपली. आता मी बाहेर पडलो. एकटा, डोक्यातील उध्वस्त विचारांची सोबत घेऊन. तृणाच्छादित चंद्रमौळी खोपटातून वेडीवाकडी वळणे घेत जाणारा तो दूरवरचा रस्ता हाच माझा एक जिवंत मित्र.

दूर नभाच्या खाली
तुडवित धरणी, ठेचित वाटा ..
भिरभिरणारा प्रमत्त वारा
प्राशुनी हावऱ्या भावे...
मला वाटते, असेच आपण
अविरत चालत जावे !

एकटा चालून चालून मी दूर जाऊन वळलो. वाट सोडून किंचित् बाजूस बसलो. त्या टेकडीच्या उंचवट्यावर पाय सोडून बसलो. केवढया विस्तीर्ण भूप्रदेशात मी एक चुकलेला प्रवासी होतो ! दृष्टि पोचेल तेथवर हिरवेगार. केवळ रसरशीत हिरवेगार ! नुकताच पाऊस पडून गेला असावा. दूरवर एका खड्ड्यात पाणीच पाणी साचले होते. टेकडीच्या पायाशी झुडपाच्या झावळ्यात एखादे खोपट असावे. त्याचे ठिकाण दिसत नव्हते. पण तेथून वर, उंच जाणारा धूर त्या निसर्गाच्या राउळात माणसाच्या धडपडीची (की तडफडीची) याद देत होता. अगदी शांत, प्रशांत स्तब्धता ! दोन्ही डोळ्यांच्या दृष्टिक्षेपेत मावणारी पण कितीतरी विशाल अशी एक अभंग, एकात्म, चेतनामय शांति ! डाव्या हातास एक करडूं अकस्मात् उडी मारून आलें आणि मला पाहताच अंमळ दचकले ! 'बें ऽऽएं' करून ओरडले. क्षणभर निश्चल उभे राहिले. एकटक अनिमिष नेत्रांनी मजकडे पाहात. आमची दृष्टादृष्ट झाली. दोन दृष्टि सजड देहांना टाकून एकमेकीत मिसळल्या. केवळ दोन चेतना एकरूप झाल्या. त्या भुरक्या करडाचा तो निरागस भाव, कुतूहलजनक दृष्टि आणि पळभरच झालेले आत्मविस्मरण. देहआत्म्याचा वाद मला कळत नाही, पण त्या विशाल सृष्टीच्या एकात्म चेतनेचा एक अविभाज्य अंश एवढीच जाणीव त्या करडाच्या नेत्रात होती. आणि आश्चर्य असे की, या जाणिवेचा प्रामाणिक व सहज आविष्कार करडाच्या दृष्टीत होता; माझ्या माणसाच्या दृष्टीत नव्हता. अगदी दूरवर कोणास तरी दीर्घ हाक मारल्याचा आवाज आला. ती आर्त हाक सशब्द नव्हती. केवळ भावमय ललकार. त्यात ना राग ना लोभ. ना आग्रह ना लाचारी. केवळ एक संबोधन—ध्वनि !

सूर्य वेगाने क्षितिजाखाली गेला. ताप आता अगदी सह्य झाला होता. एक तांबूस गोळा आणि त्याच्या रक्तवर्णी शलाका ! धूसर संधिप्रकाश मागे ठेवून

आणखी एक दिवस अखंड दिनमालिकेत लुप्त झाला. अगदी निर्लेप अलिप्तपणे शतशतकांची संसृति केवळ पाहाणारा तो सर्वसाक्षी नाहीसा झाला !

यास काय म्हणावे ? हे सृष्टिसौंदर्य वाटत नाही की जे शब्दाशब्दांच्या गोधडीत शिवून पुनःप्रत्ययासाठी वारंवार इतरेजनांसमोर पसरावे. हे काही तत्त्वज्ञान नाही की 'जे प्रत्यक्ष पाहिले' त्यास विसरून, त्याच्या स्मृतींना तर्करज्जूंनी चौफेर आवळून त्याचा एक गुच्छ विचारार्थ पिढ्यान्‌पिढ्यांच्या हवाली करावा. हे काव्यहि नव्हे की ज्याचा स्वर आणि स्वर भावमयतेच्या तारांवर छेडावा वा आळवावा. जे पाहिले, अनुभवले, ते तत्क्षणीच जाणवले. त्याच्या सर्वंकषतेची जाण आली. त्या सृष्टीच्या विशाल आत्म्याची एक सहज संवेदना एवढीच स्वतःची जाणीव वा नेणीव ते पाहात असताना उरली होती. ती अनुभवली आणि तेव्हाच सारे संपले.

साने गुरुजी म्हणत असत की, अशा विशाल सृष्टिरूपाचा प्रत्यय घेत असताना गवतावरील एक दवाचा थेंब जसा असावा तसे असावेसे वाटते. आणि तो जसा नाहीसा होतो तसे पाहाता पाहाता संपावेसे वाटते. नाहीसे व्हावे वाटते. विशाल सृष्टयैक्याची ही अतिसहज व प्रवृत्तिहीन वांछा होय...

**" माझे असतेपण लोपो । नावरूप हारपो ।**
**मज झणें वासिपो । भूतजात ॥**
**ऐसी जयाची नवंसिये । जो नित्य एकांता जातु जाये ।**
**नावेंचि जो जिये । विजनाचे नि ॥**
**वायू आणि तया पडे । गगनेंसी बोलो आवडे ।**
**जीवें प्राणें झाडे । पढियंती जया " ॥**

सहाशे वर्षांहून अधिक काळ गेला. पण ज्ञानदेवांची ही भूक अगदी शंभर टक्के प्रत्ययास येते. आजहि त्यातील अक्षरन् अक्षर पटते. जाणवते. विनोबा म्हणतात,

" समोरच्या झाडाच्या पानात जो वेदमंत्र वाचू शकतो, त्याला वेद समजला ! "

मी त्या प्रशांत समाधिस्थानावरून उठलो. पुन्हा माणसाच्या जगात परतलो. उडत्या बगळ्यासारख्या उडून जाणाऱ्या या क्षणाक्षणातून क्वचित् कधी अनंताचा साक्षात्कार झाल्याचा भास होतो. देहवैकल्याचा वारा मनास पकडून बंदिस्त करून 'रुक्ष जगाच्या रेताडातच' डांबून ठेवतो. पण त्याची नजर चुकवून ते तरीहि उडून जाते. कुठेतरी प्रकृतीबाहेर पडून पुरुषाशी एकत्व सांधते.

चिरंतनाचा स्वाद घेऊन अंमळ सुखावते न सुखावते तोच त्याला प्रकृतिधर्मात गुरफटावे लागते. मग ' ते हरपले श्रेय ' पुन्हा शोधून काढणे, धुंडून काढणे हाच त्याचा एकमेव व्याप उरतो. हाच पाठशिवणीचा खेळ त्याला खेळावा लागतो.

मी एक प्रवासी आहे. सोमनाथ ते दक्षिणेश्वर, मदुरा ते हरिद्वार वाटचाल केली. कधी देशोदेशींचे लोक पाहिले. कधी केवळ राने, अरण्ये तुडविली. कधी कोणी तपस्वी शोधून त्याच्याबरोबर राहिलो. कधी कोणी मनस्वी दिसताच थांबून कानोसा घेतला. एकांतात वा लोकांतात विश्वरूप पाहाता पाहाता आत्मरूपाची ओळख पटली. काही नवीन जाणवले, अनुभवास आले. कधी अड्यारच्या विशाल वटवृक्षाखाली ते दिसले, कधी काशीपूरच्या स्मशानात परमहंसाच्या समाधीशेजारी जळताना ते पाहिले आणि बव्हंशी इंद्रायणीकाठी त्या दोन महामनांच्या आश्रमात ते लाभले. या साऱ्या लाभास खरा रंग भरला तो कृष्णमूर्तींच्या त्या पावन, प्रेमळ वाणीने. त्यांच्या प्रवचनातून बरसणारी शांतिसुखाची ती धार आणि प्रत्यक्ष सहवासातून मिळणारी ती खरी माया. आता जे जे करावे, पाहावे, बोलावे ते ते निरर्थक वाटते, जाणवते. ही नैराश्यता खचित नाही. ते वैफल्यहि नसावे. कारण त्याचा परिपाक व्यष्टि वा समष्टि यांना विघातक अशा कृत्यात झालेला नाही; काही व्यक्तिगत जबाबदाऱ्या धुडकावून दैवी नैराश्याच्या नावाखाली पळपुटेपणा उरी कवटाळण्यातहि झालेला नाही. पण आता शांत वाटत नाही. सर्वांची निरर्थकता जाणवते. वाढता व्यामोह गोंधळ आणखीनच वाढवतो.

याच अर्थाने पुनश्च मीहि एक आदिवासी झालो आहे. आदिवाश्याचा हा प्रवास कुठे संपणार, कसा संपणार समजत नाही. पावले उचलावीत आणि टाकावीत ही कंटाळवाणी कसरत चालू आहे. लोकोद्धाराचे प्रयत्न आजवर अनेक झाले. आता त्याचा संघटित व्यापारहि चालू आहे. हे प्रयत्न आणि या संघटना, जे नष्ट करावे वा सुधारावे म्हणतात त्याच्याच अस्तित्वाचे सातत्य वाढवीत आहेत. " जुन्या बाटलीतून नवी दारू, " " जुनी गिरमिटे नवीन वळसे. " बंधविमोचनाच्या साऱ्या चळवळी, ' बंधा'चे प्रकार प्रत्यही बदलीत आहेत, फार तर अद्ययावत् सुधारून देत आहेत म्हणावे. आता समष्टीस कवेत घेऊन तिच्या आघाडीवर झेंडा घेऊन चालण्याऐवजी आपल्या ठिकाणीच आपल्या शृंखला टाकता येतात का ते पाहाणे बरे. शृंखलामुक्त मनमयूर पाहाता पाहाता एखाद्या मुक्तक्षणी उडून जाऊ शकेल. जावा. जरूर जावा. तोवर—

**दूर नभाच्या खाली**
**अशीच माझी प्रत्यही चाले नष्ट पायपीट**

खुल्या अंतराळी
विचारचक्रे करकर करकर पिंजती माझे माथे
मला न ठावे
आटापिटितुन माझ्या असल्या काय मनी उमलावे !
परी वाटते, अगदी निश्चित
भ्रामक नाही चाल श्रमाची
पायपीटहि नाही फुकाची
मंथन चाले जेथे जेथे, घुसळण ज्या ज्या ठायी
सार तयाचे आज उद्या रे, खचितच उमलुन येई.

• • •

३

★

# ‘गीर’ कुहरांतील अनिद्रित ‘हरि’....

सौराष्ट्र मेल धाड् धाड् धावत होती. झपाट्याने शेजारचे वृक्ष मागे पळत होते. दूरध्वनीच्या तारा वरखाली वाहात वाहात मधूनच उभ्या खांबाशी धडका घेत होत्या. चाकांचा एक ठराविक आवाज; त्याची डोक्यात जाऊन बसणारी ती लय! क्षणभर डोळे मिटले की, चालू असलेल्या प्रवासाचा आदि आणि अंत पूर्ण विसरला जात होता. केवढे सौख्य असते या विस्मरणात! एका गतीवर आरूढ झालेली मनाची लयकारी. ही लय आणि गति हीच काय ती सत्य. या गतिमानतेस शेवट असेलच कसा? निदान असू नये! पण ते भाग्य प्रत्येकाचे कोठून असणार? बसल्या जागी, मिटल्या डोळ्यापुढे आणि शांत स्तब्धतेतहि आत्म्याचा परमाणु गतिमान अवस्थेत अनुभवण्याचे भाग्य एखाद्या सिद्धाचेच!

रात्रभर एकसारखे धावून मेलगाडी सकाळी विरमगामला उभी राहिली. आजच्या वेगयुगात हजारो मैलांचे अंतर कापणे म्हणजे केवळ पोरखेळ. वाटेतील पहाड-पत्थर म्हणजे कोणत्या झाडाचा पाला! आडव्या येणाऱ्या लोकमाता केवळ क्षणार्धात पार कराव्यात; रुक्ष वाळवंटे असोत, सुपीक कुरणे असोत किंवा सागराच्या अधेमधे घुसलेल्या खाड्या असोत. पट्टीच्या जादुगाराच्या हस्तलाघवाचा प्रथम पंधरा मिनिटे अचंबा वाटतो. नंतर ‘हा काय हवे ते करू शकतो’ या समजापोटी कशाचाही अचंबा वाटेनासा होतो. आजचा प्रवास, हे हजारो मैलांचे अंतर तोडणे, ही धावाधाव, अशीच एका ठराविक कुग्राम नंतर जाणवत नाही. मन बधिरच होते. बाजूस येणारे स्टेशन, एखादे काळाअसो वा अद्यावत् नगरी असो, वेदविद्येचे माहेरघर असो वा गिरणगाव असो,

एका ब्रह्माचा हा पसारा तसे दोन फलाट, मध्ये बैठे घर, थोडी तांबडी-हिरवी निशाणी आणि प्रायः तेच ते आळसावलेले, ओढगस्त जीवन म्हणजे ही स्टेशने. पावलापावलावर भाषा बदलते, जीवन बदलते. आजच्या यंत्र आणि वेगयुगात पावलापावलावरील भिन्नतेचा एकच एक लघुतम साधारण विभाज्य म्हणजे हजारो मैल धावून रेलगाडीने मारलेला एक झपाटा. भिन्नतेतील इतकी कंटाळवाणी एकता अन्य कोणीहि शोधून काढली नसेल !...

गाडी बदलून वेरावळच्या दिशेने आम्ही जात आहोत. आधल्या रात्रीचा तो वेगवान् प्रवास अजूनहि डोक्यात आहे. कारण, आताचा हा उभ्या दिवसाचा रे, रे करीत चालू असलेला प्रवास फार कंटाळवाणा वाटत आहे. एका-आड एक स्टेशन जंक्शन आहे. उभी गाडी चालू होते केव्हा आणि चालू गाडी थांबते केव्हा समजत नाही. संध्याकाळी जुनागडला उतरलो. एका विख्यात भूतपूर्व नबाबाच्या त्या राजधानीत नबाबी अवशेष चोहीकडे दिसत आहेत. नबाबाच्या ' विश्रांतिगृहा 'त एक रात्र विसावा घेतला. पण सारे लक्ष आहे ते गीरच्या जंगलाकडे. मानवी राजवटी सत्तीने व झपाट्याने नष्ट झाल्या तरी या वनराजाच्या हुकमतीस सरकारी संरक्षण मिळाले आहे ! गीरच्या जंगलातील सुमारे तीनशे सिंह सुखाने कालक्रमणा करीत आहेत. राजाची ऐट आणि रुबाबातील राजा पहावासा वाटला की, माणसाना आता जंगलाची वाट धरावी लागत आहे ! साध्या पौरजनांचे सोडा, पण प्रत्यक्ष देशोदेशींचे राजे आणि राण्या वाकडी वाट करून गीरवनात जातात आणि त्या वनकेसरीची सहजसिद्ध ऐट पाहून स्वतःच्या मोलाच्या आणि उसन्या राज-राज्ञीपदाची लाज धरतात ! गीरचे जंगल आणि त्यातील ते तीनशे सुहृद् ! आजची ही सर्वांत विचित्र तीर्थ-यात्रा आहे....

एका सुंदर सकाळी जीप मार्गस्थ झाली आहे. संध्याकाळी सहाच्या सुमारास अरण्यातील त्या विशिष्ट जागी पोचण्याचा विचार आहे. ठराविक वेळी अगदी हुकमी ' सिंहावलोकन ' करावयाचे, तर एखाद्या जागी दररोज रेड्याचे आमिष बांधून सिंहराजांच्या आगमनाचे वेळापत्रक तयार करावे लागते आणि मग निर्बुद्ध मानवी प्रयत्नास आलेले ते ' गॉडस ' पाशवी फल पहात आपल्या मनाची करमणूक करावी लागते ! वन्य प्रदेशात जाऊनही आपल्या यांत्रिकतेस न भुलणाऱ्या या कार्यक्रमात रम्य काहीच नाही. रौद्रही काहीच नाही. हा मार्ग आम्हाला कधीच आकर्षक वाटला नाही. त्यात सहजता नव्हती आणि मुख्य म्हणजे खेळाच्या प्राथमिक नियमांचेही पालन त्यात नव्हते. हा मार्ग दुसऱ्या अर्थानेहि सहज नव्हता. त्यात पत्रव्यवहार, परवाने, तारखा निश्चित करणे आणि अन्य उपाधि बऱ्याच होत्या. एवढी कंटाळवाणी, कृत्रिम यातायात करून

अमक्या दिवशी अमक्या वाजता वनराज सिंहाचे कुटुंबभोजन पाहाण्यापेक्षा माहीमच्या पटांगणातील एखाद्या रॉयल सर्कशीत वाघ, सिंह, शेळी आदींचे सहभोजन पाहणे कमी जिकीरीचे आणि खर्चाचे होते !

हे टाळावयाचे तर संध्याकाळी सहा ते आठ त्या विस्तीर्ण जंगलातील एका विशिष्ट ठिकाणी जाऊन बसावे लागते. आपले संध्याकाळचे जेवण आटोपून वनराज त्या ठिकाणी पाणी पिण्यास येतात. ' सांजबेडा ' हे त्या ठिकाणाचे नाव. साधारणतः अंधार पडताना ' सांजवेड्या ' स जाऊन पोचावे, असा बेत आखला आहे. त्यामुळे दुपारी प्रभासपाटण व त्याचा आसंमत पहाण्याचा विचार आहे. दुपारी बारा वाजायच्या सुमारास ' भालकातीर्थास ' पोचलो. एका अगदी लहानशा मंदिरावर मजकूर आहे की, ' भगवान् श्रीकृष्ण इथे समाधि लावून बसले असताना एका भिल्लाने त्यांना दुरून पाहिले आणि हरीण समजून बाण मारला ! ' एका थोर जीवनकथेचा त्या ठिकाणी अंत झालेला आहे. समोरच्याच एका चौथऱ्यावर डोळे मिटून बसलो आहे. काही काळ नामस्मरण केले. श्रीकृष्ण-चरित्र झपाट्याने डोळ्यापुढून जात आहे. मानवी जीवनातील सारी सामर्थ्ये आणि दुबळेपणा भगवान् कृष्णाच्या चरित्रात सापडतात. देवाचे इतके मानवी चरित्र माझ्या मते खिस्ताशिवाय दुसऱ्या कोणाचेही नाही. म्हणूनच ते अगदी खरे खरे वाटते. ते वृंदावन, मथुरा, गोकुळ; ती यशोदा आणि देवकी ! माणसा-सारखे बालपण, देवासारखे थोरपण. ते कुरुक्षेत्र आणि मानवी जीवनाचे अप्रतिम भाष्य असलेला कुरुक्षेत्रावरील तो सारथीसैनिक संवाद ! अहाहा ! श्रीकृष्णा, भारताच्या ऐक्याची सहजता तुझ्या काळी किती सहज स्पष्ट होती ! अथवा मथुरा-द्वारकेचे हे एकत्व तुझ्या काळी तरी काय सहज साध्य होते ? भाषा, भौगोलिक अंतर आणि राजाराजांतील वितुष्टे यामुळे आजच्यापेक्षा त्या काळी हे प्रश्न खचित् सोपे नव्हते. पण सोपे होते जीवन; माणसामाणसातील समज आणि संस्कृति ! श्रीकृष्णाने प्रभासपट्टणात आपला देह ठेवला इतके जरी सर्वमान्य असले, तरी नक्की त्या जागेचा ठिकाणा नाही. त्याबद्दल स्पष्ट व नक्की उल्लेख नाही. मात्र सोमनाथनजिकचे हे ' भालकातीर्थ ' त्याच्या मृत्यूचे ठिकाण मानले जाते. तेथून त्याचा पार्थिव देह नजीक असलेल्या हिरण्या, सरस्वती व कपिला या नद्यांच्या ' त्रिवेणी ' संगमावर नेला व तेथे त्यास अग्नि दिला !

या ठिकाणास ' देहोत्सर्ग ' म्हणतात. सध्या सोमनाथ देवालयाप्रमाणेच येथेही सरकारी बांधकाम चालू आहे. सर्व बांधकाम पुरे झाल्यावर एक शोभनीय स्मारक इथे होईल, असे सध्याच्या योजनेवरून दिसते.

त्रिवेणी आणि भालकातीर्थ पाहून सोमनाथकडे तोंड वळवले. पांचएक मिनिटातच सोमनाथच्या प्रशान्त आवारात जीप उभी राहिली.

सोमनाथ ! जे गझनीच्या महमुदाने फोडले ते आजच्या भव्य स्वरूपात सरदार पटेलांनी उभे केले ! ‘ कालाय तस्मै नमः ! ’

सोमनाथचे भव्य मंदिर डोळ्यापुढे आहे. मंदिर खरोखरच चांगले आहे. शांत, स्वच्छ आणि पवित्र. देवापर्यंत पोचण्यापूर्वी अनेकविध व सहस्रशः भिकाऱ्यांचे आणि रोग्यांचे दर्शन करावे लागत नाही. आत पोचल्यानंतर पंड्या-पुजाऱ्यांच्या छळास तोंड द्यावे लागत नाही. कदाचित् जत्रे-यात्रेचा तो काळ नसल्याने आमची यात्रा सुखद होत असेल. पण एकंदरीत मन प्रसन्न आहे, शांत आहे. आवारातील एका कोपऱ्यात छोटेसे सरकारी ‘ गेस्ट हाऊस ’ आहे. एका खोलीत सामान टाकले आणि समुद्रस्नानास निघालो. मंदिर आणि सागर यांमध्ये मंदिराच्या आवाराची लांबच लांब भिंतच काय ती उभी आहे. पलिकडे निळाभोर अथांग सागर. भर दुपारची वेळ असल्याने समुद्रस्नानास मजा वाटत आहे.

दहापांच असेच प्रवासी जवळ स्नान करीत आहेत. स्नान आटोपून खोलीवर गेलो. पुन्हा साध्या पाण्याने स्नान केले आणि दुपारच्या आरतीस देवळात पोंचलो. शें–पन्नास भक्त हजर असावेत. नव्या कोऱ्या गाभाऱ्यात भव्य पिंडी आहे. पिंडीवर तिबोटी गंध लावले आहे. आणि झांजा, नगारे व घंटा यांच्या नादात आरती चालू आहे. हे मंदिर अगदी खरे ‘ राष्ट्रीकृत ’ ( Nationalised ) आहे. कोणाची खाजगी मक्तेदारी इथे नसल्याने इतर महत्त्वाच्या देवालयांप्रमाणे मूर्तींच्या हातापायाजवळ एकेक पुजारी उभा राहून मूर्तीचा लिलाव पुकारताना व दामासाठी दंड वापरताना दिसत नव्हता. कानात कोणी बोलल्यासारखे ऐकू आले.

“ सरकार, खाविंद, म्हणाल तितक्या मोहरा आणि रत्ने पायावर आणून ओतू पण देवास धक्का लावू नका. ”—देवालयाचे पुजारी.

“ खामोश ! ए काफर, हा गझनीचा महमूद मूर्ति फोडणारा म्हणून इतिहासात राहील. मूर्ति विकणारा म्हणून नव्हे. ”

—त्या पुजाऱ्यांचाच एक वारस-प्रतिनिधि घंटानादासह हातातील दशमुखी निरांजन ओवाळत आहे.

‘ राजा कालस्य कारणम् । ’

सोमनाथ मंदिर शिल्पाचाही एक नाव घेण्याजोगा नमुना वाटतो. चित्रात किंवा प्रत्यक्षही दुरून मंदिराचा भव्यपणा चटकन् समजत नाही. मात्र प्रवेश-द्वारातून आत गेले की, तो नजरेत भरतो. प्रवेशद्वारावरील कोरीव नक्षीकाम

सभामंडपाची जडणघडण आणि आत पिंडी असलेली खोली या साऱ्यांचा सुबकपणा, सुंदरपणा व एकात्मता स्थापत्यशास्त्रासही भूषणास्पद आहे. आज तेरा-चौदा वर्षे झाली. अजूनही एका बाजूचे बांधकाम चालू आहे! या इतिहासप्रसिद्ध मंदिराचा आजवरचा इतिहास पाहाता सध्याच्या मंदिराचा भव्य पण साधा पवित्रपणा विशेष उचित वाटतो. अजूनही एक-दोन वर्षे हे बांधकाम चालू राहील. विशेष म्हणजे समोरील विस्तीर्ण पटांगणात सुंदरशी बाग होणे जरूर आहे. मंदिराच्या मागील बाजूच्या भिंतीवर एक उंचसा खांब आहे आणि त्यात एक बाण समुद्राकडे तोंड करून कशाचा तरी वेध घेत आहे.

"आसमुद्रान्त दक्षिण ध्रुवपर्यंताबाधित ज्योतिर्मार्ग" असा खांबावर उल्लेख आहे. या बाणाच्या टोकापासून सरळ जाणारी प्रकाशशलाका थेट समुद्रावरून दक्षिण ध्रुवाला जाऊन मिळेल. प्रकाशशलाकाच कशाला? आता माणूसहि ध्वनीहून अधिक वेगाने तेथे जाऊन पोचेल! बाह्य सृष्टीतील अंतर आता आम्हास कःपदार्थ वाटते. मात्र खरे 'अंतर' अद्यापही अजिंक्यच आहे—

**त्रैलोक्याचा झालो राजा, विश्वाचा अन् जरि सम्राट्**
**जोवर 'अंतर' आजिंक्य मजला, तोवर व्यर्थ दुजा अटाट!**

सोमनाथच्या पवित्र स्थानाची हवा काही काल श्वासिली. आवारातच अन्नपूर्णा भोजनगृहांत जेवण घेतले. सोमनाथच्या देवालयासमोरच अहिल्याबाईने बांधलेले दुसरे एक शिवमंदिर आहे. मंदिरासारखेच मंदिर आहे, पण प्रत्यक्ष दृश्य-पिंडी जिथे आहे तिथेच, बरोबर त्याखाली, तळघरांत दुसरी एक पिंडी आहे. रगेल मोगल आणि मुस्लिम 'शिकाऱ्यांनी' घाव घालू नये म्हणून वरील दृश्य-पिंडीखाली तळघरात ही गुप्त पिंडी. मूर्तिभंजकांना शिकार मिळाली, देवळे उध्वस्त केली, हे समाधान. त्यांचे जीवितकार्य केल्याचे त्यांना भूषण. पुन्हा आमचा देव सहीसलामत; त्याला रक्षिल्याचे आम्हांस समाधान! 'सर्वेऽत्र सुखिनः सन्तु!' धार्मिक क्षेत्रातीलही हे 'समजुतीचे सहजीवन' वाखाणण्यासारखेच नव्हे काय? देवा, तुझी लीला अगाध खरीच!

आता तिसऱ्या प्रहरी 'गीर'–कुहरातील ते अनिद्रित 'हरि' पाहण्याची उत्कंठा शिगेस पोचली आहे. दिवस कलतो आहे. जीप झपाटयाने धावत आहे. रस्ता संपला. रानातील केवळ गाडीवाट लागली. भोवतालच्या प्रदेशातही बदल झाल्याचे दिसू लागले. सपाट प्रदेश संपला. उंच-सखल जमीन, ओहोळ, ओढे, नाले सुरू झाले. सारे अर्थातच शुष्क, कोरडे. मात्र घनदाट हिरवेगार जंगल कुठेच दिसेना. अगदीच बैठी, बाभळीची, काटेरी झुडुपे. तीही एकमेकांपासून अलग. संध्याछाया पडलेल्या उदास कातरवेळी ते अरण्य रौद्र-भयानक वाटण्या-

पेक्षा निरुत्साही, कंटाळवाणेच अधिक वाटत होते. काय या असल्या दरिद्री जागी जंगलाचा राजा राहतो? की तो जनकासारखा विदेही आणि दशरथा-प्रमाणे व्रतस्थ आहे? की राजा म्हटले की, केवळ भोगप्रवणता हा सूज्ञ मानवी समज या वनराजाच्या 'जंगलीही' अद्याप नाही! विचार करता करता जीप त्या घनघोर अटवीत घुसली; आणि आता मात्र बाह्य जगाचा विसर पडला. अद्यापहि शुष्क व भकास असे ते बाभुळवनच होते. पण आता त्याच्या विस्तृततेची दडस मनावर बसली. आणि आता सूर्यही पुरा बुडाला आहे. संधिप्रकाशही जवळजवळ लोपला आहे. आमच्या मार्गदर्शकाने आम्हांस पहिल्या सूचना दिल्या. 'धावपळ, गडबड, इत्यादि करू नका. पुतळ्याप्रमाणे निश्चल राहा आणि पाहा.'

जीपमधून आम्ही खाली उतरलो आहोत. डोळे फाडून चोहोकडे एकाग्र-पणे पाहतो आहो. मनास वारंवार बजावीत आहो की, "छे छे, आम्ही काही शिकारी नव्हे. पाहा अगदी निःशस्त्र होऊन आम्ही येथे आलो आहोत. वनराजा, केवळ तुझ्या दर्शनार्थ! सुसंस्कृत मानवी जमातीचे आम्ही प्रतिनिधि. भावनिक ऐक्य हा आमचा आवडता छंद. आम्ही तुला इजा करू इच्छीत नाही. तेव्हा तूंही शांतपणे सामोरा ये." स्वतःच्या संपूर्ण सद्हेतूची खात्री होती तरी एकदम भीतीचा विचार मनात येई. बापरे! आसपास तीनशे सिंह आहेत! त्यातला एखादाहि आजारी, वेडा, पिसाट नसेल काय? त्याला आमचा उच्च हेतु न समजला तर? त्याने एकदम चाल केली तर? तेवढ्यात आपल्याजवळील सर्व 'आयुधांची' माझे मन पाहाणी करते आहे. अरेरे! हवा भरण्याच्या पंपाखेरीज म्हणण्यासारखे आयुध आमच्याजवळ नाहीच! म्हणजे आता संपूर्ण भरवसा त्या वन्य पशूंच्या सुसंस्कृतपणावरच!

काय गंमत आहे पाहा, आमची मानवी मने पशूवरहि आमचे संस्कार लादीत होती. साशंकता, फितुरी, वन्यपणा, रक्तलालसा. माझी खात्री आहे, बाकी सर्व गोष्टी अनुकूल असत्या तर सिंहापासून धर्म अपेक्षिणाऱ्या आम्ही हळूच एखादा छावा मारून आमच्या जगात स्वपराक्रमप्रदर्शनार्थ नक्की आणला असता. मनात हा विचार चालला आहे. एखादे रानमांजर खसखसले की, सिंह म्हणून त्याला टिपीत आहोत.

आणि एवढ्यातच आमच्या जीपचा एक टायर पंक्चर झाला आहे. आमची पाचावर धारण बसली. पलायनाचे एकमेव साधन कामी आले! आता सूर्याजीने दोर कापल्याप्रमाणे केवळ सिंह आणि सिंह यानाच शरण गेल्यावाचून तरणोपाय नाही. खाली उतरून सर्वांचा एक फोटो घेतला आहे. माझी खात्री

आहे की, रान तोडण्यासाठी आलेल्या मजुरांच्या एखाद्या टोळीपेक्षा अधिक तेज व उत्साह आमच्या चेहऱ्यावर नाही. फोटो निघाला आणि कॅमेरा बंद झाला न झाला, तोच चौफेर वातावरण सिंहनिनादाने दुमदुमून गेले. ओ हो हो ! एखाद्या सर्कशीत कानी आलेली सिंहाची ती गर्जना. पण येथे निसर्गाच्या मोकळ्या वातावरणात, शानदारपणे राहिलेले अनेक सिंह एकत्र, एकामागोमाग गर्जना करीत आहेत. अंगावर रोमांच उभे राहिले, पण ते भीतीचे नाहीत. त्या निबिड गीराटवीत, त्या धूसर संध्यासमयी, सर्वसंगपरित्यक्तावस्थेत प्रत्यक्ष तीनशे सिंहांच्या वस्तीत उघड्या मैदानावर उभे राहून ऐकलेली ती सिंहगर्जना ! ही गर्जना जितकी उदात्त, निरोगी, उमदी तितकीच ध्वनिरम्यही वाटत आहे. तोही निसर्गाचा एक स्वयंभू आविष्कार; ' जे आहे ' त्या वास्तविकतेचा एक सहज साक्षात्कार ! मनातील जळमटे किंचित्काल नष्ट झाली आहेत. मी डोळे मिटले आहेत. चित्त आपोआपच एकाग्र झाले आहे. कशाचीही जाणीव राहिली नाही. सर्वांगाचे कान झालेत. आणि एकामागोमाग एक अशा ' उच्चैःश्रवा ' घनगंभीर, गर्जना ऐकू येत आहेत. घनगंभीर काळ्या ढगांनी खचून भरलेले आकाश घनगर्जना करील तशा. सर्वांगाचे एकचित्त झालेल्या त्या निमिषाच्या समाधीत ओठ पुटपुटले—

' शंकर मंडारी बोल... ! '

होय. मला बडे गुलामअलीची अशाच गंभीर आवाजाने गाइलेली " हरि ॐ तत्सत् " ही भैरवी आठवली. नव्हे ऐकू येतच राहिली. गोकाक आणि गिरसप्पाच्या प्रपाताची अखंड गर्जना ऐकू येत राहिली. निंबाळच्या आश्रमातील गुरुदेव रानड्यांच्या विदेही मुखातून उमटणारी ' नारायण ' नामगर्जना ऐकू आली. हा अभूतपूर्व, अश्रुतपूर्व नादानुभव होता; पण तरीही त्या नादाचे सादप्रतिसाद आजवर कुठेतरी ऐकलेच होते. अत्यंत सहज, हेतुशून्य व उत्स्फूर्त असे ते नादब्रह्म ! केवळ तो नादच तेवढा खरा होता. आम्ही सर्व खोटे होतो !

डोळे उघडले आणि नादामागोमागच खसखस ऐकू आली. सर्वांनी पुन्हा जीपमध्ये जागा धरल्या. आणि पांच-सहा वनकेसरींचा तो काफिला अमळ दूरवर एका भागातून येऊन दुसरीकडे गेला. किती थोर, दमदार, उदात्त चाल ! ऐट हा शब्द अप्रस्तुत. किती रुबाब त्या रूपांत. तेच ते सर्वविदित सिंहावलोकन ! नेत्र तृप्त झाले. एक निराळेच समाधान लाभले.

आमच्यासारखी क्षुद्र माणसे त्यांच्या गावीहि नव्हती आणि आम्ही मात्र पोटात भीति धरून होतो. आता आम्हालाहि अधिक धीर आलेला आहे.

जीपचे चाक तोवर ड्रायव्हरने ठीक केले आहे. पुन्हा जीपमध्ये बसून आम्ही सांजबेडेयांकडे निघालो आहोत. आता चंद्राचे अस्पष्ट चांदणे पडले आहे. त्या निर्जन एकान्तांत, चंद्राच्या अस्पष्ट प्रकाशाने झाडाच्या सावल्याही अस्पष्टपणे पडल्या आहेत. एकंदर वातावरणच अतिगंभीर ओसाड, अद्भुत वाटते आहे आणि आता आमच्या मनावरहि सिंहाच्या अस्तित्वाचा, दर्शनाचा पक्का ठसा उमटला आहे, मात्र सिंहगर्जनेशिवाय सारे कसे निःशब्द आहे, शून्यवत् आहे! जणू ते प्रचंड 'हरिकीर्तन' ऐकून सारा अवकाशच एकदम जड-मूढ झाला आहे; भ्रान्त-स्तब्ध झाला आहे. सांजबेड्यावर आम्ही पोचतो. तेथे आधीच दोन सिंह, एक सिंहीण व तिची प्रजा इतस्ततः विखुरली आहेत. एकटक ते दृश्य पहात आम्ही कितीतरी वेळ आहोत. शेवटी स्तब्धपणे जीपमध्ये बसलो. परतलो. त्या तसल्या अरण्यातही अधूनमधून पाच-चार झोपड्यांची खेडी आहेत. वस्ती आहे. एका खेड्यातच आम्ही रात्रभर वस्ती केली. गुरांना सिंहाचे भय अधिक असल्याने त्यांचा बंदोबस्त माणसाच्या घरांपेक्षा अधिक काळजीपूर्वक केलेला व पक्का होता! रात्री बाजेवर अंग टाकले तरी झोपच येत नाही. त्या अद्भुत वातावरणाच्या पार्श्वभूमीवर ऐकलेली ती घनगंभीर सिंहगर्जना आणि ते हरि-दर्शन मनावर एवढे भव्य-भयानक संस्कार करून गेले आहे की, तहान-भूक आणि झोप-विश्रांती हे शरीरधर्म फारच उपेक्षणीय वाटू लागले आहेत; त्यांची आठवणच उरलेली नाही!

बृहत्कवी रानावनातून आपली कविता गात हिंडू लागला, तेव्हा सिंह-व्याघ्रादि हिंस्र पशू आपले जन्मजात वैर विसरून त्या काव्यपंक्तीशी समरस झाले होते! अँड्रोक्लीसच्या उपकाराची आठवण ठेवून अत्यंत सुसंस्कृतपणे त्याची मैत्री संभाळणारा सिंह त्या कालच्या राजाची पशुवृत्ती जगजाहीर करून गेला. एका यःकश्चित् उंदराच्या धाष्टर्याचे सहर्ष कौतुक करून त्यास जीवदान देणारा सिंह, सिंहच असू शकेल; वाघ कधीहि असणार नाही. खरोखर त्या दिवशीच्या त्या दोन घटकांच्या सिंहांच्या सहवासाने आम्हांला आमच्या क्षुद्र मानवतेची लाज वाटू लागली आहे.

गीरच्या विस्तीर्ण जंगलातील हे सिंह 'निद्रित'ही नाहीत आणि त्यांना कसलाही 'भ्रम' झालेला नाही. माणसे माणसासारखी वागू लागल्याचे आताच कुठे त्यांना अनुभवास येत असेल! आता 'स्वार्थी व्यवहाराला विटुनि, विषण्ण मन झाल्यावर' जेव्हा अंतर उजळून घ्यावे वाटेल, तेव्हा डोंगर आणि झाडे, सागर आणि सरिता यांची जवळीक साधताना, शक्य असेल तर 'गीर' कुहरी अनिद्रित असलेले हे 'हरि' मी अवश्य जवळ करीन.

● ● ●

अनुक्रम ३४८७३ दि.
दि. ३०।८।६३

४

# दिल्लीच्या परिसरात चार घटका....

पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या परिसरात चार-एक वर्षे प्राध्यापक म्हणून काढल्यानंतर अगदी अचानक आणि योगायोगाने एका सुप्रभाती दिल्लीच्या लोकसभेत संशोधक म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली. अर्थ-शास्त्र, राज्यशास्त्र या विषयांचा व्यासंग अभ्यासिकेत आजवर झाला होता आणि चार भिंतींच्या आत विद्यार्थ्यांसमोर त्याचे निरूपण करण्यात उत्साहाने चार वर्षे व्यतीत केली होती. त्याच प्रश्नाची प्रात्यक्षिक बाजू पाहण्याची आणि अभ्यासण्याची संधी अशी अचानक आली म्हणून आनंद वाटला. एका प्रथम-श्रेणीतील उद्योगपतीसाठी लोकसभेतील भाषणे तयार करणे, संशोधन करून माहिती गोळा करणे, महत्त्वाच्या बिलांचा पद्धतशीर अभ्यास करणे, आर्थिक व परराष्ट्रीय धोरणांच्या चर्चेच्या वेळी सर्वांगीण दृष्टींनी परिपूर्ण अशी भाषणे, लेख लिहिणे यापेक्षा अधिक आवडीचे काम काय असणार ?

दिल्लीत उतरल्यावर प्रथम राजधानीच्या चतुःसीमेचे अवलोकन करण्यात वेळ घालवला. लोकसभा, सचिवालय, राष्ट्रपतिभवन, प्रधानमंत्रीनिवास आणि लाल किल्ला, जुम्मा मशीद, चांदणी चौक यांची बाहेरून भेट घेतली.

मग एक दिवस लोकसभेत जाऊन बसलो. तेव्हा आंध्र बिल चर्चेसाठी होते. श्रीमती रेणू चक्रवर्ती या अध्यक्षांच्या खुर्चीत स्थानापन्न होत्या.

आजची भव्य संसद् ज्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर जन्मास आली तो सारा इतिहास आमच्या पिढीने प्रत्यक्ष पाहिला आहे व म्हणून एका दिवशी सकाळी

लोकसभेच्या त्या गंभीर इमारतीत मी जाऊन बसलो तेव्हा मनामध्ये अनेक विचारांचे काहूर उसळले.

पहिली गोष्ट त्या ठिकाणी आढळते, ती अशी की, या साऱ्या इमारती व नव्या दिल्लीच्या सरकारी ऑफिसेसूची सर्व आखीव योजना ही भरपूर पैसे खर्चून निर्माण केली गेली आहे. दिल्ली हे ठिकाण इतिहाससंपन्न असल्याने येथील राज्यकर्त्यांना एक प्रकारचा होश यावा व त्या नादात इतिहासजमा राज्यकर्त्यांना मागे सारील अशी काही भरीव कृती येथे आपण प्रत्यक्ष करून ठेवावी, अशी वीरश्री त्यांना वाटावी हे साहजिकच आहे. ' लाल किल्ला ' आणि ' कुतुबमिनार ' ही जेथे उन्नतमस्तक खडी आहेत तेथे त्यांना बाहुबलाने जिंकून घेणाऱ्या गोऱ्या राज्यकर्त्यांनी ' हलवायाचे घरावर तुळशीपत्र ' ठेवून नवी दिल्लीच निर्माण करावी हे अगदी ओघानेच प्राप्त झाले. उत्तुंग राष्ट्रपतिभवन, पार्लमेंट, सेक्रेटरिएट, इंडिया गेट व भोवतालचा सारा परिसर दृष्टी खिळून टाकील असा आहे खरा !

संसदेच्या चक्राकार इमारतीत मध्यभागी एक ' सेंट्रल हॉल ' आहे, आणि वर्तुळाच्या तीन कप्प्यांत लोकसभा, राज्यसभा व सुप्रीम कोर्ट आहेत. ही सारी रचनासुद्धा नयनमनोहर तर आहेच पण गंभीर अधिक आहे.

लोकसभेतील सारे वातावरण कसे भारदस्त व प्रौढ वाटले. बरोबर सकाळी ८। वाजता त्या दिवशी अध्यक्ष स्थानापन्न झाले आणि त्यांनी आपल्या कामास सुरुवात केली. हा वेळपर्यंत त्यांच्या उजव्या हातास अनेक मंत्री येऊन बसले होते व मंत्र्यांच्या पाठीशी बहुसंख्यतेच्या ऐश्वर्यात काँग्रेसपक्षीय सभासदही बसले होते. डाव्या हातास विस्कळीतपणे विरुद्धपक्षीय सभासद बसले आणि पस्तीस कोटी जनतेच्या विश्वासास पात्र असलेल्या या सभागृहातील डाव्या–उजव्या गटात ' थंड वाग्युद्ध ' अध्यक्षांच्या हुकमतीखाली सुरू झाले.

त्या दिवशी कर्मधर्मसंयोगाने जो पहिला प्रश्न उपस्थित झाला तोच मुळी ख्यातनाम श्यामाप्रसाद मुखर्जींच्या निधनानिमित्त लोकसभेस सुटी द्यावी किंवा नाही हा होता. मी लोकसभेत पाऊल टाकले तेच मुळी मुखर्जींच्या निधनोत्तर ! मुखर्जी हे प्रामाणिक, लढवय्ये व बुद्धिमान् असे सभासद होते आणि विरोधी पक्षाचे धुरीणत्व त्यांच्या हाती मोठे शोभून दिसत असे. पण मला त्यांचे भाषण लोकसभेत ऐकावयास मिळाले नाही याबद्दल चुटपुट लागून राहिली. त्या दिवशी सभा तहकूब झाली आणि सर्व सभासदांनी त्यांच्यावरील आपला आदर व्यक्त करून दाखविला.

गेली तीन-चार वर्षे भारतीय घटना व राज्यशासनपद्धति यांवर व्याख्याने देण्याचा माझा व्यवसाय होता. संसदीय राज्यकारभाराचा मी स्वतःहि चहाता होतोच आणि सुमारे १२९५ साली संसदेचे बीजरूपाने इंग्लंडांत जे निर्माण झाले, तेथून आजचे भव्य व प्रगत स्वरूप प्राप्त होईपर्यंत जी स्थित्यंतरे होत गेली, त्यांचा सूक्ष्म अभ्यास मला नेहमी उद्बोधक वाटत आला होता. स्वतंत्र भारतांतील पहिल्या संसदेत पाऊल टाकताना माझ्या मनात हेच विचार घोळत होते. इंग्रजांची संसदीय राजकारणाची परंपरा, संसदीय सभासदांचा उच्च दर्जा, वाङ्मयांत अजरामर झालेली ती त्यांची भाषणे मनात घोळू लागली. एडमंड बर्कचेच वक्तव्य चालले आहे, असे भासू लागले. थोरल्या पिट्चे वक्तृत्व ऐकून कान तृप्त होत आहेत असे वाटत राहिले. 'एक दिवस माझे म्हणणे तुम्हास ऐकावेच लागेल' असे ब्रिटिश पार्लमेंटच्या ऱ्हास बजावणारा डिझ्रेली समोर दिसू लागला. 'गुंडाळा तो युरोपचा नकाशा' हे धाकट्या पिट्चे वैतागाचे उद्गार आठवले. रॉबर्ट पील, ग्लॅडस्टन, पामर्स्टन, चर्चिल--ही परंपराही मनात जागी झाली आणि नंतर भारतीय परंपराही दिसू लागली. केवळ संसदीय परंपरेचाच विचार करावयाचा तरीही अनेक नांवें आठवली. गोखले, शास्त्री, सप्रू, जयकर इत्यादि नेमस्तांची योग्यता कोणत्याही आंग्ल नावाहून कमी नव्हती. जहालांनी तर आपला प्रभाव अष्टदिशांना पाडलाच होता आणि आजहि भारतीय संसदेत उत्कृष्ट वक्ते आहेत, वादपटू आहेत, कर्ते आहेत, बोलके आहेत. नररत्नांची खाण असलेली ही कृष्णाची भूमि आजहि आपल्या तेजाने तळपत आहे, याचा पूर्ण साक्षात्कार मला संसदेच्या दर्शनाने पहिल्या दिवशीच झाला.

संसदेतील पहिल्या प्रश्नोत्तराच्या एक तासांत सारे विचार मी तपासून पहात होतो. इतक्यात डाव्या हातच्या दाराने एक उंच, तरतरीत व्यक्ती घाईघाईने आत आली. पांढरा स्वच्छ पोषाख, डोक्यावर पांढरी टोपी, हातात एक फाईल आणि जवळजवळ धावतच आत शिरून आपल्या आसनाकडे त्वरेने जाणारी ही व्यक्ती पाहून माझी दृष्टी तिथेच खिळली. कारण त्या व्यक्तीचे हे एक नवे रूप मी पहात होतो. मोटारीत उभे राहून दुतर्फा ओळीने उभे असलेल्या जनसंमर्दाचा प्रणाम घेत व त्यास उलट नमस्कार करीत जाणारी ही व्यक्ती माझ्या व अनेकांच्या परिचयाची आहे. पण भारताचा हा अनभिषिक्त सम्राट् लोकसभेतील आपले आसन कसे भूषवितो हे पहाणे मला नवीन होते. बसताना, त्या व्यक्तीने, सभेच्या अध्यक्षास प्रणाम केला, समोरील फाईल उघडली आणि हातावर हनुवटी टेकून ती स्थिर झाली. प्रश्नोत्तरे चालू झाली आणि एक प्रश्न त्या व्यक्तीस उद्देशूनच विचारला गेला. प्रथम व्यवस्थित उत्तर दिले गेले. पण प्राश्निकाचा रोख थट्टेचा होताच, त्या व्यक्तीची अस्वस्थता दृश्य होऊ

लागली. शेवटी थोडीशी रागाची छटाही उत्तरात दिसली. प्रश्नोत्तराचा तास संपताच ती व्यक्ती आली त्याच दरवाजाने घाईघाईने निघून गेली.

पंडितजींचे अगदी जवळून दर्शन नंतर अनेक वेळा जरी होत राहिले आहे तरी त्या दिवशीचा तो प्रसंग फार मौजेचा वाटला. आज भारताचीच काय, उभ्या आशियाची दृष्टी या एका व्यक्तीवर खिळून राहिली आहे. हा महात्माजींचा शिष्य शांतीचा भाट बनून ठिकठिकाणच्या दावाग्नीवर पाणी ओतीत चाललाच आहे. आज 'यूनो' च्या धोरणाचा शिल्पकार, तर उद्या छोट्या छोट्या राष्ट्रांचा सहाय्यक, कधी दलितांच्या उद्धारार्थ तुफानी दौरा, तर कधी पुराणा चीनचा मित्र बनून चिनी जनतेशी हस्तांदोलन, असा त्यांचा कामाचा सपाटा चालला आहे. काय करू आणि काय नाही, ही त्यांची ऊर्मी आहे. रात्र थोडी आणि सोंगे फार ही त्यांची रास्त तक्रार आहे. एका एका व्यक्तीचे जीवन पाहिले तरी केवढी उलाढाल एका आयुष्यात आणि केवढी कमाई दोन हातांची ! तसे पाहिले तर करोडो लोक जगत आहेत, धरपडत आहेत, जन्म-मृत्यूची तोंडमिळवणी करीत आहेत. पण जी खरी जगत आहेत असे वाटावे ती किती अल्प-स्वल्प म्हणावी ? या थोड्या व्यक्तीत अग्रगण्य म्हणून पंडितजींना समजावे लागेल. पंडितजींचे युग म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाचा पुरेपूर प्रत्यय आहे. त्यांच्या आशाआकांक्षा, महात्माजींच्या तत्त्वज्ञानाशी एकरूप झालेली त्यांची विचारधारा आणि शांतीवर आधारलेली त्यांची जनहितकारी तळमळ, जनतेच्या मनातील त्यांचे स्थान अभंग राखील.

पहिल्या दिवशीचा माझा हा अनुभव मला दीर्घकाल आनंद देत राहील. या काळात जन्म घेणेच जेथे फार मोलाचे, तेथे प्रत्यक्ष या घटनांचे जवळून दर्शन व अभ्यास किती उत्साहाचा वाटावा !

संसदेतून मी बाहेर पडलो आणि दिल्लीच्या परिसरात मुशाफिरी करावी म्हणून दुचाकीवर स्वार झालो.

मी संसदेतून बाहेर पडलो आणि दिल्लीच्या चतुःसीमेची ओळख व्हावी म्हणून सायकलवरून मन मानेल तसे हिंडण्याचा निश्चय केला. ज्या वेळी मला चिंतन करावेसे वाटते (आणि चिंतन हा माझा अत्यंत आवडता छंद आहे) त्या वेळी मल्या पहाटे उठून गावाबाहेर एकटेच पायी फिरावयास जाणे मी पसंत करतो. पण इथे मला थोड्या वेळात भरपूर वाटचाल करावयाची होती म्हणून मी सायकल पसंत केली. दिल्लीच्या—विशेषतः नव्या दिल्लीच्या—रस्तो-रस्ती सायकलवरून हिंडण्यास खरेच फार मजा येते. सुंदर, सरळ, काळेभोर रस्ते. दोन्ही बाजूंस अगदी आखून, मोजून उभे असलेले तऱ्हेतऱ्हेचे वृक्ष.

सारख्या लांबी-रुंदीचे फूटपाथ. सर्व काही अगदी आखून तयार केलेले. क्षणभर असा भास होतो की, या झाडावरची सारी पानेहि कोणी मोजून-मापून ठेवली नाहीत ना ! सायकलला भरपूर वेग द्यावा आणि विचारांच्या तंद्रीत भरपूर रस्ता कापीत जावा.

प्रथमच मी गेलो तो थेट राजघाटावर. पुष्कळ चाकपीट केल्यावर एका विस्तीर्ण, हिरव्या हिरव्या कुरणांनी आच्छादलेल्या, अतिशय साध्या समाधीपाशी येऊन उतरलो. राजघाटावरील महात्माजींची समाधी आज अगदी साध्या स्वरूपात आहे, आणि म्हणूनच ती फार सुंदर आहे. प्रामुख्याने डोळ्यात भरणारी गोष्ट म्हणजे समाधीच्या सभोवती चौफेर पसरलेली हिरवीगार कुरणे. महात्माजींच्या विशाल अन्तःकरणाची साक्ष याहून अन्य कोणत्या गोष्टीने पटावी ? मी सीमेंटच्या त्या चौथऱ्यावर गेलो. चौथऱ्यावर रंगीबेरंगी निर्गंध फुले अंथरलेली होती व त्यातूनच ' हे राम ' अशी अक्षरे काढली होती.

'हे राम !'

हे साधे दोन शब्द किती बोलके वाटले. ती मनुष्याच्या गेल्या हजारो वर्षांच्या इतिहासावर एक दारुण टीका आहे. ती, भेदाभेद आणि हेवेदावे यानी ग्रासलेल्या मानवी जीवनाची फलश्रुती आहे. इतिहासाला फारशी अपरिचित असलेली ही घटना नाही. आजवर असे कैक मानवतेचे पुजारी, नाठाळ पाशवी शक्तीने पचविले आहेत ! आणि तरीहि तिच्या अभ्युदयार्थ विवेकाचा आणि प्रेमाचा पलिता घेऊन, कोणी महात्मा विकारांशी टक्करा देत अधूनमधून उभा राहातच आहे ! राजघाटावरील त्या दृश्याने माझ्या मनास भोवळ आली आणि मी तिथेच जडमूढ अवस्थेत बैठक मारली.

दुसऱ्याच क्षणी, मला पुण्यानजीक असलेल्या आगाखान पॅलेसमधील कस्तुरबाची समाधी दिसू लागली. पति-पत्नी आपापल्या कर्तव्याच्या वाटा चुकवीत असताना कालवश झाली आणि आज हजारो मैल दूर शांतपणे निद्रिस्त आहेत. आगाखान पॅलेसमधील कस्तुरबांच्या समाधीशेजारी महादेवभाईची समाधी आहे. त्या समाधी उभ्या केल्या तेव्हा भारत परकीयांच्या मगरमिठीतून सुटला नव्हता. साहजिकच एका कोपऱ्यात कशातरी त्या दोन व्यक्ति समाधिस्थ आहेत. तरीपण कस्तुरबांच्या समाधीशेजारी उभे राहिले असताना, जो एक उच्च वातावरणाचा साक्षात्कार होतो तो राजघाटावर होत नाही. कस्तुरबांच्या समाधीच्या चौफेरचा प्रदेश अगदी निसर्गमय आहे. अस्सल ग्रामीण आणि आधुनिक यंत्रयुगीन धक्काधक्कीपासून आलिप्त. आगाखान पॅलेसची उपटसुंभी श्रीमंतीसुद्धा त्या समाधींना पाठमोरीच आहे. याउलट राजघाटावर निर्भेळ

निसर्गाचा साक्षात्कार होत नाही. एका बाजूस उंच उभी असलेली व आकाशात धूर ओकत राहिलेली एक चिमणी अरसिकपणे आपले अनाठाइस्व जाहीर करत असते. त्या दृश्याने झालेला रसभंग फार काळ मला बोचत राहिला.

गांधीजींच्या—म्हणजे वस्तुतः भारताच्या—आयुष्यातील काही महत्त्वाचे प्रसंग मला आठवू लागले. त्या निमित्ताने मीही गतआयुष्यातील काही क्षणांची व प्रसंगांची स्मरावलि ओढू लागलो.

तसे पाहिले तर अवघ्या ७०—७५ वर्षांची कथा. पण तीन हात लांबीच्या अगदी सर्वसामान्य देहातही वास करणारी ' मन ' नावाची जी शक्ती आहे, तिच्या सामर्थ्याचा केवढा दिव्य चमत्कार गांधीजींच्या रूपाने जगास दिसून आला ! किती साधे विचार आणि तरी केवढी प्रचंड त्यांची शक्ती आणि जनमनावर मोहिनी. मनुष्यजातीचा खरा शत्रू, तोफा-बंदुकात नाही किंवा ॲटम्—हैड्रोजन—बॉंबमध्ये नाही. एका निर्भयतेच्या ढालीवर, जगतातील कोणतेहि प्रचंड वज्र आणि अस्त्र बोथट होऊन जाईल, हे खरे नाही तर काय ?

चटकन् मला आठवला तो १९४२ मधला एक दिवस ! आगाखान पॅलेसमध्ये, उन्मत्त ब्रिटिश सत्तेशी मुकाबला करीत असताना आपल्या एकवीस दिवसांच्या उपोषणाचा अंत समीप दिसत असतानाहि, अगदी चिंताजनक परिस्थितीत गांधीजी होते ! मोठमोठे रथी-महारथी त्यांना भेटून जात होते आणि दीर्घ उसासा टाकीत जनतेसमोर येत होते. तरुण रक्त उसळ्या घेत होते. शाळा-कॉलेजे आणि पोलिस-कचेऱ्या भीतीने थरथरत उभ्या होत्या. आन्तर-राष्ट्रीय मुत्सद्दीही ब्रिटिशांच्या धाष्टर्याचे व उद्दामगिरीचे साश्चर्य कौतुक करीत होते. आणि तरीही मारण—मरणाच्या भेसूर दृश्याने ज्यांना खून चढला होता, ते चर्चिल-ॲमेरीसारखे कट्टर साम्राज्यवादी, आपल्या हटवादीपणातील माणुसकीचा अंश, गांधींच्या चितेसाठी चंदनकाष्ठे जमवून जागा करू पहात होते.

मला आठवते की, लोकनायक बापूजी अणे शेवटी गांधींना भेटून आले, आणि " ईश्वरी चमत्कार झाला तरच आता बापूजी वाचतील " असा भेसूर संदेश त्यांनी जनतेस दिला.

पण झाला चमत्कार तो ईश्वरी नव्हता. किंवा मनाला पटणारे बोलावयाचे तर शुद्ध व निर्मळ माणुसकीचा चमत्कार होता. कोट्यवधि आबालवृद्धांनी गांधीजींच्या जीवितासाठी अहर्निश सदिच्छा बाळगल्या, त्या यमाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवून गांधींना जिवंत राखू शकल्या—

आणि एका थोर युगपुरुषाच्या शरीराचा ग्रास करण्यासाठी आतुरतेने उभा चाटीत राहिलेल्या चंदनकाष्ठांची दारुण निराशा झाली !

गोऱ्या सत्तेने त्या चंदनकाष्ठांचा कोणता उद्दुपयोग केला ते आजतागायत प्रकाशात आलेच नाही !

त्या भेसूर प्रसंगातून गांधीजी वाचले खरे, पण त्यानंतर त्यांना अधिकाधिक कठिण कसोट्या द्याव्या लागल्या. ज्या जनतेने त्यांच्या जीवावरील प्रसंगात त्यांना साथ दिली आणि अभय अपेक्षिले, ती जनता त्यांच्या अंतकाळी भांबावून गेली आणि आपल्या कर्तव्यास घसरली. आम्ही आमच्या डोळ्यादेखत, एका अतिशय थोर व साधक युगपुरुषाचा धीरगंभीर शेवट पाहिला !

तीच ही राजघाटावरील त्या थोर तपस्व्याची चिरनिद्रा ! गांधीजींसारखे थोर पुरुष ज्या काळात जन्मले आणि प्रयोग करीत राहिले तो काळ अगदी कालच्या आठवणीसारखा, डोळ्यापुढे कसा उभा आहे !

राजघाटावरून माझे पाय अगदी सहजपणे ' बिर्ला हाउस 'कडे वळले. राजघाटापेक्षाहि चित्तथरारक अशी ती जागा ! त्या ठिकाणी जे घडले, ते किती मतभिन्नता, द्वंद्वे, भेदभाव यांच्या झगड्यातून निपजले होते ! मनुष्यदेह धारण केलेल्या दैवी आणि दानवी शक्तींच्या झटापटीतून पावन झालेली ती भूमी ! रम्य, हिरवेगार कुरण. भोवताली कुंपण असलेली बाग. आणि एके ठिकाणचा तांबड्या दगडाचा चौथरा. कुठून गांधीजी आले, कसे वर चढले, कोण कुठून आला आणि पाहाता पाहाता इतिहासाने खचून भरलेल्या एका युगाचा शेवट झाला ! कालचक्र पळभर थांबले. जणू सारी गतिप्रवण चक्रे उलटी भिरभिरली. आणि दिङ्मूढ मानवता पोरकेपणाने घाबरून थयथयणाऱ्या अण्वस्त्राला शरण जाण्याची पाळी येते की काय, या विचाराने भेदरून गेली !—

जुनी दिल्ली आणि नवी दिल्ली हीं जरी केवळ कालवाचक नावे असली तरी एका निराळ्याच अर्थाने ती मला फार अन्वर्थक वाटतात. विशेषतः देशाच्या राजधानीला हे जुने-नवेपण फार शोभून दिसते. काळ झपाट्याने धावत असताना येथील सिंहासनाधिष्ठित राजर्षींनी आपल्या कर्तृत्वाचा जिरेटोप सांभाळीत आपल्या आणि आपल्या काळाच्या स्मृती जागोजागी खोदून ठेविल्या आहेत, त्यांचे दर्शन होऊन नवल वाटते. राजधान्यांची राजधानी असे हे दिल्ली शहर तर या बाबतीत अगदी अनन्यसाधारण आहे. कदाचित् येथील हवामान वर्षभर एकसारखे सुखद नसेल; येथील बहुसंख्य जनतेत शिक्षणाचा प्रसार नाव घेण्यासारखा नसेल; येथील स्वच्छास्वच्छतेच्या कल्पना दाक्षिणात्यांना मोठ्या मानवणाऱ्या नसतील कदाचित्; तरीहि राजधानी म्हणून या शहराची आणि त्यातील नव्याजुन्याची एक विशिष्ट संस्कृति मनावर परिणाम केल्याशिवाय रहात नाही.

जुन्या दिल्लीतील बहुजनसमाज अजूनही मोगली ऐसपैसपणातच लोळत पडलेला दिसतो. अशांती, अस्थैर्य, असमाधान ही आजच्या समाजजीवनाची वैशिष्ट्ये आहेत म्हणे! पण चांदणीचौकाच्या चतुःसीमेत पहुडलेल्या तमाम जनतेस त्याची सुतराम् जाणीव नसावी. ही जनता अजूनहि 'धीरे धीरे' आगेकूच करीत आहे. घाई, गर्दी, धावाधाव त्यांच्या गांवीही नाही. किंबहुना, अवघ्या हाकेच्या अंतरावर 'नवी दिल्ली' नावाचे एक शहर असून, देशाच्याच काय, परदेशाच्या अंतरंगातही खळवळ उडविणाऱ्या घटना तेथे घडतात याची दखल तरी कितीजणांस आहे कुणास ठाऊक ? – राजे बदलणार, काळ मागे पडणार, तत्त्वज्ञाने पुसून जाणार, जुन्या शस्त्रांना नवे पाणी येणार, आणि या धावाधावीत मारण-मरणास ऊत येणार – हे येथे मुळी सर्वांनी नेहमीचेच म्हणून जमेस धरलेले. यापरते अन्य काही घडले तरच ते आगळे! नाहीपेक्षा या राजधानींत राहणाऱ्या पौरजनांस 'वैऱ्याची रात्र' आहे असे कधीच वाटत नाही आणि त्यायोगे त्यांची झोपमोडही कधी होत नाही.

प्रशस्त लालकिल्ल्याचा परिसर जुन्या दिल्लीस आटोपून आज अभंग उभा आहे. ओटयावरचा एखादा 'चचा' नाकावर ओढलेल्या चष्म्याच्या भिंगातून 'केसरी' वाचता वाचताच, परसात उच्छृंखल हैदोस घालणाऱ्या वानरसेनेकडे ज्या दृष्टीने पाहील, ती दृष्टी मला लालकिल्ल्याच्या नसलेल्या नेत्रात चक्क दिसते ! तो 'करून सवरून' भागलेला जराजर्जर तपस्वी समोर तरळणाऱ्या घडामोडी अशाच ज्येष्ठ निर्हेतुकतेने न्याहाळीत असल्याचा भास होतो. तो वर्षानुवर्षे तेथे तसा खडा आहे, त्याला द्रुतगतीने निसटणाऱ्या चारदोन मिनिटांचे काय होय ? समोरच्या भव्य जुम्मा मशिदीचा शेजार त्याला किती अमोल वाटत असेल ! त्याच्या काळातील ती एक व्यक्ती. आणि अगदी शेजारी खडी असल्याने, सुखदुःखाचे निर्लेप आलाप करण्यात, त्याच्या घटकान् घटका संपत असतील.

पण खरे म्हणजे माझे मन जुन्या दिल्लीच्या या ऐतिहासिक ऐवजात रमत नाही. काळाचे अखण्ड सातत्य पोटात सामावून उभी असलेली फारच थोडी शहरे, मला वाटते, दिल्लीची बरोबरी करू शकतील. कुरुक्षेत्रापासून ते राजघाटा-पर्यंतच्या दृश्य अवकाशात सामावलेली असंख्य मिनिटे जेव्हा भावनेच्या कल्लोळात फुटतात तेव्हा त्यातून बाहेर पडणारी इतिहासाच्या अणुशक्तीची किमया जाणिवेचा सारा प्रदेश बेचिराख करते ! घटना अनंत, स्वरूप एक ! एकच धडा पण गिरवून गिरवून घटवलेला ! उद्दिष्ट एकच पण किती अनेक वाटांनी ते साध्य करण्याची प्रचंड यातायात. अगदी जुनी जुनीच 'गिरमिटे' आणि 'नवीन वळसे' !

नव्या दिल्लीची कर्तृत्वशक्ती, जुन्या स्मृतींना अंमळ मागे रेटून मनगटात

नाचत असल्याचा प्रत्यय येतो. येथील सर्वच आखीव, आटोपशीर, योजनाबद्ध. जणू कोटी कोटी जनतेचे भाग्य शिल्पिण्यास बद्धपरिकर असलेली प्रचंड सेना एका ताला-सुरावर पावले टाकीत आहे ! राष्ट्रपति-भवनाच्या दोन्ही अंगांस उभे असलेले ते दोन भव्य प्रासाद ' कार्यकारी ' सत्तेच्या निवासास अगदी अनुरूपच वाटतात. शेजारीच ' चक्राकार ' आणि अतिभव्य उभे असलेले संसद्‌गृह आपल्या वर्तुलाकृतीने उच्च पातळीवरील वादविवादाचे अंगविशेष उघड करून दाखवते. या इमारतीचे बाहेरून एकदम डोळ्यात भरणारे ते प्रचंड खांब लोकशाही राजवटीचे आणि एकूण लोकशाही जीवनाचे खरेखुरे आधारस्तंभ वाटतात. या प्रशस्त इमारतीच्या आत ज्या घडामोडी दिवसानुदिवस होत राहातात त्यांचा अचंबा तेथील इंच इंच जागेसही वाटल्याशिवाय रहात नसेल. मधल्या विस्तीर्ण चौकात क्षणभर उभे राहिले तर दृष्टीस अतोनात सुख तर होतेच, पण मनही भांबावून जाते. समोरून जाणाऱ्या चार माणसांतील तीन व्यक्ती तरी जागतिक घडामोडींशी संबद्ध असलेल्यांपैकी असतात. मधमाशांचे मोहोळ फुटावे तसे माणसांचे मोहोळ फुटून ती चारी बाजूंस गुंजारव करीत असल्याचा जो गंमतीचा अनुभव तेथे येतो, तो माझ्यासारख्याला फार आनंदाचा वाटत असल्यास नवल नाही. तशी माणसांची वाण या देशात आहे अशातला भाग नाही. पण येथील माणसे आणि इतरत्र आढळणारी माणसे यात केवढा तरी फरक आहे ! अगदी सरळसरळ पाहिले तरीही तेथील प्रत्येक सदस्य सहस्रावधी लोकांचे जिणे जगत आहेच ना ! क्षणभर तुम्ही संसदेच्या आतील चौकात उभे राहा. एका बाजूस कृपलानींची कृश मूर्ती धीरे धीरे आत चाललेली दिसेल. दृष्टी तेथून काढली तर टंडनबाबूंची ऋषितुल्य प्रतिमा तिच्या आढळात येईल. आणखी पलिकडे पहाल तर कृष्ण मेनन यांच्या मुद्रेवरील राजनीतिपटुता तुमचे लक्ष वेधून घेईल. भव्य आणि सुंदर देहयष्टीतील पृथ्वीराज कपूर समोरून येणाऱ्या आझादांना किंवा सुचेता कृपलानींना किंवा पंडितजींना नम्र कुर्निसात करताना दिसतील. पृथ्वीराज नाट्यप्रवीण असतील, नटश्रेष्ठ असतील, पण त्यांना थोर राजकारणी पुरुष वंदनीयच वाटणार आणि ते तसे वाटतात म्हणूनच त्यांच्या नम्र अभिवादनाचे चेतोहर नाट्य तिथे पहाताना दृष्टी त्यावर खिळून राहाते. डाव्या हातास घाइघाईने धावणारी एक स्त्री-व्यक्ती नजरेतून सुटू शकत नाही. ही उण्यापुऱ्या उंचीची, तेजस्वी, सुहास्यवदन व्यक्ती आता समोर दिसेल, तर उद्याच पालम विमानतळावर इंग्लंडच्या सम्राज्ञीची भेट घेण्याच्या वाटेवर असेल; तर परवा ' यूनो 'च्या अध्यक्षपदाचा स्वीकार करण्यासाठी तेथून पुनः उड्डाण करते आहे, हे वाचावे लागेल. किती तऱ्हेतऱ्हेची आयुष्ये एकाच व्यक्तीत सामावलेली ! ही मानवी आयुष्याची सार्थकता आहे. ही मनुष्यजातीची

अभ्युदयार्थ चाललेल्या घडपडीवरील साय आहे. या अनन्यसाधारण अनुभूतीचे वर्णन करावे तरी कसे ? सर्वसाधारण माणसासारखी एक व्यक्ती आपल्या बुद्धि-प्रभावाने कशी तळपते त्याचे आश्चर्य करावे, की चारी खंडांना पहाता पहाता प्रदक्षिणा घालून पुनः घरी पोहोचविणाऱ्या आधुनिक विज्ञानप्रगतीला धन्यवाद द्यावेत, की ऐषआरामी जिण्याचा त्याग करून समष्टीच्या सुखद जीवनासाठी स्वेच्छेने कष्टरत होणाऱ्या प्रगल्भ मानवी बुद्धीचे कौतुक करावे, की मनात वारं-वार उचंबळून येणारे एक प्रकारचे तौलनिक असमाधान चघळीत राहावे की करावे तरी काय !

संसदेच्या प्रांगणांत किंवा त्या सबंध इमारतीतच एक प्रकारचे अभिनव नाट्य प्रत्ययास येते. असाधारण नाट्याची निशाणीच ही आहे की ते पहात असताना वायुवेगाने आपण उंच, उंच वातावरणात संचार करीत असल्याचा अनुभव यावा; टीचभर पोटासाठी शिणवणारी क्षुद्र दैनंदिन वळवळ बाजूस सारून सूक्ष्म मानवी प्रश्नाची उकल करण्यास आपण एकत्र जमलो आहोत अशी भावना निपजावी; स्वतःच काही पराक्रम करीत आहोत या जाणिवेने रोमांचित व्हावे; जणू आपणच निर्माण केलेल्या दुनियेतील काही ‘ पात्रे ’ आपल्या अडचणी आपणांस सादर करीत आहेत असे वाटून, विधात्याच्या ज्येष्ठ दिमाखाने आपणांस त्या पाहिल्या पाहिजेत असा काहीसा प्रत्यय यावा ! बरोबर हीच भावव्याकुलता संसदेच्या त्या प्रचंड इमल्यात घडीघडी जाणवते. इमारतीची भव्यता, साधेपणा आणि गांभीर्य एक गोष्ट प्रथमच मनावर ठसवते की, ही इमारत स्थिर आहे आणि आतील सारे सदस्य येणारे-जाणारे आहेत. जीवनाच्या क्षणभंगुरत्वामुळेच केवळ हे नसून, इमारत कायम पण संसदीय सभासद दर पाच वर्षांनी नवे, या गोष्टीमुळेहि असे म्हणावेसे वाटते. ती न बोलणारी गंभीर इमारत आपल्या मनाशी सतत विचार करीत आहे, आडाखे बांधीत आहे, अवलोकन करीत आहे, असे स्पष्ट भासते.

आणि त्या दृश्य इमल्यापाठीमागे घडून राहिलेला केवढा तरी पुराणा, दीर्घ इतिहास आहे ! सामूहिक विचार-विनियम, परस्परांचे विचार समजून घेणे आणि समजावणे—हे मानवी समष्टिजीवनाचे किती साधे आचार वाटतात ! पण कोण म्हणतो ते साधे आहेत ? पन्नास, पंचाहत्तर हजार नागरिकांचे एका व्यक्तीने प्रतिनिधित्व करावे, हे विचार-बालक जन्मले ते किती रक्तपात, प्रसुति-वेदना व कालहरण करून ! असंख्य जनतेवर मूठभर सत्ताधाऱ्यांनी राज्य करावे हा तर इतिहासाचा आश्चर्यकारक दाखलाच आहे. त्याचे प्रात्याक्षिक येथे पहा-वयास मिळते. संसदेची कल्पना तरी किती कष्टसाध्य ठरली ! जनतेने एकत्रित येऊन आपल्या मागण्या राजास सादर कराव्या, या सहज घटनेमधून संसद्,

एकत्र येणे, विचार-विनिमय, निष्कर्ष इत्यादींची बांधणूक झाली. उण्यापुऱ्या सातशे वर्षांपूर्वी एक मागण्यांचा मसुदा जनतेने इंग्लंडात राजास सादर केला, तेव्हा आपण एका महान् घटनेस जन्म देत आहोत याची त्या बिचाऱ्यांना कल्पना तरी होती का? १२९५ मध्ये संसदेच्या आजच्या स्वरूपाशी काहीशी जुळणारी संसद् तिथे अस्तित्वांत आली. तेव्हापासून त्यावर कालविशिष्ट संस्कार होत होत त्याला आजचे स्वरूप प्राप्त झाले. संसद् सुधारली असेल कदाचित्. त्याला बाह्यतः भव्य आकार आला असेलही. पण समष्टिजीवनाचा आणि त्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न सुटला काय? उघडीवाघडी दण्डशाही नष्ट झाली असेल, पण संसदेच्या कोनाकोपऱ्यातून बेगरूळपणे वावरणारी मतलबशाही चांगली बाळसेच धरत राहिलेली नाही काय? एकाद्या पुराण्या आजाराप्रमाणेच लोकशाहीच्या सांध्यासांध्यातून घर करून राहिलेली आणि जनतेच्या मतावर पोसलेली पण जनतेवरच विजय मिळवणारी, हीं छुपी मतलबशाही निपटणे फार जिकीरीचे झाले आहे.

संसदेच्या प्रांगणांतील दृश्य आणखीहि एका बाबतीत असाधारण वाटते. ती बाब म्हणजे येथे होणारे उभ्या भारताचे दर्शन. हजारो मैल दूर दूर असलेल्या खेडयापाडयातून कुणीहि ' पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड, उत्कल, वंग ' हे सूर आळवावेत. रवींद्रबाबूंच्या कवित्वाने आणि नेताजींच्या शौर्याने मराठ्याची छाती फुगावी किंवा शिवाजीच्या चित्तथरारक इतिहासाने पंजाब्यांना स्फुरण चढावे, किंवा इक्बालचे भूषण इतर प्रांतीयांनी शिरी मिरवावे. खण्डप्राय देशाच्या अष्टदिशात खचून भरलेला इतिहास सर्वांनाच प्रेरणा देत आला आहे. तरीपण आपापल्या प्रांतात अनुभवास येणारी ही अन्यप्रांतीय चेतना केवळ बौद्धिक, केवळ भावगम्य असल्यास नवल नाही. असे एक ठिकाण, अशी एक वेळ आणि प्रसंग काय तो फक्त या संसदेतच जाणवतो की जिथे विस्कळीत प्रांतीयांची सुख-दुःखे एकाच ' कढई 'त वितळत राहातात! प्रांतोप्रांतीच्या ईर्षा, असूया, आशा, आकांक्षा येथे मूर्तरूप घेण्याची कोशीस करतात! आपापली गाऱ्हाणी घेऊन देशाच्या वेशीवर टांगण्यासाठी इथेच काय ती फक्त सर्वांची धडपड चालू असते. ही धडपड नेहमीच हितकर असते असे मात्र नाही. मनुष्यस्वभाव येथे जमा होणाऱ्या महशूर जनसेवकांना सोडीत नाहीच. उलट, तो कधी कधी उग्र रूपही धारण करतो. पण तरीहि आसिंधु-हिमाचल भारताची अंगभूत एकता मात्र दृष्टीआड होत नाही. आपली बहुप्रसवा भारतभूमी पुनः पुनः युगपुरुष निर्माण करून त्यांकरवी मानवी सुखदुःखांवर प्रयोग करीत राहिली आहे! मैत्रेयी गार्गींचा तात्त्विक सुसंवाद फार जुना नसावा असे इथे जाणवते. शंकराचार्य आणि गौतम, रामतीर्थ आणि विवेकानंद, महात्माजी आणि नेताजी या

साऱ्यांचा वारसदार हा देश आजही त्या कर्तृत्वाचे अवजड ओझे पाठीशी बांधून भविष्याचा दुस्तर पहाड चढतच आहे. या देशाच्या प्रौढत्वाचा साक्षात्कार, सर्वसमावेशकत्वाची जाणीव, 'पूर्वदिव्यत्वाची प्रचीति' आणि 'रम्य भावी काला'चा विश्वास देण्याचे सामर्थ्य संसदेच्या भव्य मंदिरातील सर्वप्रांतीय जन-सेवकांच्या या मेळाव्यातच समाविष्ट झाले आहे.

संसदेच्या या भव्य मंदिरातून बाहेर पडावे तो 'इंडिया गेट' चा उत्तुंग दरवाजा आणि तेथून राष्ट्रपतिभवनास सांधणारा विस्तीर्ण, आखीव 'राजमार्ग' डोळ्यात भरतो. हा राजरस्ता (King's Way) नयनरम्य तर आहेच, पण ऋतुमानाप्रमाणे तो अंगावर निरनिराळी वस्त्रे जी परिधान करतो, तीहि डोळ्यांना अनिवार आनंद देतात. या रस्त्याच्या दोन्ही अंगांस लांबवर हिरवी कुरणे दिसून येतील. त्या कुरणांच्या समीप पाण्याचे बांधून काढलेले लांबरुंद तलाव दिसतील. अधूनमधून थुयथुय उडणारी ती कारंजी. आणि या नयनरम्य वातावरणाची पार्श्वभूमी म्हणून समोर, आजूबाजूस, चारी दिशांस दिसणाऱ्या तांबड्यालाल दगडात बांधून काढलेल्या त्या उत्तुंग, भव्य इमारती. हिरव्या रंगाचा निसर्ग आणि तांबड्या दगडाच्या इमारती यातील रंगसंगतीत एक प्रकारची अहमहमिकाच चालल्यासारखी वाटते. लालभडक प्रचंड शिळांचे हे बांधकाम चौफेर सारखेच दिसते. हा लालपणा आला कुठून ? ही रक्तरंजित राजकीय उलथापालथींची निशाणी म्हणावी की बेहोष मर्दुमकीची डोळ्यातील धुंदी म्हणावी ?

वातावरणावर एकच एक ठसा उठवणाऱ्या लालभडक प्रचंड शिळांचे हे बांधकाम व निसर्गसौंदर्यात बुचकळून निघालेले त्यामागील मानवी श्रम. निसर्गाचा मन मानेल तसा आकार घेणारा आडदांडपणा इथे मानवी शक्ती व बुद्धी यांनी तासून ठोकून आटोपात आणलेला पाहून दृष्टी स्तिमित व्हावी अशी येथील शोभा व कलाकुसर आहे. पण आश्चर्य असे की या वातावरणात निर्भेळ निसर्गसौंदर्याचा साक्षात्कार होत नाही. येथील झाड-पालाही राजकीय दडपणाखाली जडमूढ झाल्यासारखा वाटतो ! येथील पाण्याची कारंजीही जागतिक परिस्फोटक परिस्थिती-मुळे मनमुराद उचंबळत नसून, दबकत दबकत आत-बाहेर करीत असल्यासारखे जाणवते. येथील हिरवीगार विस्तीर्ण कुरणे ! इवल्या इवल्या रानफुलांसाठी, खरे पहाता हे गालिचे असायचे. रंगीबेरंगी फुलपाखरांनी त्यावर रुंजी घालीत बागडायचे. पण हाही देखावा येथे कधी आढळात येत नाही. जणू ही निसर्गबाळे या गावचीच नव्हत ! जणू येथील स्वयंभू निसर्ग मानवी हस्तस्पर्शाने बाटगा झाला आहे. या विस्तीर्ण अवकाशात एक प्रकारची भयावहता भरून राहिल्यासारखे जाणवते. या कोवळ्या निसर्गाच्या पोटी एक प्रकारची दडस असल्याचे प्रत्ययास येते. हिरव्या

मैदानावरील कोवळ्या तृणांकुरांनी उपजताच माना टाकल्या आहेत जशा ! कुठे काय घडेल आणि पहाता पहाता घोडेस्वारांच्या उन्मत्त टाचाखाली भुइसपाट व्हावे लागेल याची चिंताच त्यांना पडली आहे ! शहराचे सारे सौंदर्य या अनिश्चित भीतीने काळवंडल्यासारखे वाटते !

खडा कुतुबमिनार असो की पावन बिर्लामंदिर असो, शांत राजघाट असो की भयाण बिर्लाहाऊस असो – दिल्लीच्या आसमंतांतील अणूरेणू जेवढे बोलके वाटतात आणि बोलण्यासारखेही त्यांचेजवळ जेवढे आहे, तेवढे इतरत्र एकट्या-दुकट्या शहराच्या परिसरात क्वचितच असेल. शतकानुशतकांच्या इतिहासाचे अवजड ओझे पाठीशी घेऊन वावरणारी येथील संस्कृती सतत कार्यरत आहे. नव्या कालातील नवे प्रश्न तिला भेडसावीत आहेत. गीताईचा ठेवा जिने प्रसविला तिला प्रेतांच्या खचावर गुडघे टेकून प्रार्थना करणाऱ्या व कृतकृत्यता अनुभवणाऱ्या तैमूरलाही अंकी खेळवणे भाग पडले ! तिने दाक्षिणात्य स्वातंत्र्यझेपेची अटकेपार भरारीही उघड्या डोळ्यांनी पाहिली ! ‘ दिवाण-इ-आम ’ आणि ‘ दिवाण-इ-खास ’च्या दरबारी थाटाचा आस्वाद तिने घेतला. विलायती शराबीची धुंदीही काही काळ तिच्या डोळ्यावर चढली. शांतीचे प्रेषित तिने पाहिले, रक्तपिपासूंची चटक तिने चाखली !–अगदी कालपर्यंत हेच इथे चालू आहे; हेच इथे घडत आहे !

येथील इतिहासाची व त्याच्या उच्छिष्टांची चव घेत काही काळ राजधानीच्या रस्त्यारस्त्यातून मुशाफिरी केल्यावर एकच एक ठसा मनावर उतरतो की, येथील पुराणा इतिहास काळपोटी जमा आहे. येथे दृष्टी ‘ काल ’-च्या घटितापेक्षा ‘ उद्या ’च्या पोटातील अघटितावर केंद्रित करण्याची जरूरी आहे. इतिहास दृष्टीखालून घालण्यासाठी नव्हे, तो घडविण्यासाठी: इथे धडपड करणे अगत्याचे आहे. विषाद, शोक, आश्चर्य या भावांना इथे फारशी जागा नाही. उत्साही कार्यमग्नताच काय ती इथे संभवते. याच विचारांच्या ओघात दृष्टी कुतुबवरून हळुहळू खाली उतरते, राजघाटावरील प्रशांत समाधीत संचार करणाऱ्या तत्त्वज्ञानाची स्फूर्ती घेऊन परत फिरते आणि पुनश्च संसदतील जीवन-कलहाशी निगडित असलेल्या चर्चाचर्वणात आपला सूर मिसळून भविष्यकालीन सुराज्याचा रांधा घोटीत राहाते

३४८७३ ३२

५

*

# पाटणा, प्रयाग, 'ताज', चंदिगड....

सकाळी १० वाजता पाटण्यास उतरलो. स्टेशन चांगले मोठे दिसले. अलाहाबाद सोडल्यापासून बिहारची भूमि वेगळी दिसत होती. एकच हिंदी भाषा दिल्लीत निराळी आहे, लखनौमध्ये निराळी आहे, अलाहाबादला निराळी आहे, पाटण्यास निराळी आहे. आणि केवळ भाषा निराळी आहे एवढेच सांगण्याचा हेतु नाही. या निराळेपणाच्या पोटी परस्परांविषयी असूया, ईर्षा भरपूर आहे. दोन अलग भाषिकांना परस्परांविषयी वाटते, अगदी तशी. बिहारमध्ये दारिद्र्य अधिक आहे, शिक्षणाचा मागासलेपणा आहे. गौतम बुद्धाची ही भूमी फार काल उपेक्षित राहिली आहे. पाटण्यास स्टेशनबाहेर पडलो. सायकल-रिक्शा शेकड्यांनी उभ्या आहेत! दारिद्र्य इतके अफाट आहे की, दहा-बारा आण्यांत चार-पाच मैल सायकल-रिक्शा सहज येते. रिक्षावाल्याचा पोषाख म्हणजे लक्तरे! तो धापा टाकील. चढ आला की खाली उतरून हातांनी ढकलील. कसेतरी दिव्य करून तुम्हांस मुक्कामावर नेईल. सारी यातायात पाहून तुम्ही दोन आणे अधिक द्याल तर किती खूष होईल! काही शहरांची स्मृती विशिष्ट गोष्टींनीच मनात पक्की होते. दिल्ली म्हटली की अतिशय बेढब आकाराच्या छपरांची लक्तरे लोंबवणाऱ्या सरदारजींच्या रिक्षा आठवतात. (याच एका रिक्षाने संध्याकाळी ९ वाजता कॅनॉट सर्कलमधील 'मरीना' हॉटेलसमोरच्या चौकात उलटीपालटी कोलांटी घेतली होती आणि मला रस्त्यावर फेकून दिले होते. काही इजा झाली नाही. हातातले घड्याळहि बंद पडले नाही. पण तो प्रसंग आणि दिल्लीच्या रिक्शा कधी विसरणार नाही.) मद्रासमध्ये पायाला पानांच्या गाद्या

बांधून व डोक्यावर वेताची शिरस्त्राणें घालून माणसांनी ओढलेल्या रिक्षा आपल्या हृदयावरच धावतात ! मला त्या रिक्षात बसणे अप्रशस्त वाटले. पण ही परीटघडी दया म्हणजे मूर्खपणा आहे, हे समजताच एका रिक्षात बसून मैलापूराहून बीचवर गेलों. वाटेत रिक्षावाला धावत होता ते पाहताना, त्याच्या स्नायु अन् स्नायूंची हालचाल जी मनात घर करून राहिली ती पुसली जात नाही ! बीचवरील गांधीजींच्या पुतळ्याजवळ बसलो होतो. रिक्षावालाहि जवळ बसला. जरा वेळाने तो म्हणाला, "युवर मॅरेज फिनिश्ड ?' मी 'होय' म्हणालो. तो विचारग्रस्त झाला. पुढे म्हणाला, 'सर, आय ॲम फादर ऑफ सिक्स चिल्ड्रेन. नो मनी. थ्री बॉईज हेल्प मी इन् रिक्षा.' तो स्वतःशीच पुटपुटत होता. माझ्या दयेस चाळवून पैसा काढणे, हा त्याचा उद्देश नव्हता. संसाराचे शून्यलब्धि गणित तो स्वतःस घालून घेत होता आणि त्याचा अर्थ त्याला कळत नव्हता ! मी जेव्हा दोन रुपये त्याच्या हातावर ठेवले तेव्हा तो आनंदला नाही. कृत्रिम खूष झाला नाही. मला धन्यवाद त्याने दिले नाहीत. त्याच्या हातातून रिक्षाचे दांडे एकदम खाली पडले. तो डोळे वटारून माझ्याकडे पाहत राहिला. मधाच्या गणितातील एका अपूर्णांकास छेद गेल्याचा अनुभव त्यास येत असावा ! पण सारे व्यर्थच होते ते ! पुण्याच्या दोनजणांच्या त्या सुटसुटीत व नीटस रिक्षा एकदम 'स्मार्ट' वाटतात. आगरकर, रानडे, गोखले या पुण्यांतच जन्मू शकतील असेहि त्या रिक्षा पाहून उगीचच वाटते !

पाटण्यास एका रिक्षामधून 'सदाकत' आश्रमाचा रस्ता सुधारला. राजेंद्रबाबूंच्या पूर्वायुष्यातील ती कर्मभूमी. सात आठ मैल गांवाबाहेर गेले की, गंगेच्या काठी 'सदाकत आश्रम' आहे. डेरेदार आंब्याची राई आहे. बाजूस निवास आहे. याच ठिकाणी राजेंद्रबाबू पूर्वी रहात होते ! दारी प्राजक्ताचे झाड आहे. फुलांचा सडा पडलेला आहे. बागही आहे. खोलीत आलो. सामान लावले. थंड पाण्याने स्नान केले. आश्रमभर एक फेरी मारली. बिहार-विद्यापीठ आणि शहर-कॉंग्रेस यांची कार्यालयेहि त्याच आवारात आहेत. दुपारी ग्राम-विकास अधिकाऱ्यांसाठी चालवलेल्या विद्यालयात 'हिंदी ग्रामीण पुनर्रचनेचा प्रश्न' या विषयावर व्याख्यान दिले. चर्चा झाली. या सर्व अधिकाऱ्यांकडे पाहताना एक गोष्ट सतत जाणवली आहे की, हा विषय व हे कार्यक्षेत्र समजून घेऊन काम करण्यास प्रवृत्त झालेले अधिकारी दहा-पाचहि नाहीत. मिशनरी वृत्तीने झटणाऱ्या उत्साही कार्यकर्त्यांची निकड आहे. पण केवळ अधिक चांगली नोकरी मिळेपर्यंत धडपडणारे पोटभरूच अधिक. यात फारसा दोष त्यांनाहि देता येणार नाही. प्रश्न आहे तो मूळ प्रश्नाची सोडवणूक आम्ही कशी करणार हाच.

पाटण्यात मुक्काम केवळ दोन दिवस आहे. पाटणा शहरातून दुसऱ्या दिवशी फिरलो: सचिवालय व त्याचा आसपास एकदम आधुनिक आहे. आणि नव्या दिल्लीतील रस्ते आहेत तसेच रस्ते इथे आहेत. आजच्या या दहा नियोजित वर्षांत महापूर आला आहे तो सगळीकडे बांधकामास. त्यातहि राज्योराज्यी एकेक अवाढव्य सचिवालय व तदनुषंगिक इमारती मुख्यतः झाल्या आहेत. पाटण्याचा हा भाग भव्य व दर्शनीय आहे. बाकी गाव मात्र एकदम मागासलेलेच आहे.

संध्याकाळी तुफान मेलने अलाहाबादला आलो. सकाळी उठून त्रिवेणी-संगमावर स्नानास गेलो. सायकलरिक्षा ज्या भागातून व रस्त्यातून गेली तिकडे सगळी चुना फासलेली व एका बाजूने विटा उघड्या पडलेली घरे दिसत होती. एवढे प्रयागसारखे हिंदूंचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र! पण शहराची कळा मुस्लिम संस्कृतीच्या छापाची! उत्तर भारतात फार काळ मोंगली राज्य राहिल्याने सगळीकडेच मुस्लिम संस्कृतीचा छाप दिसतो. सायकल रिक्षा संगमापासून दूर थांबली. खाली उतरताच नावाडी व पंडे गोळा झाले. माझी कल्पना होती की, विस्तृत पात्राच्या गंगामाईस थोडे तरी वाळवंट असेल. तिथे स्नान करावे, संगमावरच अल्पकाळ चिंतन करावे. इकडे तिकडे फिरून परतावे. पण ही कल्पना चुकीची ठरली. नदीच्या काठी अल्पशी चिंचोळी जागा आहे. त्या जागेत पंडेलोक आपापल्या छत्र्या उभ्या करून आत बसले आहेत. हे पंडे आपल्याइकडे मुलाणी किंवा मुसलमान कोळी गुंडाळतात तसले चौकटीचे तांबडे कापड गुंडाळतात. आपल्या इकडील भय्याकडेसुद्धा खांद्यावर तसले कापड नेहमी असते. फक्त ते नेहमी तांबडेच असते. दुसऱ्या रंगाचे नसते. त्यांचे पौरोहित्यहि विशेष डोळ्यात भरत नाही. प्रत्यक्षात धंदाच अधिक. पिंडदाना-सारखे कार्यक्रम पात्रात चालले होते. ज्या लहानशा जागेत हे चालले होते तेथेच ५४ साली त्या कुंभमेळ्यात हजारो यात्रिक साधूंच्या पायाखाली चिरडून मेले. आता तेथे फरशी केल्यासारखे दिसत होते. पूर्वी तेथे चिखल होत असे. एकंदर वातावरण काही विशेषसे पवित्र व भक्तीस पोषक वाटले नाही. डाव्या हातास गंगेवर बांधलेला अतिशय लांबलचक व भव्य पूल दिसत होता. गंगा, यमुना व आत खालून वाहाणारी सरस्वती यांचा हा त्रिवेणी संगम आणि अखिल हिंदूंचे हे पवित्र तीर्थ प्रयाग. नावेत बसून संगमापर्यंत गेलो. शुभ्र गंगा, सावळी यमुना व रंगहीन सरस्वती यांचा एकत्र वाहाणारा ओघ पिळलेल्या दोरासारखा अलग अलग दिसतो, अशा थापा नावाड्यांनी—पंड्यांनी मारल्या होत्या. पण तसे काही दिसले नाही. मात्र समुद्राच्या अथांगपणाला शोभण्यासारखी नद्यांची पात्रे पाहून नवल वाटले. तसेच ते त्यांच्यावरील पूलहि. हुगळीवरील हावडा ब्रिज, अलाहाबादेत शिरताना लागणारा यमुनेवरील पूल, कलकत्त्यास दक्षिणेश्वरी

९३३७६

जाण्यासाठी ओलांडावा लागणारा तो पूल म्हणजे स्थापत्यकलेचे अजब नमुने वाटतात. ही खरी मानवी बुद्धीची शोभा. प्रयागच्या त्रिवेणीत जरा वेळ नावेत बसून हिंडलो. माता-पितरांच्या वतीने गंगामाईस पुनः पुन्हा प्रणाम केला आणि परतलो. दुपारी बाराच्या सुमारास अलाहाबाद विद्यापीठात गेलो. सुटीमुळे ते बंदच होते. पण विद्यापीठाची इमारत, आवार, बगीच्या सर्व काही भव्योदात्त आहे. मुख्य म्हणजे गुरुवर्य रामभाऊ रानडे इथे उपकुलगुरू होते, या घटनेचा तेथे अभिमान वाटला. जरा वेळाने रिक्षात बसून ‘ सिव्हिल लाईन ’ भागात हिंडलो. मोठ्या शहरात असणारा, व्यवस्थित आखलेला, लांब-रुंद रस्त्यांचा आणि मोठमोठ्या इमारतींचा असा हा भाग आहे. मात्र त्या मानाने रस्त्याच्या कडेला मोठी, भरदार, डेरेदार झाडे बरीच दिसली. तेथून सरळ द्रौपदी घाटावर गेलो. इथे गु. रानडे रहात होते. आपल्या तपस्येची श्रेष्ठतम फले त्यांनी इथे अनुभवली. इथेहि आंबराई व इतर झाडी आहेच. एक लहानशी वाट मधूनच गंगेकडे जात होती. त्या वाटेने जाऊन घाटाच्या पायऱ्यावर बसलो. त्रिवेणी संगमापेक्षाहि हीच जागा अधिक रम्य व चिंतनास अनुकूल वाटली. गंगेचे विस्तीर्ण पात्र समोर होते. घाटावर चार दोन मुले पोहत होती. वाळू अशी पात्रात नाहीच. पांढरी माती व चिखल मात्र भरपूर. गंगेचे दोन्ही काठ जिथे जिथे पाहिले तिथे तिथे दोन्ही अंगास भुसभुशीत मातीच्या कडाच दिसतात. उत्तर प्रदेश म्हणजे गंगा-यमुनांचे सुपीक खोरे. दगड वा वाळू मुद्दाम शोधावी लागते. पांढरी स्वच्छ माती हे वैशिष्ट्य. द्रौपदी घाटावरून उठलो आणि अलाहाबादच्या रस्त्यातून उगीचच चकरा मारल्या. संध्याकाळी लीडर रोडवरील हुमायूनची कबर आणि त्याभोवतीची बाग पाहिली. तांबड्या दगडातील मोठमोठ्या कबरी व त्यावर वरपर्यंत चढून जाता येईल असे जिने दिसले. माहिती सांगण्यासाठी व पावित्र्य रक्षणार्थ सूचना देण्यासाठी गाइड्स वा पुजारी या इमारतीत होते.

रात्री १२ वाजता तुफान मेलने अलाहाबाद सोडले आणि उत्तर प्रदेशातून आडवा प्रवास करीत दुसऱ्या दिवशी चार वाजता आग्र्याच्या ‘ राजा की मंडी ’ स्टेशनवर उतरलो.

आग्रा शहरात गाडी शिरू लागली की अनेक चमत्कार होतात. प्रत्यक्ष नकाशा पाहिला नाही तर आग्रा फोर्ट, आग्रा कँट, व ‘ राजा की मंडी ’ या स्टेशनांचा भूगोल समजतच नाही. प्रथम आग्रा कँटमध्ये गाडी शिरण्यापूर्वी एक पूल लागतो. हा पूल वरूनसुद्धा लोखंडी कांबी टाकून बंद केला आहे. एकदा गाडीच्या छतावर बसलेली माणसांची रांग, गाडी पुलाच्या वरील बोळकांडीतून जात असता त्या कांबीवर आपटून मेली होती. पुलाबाहेर गाडी पडली की, आग्रा कँट स्टेशनावर ती उभी राहाते. तेथून मीटर गेजचा एक फाटा जातो.

बराच वेळ उभी राहिल्यावर गाडी जी पुन्हा सुरू झाली, ती पुन्हा जिकडून आली तिकडूनच. त्या नवलाईचे कौतुक करता करताच ती 'राजाकी मंडी' स्टेशनात उभी राहिली. ताजमहाल पाहाण्यासाठी जायचे तर हे स्टेशन अधिक सोईचे आहे. स्टेशनवर उतरलो. तांबड्या गणवेषातील एक हमाल सामान घेऊन महाराष्ट्र मंडळापर्यंत येतो म्हणाला म्हणून घेतला. रुळाच्या कडेने थोडे चालल्यावर 'महाराष्ट्र मंडळ' ही पाटी दिसली. पण ते खरे मंडळ नव्हते. अशी नकली महाराष्ट्र मंडळे इथे एक-दोन आहेत आणि एका बोळात पांढऱ्या चुन्याने भिंती फासलेल्या बैठ्या घरात "महाराष्ट्रीयांचे महाराष्ट्रीयांनी महाराष्ट्रीयांकरता चालवलेले" खरे खरे मंडळ आहे! हमाल गेला. वरच्या मजल्यावर एक खोली घेतली. पहिल्या मजल्यावर एक हॉल होता. नुकताच गणेशोत्सव झाला होता. सजवलेला बडा गणपति कोनाड्यात तसाच होता. स्नान वगैरे आटोपले आणि सायकलरिक्शा घेऊन ताजमहाल पाहाण्यास गेलो.

पाच वाजले होते. तीन चार मैल रिक्शातून गेल्यावर तांबड्या दगडाची भिंत व मधोमध भव्य दरवाजा लागला. त्यातून आत गेलो. हिरवीगार, सुव्यवस्थित व विस्तीर्ण बाग लागली. त्यातून पुनः डावीकडे वळलो आणि आजवर हजारो चित्रातून पाहिलेली ती बाग, मधली संगमरवरी लांबलचक पुष्करिणी व त्यानंतर शुभ्र—स्वच्छ अशी ती ताजमहालची आकृति एकदम डोळ्यांना दिसली. सतराव्या शतकातील त्या प्रेमिकाची ती कहाणी मूर्त स्वरूपात आज डोळ्यासमोर उभी आहे! काळ गेला. नजीकच्या यमुनेतील पाणी वाहिले आणि वाहिले. ताज मात्र खडा आहे.

मी चौथऱ्यावर चढलो. चौफेर एक फेरी मारली. त्या चारी बाजूंच्या चार मिनारांसमोर थबकलो. एका मिनाराचे दुरुस्तीकाम चालू होते. मला कल्पनेत रुजल्या होत्या, त्यापैकी एक दोन गोष्टी प्रथम खटकल्या. पहिली अशी की, हिरव्यागार बागेच्या पार्श्वभूमीवर ताजचा शुभ्रपणा एकदम डोळ्यांत भरला, तरी जवळून पाहाताच ते दगड पांढरे शुभ्र किंवा हंसधवल दिसत नाहीत. अंमळ मळके दिसतात. काळाचा परिणाम निःसंशय झाला आहे. दुसरे असे की, दगडावर दगड ठेवून उभारलेले हे मनोरे मधल्या दर्जा काळ्या रंगाने भरून उभे केले आहेत. चांगल्या दुबोटी रुंदीच्या काळ्या रेषा वरपासून खालपर्यंत त्यावर असल्यामुळे अखंड शुभ्रतेस ते बाधक ठरले आहे. मुंबईकडच्या आजच्या आत्याधुनिक इमारतीचा दर्शनी भाग पांढरट संगमरवराने मढवलेला असतो, तेव्हा दोन दगडांमध्ये रेसभरहि जागा नसते आणि उभी भिंत ही एक अखंड शिला आहेसे वाटते. तशी अखंडपणाची जाणीव ताजकडे पाहून वाटत नाही.

चौथ्यावर जाऊन हिंडलो. आत जाऊन खऱ्या व खोट्या कबरी पाहिल्या. आतला आवाज दीर्घकाल कसा प्रतिध्वनित होतो ते अनुभवले. पुनः बाहेर पडलो. पुनः निरनिराळ्या दृष्टिकोनातून ताज पाहिला. शेवटी यमुनेकडील बाजूच्या कठड्यावर येऊन बसलो. ताजच्या पार्श्वभागाकडील तांबड्या दगडांच्या भिंतीवर आदळत, आपटत यमुनेची चंद्रकोर संथपणे वाहात होती ! सारे काही पाहात, पाहिलेले गात गात आणि सर्व स्मृतींवर पाणी ओतीत !

हे प्रेमाचे स्मारक की स्मारकावरील प्रेम ? ही बांधणाऱ्याची सौंदर्यप्रीती की श्रमिकांची माती ? ऐश्वर्याची ही जाहिरात की स्वामित्वाची ही आतषबाजी ? लक्षावधि प्रेक्षकांकडे पाहून हा पांढऱ्या दगडांचा ढीग आज शेकडो वर्षे उपहासानें हसत येथे उभा आहे !

ताजसारखी समोरची बागहि सुंदर आहे. पाठीमागची यमुना सुंदर आहे. जगभर गाजलेल्या एका 'संगमरवरी स्वप्नाची' आज ओळख झाली. बाहेर पडताना हस्तकलावस्तूंची दुकाने लागतात. त्यातून एक ताजमहाल विकत घेतला. माझ्या ग्रंथालयात तो 'ताज' म्हणजे जीवनाचा एक अमोल ग्रंथ आहे. मानवी जीवनाच्या लौकिक भागाचे वैय्यर्थ तो ताज सतत मनावर ठसवतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजा की मंडी स्टेशनवर दिल्लीस जाणारी गाडी पकडण्यासाठी आलो; पण १ आक्टोबर असल्याने वेळापत्रक बदलले होते. मला हवी असणारी गाडी दुपारी ३ वाजता जाणार होती. शेवटी त्या स्टेशनातल्या सुंदर स्नानगृहात स्नान केले व जेवण करून तिथेच आराम केला. आगऱ्याची सर्व स्टेशने सर्व सोयींनी सज्ज आहेत. ताजच्या सामीप्यामुळे दूरवरचे मुशाफिर सतत येत असतात. दुपारी तीनच्या एक्सप्रेसने दिल्लीस निघालो व तिथे ७ वाजता पोचलो. पाचसहा वर्षांपूर्वीची दिल्ली आता राहिली नव्हती. नव्या दिल्लीचे स्टेशन फारच मोठे झाले होते. बृहन्महाराष्ट्र भवनात रात्रभर मुक्काम केला. मागे दोन वर्षे तेथे राहिलो होतो. राजधानीत ही एक फार चांगली सोय झालेली आहे. हवेशीर खोल्या, नेहमी उत्तम संगत आणि अमहाराष्ट्रीयांनी बनवलेले अगदी पुणेरी जेवण. हॉटेलमध्ये उतरलो आहोत असे वाटत नाही. तेथल्या त्या सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रमहि वारंवार होत असतात. त्यावेळी जमणारा महाराष्ट्रीयांचा मेळावा एकदम उच्चपदस्थ, सुखवस्तु व तुकतुकीत ध्यान असलेला दिसतो.

सकाळी ७ ला दिल्लीहून निघालो. पंजाबात रस्त्यांची सोय चांगली आहे. समृद्ध शेती म्हणजे काय, तेहि पंजाबात पाहण्यास मिळते. सुपीक जमीन, 'कृष्ण' विहिरींचे भरपूर पाणी, आणि म्हणून मैलचे मैल हिरवीगार शेती. पंजाबी शेतकरी

देशांतील इतर भागांतील सामान्य जनतेपेक्षा अधिक सुखी आहे. दिल्लीहून निलोखेडी व राजपुरा या दोन ठिकाणी प्रथम गेलो. ग्रामविकास योजनान्तर्गत शिक्षणसंस्था निलोखेडीस आहेत. एक लहानशी वसाहतच आहे. राजपुऱ्यास 'कस्तुरबा केंद्र' नावाचे निर्वासित महिलांसाठी चालवलेले मोठे ग्रामोद्योग उत्पादन केंद्र आहे. खादी, साबण, कागद, पॉटरी असले उद्योग मोठ्या प्रमाणावर उत्पादन करीत आहेत. राजपुऱ्याहून दुपारी १ वाजता बसने निघालो आणि चारच्या सुमारास चंदिगडला पोचलो.

चंदिगड. नकाशाप्रमाणे आखून वसवलेले कोरे करकरीत शहर; आणि आखणी व बांधकामहि अत्याधुनिक परदेशी तज्ज्ञ स्थापत्यविशारद आणून त्यांचेकडून करून घेतलेले. शहरातील रस्ते 'सेक्टर एक;' 'सेक्टर दोन' अशा नावाने ओळखले जातात. शहराचा विस्तार मोठा. उंची कमी. प्रथम सर्व नवे कोरे पाहून मनात विचार आला की, सामान्य जनता—शिपाई, पोस्टमन, मास्तर वगैरे—राहाते तरी कुठे? एखादी झोपडी बांधून राहायचे म्हटले, तरी त्यांना मुख्य वस्तीपासून दहापाच मैल दूर जावे लागणार. पंजाबची पहिली राजधानी लाहोर. ती पाकिस्तानात गेल्यामुळे हे नवे कोरे राजधानीचे शहर वसवले आहे. हायकोर्ट, मुख्य बाजाराचा रस्ता व चौक वगैरेची आखणी रम्य आहे. गडबड—गोंधळ अजिबात नाही.

मोटार स्टँडवरून सरळ राजभवनात गेलो. पंजाबचे राज्यपाल ना. गाडगीळ याना आधी पत्राने कळवले होते व त्यांनी भेटीसाठी दिन-वेळ दिला होता. राजभवनाच्या टुमदार, शांत, रम्य वातावरणात काकासाहेबांशी झालेली घरगुती बोलाचाली उद्‌बोधक वाटली. आजकाल गावगन्ना सफेत पुढारी वावरतात व अगदी बाह्य कारणावरून त्याना सत्तास्थान प्राप्त होते. ते प्राप्त झाले की, अशोक-अकबराचेच आपण वारसदार अशी गोड समजूत ते करून घेतात आणि त्यामुळे त्यांचे पितळ लगेच उघडे पडते. या रुबाबी वर्तनाशी काकासाहेबांचा मोठा अपवाद आहे. राज्यपाल असतानाहि 'अजि म्या सिंह पाहिला' आणि 'राज्यपाल भजी खातात' हे जगजाहीर करण्याचा सोपा, सरळ प्रामाणिकपणा आज दुर्मिळ आहे. जनतेत मिसळण्याचा त्यांचा शौक तर क्वचित् अतिरेकी आहे. सिमल्याच्या पार्श्वभूमीवरील हिमालयोन्मुख राजभवनात वावरणाऱ्या या साध्या गृहस्थाचे खरे प्रेम मेहुणपुऱ्यातील घरावरच अधिक आहे—आणि हे व्यापक अर्थाने खरे आहे, म्हणून मलाहि त्यांच्याविषयी आपुलकी वाटत आली आहे. काकासाहेबांच्या अभ्यासिकेत बोलत बसलो. खिडकीतून पलीकडे सिमल्याच्या डोंगररांगा दिसत होत्या. एकंदर वातावरण अभ्यासास व चिंतनास फार अनुकूल वाटत होते. भिंतीवरील पंजाबच्या

नकाशाच्या साहाय्याने सीमाप्रश्न वगैरेवर काकासाहेब बराच वेळ बोलले आणि नंतर ते आपल्या लेखनाविषयी बोलू लागले. राजकारणाच्या धकाधकीत आकंठ बुडाले असतानाहि गेल्या दहा-पंधरा वर्षात काकासाहेबांनी ललित लेखनाबरोबरच अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, कायदा वगैरेसारख्या विषयांवर मौलिक ग्रंथरचना केली आहे, याबद्दल मला विशेष नवल वाटते. विश्वविद्यालयाच्या शांत परिसरात वावरूनहि लेखन—संशोधनाच्या क्षेत्रात तेथील मंडळी काही करीत नाहीत. मान्यवर अपवाद अर्थात् वगळले पाहिजेत. तेथे आपापल्या विटाळ्यांत ही मंडळी राजकारण खेळत कालव्यय करतात. आणि राजकारणाच्या धबडग्यांत एखादा अविरत मौलिक लेखन करतो हे नवलच नव्हे का?

काकासाहेबांचा निरोप घेऊन मी परतलो. पुनः चंदिगड ते दिल्ली व दिल्ली ते मुंबई. डेहराडून एक्सप्रेस सात तास उशिरा मुंबईस पोचली. सुरतेच्या महापुराने एकच धमाल उडविली होती. सबंध रेल्वे लाईन वाहून गेली होती. तिची कमान झाली होती. एका लाईनवरून गोगलगाईच्या वेगाने गाडी चालत होती. मुंबई ते पाटणा, पाटणा ते चंदिगड व चंदिगड ते मुंबई असा भला मोठा त्रिकोणी प्रवास झाला. भारताच्या तीन कोपऱ्यांतील अलग अलग जीवन, मनुष्यस्वभाव, निसर्ग आणि साधर्म्य पाहून-अनुभवून परत मुंबईच्या परिसरात उतरलो. घरी आल्याचे समाधान सर्वांत अधिक वाटले.

...३४८७३.
नाटक भू-प्रवास
३०/४/६३.

६

★

# ‘श्रियेची राउळे’

“ मी सूर्याचेनि वेषें । तपे तै हे शोषे ।
पाठीं इंद्र होऊनि वर्षे । तै पुढती भरे ॥ ”

विशाल सागराच्या पाण्याची वाफ उन्हाने व्हावी आणि ती घनीभूत होऊन मेघांनी स्वाङ्गे वाहून न्यावी. गिरिगव्हरी तिचे पुन्हा पाणी व्हावे आणि भूमी शिंपडून निघावी. डोंगरमाथ्यावर पडणारी धार खाली वाहू लागावी आणि अशाच सहस्र लहानमोठया ओहळांनी एकत्र येऊन पाण्याचा एक अलोट लोट निर्माण करावा. वाहात वाहात तो जावा आणि सागरास मिळावा. उत्पत्ति, स्थिति, लयाचे हे चक्र पुरे व्हावे. नद्यांच्या जीवनकथेचे हे असे साधे शास्त्र !

उत्पत्ति आणि लय या दोन टोकांमध्ये वाहाणाऱ्या शतावधि जीवितांचा असा सरळ साधा प्रवास असला तरी त्यातच असे अनेक जन्मास येतात की, ज्यांच्या अस्तित्वाचे दुंदुभि ते जिवंत असताना वाजतात आणि त्यांच्या देहपाता-नंतरही त्या नौबती गर्जत राहातात. अनेक सहप्रवाशांना त्या जीवनापासून स्फूर्ती मिळते, साह्य मिळते. अनेकांच्या रेताड दिवसांना ते ओलावा देऊन जाते. अनेक त्यांच्या तीरावर अंमळ विसावतात आणि सत्य आणि सौंदर्य पिऊन घेतात. अशा प्रखर जीवितांच्या नावरूपाने देश आणि लोक ओळखले जातात. जडभूमि आणि उदास आकाश त्यांच्याच जयघोषाने नादावतात.

तापीचे वाळवंट आणि नर्मदेतील दगडगोटे यांनाहि भरपेट वाहाणाऱ्या नदीच्या पाण्याइतकीच शोभा दिसते. नदी म्हटली, की डोळ्यासमोर एक विशिष्ट चित्र उभे राहाते. दोन्ही तीरांवर चांगले मोठमोठाले वृक्ष आहेत; त्यातून पलिकडे गेले की, जाड्या-भरड्या वाळूचे विस्तीर्ण वाळवंट आहे; वाळवंट तुडवले की, दोन्ही अंगाच्या वाळवंटामधून लहान-मोठा जलौघ वाहतो आहे. ही नदी. तिच्या ओहळाकडे जाण्यास थोडी वाटचाल करावी लागते; तिच्या थंडगार प्रवाहात पाय बुडविण्यापूर्वी तप्त वाळूची राने तुडवून जावी लागतात. या चित्राशी विसंगत असे गंगे-यमुनेचे प्रचंड प्रवाह उत्तरेच्या सुपीक खोऱ्यातून वाहाताना पाहिले तेव्हा पवित्र भावनेचा बाजार झाल्यासारखे वाटले. आणि म्हणूनच वाईचा कृष्णाकाठ किंवा देहू-आळंदीचा इंद्रायणीतट मला अधिक मोह घालतो. पंढरपुरातील चंद्रभागा भक्तिरसात न्हावून निघाली आहे खरीच. पण तिच्या वाळवंटातील भक्तिगान वर्षाकाळातील तिच्या दुथडी वाहाणाऱ्या रूपापेक्षा अधिक मंगल वाटते. पुण्याजवळील विठ्ठलवाडी, बोटी वाहाणाऱ्या हावडाच्या गंगेपेक्षा अधिक चेतोहर वाटते. मनाच्या रुक्ष रेताडातून तो प्रवाह अवचित झुळझुळतो.

कैलासेश्वराच्या माथ्यातून उफाळणाऱ्या गंगामाईचा समुद्राला मिळे-पर्यंतचा प्रवास पाहिला आहे. त्या भागीरथीचा देश तसा वेश आहे. निसर्गाच्या मांडीवर ठायी ठायी तिने केलेली ' केली ' पहात रात्री आणि दिवस काढले आहेत. उगमाजवळ कैलास पर्वतावर ती उच्छृंखल उड्या मारीत खाली उतरते. हरिद्वार, हृषीकेशजवळ तिचा रुपेरी ओघ केवळ दृष्टी ठरणार नाही इतका तेजस्वी दिसतो. काय तो खळाळ, तो वेग, ती हंसधवलता आणि ते गांभीर्य! शंकराचा कोप मूर्तिमंत द्रवता धारण करून, वाटेत येईल ते गिळून, शापून, भस्मून फुंफाटत निघावा तसा तो ओघ. भारतीयांच्या मानसमंदिरी अहर्निश पूजा घेणारी ही भागीरथी अशी ' झडझडौनि वहिली निघालेली ' पाहून आश्चर्याचा धसका बसतो. हृषिकेश आणि त्याजवळील लक्ष्मणझूल्यावरून गंगेकडे पाहावत नाही. तिचा ओजस्वी वेग व झपाटा दुबळ्या छातीस पेलत नाही. एका बाजूस पवित्र नगाधिराजाच्या गगनचुंबी सुळक्यांना शुभ्र हिमाने घातलेले पांघरूण, खाली खोलवर पसरलेल्या दऱ्याखोऱ्यांतील हिरव्यागार झाडीशी रंगस्पर्धा करीत असते आणि त्याच पर्वताच्या अंगाखांद्यावरून उड्या घेत ही भागीरथी खळखळाटत असते.

केवळ सुंदर दिसणारे एखादे दृश्य वा चित्र पाहून वाटते तितक्याच आणि फक्त ऐंद्रीय भावना मला हृषिकेशच्या आसपास गंगालहरी पाहून आल्या नाहीत; त्यापेक्षा अधिक फार काहीतरी वाटत राहिले व ते काय हे समजून घेण्याच्या तलासात मी गुंतलो. हे ' अधिक काहीतरी ' गंगेच्या धार्मिक-

पौराणिक इतिहासाशी निबद्ध असलेल्यापैकी नव्हते. किंबहुना, मी भारतीय आहे, हिंदू आहे, अध्यात्मवादी आहे, असल्या रूक्ष व अरूपवादी विचारांना मनात थाराच मिळेना. कोणत्याही स्वरूपातील भेदाभेद आणि क्षुद्र सांसारिक पार्श्वभूमी यांच्या कुबड्या घेऊन त्या चेतोहर दृश्याकडे पहाणे मला क्षणभरही शक्य झाले नाही. पंचमहाभूतांपैकी एक असे पाणी तेथे वाहात होते. आणि निर्मळ जीवनाचा तत्क्षणीच साक्षात्कार होत होता. ते नामरूपगंधहीनच जर होते तर तेथे धर्माधर्म आणि देशोदेश यांच्या डबक्याचा आठव व्हावा कसा ? ते पाहाता पाहाता साचलेल्या जीवितातील कुजकट डबकी कशी हातोहात नष्ट होत होती. वाटेत येणारा प्रत्येक खळगा बुजवून पाणी पुढे पुढे वाहाते. मनात येणारा प्रत्येक क्षुद्र व भेदाभेदकारक विचार धुवून हे गंगाजल खाली धावत आहे. गर्द हिरव्या डोंगरमाथ्यावरून दृष्टि संथपणे विहरत होती. आणि खळ-खळणाऱ्या वेगवान् पाण्याची तिला संथ सोबत होत होती. डोंगर, झाडे, पाणी आणि त्यांचे रूप घेऊन त्या आसमंतात भरून राहिलेली एक निर्गुण निराकार चेतना. आत्मा ही जड शरीरांमागील प्रखर चेतना असेल तर अशी एक चेतना, दीप्ति, ज्योति त्या खळखळ पाण्यात आणि हिरव्यागार राईत निश्चित होती की जिची ' सुगंध वार्ता ' वारंवार अन्तःचक्षूंना येऊन भिडत होती. ' डोळे फाडून बघावे ' असे सौंदर्य चर्मचक्षू पाहातात. ' डोळे मिटून पाहावे ' असे दीप्तिमान तेज फक्त अंतरात्म्यालाच दिसते. आणि ते या अशा ठिकाणी की, जेथे पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश यांचा एकच हृद्य संयोग झालेला असतो. ही उभी हिरवीगार झाडे पाण्याचा मत्त वेग पिऊन डोंगर-माथ्याशी कुस्ती खेळत आहेत !

हृषिकेशासमीप प्रत्ययास येते ती गंगाजलाने प्रतिक्षणी सुस्नात झालेली एक दिव्य प्रभा.

इथे देववादाचा प्रश्न नाही आणि आस्तिक्याचा सवाल नाही. चारी बाजूंस उंच उंच डोंगररांगा हिरव्या रंगाने न्हाऊन आणि पांढऱ्या बर्फाने शिरे माखून उभ्या असतात. मधूनच त्या दऱ्यातून हिरवट, दुधाळ, फेसाळ पाण्याचा प्रवाह वाहात असतो. माणसाचा सांवटही येत नाही. पक्ष्यांची एखादी संथ लहर डावीकडून उजवीकडे वा वरून खाली तरंगते. तुम्ही पहाता. मनास सांगता की, हे कैलासनाथाचे माहेरघर. स्मशानातील राखाडीत सर्पावली धारण करून थयथयाट करणारा हा भणंग भैरवनाथ त्या तन्वांगी शैलजेने माणसात आणला. ही जान्हवी त्याच्या माथ्यावरून सावरली आणि रोज त्याचे पाय धूत

राहिली. जीवन हा निसर्गाचा एक आवडता खेळ. शृंगार हा त्याचा पाया. ही धौतशिखरे आणि गिरिगव्हरे, प्रवाहित जलौघ आणि फेनवल्लरी, उसाळत वाढणारी झाडे आणि हिरवी वनराजी आणि त्यांना व्यापून असणारा हा सकस एकांत, दाही दिशांना हाकारे घालून जीवनास बाहतो आहे. मधुरमीलनाच्या आत्मविस्मृतीत प्रकृति-पुरुष इथे ' भिंगुळवाणा ' उभा आहे! उमा-शंकराच्या प्रणयरागाचे आलाप आळवतो आहे वाहाणाऱ्या पाण्याच्या ' शंकरा 'नुरोधाने!

या इथे घडीभर असे बसले की, ते ' श्रियेचे राऊळ ' बोलू लागते. ' समस्त त्रैलोक्याच्या त्या गोसाव्याची ' आठवण येते. तो तुम्हास समोर दिसतो; फेसाळत पुढून वाहाणाऱ्या जान्हवीच्या प्रत्येक बिंदूत. ते वाहणारे जल कधी थांबत नाही. ' आकाश सर्वत्र वसते ', ' वायू नावभरी उगा राहात नाही ', ' पर्वत बैसका सांडत नाहीत ' ' समुद्र रेखा ओलांडत नाहीत.' कोणाच्या इच्छेने? हे श्रुति-दिठी मनोहर सृष्टिरूप ' कोणा एकाच्या ' आज्ञेने वा इच्छेने हालत-नाचत असेल काय? हे असेच वाहाणार. ते तसेच असणार. हे अपौरुषेय आहे. मातीच्या हाताने हे तेज-ओज उमलणे नाही. मोझेसला ' सायना ' पर्वतावर दिसलेले ' ते तेज ' इथे आसमंतात विखरल्यासारखे वाटते. बुद्धाला त्या जीर्ण वृक्षाखाली झालेले ' ज्ञान ' इथे अंतराळातील कणाकणात भरून राहिलेसे भासते. त्या दिव्य ज्ञानदीप्तीच्या ग्रहणाआड येणारे हे मातीचे शरीर या गंगाजलात फेकावे काय? ते तसे फेकूनही एक अमर तेजज्योति उरेल काय? या इथल्या तेजाच्या अणुरेणूत सामावून! या जान्हवीच्या जलौघात वाहात राहून! तिच्या फेनतुषारांच्या रंगीन लहरींशी ' आत्मा वा अरे द्रष्टव्यो, श्रोतव्यो, आश्वासतिव्यो ' अशा गोष्टी करीत? हे अंबितमे जान्हवी, तेजाच्या राउळी धावपळत रिगताना, माझ्या विमनस्क व्याकुळतेचा सांगावा तू त्या तेजोनिधीस कळव. हेच एक अर्घ्य मी तुला कैलासेश्वराच्या साक्षीने इथे देतो. हा तुझा वेग, तुझे ओज आणि तेज पाहिले की वाटते,

**तेथ अंतर्बाह्य गेले। निर्मळत्व एक जाले।**
**किंबहुना उरले। शुचित्वचि॥**

हरिद्वार, हृषिकेश आणि लक्ष्मणझूला यांच्या पलिकडे आहे कनखल. लक्ष्मणझूल्यावरून गंगा पाहिली की, पुन्हा: पलिकडे जाऊन तिचे दर्शन घ्यावे अशी आस उरतच नाही. पण कालिदासाच्या काव्यांत अमर झालेले ते कनखल. त्याला आज प्रत्यक्ष भेट देणे म्हणजे मेघदूताच्या दिव्य काव्यपंक्तींशी संबंध साधणे होय.

"तस्माद् गच्छेरनुकनखलं शैलराजावतीर्णां
जन्होः कन्यां सगरतनयस्वर्गसोपानपंक्तिम् ।
गौरीवक्त्रभ्रुकुटिरचनां या विहस्येव फेनैः
शंभोः केशग्रहणमकरोदिन्दुलग्नोर्मिहस्ता"

असे तो यक्ष त्या मेघास म्हणाला होता. जान्हवीचे हे सारे यौवनविशेष हृषिकेशाच्या आसपासच पाहिले आहेत. एका महान् नगाधिराजाच्या अंतर्यामातून हा तेजाळ ओघ ना आदि ना अंत असा आपला धावतो आहे.

उत्तर प्रदेशाच्या सुपीक पठारावरून नंतर भागीरथी वाहते. तिचा तेथून पुढचा प्रवास आणि कैलासाच्या कडेकपारीतून उड्या घेत जाणारा तिचा धुमाकूळ यात फार अंतर आहे. अवखळ शैशव संपून जेव्हा ती तारुण्याच्या उन्मादात अंगाने भरून वाहू लागते, तेव्हा तिची चाल गजगती होऊ नये तर काय ? पुरंध्रीचा स्थिरपणा आता अवखळ तारुण्यास मागे टाकतो. तिच्या दोन्ही अंगांचे खडखडीत वाळवंट संपते. नितळ सुपीक मातीच्या दोन बाजूंच्या खोऱ्यातून ती आता संथपणे भरपेट वाहाते. प्रियकराच्या भोवती खळाळणारा उन्मादक 'आडाणा' संपून आता नवरसाची 'आसावरी', 'अस्थाईवर स्थाइक होते'. कैलासनाथाच्या अंगांगावर लोळणाऱ्या अवखळ शैशवाचा परिपाक, स्तनपानाने जीवने पोसणारी माता बनण्यात होतो. अचपळ जान्हवी आता गंगामय्या बनते.

**का फेडित पापताप । पोखीत तीरींचे पादप ।**
**समुद्रा जाय आप । गंगेचे जैसे ॥**
**तैसी बांधली सोडित । बुडाली काढित ।**
**सांकडी फेडित । आर्तांचिया ॥**

असा तिचा बहुजनहिताय, बहुजनसुखाय प्रवास सुरू होतो. उगमारंभी तिचा असाधारण वेग व असह्य ओज जे होते ते अनंतहस्ते जनसंवर्धन करण्यासाठीच तर.

प्रयागास गंगायमुनांचा गुप्त सरस्वतीशी संगम झाला आहे आणि म्हणून अखिल हिंदुजातीचे ते एक महान् तीर्थ बनले आहे. या त्रिवेणी संगमावर अलाहाबादला गेल्यावर मी मोठ्या उत्साहाने गेलो. पण एक चिंतन-मनन करण्यास उपयुक्त ठिकाण या दृष्टीने मला तिथे फारसे समाधान लाभले

नाही. गंगेचा तिथे एक प्रचंड प्रवाह बनतो आणि जणु शतकांच्या विरहाने भेटीसाठी व्याकुळ झालेल्या यमुनेस तो असा जाऊन भेटतो की,

'मिळोनि मिळताचि असे। समुद्री गंगाजळ जैसे'

हे ज्ञानदेवांचे बोल आठवावेत. दोन महानद्यांचा समुद्रच डोळ्यास दिसतो. त्यावर उभे असलेले ते प्रदीर्घ पूल जणु सागराचे दोन तीर सांधतातसे दिसतात. येथे गंगामाई अधिक शांत-गंभीर वाटते. सावळ्या यमुनेशी तुलना करून पाहाता गंगामय्या पांढुरकी दिसली तरी हृषिकेशीन रूपेरी तेज आता लोपले आहे. कनिष्ठ भगिनीच्या सांसारिक समवायामुळे तिच्यावर आलेल्या जबाबदारीची तिला जणु पुरी जाण झाली आहे आणि तिच्यावर आलेल्या तीर्थत्वाची महात्मताहि आता ती विसरू शकत नाही.

**मीनले गंगेयमुनेचे ओघ। तैसे रसा जाहले प्रयाग**
**म्हणोनि सुस्नात होत जग। आघवे एथ ॥**

पण प्रयागच्या 'तीर्थरावो'ची महती वजा केली तर या संगमाच्या केवळ नदीकिनारीची महती मला विशेष वाटली नाही. बहुतेक धाऊक तीर्थस्थाने अशीच असतात. हजारोंचा जीवनसंग्राम तिथे पोसला जात असल्याने त्या बाजारात मूळ निसर्ग मृतवत् होत असल्यास नवल नाही. आणि त्याच्या मूळ निसर्गपणाकडे पाहून त्याचे रूप नष्ट न होऊ देण्याची आंच व उसंत कोणास असत नाही. मग नदी आपले नदीपण हरवते आणि खुल्या बाजार-पेठेत एक विकाऊ चीज म्हणून येऊन बसते. मी प्रयागच्या त्रिवेणी संगमावर फार काल थांबलो नाही. मला द्रौपदी घाटावरची आंबराई आणि ती एकांत प्रिय जान्हवी अधिक पसंत पडली. तिथे तिच्या उरी धगधगणाऱ्या अनेक कथा तिने मला ऐकवल्या; मी ऐकल्या. आपल्या अक्षय यौवनाची दर्दभरी कहाणी 'विहस्येव फेनैः' सांगितली जात होती. पण मर्त्य मानवाचा दोन घडींचा डाव सार्थ करण्यापेक्षा अधिक चिरंतन शांति त्यांच्या आत्म्याला लाभावी हाच प्रयागच्या आसपास गंगामैय्याचा खरा अट्टाहास होता. कितीएक जीवांची मूठभर रक्षा तिने आजवर आपल्या पोटी घेतली होती. असल्या भावना सहसा न जोपासणारे पंडित नेहरूहि कमलादेवीची रक्षा प्रयागला गंगार्पण केल्यावर म्हणतात, "...नंतर अलाहाबाद आले आणि तो मौल्यवान रक्षाकलश आम्ही द्रुतवाहिनी गंगेकडे घेऊन गेलो; त्या श्रेष्ठ सरितेच्या ओटीत ते अर्घ्य दिले. आमच्या किती पूर्वजांची रक्षा तिने स्वहस्ते सागरास पोचविली

आहे. आणि आमच्या किती भावी पिढ्या तिच्या पोटी आपला अंतिम प्रवास पुरा करणार आहेत!"

प्रयागहून गंगामय्या बनारसला उतरते. इथे तिच्या काठी पुन्हा काशीविश्वेश्वराने वसती केली आहे. पण उत्तरकाशीच्या अत्यंत रमणीय व अंतर हेलावणाऱ्या वातावरणात जिने आपल्या पित्याच्या अंगाखांद्यावर मनमुराद क्रीडा केली तिला काशीविश्वेश्वराचा फारसा लळा दिसला नाही. ते मंदिरही इतके असुंदर व अस्थानी आहे की, कैलासाच्या हिमाच्छादित शिखरांचा व त्यावरील सघन हिरव्या वृक्षसंभाराचा हव्यास असणारा तो शंभुनाथ बनारसच्या काशीविश्वेश्वर मंदिरांत राहात असेल हे पटतच नाही. बनारसला गंगेवर अनेक घाट बांधलेले आहेत. एकेक घाट म्हणजे मानवी जीवनाच्या सोळासंस्कारांशी निगडित आहेत. 'दशाश्वमेध' घाटावर स्नानाची एकच धमाल, तर 'मनकर्णिका' घाटावर अस्थिविसर्जनाची उदास धावपळ. प्रत्येक संस्थानिकाच्या नांवाचा एकेक घाट निराळाच. 'म्हैसूर' घाटावर बराच काळ बसलो होतो. समोरून गंगेचा पक्व प्रवाह वहातो आहे आणि घाटावरच्या बाल्कनीवजा मोठ्या ओरींत समतेची गाणी गात सर्वोदयवाद्यांचा एक मेळावा बसला आहे. याच भागीरथीने माणसाच्या वळवळीचे भगीरथ हजारो वर्षे पाहिले आहे आणि आपला क्षुद्र प्रपंच अजूनही नेटका करू न शकणारा तुटका मानव तिच्या काठी नव्या प्रतिज्ञा आणि नवे तत्त्वज्ञान उद्घोषित आहे. आमच्या पूर्वजांनी गंगा–सिंधूच्या तीरावर सामगायने गाइली आणि तिथे त्याना उपनिषदे स्फुरली. कोणताही विचार हवेत स्फुरत नाही हे खरे असेल, तर त्या औपनिषदिक तत्त्वज्ञानासही परिस्थितीची मातापितरे होती आणि त्यांना दिशा दाखवण्यास त्या ऋषिमुनींनी जीवनोपनिषद् पुरस्कारले. ते जमेस धरून व तदनुसार वर्तीव करून माणूस आज किती पुढे जावयास हवा होता! पण आजही साऱ्या समाजाला पंचमहाभूतांपासून आपले रक्षण कसे करावे इतकाच एक उदात्त प्रश्न ग्रासतो आहे. मग त्यासाठी मोठ्या दिमाखाने त्याने अनेक नवे वाद आणि प्रवाद भले निर्माण करावेत! ते गंगाजल उपहासाने किती हंसत असेल!

'घेउनी जळाचे लोट। आलिया नदी नदांचे संघाट' अशी गंगामय्या उत्तर प्रदेश आणि बिहारच्या खोऱ्यातून दुथडी वाहाते, तेव्हा काठाकाठावर जीवन फुलते, फळते.

'न केवलानां पयसां प्रसूतिमवेहि मां कामदुघां प्रसन्नाम्' नंतर ती खाली पाटण्यास येते. 'सदाकत आश्रमा' शेजारी गंगेच्या काठावर बराच वेळ बसलो होतो. तेथेहि लहान लहान व्यापारी गलबते गंगेतून वाहातुक करीत होती.

दोन्ही अंगचा सुपीक मातीचा थर आणि त्यातून घुसलेली गंगामय्या. ना वाळवंट, ना उजाड पात्र. इथे तिचे स्वरूप पाहिले की, उगमाजवळील तिची शान आणि लक्ष्मणझूल्याजवळील तिची बेफिकीर तान संपून आता ती फक्त 'उपकारापुरतीच उरली' आहे असे दिसते. 'कां श्रुति स्वभावता बोले। गंगा काजेवीण चाले॥' पण तिचे काज म्हणाल तर आहे, म्हणाल तर नाही. ती वहात आहे, गात आहे. 'आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम्' असा तिचा सागराकडे प्रवास चालू आहे. मग वाटेत कोणी काठावर शेती करो अथवा आतून गलबते हाकारो. दोन्ही काठांवरची जीवने समृद्ध करीत करीत ती ओघळत आहे.

पाटण्याहून कलकत्त्यापर्यंत गंगामैय्या केवळ जहाज-वाहतुकीचे एक साधन झाली आहे. केवढाली गलबते तिच्यातून पसार होतात! कोठे कोठे तर तिचे पैल तीर दिसतहि नाही. वाटते की, सागरच तिचा दीर्घविरह सहन न झाल्याने तिला कवटाळण्यास आत घुसला आहे. 'करी वाड पोट। समुद्र जेवीं'. अथांग पाणी, विस्तीर्ण जलाशयाची एक पातळी आणि त्यावरून होणारी ती संथ, अप्रतिहत वाहतूक. शेवटी तारुण्यातील उभारी व उत्साह आणि शैशवातील अपरिमित स्वप्ने सारी संपली. शुचितेचा सरळ ओघ अडखळला, घोटाळला आणि तिथेच किंचित् गढुळला. मग खाली उरली ती शुष्क व्यवहारिता. आणि तीच आता या जलोनिधीतून कंटाळवाणी 'ये', 'जा' करीत आहे.

आता फक्त कलकत्त्यानजीक दक्षिणेश्वरी तिच्या काठावर परमहंसांचे ते साधनमंदिर उरले आहे!

...... यमुनेचे जीवित गंगेपेक्षा किंचित् लहान असले तरी तीहि ठायी ठायी इतिहास लिहून गेली आहे. फरक आहे तो वृत्तीचा. आरंभी निखळ क्रीडाप्रेम, पुढे सर्वसंग्राहक वृत्ति व अन्ती हेतुशून्य वानप्रस्थता हे गंगामाईचे विशेष आहेत. यमुना अधिक संसाररत आहे. तिचे दिल्ली-मथुरेनजीकचे जीवित भगवान कृष्णाच्या चरित्राशी निगडित आहे, तर आग्रा शहराच्या आसपास ऐतिहासिक प्रीतिकथा तिने कशा पोसल्या आहेत! ताजमहालच्या पार्श्व-भिंतीवर मी कितीतरी वेळ यमुनेकडे पहात बसलो होतो. तिचा अर्धचंद्राकृति प्रवाह ताजपाठीमागच्या लाल भिंतीवर संथपणे आदळत चालला होता. जिच्या पाण्यात कृष्णाने कालियाचे मस्तक तुडविले ती काळी सावळी यमुना मुमताजच्या प्रीति-समाधीचे गुणगान अखंडपणे गात आहे. वर दिल्लीत राजघाटावर तिला भोवळ यावी अशी घटना घडली आहे, तरी ताजपाशी ती आपले प्रेमजीवन विसरलेली नाही. गंगायमुना हा या जीर्ण देशातील एक अटळ द्वंद्व समास आहे. कालिदासाने उत्तरेच्या हिमालयास 'पृथिव्या इव मानदण्डः' असे

संबोधले खरे. पण ते संबोधन किंचित् अपुरे होते. उत्तरेला तो नगाधिराज आणि गंगा-यमुना ह्या त्याच्या दोन कन्यका हा मानवजातीचाच एक मानदण्ड आहे. या तीन नावांच्या एकत्रित उच्चाराशिवाय भारतीयांचे प्रेमस्तोत्र पुरे होत नाही.

......आणि म्हणूनच खांद्यावर शाल पांघरून आणि पाठीवरचा बोजा कृष्णार्पण करून तुम्ही एकदा उत्तरकाशीपासून दक्षिणेश्वरापर्यंत, समोर तो हिमाद्रि साक्षीस ठेवून, गंगा-यमुनांचा काठ तुडविला, की मेंदूत ठाम बसलेले सारे अडसर कसे घळघळ वाहू लागल्याचा अनुभव येतो!

उत्तरेच्या पहाडातून करांगुलीएवढी स्रवणारी ती धार किती प्रशस्त व्हावी? गंगोत्री, हरिद्वार, हृषिकेश आणि कनखल यांच्या अवतीभंवती उड्या घेणारी जान्हवी जेव्हा प्रयाग-पाटण्याजवळ सखल प्रदेशात उतरते तेव्हा 'ह्या गंगेमाधि गगन वितळले' असल्याचे स्पष्ट दर्शन होते. वर निळेभोर सर्वव्यापक आकाश आणि खाली 'सबिन्दु-सिंधु-सुस्खलत्-तरंग-भंग रंजितम्' असा विशाल जीवनौघ! पाणी. पाणी. पाणी. हे सुमधुर जल आपल्या बिंदूबिंदूत केवढी अमाप ताकद आणि काव्य घेऊन आले आहे! साध्या स्नानगृहात पडणारी धारा पहाताच मन गानलुब्ध होते; तेथे ही विशाल जलधारा समोर पाहाताच अनाहत नादाचा जल्लोष ऐकू यावा, यांत नवल ते काय? उत्तुंग पर्वत-राजी आणि त्यातून खळाळणाऱ्या सहस्रावधि अमृतधारा यांच्या दर्शनाने माणसाचा देवत्वाशी सांधा जोडला जातो. काय लिहावे आणि कसे लिहावे समजत नाही. 'किती शब्द बनवू गा। अब्द अब्द मनी येते.'

रसरशीत जीवनाचा एकत्रित साक्षात्कार व्हायचा असेल तर कृष्णा, गोदावरी, गंगा, यमुना, कावेरी यांचा एकत्रित आठव करावा. आणि यांपैकी प्रत्येकीस मिळणाऱ्या लहान लहान नद्यांच्या काठी आठवणींचा सागर उसळतो, तोही त्यांत सामावून घ्यावा. इंद्रायणीचा देहू-आळंदीचा काठ, चंद्रभागेचे पंढरपूर, गोदातीरावरील पैठण यांच्या आठवणी त्या नद्यापासून अलग होत नाहीत. पण शेवटी या सर्व स्मृती विरल होत जातात आणि निवळशंख पाण्याची एक ओंजळ पुढे उभी राहाते. दोन्ही हातांच्या ओंजळीत सप्त-नद्यांचे ते सुमधुर जल घ्यायचे आणि नदीच्या ओटीतच ते पुनः टाकायचे—

**आवर्तबुद्बुदतरंगमयान्विकारान्**
**अम्भो यथा सलिलमेव हि तत्समस्तम्।**

अशा नद्यांच्या उगमस्थानी किंवा पर्वतराजींच्या सान्निध्यात ' श्रियेची राउळे ' भेटतात. रम्य, शांत, गूढ ठिकाणींचा तो निर्मळ एकांत. ज्ञानदेवांनीच त्याचे भावगम्य वर्णन केले आहे. साधकाचे इष्ट ठिकाण पायरवापासून दूर असावे. सदा फळती झाडे की, जी आपल्या अमृतरसाची गोडी मुळासकट देतात, त्यांची दाटी असावी. ' पाउला पाउला उदक असावे, मंद झुळुकेचा अति निश्चळु पवन असावा, निःशब्द स्थानात श्वापदांचा रिगाव होणार नाही असे असावे, पाण्यातील हंस असावेत, सारस असावेत, कोकिलकूजित असावे, निरंतर नाही पण चारदोन मयूर आले गेले तर वानवाच आहे' असे ते रम्य स्थान. 'तेथ निगूढ मठ होआवा । का शिवालय' अशी शिवालये सह्य-विंध्याच्या कडे-कपारी आणि हिमालयाच्या गिरीकुहरी कितीतरी आहेत. ते चेतोहर सौंदर्य मन मानेल तसे पिऊन घ्यावे. या अगणित ' श्रियेच्या राउळा'तून निसर्गाशी एकतानता साधली आणि अनेकदा विमनस्कतेचा उपशम झाला.

तो पुनः माणसाच्या झोपडीतील निर्बुद्ध दुःखाचा चटका बसेपर्यंत !

• • •

७

★

# आणि 'ज्ञानाची वेळाउळे'

पोचमपल्लीच्या उघड्या मैदानावर दानयज्ञाचा जेव्हा तुला साक्षात्कार झाला तेव्हाच एक स्वैरपक्षी तुझ्या कानांत किलबिलला आणि तेव्हापासून तुझी ही धरित्रीयात्रा सुरू झाली. तुझ्या पायाला भिंगरी लागली ती तेलंगणांत आणि खुल्या कुरणावर जमलेल्या जीवितयात्रिकासमोर. पण हे एक निमित्तच झाले. कितीतरी अज्ञात वर्षे तू एका दूरगामी चिंतनांत घालविलीस आणि अशा अनेक 'असूर्यपश्या' क्षणांची पिंजून पिंजून तू रक्षा केलीस. लौकिक दृष्टीस जेव्हा तू दिसत नव्हतास तेव्हाच तुझ्या नासिकाग्र दृष्टीस काही गवसले होते आणि ते पाताळाचा वेध घेण्यास सज्ज झाले होते. शक्य आहे की, तेव्हा त्या जीवितवेड्या महात्म्याबरोबर तू काळाची आतडी पिळवटून हविर्भाग संचित करीत होतास. अथवा ज्या जीविताच्या यक्षप्रश्नास हात घालावयाचा तो प्रश्न खराच अस्तित्वात आहे की नाही ते पहाण्यात तू गर्क होतास. कोणत्याही स्वरूपाच्या असाधारण तपस्येविना हा प्रश्न सुटू शकत असला तर ते तुला हवेच होते; आम्हासही हवे होते. माणसाने आपल्याच हेकट वर्तनातून अनेक गुंतागुंती निर्माण करायच्या आणि मग त्या सोडवण्यासाठी एखाद्याने कफनी पांघरून हाती कमंडलू घ्यायचा, हा संन्याशाचा संसार तुला मान्य नव्हता आणि तू त्याच्या पलिकडे केव्हाच गेला होतास. म्हणूनच तुझ्या अनेक सुहृदांनी काळ-वेळ पाहून तुला जेव्हा जेव्हा हाकारा घातला आणि ते तुझ्या धांवण्या धावले तेव्हा तू फक्त मंदस्मित केलेस आणि स्वगतलास की, 'एक दिवस माझ्या पायाला

भिंगरी लागणार आहे.' पोचमपल्लीच्या त्या दानक्षेत्रावर, 'माझ्या गावकऱ्यांना माझ्या जमिनीचा षष्ठांश देण्यास मी तयार आहे, असे सहजोद्गार जेव्हा तू ऐकलेस तेव्हाच तुझ्या अंतस्थातील रामधून अचानक सशब्द झाली आणि तुला म्हणाली, 'चल.'

तू उठलास आणि तुझ्या पायाला चाके लागली. तुझा एकच महामंत्र की, 'मी तुमचा सहावा भाऊ आहे आणि मिळकतीतला माझा सहावा वाटा मला द्या.' तुझ्या या साध्या मागणीनेच लोक अधिक विचार करू लागले. कधी कधी लोकांना अगडबंब श्रुतिवचने प्रिय असतात. कारण ती ऐकली की, लगेच त्यांची देव्हाऱ्यात प्रतिष्ठापना करून त्यांना रोज एक नमस्कार करता येतो आणि मळलेली पाउलवाट पुन्हा तुडवता येते. झोपमोड न होऊ देता; आतल्या चाव्याना जागे न करता. पुढे पुढे तर जोडा काढून ठेवण्याचीही जरूर उरत नाही. फक्त हात कपाळाला लावला की बस्स. अशा जडजंबालांना तुझा बाराक्षरी मंत्र अधिक टोचूं लागला. तू समाजशरिरातील मत्तेच्या विकृतीसच हात घातलास. प्रभूने दिलेले जेव्हा एका घरीच साटून राहिले आणि निखळपणे ते समाजात वाहू लागेना तेव्हा त्या डबक्यात विविध जीवघेण्या जंतूंचा प्रादुर्भाव झाला आणि त्याने सारे जीवनच नासून टाकले. हे किल्मिष कसे निपटावे ते कुणास उमगेना. अनेक धन्वंतरींनी आजवर त्यावर विचार केला होता आणि देशोदेशींच्या इतिहासाने त्याचे प्रयोग केले होते. पण अजूनही समाजशरीर निकोप होईना. एक रोगबीज निपटावे तर दुसरे आणि अधिक विषारी रोगबीज तेथे निर्माण होई आणि रोगाचे स्वरूप बदलले तरी रुधिराभिसरण अशुद्ध ते अशुद्धच राही. अशी एक संजीवनी हवी होती की, जी साऱ्या रोगबीजांचे निपटून मुळापर्यंत जाईल आणि समाज-पुरुषाचाच कायाकल्प करील. ती मिळण्याचा याच भूमीत संभव अधिक होता. कारण असे अनेक भीषग्वर्य येथे होऊन गेले होते आणि अशा संजीवनीस जन्म देणाऱ्या अनेक पर्वतराजी आजहि इथे उभ्या आहेत. शेवटी तू दानाचा मंत्र म्हटलास. दान. तुच्छतेने तुकडा भिरकावणे नव्हे किंवा बाहूबलाने तो हिसकावून घेणेही नव्हे. 'दानं संविभागः।' हा एक यज्ञ आहे. समाजपुरुष 'होता' आहे. प्रत्येकास आहुति टाकायची आहे. पंचमहाभूतांनी अनंतहस्ते जे दिले आहे त्यातून दोन हातांस झेपेल तेवढेच ठेवावे. उर्वरिताची आहुती या दानयज्ञात टाकावी. म्हणजे 'ईशावास्योपनिषद्' पुरे झाले. हे खरे तर आम्हास नवीन नव्हते. पण मधल्या काळात आमचे गणित पार चुकले. संग्रह आणि संचय हेच आम्हास सुवत्तेचे लक्षण वाटले आणि अपरिग्रह आम्हास दैन्यलक्षण भासले. मग त्यातून निपजले ते केवळ दुःख, दैन्य आणि दारिद्र्य. म्हणूनच,

ॐ पूर्णमदः पूर्णमिदम्
पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय
पूर्णमेवावशिष्यते ॥

हे पुन्हा एकदा सांगणारा ऋषि हवा होता. ते ऋषिपण घेऊनच पाचमपल्लीच्या वेशीबाहेर आपली पडशी आणि पावले तू टाकलीस !

वेशीबाहेर पडलेले तुझे पाऊल अजून गावठाणात स्थिर होत नाही. कारण तुला ठाऊक आहे की, झंझावाती दौरे फक्त वाहनांना गति देतात आणि लंबीचौडी व्याख्यानबाजी आपल्याच शब्दांना पाहून अडखळते, लाजते. म्होरक्यांनी संघटना बांधाव्या आणि मग शिष्यगणाने सत्यान्वेषणाचा राजरोस धंदा करावा, हा 'अव्यापारेषु व्यापार' तुला माहीत आहे. म्हणून तू ठरवलेस की, संघटणा नको, पताका नकोत, मठ नकोत आणि संस्था नकोत. उठावे आणि कामास लागावे. तू पदयात्रा काढलीस. ठरवलेस की, झोपडी-झोपडीतील साध्या सरळ माणसास भेटावे आणि 'हे गणित' सुटते का ते पहावे. अथवा ठरवलेस तरी कसले ? जेव्हा प्रज्ञेस पंख फुटतात आणि जाण विश्वाची चिंता करू लागते, तेव्हा मन काही ठरवीत नाही आणि पाय रस्ता चालत नाहीत. ते सहजपणे हवेत विहरू लागते. तसे तू पाऊल उचललेस आणि अफाट देशाची धरणी तू तुडवू लागलास. तुझे 'असतेपण' लोपले. 'नावरूप' हरपले. एका अर्थाने 'भूतजात' तुला 'झणे' विसरली देखील. तिच्या ध्यानात राहिले ते इतकेच की, देवाने दिलेले माणसाने साठवू नये. आज आंध्र, उद्या मद्रास, तर कधी महाराष्ट्र आणि कधी गुजराथ असा तू फिरलास आणि लोक म्हणाले, 'बाबा, या'.

हजारो एकर जमीन तुला मिळाली आणि अशा प्रकारे आपल्या इष्टगृही गेली. दानमहती धनिकास समजू लागली. भू-दान, ग्राम-दान, संपत्ति-दान अशा पायऱ्या-पायऱ्याने समाजपुरुष अंग धरू लागला आणि केवळ प्रज्ञ इच्छाशक्तीच्या बळावर एक अभिनव क्रांती इथे रुजू लागली. आपली क्रूर अपत्ये आपल्याबरोबर घेऊन न येता जनमनात इथे क्रांतीचा प्रादुर्भाव झाला. तुझ्या या यशाने अनेकांप्रमाणेच मलाहि जाग आणली. वाटले, 'जे वंगेत सांपडणार नाही ते चिमटीत सापडू शकते', ते असे. मी ठरवले की, तुझ्याबरोबर चार दिवस राहावे. पाहावे. आपल्याच नष्ट प्रजेच्या कर्तुकीने व्याकूळ झालेल्या अष्टदिशा तुझ्या सादाची वाट पहात आहेत, तेव्हा मीही एक दिवस या प्रवाही लोकमातेच्या काठावर अंमळ विसावावे म्हणतो. लोकोत्तर पुरुषांच्या तत्त्वज्ञानाची

समज पुस्तके वाचून येत नाही. ती त्यांच्या प्रत्यक्ष सहवासानेच येणार. कारण तुझ्या योजनेस ठाम अवधि नव्हता आणि ठोकळ लक्ष्येहि नव्हती. एखाद्या राजकीय पक्षाचे सौभाग्य लेणे लेऊन तू आपले काम आखलेले नव्हतेस. तुला साऱ्या भेदाभेदांचा लघुतम साधारण विभाज्य काढावयाचा होता आणि उभ्या मानवी जीवनाचा छेद घेऊन मानवी दुःख निपटावयाचे होते. म्हणून तू लोकात राहात होतास, बोलत होतास, चालत होतास. ज्ञानेश्वर सांगून गेले की, खरी अहिंसा काय ती पहायची असेल तर तसा एक सत्पुरुषच पहावा.

जें अहिंसा कानें ऐकिजे । ग्रंथाधारें निरुपिजे ।
ते पाहावी हें उपजे । तैं तोचि पाहावा ।।

त्याचप्रमाणे एकांतात स्फुरलेले आणि लोकांतात बहरलेले तुझे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष सहवासावाचून समजणे कठीण. सहानुभूतीचा लोट तुझ्या रक्तातून वहात होता आणि मनुष्यदेहाच्या साऱ्या उपाधी आलोडून तू पलीकडे गेला होतास.

तैसेनि मार्दवे पाय । भूमीवरी न्यासितु जाय ।
लागती तेथ होय । जनां सुख ।।
पुढां स्नेह पाझरे । मागां चालती अक्षरें ।
शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ।।
ऐसा मनें देहें वाचा । सर्व संन्यासु दंडाचा ।
जाहला ठायीं जयाचां । देखशील ।।
तो जाण वेल्हाळ । ज्ञानाचें वेळाऊळ ।
हें असो निखळ । ज्ञानचि तो ।।

ज्ञानेशांच्या या वर्णनाशी जुळणारा आम्हास माहीत असलेला, जवळात जवळचा असा सत्पुरुष म्हणजे तूच एक होतास. माझ्या मनाची तळमळ होती की, काही काळ तुझा सहवास व्हावा आणि तुझ्या तत्त्वज्ञानाचे प्रत्यक्षतः निरूपण करावे.

त्या वेळीं इंदूर शहरात तुझा मुक्काम होता. सायंकाळी सहा वाजता मी इंदूरास पोचलो आणि तुझ्या निवासाकडे निघालो. प्रार्थनेची वेळ झाली होती. पाऊस पडू लागला होता. लोक म्हणाले, ‘ बाबा, आत इमारतीत प्रार्थना करू या. ’ तू म्हणालास, ‘ आमसभा बसू शकेल एवढा निवारा असला तरच प्रार्थना आत. मी आत आणि लोक बाहेर पावसात हे होणे नाही. ’ सर्व लोकाना बसता येईल एवढी जागा नव्हती. तू उत्तरलास ‘ तर मग माझी प्रार्थना

बाहेर उघडल्यावर होईल. आणि पाऊस असेपर्यंत ती चालू राहील!' वरुणराजाने संतत धार धरिली. एक लहानसे खादीचे कापड तू टाळूवर बांधलेस. त्या पावसाच्या अभिषेकात वेद आणि ऋचा तुझ्या मुखातून स्रवू लागल्या. एक नवाच अनुभव अंगांगातून शहारत गेला. दहापंधरा मिनिटे वेदपठन झाल्यावर तू म्हणालास की, आता मूक प्रार्थना करू या. ज्याला जे नाम प्रिय आहे, ते त्याने मनात स्मरावे. कोणत्याही नामाचा आग्रह नाही, सशब्द प्रार्थनेचा हट्ट नाही. आपल्या अंतरातील देव जागा व्हावा हे लक्ष्य. मतप्रसार, धर्मप्रसार वा उच्चनीच भेदाभेद यांचा मुतराम संबंध नाही. अशी मूक प्रार्थना झाली आणि सभा संपली. इंदुरास आल्यावरोबरच तुझे असे दर्शन झाले. आग्रह-दुराग्रहाच्या दूर दूर असे एक आध्यात्मिक वातावरण अनुभवास आले. इंदुरातील ती संध्याकाळ, रंक-राव आणि महाल-झोपडी यांची पर्वा न करता स्रवणारी ती पर्जन्यधारा आणि पाण्याइतकीच पावन आणि निर्मळ अशी तुझी वाणी. शायराच्या शब्दात पण या प्रसंगास अनुलक्षून बोलायचे म्हणजे,

**आए भी लोग, बैठे भी, उठ भी खडे हुए**
**मैं जा ही देखता तेरी मैफिलमें रह गया**

पुढे दोनतीन दिवस तुझ्या प्रत्येक कृतीचा अभ्यास करता आला. ढोवळ शरीरधर्म तुझ्या स्मृतीतच राहिलेले नाहीत. ते हट्टाने रोधलेले नाहीत, तर ते केव्हा सुटले ते तुझे तुलाच समजलेले नाही. तुझे वाचन आणि प्रचलित शास्त्रीय जगाशी तू राखलेला अद्यावत संबंध नवलाचा आहे. तशीच तुझी ती व्यापक विचारधारा. एका प्रवचनात तू म्हणालास, 'दोन देशात मी आता आहे असा उभा राहाणार नाही, यापुढे शास्त्र मला तसे करू देणार नाही असे हिमालय आता म्हणेल. राष्ट्राराष्ट्रांच्या भौगोलिक मर्यादा म्हणजे केवळ अपघात. त्यांचा मागोवा घेत राज्ये उभी करण्याची आशा आता धरू नका!' अशा अर्थाचे ते प्रवचन म्हणजे पक्क विचारांच्या व्यापकतेची परिसीमाच होती. तुझे अस्तित्व हेच मुळी विचारास जोराची चालना देणारे. यासाठीच देशोदेशींचे विचारवान येथे येऊन तुझ्या स्थंडिलावर आपापल्या पणत्या उजळून घेऊन जात आहेत.

तुझ्या जीविताकडे पाहिले की, कृतकृत्यतेचे समाधान मिळते. ते तसे तुलाही मिळत असावेसे वाटते. इंदुरास जेव्हा तुझी प्रकृती अंमळ सुधारल्याचे मला जाणवले व मी तसे इतरांपाशी बोललो तेव्हा ते म्हणाले की, मध्यप्रदेशातील खुनी—दरोडेखोरांच्या शरणागतीने तुला एक विशेषच समाधान वाटले व त्याचा तुझ्या मनावर उत्साहवर्धक परिणाम झाल्यावाचून राहिला नाही.

' मीही तुम्हासारखा एक बंडखोर आहे. तेव्हा तुम्ही माझ्याकडे या आणि आपण मिळूनच नवसमाज उभारण्याचा प्रयत्न करू या ' ही तुझी अभिनव हाक जेव्हा समाजातील अगदी पराकोटीस गेलेल्या समाजविघातक शक्तीपर्यंत पोचली आणि ते सारेजण तुझ्या धामी येऊन दाखल झाले तेव्हा पुन्हा एक नवीन जाग समाजास आल्याचा अनुभव तुला आला. विध्वंसक शक्तीचे भय जर सर्वांना वाटते व त्या भयाची मशाल अप्रतिहतपणे पेटती ठेवून एखादी व्यक्ति, समाज किंवा राष्ट्र दुसऱ्यास काबूत ठेवण्याचा प्रयत्न करतात तर प्रेमाची पताका उंच धरून सर्वांच्या अन्तःकरणापर्यंत का पोचता येऊ नये याचा तू सतत विचार करीत होतास आणि त्याच वेळी मध्यप्रदेशातील दुष्ट प्रवृत्तींनी तुझ्या प्रेमाच्या हाकेला ' ओ ' दिली म्हणून साहजिकच तुला आनंद झाला. ते एक आगळेच समाधान तुझ्या मुखावर विलसले.

उत्तम परिपक्व बुद्धी, आत्यंतिक वैराग्य, मानवतेविषयी नितांत सहानुभाव व अन्यांच्या सुखवृद्धीसाठी अहर्निश कष्टरतता ही तुझ्या ठिकाणीची साधनचतुष्टये माणसाच्या जीविताची अंतिम लक्ष्ये नव्हत का ? स्थितप्रज्ञतेचा तू मूर्तिमंत आदर्श. जे. कृष्णमूर्ति एके ठिकाणी म्हणतात की, " माणसाने वैभवसंपन्नतेत मरणे म्हणजे आयुष्य फुकट घालवण्यासारखेच आहे. " ( To die rich is to have lived in vain ) वैभव मिळवण्यासाठी लागणारी गुणसंपन्नता अंगी असणे जरूर. पण ती तशी असल्यावर केवळ धनसंचयाच्या मागे जीवन रावबणे हे अगदीच मूर्खपणाचे कृत्य आहे. आणि हे येथे लिहिताना दारिद्र्य व सधनता या दोन्ही टोकांचा स्वाद व दर्शन घेतले असल्याने एक आत्मप्रत्ययच लिहावयाचा आहे. सहज मिळत असलेले ऐश्वर्य, त्यात विशेष अर्थ नाही हे समजून आल्याने, न मिळवणे, यातच मोठा पराक्रम आहे. महत्त्वाकांक्षा जिंकणे हीच खरी महत्त्वाकांक्षा. दृश्य जीवितहेतूच्या पलिकडे काही अधिक बलवान असा जीविताशय आहे असे जाणवले तर साध्या संसाराविषयी— तो नीटपणे केल्यानंतर—अनास्था वाटणे यात गैर काही नाही; तोच खरा पुरुषार्थ आहे. त्या निकषावर घासून पहाता तुझे जीवित तुला भरपूर समाधान देत असेल व इतरेजनांनाही तुझ्याकडे पाहून तसेच वाटत असेल.

तुझ्या उदात्त जीवनाबद्दलचे समाधान केवळ तुझ्याबरोबर हिंडताना आणि तुझ्या सहवासातच तेवढे लाभते असे नाही. ठायी ठायी तप्त भूमीवर व सहृदय मानवतेवर तुझ्या पावलांच्या खुणा उमटल्याचे मी पाहिले आहे. आज एक कोणी ' बाबा ' आम् पददलितांची चिंता करीत या देशात उभा-आडवा असा पायीच चालतो आहे, हे झोपडी-झोपडीतून माहीत झाले आहे. कोइमतूर जिल्ह्याच्या तिरुपूर तालुक्यात मी पुष्कळ हिंडलो. कांगायम्, पलाडम्, वीरापांडी

अशी छोटी छोटी खेडी पायाखाली घातली. तुझ्या 'भूदानमूलक ग्रामोद्योग-प्रधान अहिंसक समाजरचनेचा' दुंदुभि अशा खेड्यातूनही गरजतो आहे. मी या खेडोपाडी मुद्दाम पहात होतो की, तुझ्या स्वप्नांची शिदोरी कितीजणांची भूक शमवीत आहे! आणि या खेड्यांतून मला अतिशय उत्साहवर्धक दृश्ये पहायला मिळाली. ग्रामोद्योगांचे कार्य मद्रास राज्यात चांगलेच अंग धरून आहे. प्रत्येक घरी अंबर चरखा तर फिरत होताच पण त्या अशिक्षित व अर्धपोटी खेडुतांनी केवळ अनुभवाच्या आधाराने त्यात लहानसहान सुधारणा केल्या होत्या आणि दररोजचे उत्पादन वाढवले होते. आबालवृद्धांच्या हाती ते सुदर्शन फिरत असताना पाहून माझ्या मनात आले की, भरलेल्या पोटावर ग्रामोद्योगाच्या इष्टानिष्टतेचा वितंडवाद आम्ही शहरी पांढरपेशे किती दिमाखाने घालतो आणि स्वतःच्या पढीक अननुभवातच मशगुल होऊन राहातो. केवळ ग्रांथिक तत्त्वज्ञानाच्या तर्क-कर्कशतेचा आश्रय घेऊन या खंडप्राय देशातील आर्थिक प्रश्न सुटणार नाहीत. इतकेच नव्हे तर त्यांची तोंडओळखही होणार नाही. बेकारीचे प्रत्यही अधिका-धिक गंभीर होणारे 'रूप लोचनी पाहिल्यावर' या देशातील वस्तुस्थितीचा किती सखोल व व्यापक विचार गांधीजींनी केला होता त्याचे प्रत्यंतर येते. आर्थिक योजनांच्या आराखड्यांची व सविस्तर कार्यक्रमाची घाऊक आयात परदेशातून करून येथले प्रश्न सुटणार नाहीत, हा एकच ठाम निष्कर्ष दहा वर्षांच्या नियोजनाची देशभर चाललेली धडपड मला शिकवून गेली. वीरापांडी नावाच्या एका खेड्यात मी घरोघर हिंडलो. किमान आठजणांचे तरी ते एक कुटुंब एका घरात होते. प्रत्येकजण चरखा फिरवीत होता. दररोज रुपयाभरापर्यंत सर्वसाधारण कमाई करीत होता. त्या गावात हातमाग मुद्दाम घालून विणकरांची कुटुंबे स्थायिक केली होती आणि कातणे व विणणे यांच्या आश्रयाने एरव्ही केवळ भटके या स्थितीत राहिले असते असे शे-पन्नास ग्रामस्थ भरपूर काम करीत होते. पोटभर जेवत होते. आमच्या योजनेतील अन्य कोणताही कार्यक्रम त्यांचेपर्यंत जाऊन पोचला नसता आणि त्यांच्या दैनंदिन उपासमारीची अंश-भरहि सुटका झाली नसती.

एक ऐंशी वर्षांची 'राजम्मा' कातीत होती. तिचे हातपाय थकलेले होते आणि हिंडणे-फिरणे तिला अशक्य होते. मानही 'नन्ना' करू लागली होती. डोईवरच्या सफेद झिंजांचा कापूस आताच धनुकली मारल्यासारखा स्वैर विहरत होता. चेहऱ्यावरची ती अनेक पावसाळे पाहिलेली पक्व अनुभूती, हिंदी ग्रामीण अर्थव्यवस्थेचे एक दारुण प्रश्नचिन्ह म्हणून माझ्यासमोर उभी होती, माझेकडे एकटक पहात. तिच्या हातात चरखा फिरत होता आणि सुताची दीर्घसूत्री तार बाहेर पडत होती. मी राजम्माचे पाय धरले आणि तिला प्रणाम केला. तिला

दिसत होते वेताचेच. तामीळ भाषेत तिने मला आशीर्वाद दिला. सोबत्यांनी सांगितले की, ती तुम्हास ‘ राजा हो ’ म्हणाली.

‘ अम्मा, तू कशासाठी काततेस ? ’ मी विचारले.

‘ पोटासाठी ’ ती उत्तरली.

( कदाचित् कातण्यातील ‘ फॅशन ’ तिने पाहिली असावी व म्हणून ‘ पोटासाठी ’ हा विकल्प सांगणे तिला आवश्यक वाटले असावे ! )

‘ किती वेळ काततेस ? काय मिळते ? ’

ती म्हणाली की, अधूनमधून चार एक तास तिच्याने काम करवते. याशिवाय तिला अन्य काहीही करणे शक्य नाही आणि सुमारे सहा आणे रोज ती मिळवते. ते कुटुंबाच्या मासिक उत्पन्नांत मोलाची भर टाकतात.

अशा कित्येक राजम्मा तामीळनाडातील खेडोपाडी मला भेटल्या. मद्रास राज्यातील खादी उत्पादनाचे काम व त्याचा तादृश फायदा मला अत्यंत समाधानाचा वाटला. स्वप्नाळू योजना आणि त्या महान् योजनेतील पैशाचा निरर्थक व्यय यांना बगल देऊन, प्रत्यक्ष वस्तुस्थिती जी आहे ती तशी स्वीकारून त्यावर उत्तर शोधण्याचा प्रयत्न व त्यात मिळालेले यश तामीळनाडात पहावयास मिळाले, आणि त्याचे समाधान वाटले. ही सर्व कुटुंबे आणि त्यातील दरोबस्त कामसू कारागीर ‘ बापू ’ आणि ‘ बाबा ’ यांचे कृतज्ञ आहेत व रोजच्या प्रार्थनेत ते तुझी आठवणही करतात.

तुझ्या दृष्टिकोणातून तुझ्या तत्वज्ञानाकडे पाहिले आणि जीवनाचा तुझा ढाचा अनुभवला की भरपूर समाधान मिळते, असे मी वर लिहिले. आपण आपली शक्ति-बुद्धि समष्टीच्या सुखासाठी खर्चावी व स्वतःचे जीवित उन्नत करण्याचा प्रयत्न करावा हा एक जीवितहेतू झाला. पण त्याबरोबरच आपल्या तपस्येने समष्टीचे सुख अस्तित्वात येते की नाही हे पहाण्याची उत्कंठा असणे चूक म्हणता येणार नाही. कर्मयोग कितीही इष्ट असला आणि तो निष्काम असणे जरूर असले तरी स्वतःच्या तत्त्वज्ञानाचा आणि कार्याचा परिपाक पाहूनच कार्याची प्रेरणा मिळत जाते व जावी. आणि इथेच तुझ्या कार्याच्या मर्यादा स्पष्ट दिसू लागतात व विमनस्कता पदरी येते. तसे पाहिले तर गेली पन्नास–पाऊणशे वर्षे, या देशाने दोन असामान्य युगपुरुषांच्या आधिपत्त्याखाली गुजरली. गांधीजी आणि स्वतः तू. पण याच विशिष्ट कालात सामाजिक जीवनातील प्रत्येक क्षेत्रात अशुद्धता, दंभ, खोटेपणा, स्वार्थलंपटता आणि हिंसा यांचा वारेमाप धूमाकूळ माजला आहे हेही आज प्रत्येकाच्या अनुभवास येते.

का हे असे ? अगदी निष्ठावान् अनुयायीही या साऱ्या अशुद्ध चारित्र्यापासून दूर नाहीत. किंबहुना तुझे किंवा गांधींचे पुढारीपण पत्करताना आचारसंहितेच्या काही किमान मर्यादा पाळल्या पाहिजेत असे त्यांना भावतच नाही आणि याचा फार अनिष्ट परिणाम समाजावर होत आहे. झाला आहे.

सफेत कार्यकर्त्यांपासून किंवा तुझ्या तत्त्वज्ञानाची पोपटपंची करणाऱ्या तुझ्या अनुयायांपासून दोन हात दूर राहाण्याचीच समाजाची प्रवृत्ती दिसून येते ! ‘ हेचि काय फळ तव तपाला ? ’ बनारसमध्ये मी दोन दिवस राहिलो. त्या वेळी ‘ स्वच्छ शहराचा ’ तुझा कार्यक्रम चालला होता. इंदूर, बनारस अशी काही शहरे निवडून तेथे अनेकविध कार्यक्रम चालू होता. बनारस शहरात त्या दिवशी सकाळी आम्ही असे उभे होतो. एका स्थानिक विधायक कार्यकर्त्याच्या पुढाईतपणाने सेवा-कार्यकर्त्यांची एक लहानशी मिरवणूक समतेचे गान गात समोरून येत होती. वास्तविक द्वेष वाटावा असे त्यात काही नव्हते. तरीपण आम्ही उभे होतो तेथून हाताच्या अंतरावर उभे असणाऱ्या चार-दोन श्रमिकात बोलाचाली झाली ती मी ऐकली. एकजण मिरवणूक पाहून म्हणाला,

‘ चोर कंपनी आयी ’

ते कोणत्याही पक्षाचे लोक नव्हते. वृत्तपत्रे वाचून अशिष्ट वावदूकपणा अंगी शिरलेले ते कोणी सुखवस्तु समाजविन्मुख रिकामटेकडे नव्हते. ते साधे श्रमिक होते. जीवनकलहात तग्र-व्यग्र होते. प्राथमिक जीवनमानही त्यांना अद्याप दुर्मिळ होते. आणि पूर्वग्रह घेऊन बेजबाबदार विधाने करण्याचाही त्यांचा प्रयत्न नव्हता. म्हणूनच त्यांची ती सहजोद्भव टीका मला एकदम चटका देऊन गेली. तुझ्या वैयक्तिक तपस्येची शान पटूनही हीच एक सर्वसाधारण प्रतिक्रिया समाजात तुझ्या कार्यक्रमाची आहे हेही मान्य केल्याशिवाय चालत नाही आणि इथेच बुद्धीस तडा जातो, आणि आंतड्यास तिढा पडतो.

जागतिक कामगारांना एक होण्याची आरोळी शंभर वर्षांमागेच ठोकली गेली होती. एका देशात ती खरी झाली. कामगारांचे राज्य झाले. देशाची भौतिक प्रगती वारेमाप झाली. सर्व काही झाले. पण ती आरोळी इतरेजनांना प्रेरणा देण्यापूर्वीच त्या आद्य देशातील घटना जाणवून विचारवंतांचा भ्रमनिरास झाला. अन्याय, असत्य, पिळवणूक यांचा निःपात झाल्याचे कांही दिसले नाही. उलटपक्षी अधिक कडू जहर त्यात भिनले गेले आणि लोक भयचकित झाले. आता तर बेलगाम भांडवलशाहीचे दोष या कामगार राज्यातही भेडसावू लागले आहेत आणि आणखीनच विमनस्कता जाणवू लागली आहे. मानवेंद्र रॉयसारख्या ज्येष्ठ मानवतावाद्यालाही ‘बोल्शेविकांच्या सद्गुणांच्या यादीत ‘सत्यं,

शिवं, सुंदरम्'ला स्थान नसावे याचा मला विषाद वाटतो असेच म्हणावे लागले ना ? ' आणि त्यांच्या त्या तपस्वी पत्नीचा तो दुःखद अन्त म्हणजे मानवेंद्रांच्या वरील विधानापुढे दिले गेलेले एक दारूण उद्गारचिन्हच नव्हे का ? कमकुवतांचा गुळगुळीत सुधारणावाद जितका पोरकट व क्रांतिविरोधी तितकाच आडदांडांचा हा माथेफिरूपणा बेचव. खरी क्रांती काही निराळ्याच स्वर्गासाठी अभिप्रेत होती. पण क्रांतीची चक्रे एकदा फिरू लागली की त्यातून पदरी काय पडेल ते कोणी सांगावे आणि कसे सांगावे ?

अशा परिस्थितीत मानवी जीवनाच्या उदात्तीकरणाबद्दलचा ध्येयवाद लुळा पडतो. मी त्यासाठी काही करावे व त्या धडपडीच्या आवरणाखाली माझ्या जीवनासाठी काही उसना आवेश पैदा करावा हेही होत नाही. तसाच विचार करायचा तर वाटते की लौकिकार्थाने आपले जीवन अत्यंत सुखावह करणे हाच एक जीवितहेतु होऊं शकेल. मात्र तो एक निर्दय खेळ होईल. दुसऱ्यास निपटून आपला झेंडा सदैव उंच फडकवण्याचा प्रयत्न करायचा इतकेच. यांत रस कसा वाटावा आणि तन्मयता कशी साधावी ?

या असल्या मानसिक व्यामोहात सदैव बुडून गेलो आहे. दैनंदिन व्यवहारात स्वारस्य वाटत नाही. केवळ बौद्धिक प्रगती, समाजाची सेवा, राष्ट्रकार्य इत्यादि ध्येये आता कस्पटासमान वाटतात. मग जीवितहेतू तरी काय असा प्रश्न सतत समोर उभा राहातो. अड्यारच्या परिसरात कृष्णमूर्तींना अनेक वेळा ऐकले, इंदूरच्या आसमंतात विनोबांच्या पावन वाणीचा लाभ घेतला, निंबाळच्या माळावर भक्तिसुखाची अनुभूती संपादिली आणि अशी अनेक ' ज्ञानाची वेळाउळे ' ग्रंथांच्या सहाय्याने जवळ करून पाहिली. पण चित्त हरवून जावे आणि मन गुंतून रहावे असा आशय आणि प्रकाश अप्राप्यच राहिला. पदरी पडली ती केवळ शुष्क विमनस्कता, व्यामोहित अशांति. तिची दुःखे किती असह्य असतात ते काय सांगावे ? कधी कधी वाटते की, एकवेळ अंधश्रद्धा पुरविली पण ही वांझ साशंकता वा संभ्रमावस्था नको.

आणि तरीही दिवस चाललेच आहेत !

**दिनरपि रजनी सायंप्रातः**<br>
**शिशिर वसंतौ पुनरायातः**<br>
**काल-क्रीडति गच्छत्यायुः**<br>
**तदपि न मुञ्चति आशावायुः...**

● ● ●

अनुक्रम

८

★

# उटी, एक सौंदर्यगुटी....

झुंजूमुंजू झाले आहे. नव्या सकाळी दिसणारे नवे वातावरण इथे कोइमतुरातही अपरिचित वाटत नाही. तीच विचकत बिचकत येणारी चराचरावरील जाग. आमची आरामगाडी टीक वेळेस सुरू झाली आहे. टपाल घेण्यासाठी तिने कोइमतुरातच एक-दोन चकरा मारल्या आणि ती मार्गस्थ झाली आहे. सुंदर रस्ता, दूरवर बाहणारे ते नीलगिरी. ना खडखड, ना धडधड, अशा एंजिनाच्या लयकारीत आतील लब्ध-प्रतिष्ठितांसह आरामगाडी सुसाट धावते आहे. थंडगार हवा. माफकसा वाऱ्याचा झोत. मनाच्या अतिशय समाधानी अवस्थेत हा प्रवास सुरू झाला आहे. उटीच्या कुतुहलाने डोळे सदोदित बाहेर पाहात आहेत. दिसेल ते पिऊन घेत आहेत. केवढा प्रचंड देश आहे ! मन मानेल तेव्हा ‘ आसिंधु सिंधुपर्यंता ’ भ्रमन्ति करता येते. देश, वेश, भाषा किती निराळ्या ! तरीही सर्वाभूती असलेल्या अध्याहृत एकतेची जाणही आहेच आहे ! तीही खरी आहे. पटणारी आहे. आणि त्या एकतेस--- विविधतेतील एकतेस--- जोजावणारी ही निसर्गमातेची किमया किती खरी आहे ! आजवर हजारो मैलांच्या अंतरापलीकडे पाहिलेल्या वस्तुस्थितीतही हा एकत्वाचा साक्षात्कार असाच झालेला आहे. बरे, ती केवळ आत्मनिष्ठ जाण म्हणावी तर ही आत्मनिष्ठता तरी एकच साद का देते ? ज्या मातीतून, वनस्पतीतून, आकाशातून, पाण्यातून ही अस्मिता आकारली, तिच्यातील एकतेमुळेच तर खंडप्राय देशाच्या या सुदूर कोनाकोपऱ्यातील शिलापाषाण आणि झाड-झडोरा एकच गूज बोलतात. एकच सांगोवा सांगतात. एकच तार सर्वत्र झंकारली जाते. एकच ‘ ॐ ’कार सर्वत्र ओठावर नाचतो.

चैत्र-वैशाखाच्या रणरणत्या दुपारी मृगजळाच्या काठावर शहाबादच्या त्या फरशींच्या खाणी आणि हैदराबादजवळील त्या प्रचंड, अखंड, कवेत न मावणाऱ्या शिळा माझ्याजवळ आपले दुःख बोलल्या होत्या. कितीतरी वेळ मी मुकेपणाने त्यांचेजवळ बसून राहिलो होतो. त्यांची समजूत काढीत होतो. आणि भर उन्हात त्यांच्या अश्रुधारा निघाल्या ठिकाणीच सुकत होत्या. शेवटी मी जेव्हा त्यांना आश्वासन दिले की, वृंदावनाच्या बागेतील त्या रंगीत फुलांना मी त्यांचा निरोप कळवीन आणि दिल्लीच्या राष्ट्रपतीभवनातील नयनरम्य बगीचात त्यांच्या दुःखावर दोन शब्द बोलेन तेव्हा त्या शिळा अमळ सावरल्या. तरीही त्यातील एक जीर्ण ज्येष्ठा म्हणालीच की, नगरवासीयांना झुलविण्यात तरबेज असलेल्या आणि कृत्रिमतेचे पंख लावून अष्टौप्रहर क्रीडा करण्यात दंग असलेल्या या बागबगीचाकडून त्यांना फारशा अपेक्षा नव्हत्या. बोलायचेच तर, त्यांचे दुःख मी त्या हरितस्नात केरळनगरीत बोलावे. हिमालयाच्या पायथ्याशी गंगामाईच्या काठावर त्या वनराजीस ते सुनवावे. खांडव्याहून इंदोरास जाताना एखाद्या ज्ञातास्वाद पुरंध्रीने हुलकावण्या दाखवाव्यात तशा हुलकावण्या, पुन्हा तशी जवळीक, मग सहवास, पुन्हा सुदूरत्व, असे भावविभाव ती नदी गाडीस दाखवीत होती. त्या तिच्या धिटाईचा आणि छचोरपणाचा परिस्फोट जेव्हा मी ‘ ताज ’ काठी भरपेट वाहाणाऱ्या यमुनेजवळ केला तेव्हा तिने मला ‘ प्रीति ’ म्हणजे काय ते कसे उसासत, धपापत, हसत आणि लाजत सांगितले होते ! बेलूर मठात बसलो होतो तेव्हा वाटले होते की, ‘ धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ’ हे खरे आहे काय ? आणि “ मीनाक्षी ’ मंदिरातील देवभावाच्या आडोशाने उभा असलेला त्या प्रचंड मंदिरातील तो विस्तीर्ण मंडप आणि त्यातील त्या शेकडो मूर्ति, ती आश्चर्यकारक शिल्पकला आणि ती समाजमनाची तत्कालीन उंची पाहाता पाहाता वाटले होते की, आम्ही प्रगती केली म्हणायची ती कोणती, कोणत्या दिशेने आणि कसल्या प्रकारची ? माझा हा धुमाकूळ शांत झाला तो फक्त त्या दगडांच्या कलापूर्ण विश्वात जो एक दगडी खांब उभा होता त्यावर मी छेडलेल्या ‘ सरगम ’ने. तो जीर्ण पाषाणपुरुष किती मधुर सरगम् छेडीत होता ! तो नंदी आणि ते संगीत हीच काय ती त्या गोपुराखालील सत्ये होती. बाकी सारे मिथ्या होते. त्या सप्तसुरांनी शतकांच्या प्रगतीचे भरतवाक्य गाइले होते !

आमच्या आरामगाडीने ‘ मेट्टापलियम् ’ सोडले आहे आणि उटीच्या स्वर्गनगरीत आम्ही प्रवेश करीत आहोत. उटी, उदकमंडलम्, या दक्षिण देशात कित्येक गावे इतकी अन्वर्थक नावे घेऊन येतात की, नावातील ताल रूपाच्या दृश्यांशी अगदी बेमालूम संवाद साधतो. जमिनीपासून ७ ते ८ हजार फूट उंचावत गेलेले हे नीलगिरी आणि अधूनमधून त्याहूनही उंच उंच असे

त्यांचे सुळके नीलाकाशातील उदक खेचून आणणारे कोणी कमंडलु धारण करणारे तापसच वाटतात.

गाडी घाटात चढत आहे. दोन्ही बाजूंस हिरवीगार गर्द झाडी. उंच सूचिपर्ण वृक्षाचे चोहोकडे स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम. उतरत्या डोंगरकडावर डेरेदार चहाचे मळे. चहाच्या झुडपांची लागवड प्रायः उतरणीवर करायची असते. कारण मुळात पडलेल्या पाण्याचा निचरा व्हावा लागतो. पण उतरण उतरण तरी किती असावी? पाण्याच्या माऱ्याने हे सारे झुडूपच कसे धुऊन निघत नाही असा अचंबा वाटतो! वल्कलांची इरली पांघरून पाटीवरच्या भल्या मोठ्या टोपलीत दोन्ही हातांनी चहाची पाने खुडून टाकणाऱ्या, त्या चहाच्या झुडुपांसारख्याच खुज्या दिसणाऱ्या, शेतकऱ्यांच्या मुली आपले काम एकतानतेने करीत आहेत. प्रत्येक फर्लांगाच्या चढणीने आम्ही त्या गर्द हरितकाननात आत आत घुसत आहो. मागे वळून पाहिले की, जमिनीपासून किती उंच आलो ते दिसत आहे. सहजपणे चढत गेलेल्या उंचीचा अचंबा वाटत आहे. दोन-चार फर्लांग सरळ वाट कापली की, वळावे लागत आहे आणि ते वळणही साधेसुधे नसून केसातील आकड्याच्या स्वरूपाचे! 'हेअर पिन बेंड' अशा पाट्याच मुळी वळणावळणावर उभ्या आहेत. एका लयबद्ध हुंकारात, निःशब्द वातावरणात आमचा सारथी अगदी सहजपणे आमची गाडी वर चढवीत आहे. अधूनमधून उदकमंडलाचे शिखर गाठणारी तीन रुळांची ती छोटेखानी गाडी आणि तिचा रेखांकित विचित्र पथ आमच्या बसच्या मार्गात येत आहे. तोही पार करून आम्ही वरवर रिघत आहोत. प्रत्येक पंधरा मिनिटांच्या चढणीनंतर आम्हांस अधिक निःशब्द वातावरणात शिरत असल्याचा भास होत आहे. जंगलाच्या गुहेत आणखी आत आत जात आहोत. आणि जों जों आत जावे तों तों अधिकाधिक खोल शिरण्याची भूक वाढतच आहे. पाण्यात सूर मारला की कसे अधिक खोल खोल घुसावे वाटते, तशीच मादक इच्छा त्या निबीडाटवीत आत आत घुसण्याची होत आहे.

नीलगिरीच्या त्या उन्मत्त नीलिम्यात चढावर चढ घेऊन मत्त झालेली आमची मने आता पांगुळत आहेत. छातीवर त्या व्यापक सौंदर्याचा दबदबा उतरला आहे. एकाएकी आमच्या आरामगाडीत डिझेलचा धूर भरू लागल्याने ड्रायव्हरने ती बाजूस उभी केली आणि नेमके हवे होते तेच आम्हास मिळाले! बस उभी राहाताच आम्ही सारे खाली उतरलो आहोत. आमच्या पंचवीसतीस जणांच्या विश्वात तामीळ उतारूंचे आधिक्य आहे. तरी मी, एक सरदारजी आणि एक गोरी स्त्री सोडूनही, १०–११ जणांची एक फूटबॉल टीम आमच्यात आहे.

पट्ट्यापट्ट्यांचे खमीस व पायातले कॅनव्हस बूट या वेषातच ते आमच्यात आहेत. त्यांचा हास्यविनोद व कलकलाट कोइमतूरहून निघताना बराच चालला होता. गाडी जसजशी ' चढू ' लागली तसतसे हे सारे आवाज बंद होत आले आहेत. आणि आता गाडी उभी राहाताच हे सर्व उतारू खाली उतरून अगदी निःशब्दतेने आसमन्त न्याहाळीत आहेत. कोणाच्याही आज्ञेवाचून त्या साऱ्यांच्या वाचा मुक्या झाल्या आहेत आणि प्रत्येकजण न्याहाळीत आहे, पिऊन घेत आहे; दोन डोळ्यांच्या वाटे आपले मन आणि आत्मा त्या निरुपम नवलाईत बुचकळून काढीत आहे. आणि हे अगदी सहज, अगदी नेणिवेतून. दोन पावले टाकून असलेल्या एका नाल्याच्या कठड्यावर मी विसावलो आहे. निळ्या आकाशाखाली दूरवर नीलगिरींच्या उत्तुंग शिखरांची निळाई. त्या अलीकडे एक दरी. आकंठ वनस्पती आणि वृक्ष यांनी भरलेली. समोर लव्हाळ्यांचे मार्दव. पुरातन वटवृक्ष आणि वठलेल्या खोडातील विरूप ढोली यांना लपेटून उभा असणारा वृक्षांचा सागर. साग आहेत. खराची झाडे आहेत. सिंकोना वृक्ष आहेत. सूचिपर्णांचा तर खचच आहे. तृण-वेलीही आहेत. आणि या हिरव्या तेजःपुंज रसरशीत गालिचावर अनेक रंगांची, अनेक आकारांची फुलेच फुले आहेत.

दहा वाजण्याचा सुमार. पानापानावर आणि फांद्याफांद्यावर उन्हाचे लहानमोठे आरसे—कवडसे चकाकत आहेत. मधूनच वाऱ्याची झुळूक येई. अनुभव बोलण्यासाठी तोंड उघडतो तेव्हा ओठांची हालचाल कशी झाली न झाली अशी होते, तशीच त्या मोकळ्या आसमंतात आलेल्या वाऱ्याच्या झुळकीने वृक्षपर्णांची हालचाल होत आहे. एखादा सुस्कारा सोडल्यागत. एखादा निःश्वास टाकल्यागत. समोर वृक्षाच्या आडव्या फांदीवर एक आकाशपक्षी बसला आहे. आमच्याइतकाच शांत, निश्चल. एकदम आपली चोच खोडावर आपटून तो टक् टक् आवाज करू लागला. एक घार संथ गिरक्या घेत खाली उतरली. ' कर्‌कर् ', ' चकम् ' अशी ललकार देत दुसरा एक पक्षी समोरून पसार झाला. वृक्षांच्या बुडात साचलेल्या पानांच्या ढिगात खस्‌खस् आवाज झाला आणि एक रानमांजर त्यातून बाहेर पडले ! माझ्याकडे पाहात एकदम उभे राहिले आणि दुसऱ्याच क्षणी पुन्हा त्या ढिगात नाहीसे झाले ! माझी दृष्टि, अगदी जवळ, हाताच्या अंतरावर स्थिरावली आहे. उन्हाच्या एका कवडश्याने एक रानफुलांचा ताटवा चमकत आहे. गुडघाभर उंच हिरवे गवत. त्यामध्ये मिरीएवढी वचकभर फुले ! पांढरी, निळी, पिवळी आणि जांभळी. नजर ठरत नाही. रुपयाच्या आकाराची फुलपांखरे त्या ताटव्याभोवती रुंझी घालीत आहेत. निःशब्द वातावरणात फुललेली चेतना. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश यांच्या सौंदर्यगुच्छातून दरवळणारा एक गंधहीन सुवास ! इथे डोळ्यांना ऐकू येत आहे,

कान पहात आहेत, स्पर्श प्राशीत आहे आणि जाण अजाण झाली आहे. किंबहुना डोळे मिटले तरच हे दिसत आहे. स्मृति नष्ट झाली तरच त्याचा स्वाद घेता येत आहे. त्या विशाल सृष्टीशी मनाचे फुलपाखरू रुंझी घालीत आहे. आणि आता सांगण्यासारखे कांहीच उरलेले नाही !

भुईसपाट कारवारचे प्रचंड कानन पाहिले आहे. काटेरी बाभुळवनासारखे खुळखुळणारे गीरवन पाहिले आहे. पसरणीच्या घाटमाथ्यावर जांभुळआंब्यांची घनचक्कर पाहिली आहे. आंबा घाट आणि फोंडा घाट यावरून दृष्टि चौफेर फेकली आहे. तामिळनाडमधून केरळात शिरताना ओव्हलकोट जंक्शनच्या आसपास पसरलेला पश्चिम घाटांतील वृक्षपसारा पाहिला आहे. विंध्याचलावरील दऱ्याखोऱ्यातून पहाताना,

Five miles meandering with the mazy motion
The sacred river ran

प्रत्येक जंगलाचा छाप निराळा. वास निराळा. कुठे भीति, कुठे औदासिन्य, कुठे दडस, कुठे व्याकुळता जाणवते. पण नीलगिरीच्या चतुःसीमेतील या वृक्षसमारंभास नाव एकच. सौंदर्य ! नितान्त सौंदर्य ! सारे सत्यं, शिवं, सुंदरम् ! आकाशाच्या घुमटाखाली नीलगिरीच्या भिंतीआड उभी असलेली चैतन्याची ती सुंदर मूर्ती. त्या राउळातील सुस्नात तेजोमंदिरात अष्टौप्रहर तेजाने तेजाची आरती चाललेली आहे. अनाहताची हल्लर वाजत आहे. अवाक् वेदपठण चालले आहे. सत्याची दुंदुभी गाजत आहे. जितेपणाचे सार्थक होत आहे. मृत्यूस अमृतत्वाचे स्नान घडत आहे !

आमची आरामगाडी पुन्हा मार्गस्थ झाली आहे. पुन्हा चढण. पुन्हा वेग. पुनश्च वृक्षलतांना मागे रेटीत नीलगिरीच्या सुळक्याकडे धाव. गिरमिटासारखे वर वर वळसे घेत चढताना आणि चौफेर सुंदर निसर्गाचीच सातत्याने सोबत घेताना वाटते आहे की, हा स्वर्गसोपान तर नव्हे ! असेच चढत चढत, गिरक्या घेत घेत, मनाचे हलके पीस हळूच आकाशाच्या फटीतून स्वर्गाच्या बगीचात तर घुसणार नाही ! झोपडीसमोर टाकलेल्या वेलीच्या बीतून राक्षसाने लावलेली वेल अशीच उंच उंच आकाशात गेली नव्हती का ? आता परतणे नको. नीलगिरीवरून नीलाकाशात आता उड्डाण करावे. नीलगिरीच्या माथ्यावर पाय खाली मोकळे सोडून बसावे. तसे बसूनच राहावे. तिथेच आळून जावे आणि वाळून जावे !

पहाता पहाता आमची गाडी कुन्नूर शहरात शिरली. आणि आतापर्यंत कमी असलेल्या आणखी एका गोष्टीची त्या सौंदर्यसागरात भर पडली. तांबडमाती ! चौफेर तांबूस माती ! हिरवेगार सूचिपर्ण वृक्ष. दूर नीलगिरी. कुन्नूर

शहरही मोठे: सुंदर: आहे. हिरव्या झाडींतून आणि राकट डोंगरकड्यावरून कोमल तांबूस पंचगणीत शिरताच पसरणीच्या घाटमाथ्यावर जसे नेत्रांस एकदम विसावल्यासारखे वाटते, अगदी हुबेहुब तोच अनुभव कुन्नूर शहरात शिरल्याबरोबर येतो आहे. कुन्नूर ही उटकमंडची वेसच आहे. कुन्नूर ते उटी एकच एक हिरवे तांबडे रम्य वातावरण आहे. सुंदरतेची परिसीमा आहे. हवेतील सुखद बदल जाणवू लागला आहे. ११–१२ वाजण्याची वेळ आणि बंद गळ्याचा लोकरी कोट. तरीही शिंका येत आहेत. डोके बधीर झाले आहे. फुलांच्या ताटव्यांची चोहीकडे खैरात आहे. अशीच वळणे घेत क्वचित् पठारावरून धावत आमची आरामगाडी शेवटी उटीच्या मोटर स्टँडवर उभी राहिली. उदकमंडलम् ते हे ! सुमारे ८ हजार फूट उंच. निळ्या निळ्या डोंगरमाथ्यावर, थंडीची रजई पांघरून, हिरव्यागार वनश्रीत नांगरून पडलेले ते रम्य ठिकाण. थंड हवेची ती फुलराणी.

आता दोन दिवस याच स्वर्गात काढायचे आहेत. सकाळी लवकर उठलो आहे आणि गावातून एक फेरी मारीत आहे. सारे कसे हलके फुलके वाटत आहे. मधोमध रेसकोर्स आणि त्याच्या एका बाजूस बाजार. महाबळेश्वरापेक्षा गाव खूपच मोठे आहे. पण गांव, लोक, भाषा आणि आचार पाहाताच परकेपणा वाटतो आहे. दूरत्वाची जाण येत आहे. गावातील फेरफटका आटोपून विजनवनी भ्रमंती करीत आहे. चक्क उन्हात फुलांचे सागर चारी दिशास नाचत आहेत. उत्कृष्ट छायाप्रकाशांतील 'काळे-पांढरे' सिनेचित्र पहात असताना खरेपणाचा जो प्रत्यय येतो तो महाबळेश्वरादि सह्यगिरीच्या दऱ्याखोऱ्यातून येतो आणि रमणीय रंगीत चित्रपट पहाताना नेत्रांना होणाऱ्या अनुपम सुखासारखे सुख उटीच्या नेत्रदीपक रंगीबेरंगी देखाव्याकडे पाहिले असता लाभते. मनावर अहर्निश असलेले दडपण उचलते, पाठीवरचा बोजा पार वितळतो आणि संकुचितपणा, नैराश्य, हेवेदावे आणि संचयप्रवृत्ति यांची पहाता पहाता फुलपांखरे बनून हवेत नाचू लागतात. परमेश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा आणखी तो काय द्यायचा ? माणसाच्या प्रायः सुसंस्कृत असलेल्या वृत्तीचा दिलासा आणखी तो कुठे मिळायचा ?

गेले दोन दिवस केवळ परींच्या राज्यात नांदत असल्यासारखे वाटते आहे. मी डोडाबेट्टाच्या नऊ हजार फुटावरून पृथ्वीचा परीघ अजमावतो आहे. कधी अधूनमधून लकाकणाऱ्या सरोवरातील रुप्याचा पारा डोळ्यांच्या बाहुल्यात साठवतो आहे. कधी सूचिपर्णांच्या गिरद्यावरून घरंगळत अलगदपणे वटवृक्षाच्या माथ्यावर स्वतःला सावरीत आहे. कधी उटीच्या सरोवरातील जलक्रीडा मनाचे

पंख पिसारून हवेतून करीत आहे. आणि अष्टौप्रहर हजार रंगांच्या आणि हजार आकारांच्या फुलांच्या पायघड्यांवरून चालत आहे. मला वाटते आहे की, माझ्या डोईवर सूचिपर्णांच्या झिंजा आहेत आणि मी श्वासागणिक फुलेच फुले श्वसित आहे, निःश्वसित आहे. किंबहुना तसे तरी कसले? माझे 'मी' पण केव्हाच संपले आहे; आणि निसर्गाचे अलगपणही संपुष्टात आले आहे.

" अगर फिरदौस बररुए जमी अस्त,

हमी अस्तो, हमी अस्तो, हमी अस्त ! "

ही पार्थिव नगरी नव्हेच. हे उटकमंड नव्हे. ही उटी नव्हे. ही एक सौंदर्यगुटि आहे. दोनच दिवसांपूर्वी ही गुटि मी प्राशन केली आहे. रोज एकदा ती पुन्हा पुन्हा प्राशीत आहे. त्यामुळे माझी जाणच फुलांची झाली आहे. निळ्या डोंगरांचा आणि हिरव्या वनश्रीचा रंग ती प्याली आहे. मी परीच्या राज्यात, फुलांच्या वसनात आणि रंगांच्या प्रकाशात रूप-रस-गंधमय एक फूलच झालो आहे...

अखेर आज उटीचा निरोप घेत आहे. दुपारी १ वाजता मैसूरची आरामगाडी निघत आहे. तामिळनाडच्या बाजूने उटी चढलो. मैसूरच्या बाजूने हे नीलगिरी उतरायचे आहेत. चहाचे मळे आता अधिकाधिक दिसताहेत. तशीच ती नागमोडी वळणे ! हिरव्यागार वनराजीतून कोरून काढलेली ती रम्य चोरवाट ! उटी चढताना सूर्योन्मेषांचा वाढता झगझगाट ते नील पार्श्वभूमीवरील हिरवे वन अधिकाधिक रसरशीत, तेजःपुंज करीत होता. आता उटी उतरताना ढळता सूर्य ते धूसर, गंभीर करीत आहे. वाटेत गुडालूर आले. बस उभी राहिली. इथे पुरता सूर्यास्त झाला आहे. संधिप्रकाशही मंद मलिन भासत आहे. मिटल्या सूर्यफुलासारखे हे अवघे वनच रात्रीच्या विसाव्यासाठी आपल्या घरट्यात बंदिस्त झाले आहे.

संपले. ते पर्वत, ते वन, ते सौंदर्य सारे तिथे आहे. हे मन, ही सौंदर्य-तृष्णा इथे आहे. पण अंधार पसरला आणि सगळे संपले. आम्ही मैसूरच्या हद्दीत प्रवेश केला आहे. सपाट प्रदेशातून बस सुसाट मार्ग कापीत आहे. आता ते नीलगिरी मागे दूर राहिले. पहाता पहाता समोर मैसूरच्या दिव्यांचा समुद्र झगझगतो आहे. त्या दीपसागरात बस घुसली. दोन दिवस मन ज्या अपूर्व, अज्ञात तेजात न्हात होते ते तेज संपले आहे. पुनश्च ऐश्वर्य आणि ईर्षा यांचा झगझगाट डोळ्यांसमोर नाचू लागला आहे. प्रकाशात असूनही अंधारात चाचपडावे लागत आहे !

● ● ●

१

★

## तीन व्यक्ती, चार रस्ते...

कोणत्याही रस्त्यावर तुम्ही अमळ उभे राहा. दोन्ही हातांच्या फुटपाथमधून दुचाकीसाठी एक रस्ता असेल आणि त्याच्या दोन्ही अंगांस एकाच वयाची, एकाच जातीची, एकजात वाढलेली झाडे असतील. पांच-दहा मिनिटांच्या अंतराने एखादी मोटार येईल, गंभीर चेहऱ्याने निघून जाईल. मुंबई-कलकत्त्यातील मोटरगाड्यांची धंदेवाईक शर्यत दिल्लीच्या रस्त्यातून दिसणार नाही. जिकडे तिकडे राजधानीचा प्रौढ डोल आणि दरारा. मात्र या गंभीर डामडौलास अपवाद आहे दिल्लीतील पोलिसांचा! अगदी राष्ट्रपति-भवनासमोरचा पोलिस झाला तरी तो 'मनाने मवाळू कृतीने कृपाळू' असतो. एकदा त्याच्यासमोरून दिव्याशिवाय सायकल जाताना मी पाहिली. सायकलवाला चक्क त्याच्या दृष्टिपथात आल्यावर खाली उतरला. त्याच्यासमोरून सायकल हातात घेऊन गेला. पाच पावलांनंतर पुन्हा पोलिस पाहात असतानाच सायकलवर बसून गेला! सायकल हे दिल्लीत कुटुंब-वाहनच आहे! याच राष्ट्रपतिभवनापुढून, इतरही अनेक हमरस्त्यावरून, एकाच सायकलवर सीटवर पतिराज, कॅरिअरवर पत्नी, पुढे दांडीवर अपत्य, समोर टोपलीत बालराजे असा काफिला सहजपणे जातो! कधी कधी याच संचात जगात येऊ घातलेल्या अपत्याचाही समावेश असतो. हे सारे लटांवर जात असता कुटुंब-प्रमुखाने फक्त हसून पोलिसाकडे पाहायचे! आपण कायद्यात बसणारी गोष्ट करीत नाही व त्याची जाण आपणांस आहे इतके सुचवावयाचे. आणि नागरिकांच्या पवित्र हेतूबद्दल शंका उरली नाही की, त्यांच्या प्रत्यक्ष कायदेभंगाबद्दल विनाकारण कुरकुर करायची नाही असा मनाचा समजूतदारपणा फक्त नव्या दिल्लीतील पोलिसांकडूनच अपेक्षावा!

जसे पोलिस तशीच इतर सार्वजनिक कार्यक्षमता ! पंजाबी दिलदार ढिलाई सगळीकडे ओतप्रोत भरलेली. बसच्या ड्रायव्हर-कंडक्टरांना गणवेश नसायचे. तिकिटांसाठी व गल्ला गोळा करण्यासाठी पिशव्या-पेट्या नसायच्या. 'पंच' नसायचा. बसमध्ये एक विजेची घंटा असेल, एक दोरीची असेल, एक शिट्टी कंडक्टरकडे असेल. पण घंटांच्या खाणाखुणांवरून बस क्वचितच चालेल वा थांबेल. स्टॉपवर बाहेर रांग नाही. रांगेने आत प्रवेश नाही. सारा ऐसपैस गचाळ कारभार. पण असे असूनही तापटपणा, चिडाचिडी आणि हेकट रुक्षता मात्र मुंबई-कलकत्त्यापेक्षा फार कमी ! आनंद इतकाच की, परिस्थिती झपाट्याने सुधारते आहे. ५३–५४ साली होती त्यापेक्षा कितीतरी अधिक टापटीप व शिस्त आज दिसते आहे. तरीही शान 'विज्ञानभवना'च्या उत्तुंग इमारतीशी, अशोक हॉटेल व परदेश-वकिलायत कॉलनीशी, हा गचाळेपणा अतिशय विसंगत दिसतो. बेचव वाटतो. माझ्या मते नव्या दिल्लीच्या एकंदर रुबाबास व दब-दब्यास साजेसा पोलिसांचा पोषाख म्हणजे 'स्कॉटलंड यार्ड' पोलिसां-चाच. बाकी पोलिसांचाही 'देश तसा वेश' असावा हे एकापरीने नवलच नव्हे का ? ज्याची भीति वाटून घ्यायची म्हटले तरी कधी वाटत नाही असा दिल्लीकर पोलिस; फेल्ट हॅटसारखी टोप्यांची शिसरे एका बाजूचा टोपीचा काठ वर मुडपून घालणारे केरळीय पोलिस: खाकी कापडाचीच पगडीवजा टोपी घालणारे तमीळ पोलिस; आणि साधारणपणे पोलिसासारखे दिसणारे बंगदेशीय पोलिस; अंगी सर्वगुणसंपन्नता असूनही मळकट निळ्या पोशाखात वावरणारे मुंबईकर पोलिस. प्रत्येकाचा घाट निराळा, थाट निराळा, बकूब निराळा. त्रिवेंद्रमच्या भरचौकांतील पोलिसांच्याहि पायात केवळ पटीज् बांधलेल्या आणि पादत्राणांचा अभाव असलेला पाहिला तेव्हा मी तोंड दुसरीकडेच वळवले !

तर मी दिल्लीची गोष्ट सांगत होतो. अशा अनेक गंमती असलेली ती राजधानी. मी ५४ साली जेव्हा तिथे बराच काल राहिलो तेव्हा तत्पूर्वीच्या उत्तरेकडील उलाढालींचे क्रूर व्रण दिल्लीवरही दिसत होते ! राजधानीच्या आलिशान राजरस्त्यामधून इतका गचाळ कारभार का असावा, हा विचार वारंवार मनात येई. पण बाहेर बोलण्याचा धीर होत नसे. विचारायचे कुणाला ? उत्तर देणार कोण ? त्याच दिल्लीच्या राजरस्त्यात जातीयतेने किती बेलगाम धुमाकूळ घातला होता ! सरकारातील पट्टीचे रथीमहारथी कार्यवाहीत असतानाही नव्या दिल्लीच्या तेव्हाच्या उघड्याबंब स्टेशनातील फलाटावर प्रेतांची रास म्हणे रचून ठेवली होती ! रस्त्यात प्रेतांचा खच पडलेला. प्रेतांच्या कानात सोने अडकलेले. सारे सोने सोडवून घेण्यास अवधि कुठला ? तेव्हा पिशवीभर कानच कान कापून घ्यावेत आणि निवांत आडोशाला जाऊन सोने घ्यावे व कान

फेकावे, हा तर्कशुद्ध व्यापार चाललेला! एक सुंदर रमणी एकदा दहापाच गुडांनी काबीज करून चालवलेली होती. तसाच दुसरा जमाव पुढून आला आणि त्याच रमणीवर मालकी सांगू लागला. तेव्हा त्या सौंदर्याचे दोन सारखे भाग करून दोघांनी वाटून घेतले आणि आपली सौंदर्यदृष्टि व न्यायप्रीती शाबूत राखली! एक का दोन, किती चुटके सांगावेत. ही अतिशयोक्ति म्हणावी तर याहूनही भयानक कृत्ये हजारोंनी राज्याराज्यात झाल्याचे सर्वश्रुत आहे. मानवी मनास 'प्रीतीचा' एवढा फुलोरा आल्याचा इतिहासात दाखला नाही! याच दिल्लीच्या परिसरात तैमुरलंगाने काफरांची कत्तल केली, पण प्रेतांच्या राशीवर गुडघे टेकून अल्लाची करुणा भाकली होती! ५४ साली रस्तोरस्ती याच कहाण्या हवेत घोटाळत होत्या. त्या तेथे आता पौरजनांना रस्त्याची डावी-उजवी संभाळणे आणि दुचाकीवर डबल सीट न जाणे किती बेचव आणि आळणी वाटत असणार!

... पण नव्या दिल्लीत एक रस्ता मात्र मला सतत आवडत आला आहे. त्या रस्त्याचे व्यक्तिमत्व जितके कलामय तितकेच गंभीर; जितके लोकाभिमुख तितकेच कठोर भासत आले आहे. राष्ट्रपतिभवन एका अंगास उभे आहे. ऐसपैस रस्त्याच्या दोन्ही अंगांस हिरवळी आहेत. पलीकडे संसदसदस्यांना राहाण्यासाठी निवास आहेत. मधूनच हा रस्ता सरळपणे, धिटाईने, रुबाबाने दुसऱ्या एका प्रशस्त बंगल्यास जाऊन मिळाला आहे. 'साऊथ अव्हेन्यू' चे व्यक्तिमत्त्व खरो-खरच दमदार आहे. त्याची खरी मदार आहे ती त्याच्या हाती अमाप सत्ता आहे म्हणून नव्हे. त्याची शान आहे ती त्याच्या विद्वत्तेबद्दल नव्हे. त्याचा बोलबाला आहे तो त्याच्या लोकप्रियतेमुळे नव्हे. हा रस्ता अटळ आहे. राष्ट्रपतिभवन आणि प्रधानमंत्रिनिवास यांना सांधणारा हा रस्ता जितके पाहातो, ऐकतो, भोगतो, तितके दिल्लीतील दुसरा कोणताही रस्ता करीत नाही. या रस्त्याच्या एका टोकास राष्ट्रपती आहेत. दुसऱ्या टोकास पंतप्रधान आहेत. भारताचे पंतप्रधान ही व्यक्ति आजच्या राष्ट्रकारणात आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारात एक असामान्य व्यक्तिमत्त्व ठरली आहे. पितापुत्रांचे ते जीवन, संपन्नता, त्याग, बुद्धि आणि लोकमान्यता दुसऱ्या कोणास क्वचितच लाभली असेल. साऊथ अव्हेन्यूचे हे टोक व त्यावरील 'पंतप्रधान निवास' म्हणजे आज तरी भारताचे हृदय आहे. आजवर त्या वास्तूत अनेक सेनानी राहिले. परकीय सत्तेस या देशात केवळ खड्गाच्या जोरावर कायम ठेवणारे अनेक सेनापती त्या इमल्यात राहिले आणि आता लोक-मताचा खराखुरा प्रतिनिधी तेथे राहून जनमनावर प्रेमाची हुकमत गाजवीत आहे. दिल्लीतील तो रस्ता आणि त्यावरील ते व्यक्तिमत्त्व म्हणजे इतिहासातील एक अपूर्व कालखंड आहे.

आता दिल्लीच्या दुसऱ्या टोकाची ही कथा. दूर दक्षिण देशात मदुराई शहरापासून तासाभराचा बसचा प्रवास केला की, टी कालूपट्टी म्हणून एक सुंदर खेडे आहे. गांधीजींच्या आर्थिक तत्त्वज्ञानावर अधिष्ठित असलेली एक महान् संस्था आजही तेथे काम करीत आहे. या 'गांधी-निकेतन' आश्रमाकडे जाणारा रस्ता मदुरेपासून निघतो आणि रम्य प्रदेशातून सहल करीत व गांधीवादाचा वारा पीत कालुपट्टीस पोचतो. कालुपट्टी खेडे केवळ 'गांधी-निकेतन' मुळेच परिचित आहे. गांधी-निकेतन संस्थेचा परिसर विस्तीर्ण आहे. आत शिक्षणसंस्था आहेत. मूलोद्योग शाळा आहे. ग्रामोद्योग चालू आहेत. सर्वच आवारातील व्यवस्था, उत्पादन व शिस्त मनावर एकदम परिणाम करते. ग्रामोद्योगास हसणाऱ्या व मामुली स्वरूपाची विघातक टीका करणाऱ्या आळशी गप्पिष्टांनी अशा संस्था जरूर पहाव्यात! देशातील दारिद्र्य किती खोलवर रुजलेले आहे, खेडुतांची अगतिकता कशी अटळ आहे, 'काम', 'काम' म्हणून आक्रोश करणारे हजारो हात चौफेर कशी गर्दी करीत आहेत आणि विधायक दृष्टीवर ज्यांचा विश्वास आहे त्यांना परिमित साधनातूनही जीवनाची शिस्तबद्ध व उत्साही उभारणी कशी करता येते ते खरोखर कालुपट्टीस जाऊन पहावे. गांधीजींच्या द्रष्टेपणाचा पुरावा तेथे झोपडीझोपडीतून गोळा करावा. त्या काळात परकीय सत्तेचे उच्चाटण करण्याचा एकच एक बलवत्तर प्रश्न आपले विक्राळ दात विचकून समोर सतत उभा होता, तरी त्या महापुरुषाने जीवनाच्या बारीकसारीक भागाकडेही कसे लक्ष केन्द्रित केले होते; आणि येथील मातीस पचणारी, रुचणारी अशी मौलिक विचारसरणी समाजास दिली होती! मदुरेकडून कालुपट्टीस जाणाऱ्या त्या दहा-वीस मैलांच्या रस्त्यावर पदोपदी गांधीजींच्या द्रष्टेपणाची पावले उमटली आहेत.

...पण याही रस्त्यावर एक असामान्य व्यक्तिमत्त्व परवापर्यंत आढळत होते. साउथ अव्हेन्यूने पंडितजींना सांभाळले आहे, तसेच मदुरेहून कालुपट्टीस जाणाऱ्या रस्त्याने 'गांधी निकेतन'च्या परिसरात कुमारअप्पांना सावरले होते. गांधीजींच्या विधायकतेवर डॉ. जे. सी. कुमारप्पा हे एक थोर अधिकारी होते. त्यांची ती साधीच पण अतिशय सुंदर झोपडी म्हणजे स्वातंत्र्य, साधेपणा आणि सद्भाव यांचा त्रिवेणी संगम होता. गांधीजींच्या मागे लोकशासनाची धुरा ज्यांनी ख्वांद्यावर घेतली आहे त्यापैकी बहुतेकांनी गांधीवाद खुंटीस टांगून ठेवला आहे आणि केवळ पोलिसी राजवट जनतेवर लादली आहे असे त्यांना वारंवार वाटत होते आणि त्यामुळे ते व्यथितचित्त होते. राष्ट्रपतींनाही त्यांनी कळवळून सांगितले होते की, "जोवर तुमच्या राज्यात 'गांधी-निकेतन'मधील ग्रामोद्योगांच्या नाकावर टिच्चून समोर ही तेलगिरणी उभी आहे तोवर गांधीजींचा आत्मा

तळमळत राहील." शासनकर्त्यांची अगतिकता आणि कुमारअप्पांसारखे निर्भीड, तळमळीचे व विरागी विचारवंत यांची विचारसरणी यातील संघर्ष त्या रस्त्याने रोज रोज पाहिला होता. एखाद्या उदबत्तीप्रमाणे शांतपणे जळून कुमारप्पांनी ३० जानेवारीसच त्या झोपडीत देह ठेवला! कशी स्वच्छ साधी झोपडी! मी तेथे गेलो तेव्हाही ती समाधानाने उभी होती. दारी वेल होती. वेलीवर फुले होती. उभ्या हयातभर अखिल संसार घुसळून काढणारा तो महात्मा आणि त्याचा जणू दुसरा अंश अशा आत्मीयतेने त्या संसारात हाडीमासी खिळलेली गांधीवादी विचारधारा पुढे वागवणारा तो महर्षि! 'गांधी-निकेतन'-मधील सुंदर हातकागद, साबण, चामड्याच्या सुबक वस्तु आणि अखंडपणे गाणारी ती चरख्याची चाती—यांना कुमारप्पांचा आशीर्वाद लाभला होता. गांधीजींची पुण्याई मिळाली होती. मदुरेच्या गोपुराशी स्पर्धा करणारी ती कार्यप्रीतीची उंची आणि श्रमातील सुंदरता पाहून गांधी-कुमारप्पा म्हणजेच ते चर्मकार, कुंभार, विणकर व शिक्षक अशी खात्री पटत होती. कुमारप्पांच्या व्यक्तिमत्वास शिरी धारण करणारा तो रस्ता धन्य झाला होता.

पहाटे पाच वाजता दोन वर्षांपूर्वी वाराणशी स्टेशनवर उतरलो होतो. आधी योजना केलेली नसतानाही श्रावण मासातील तो पहिला सोमवार बनारस-मध्ये मिळाला! भल्या सकाळी दशाश्वमेध घाटावर गंगेत स्नान केले आणि काशी-विश्वेश्वराचे दर्शन घेतले. त्या थंड सकाळी दशाश्वमेध घाट माणसांनी फुलून गेला होता. घाटावर पंडे—पुजारी गंध—भस्म—फुले घेऊन मदतीस येत होते. त्यातील थोडे आधुनिक होते ते केसास लावण्याचे तेल, आरसा आदि साधने पुरवीत होते! सगळा एकच गोंधळ चालला होता. आणि दोन्ही अंगांनी घाटच घाट असल्याने परिमित झालेल्या गंगामाईचा देखावा कृत्रिमच वाटत होता. तरीही पिढ्यान् पिढ्या रक्तावर झालेले संस्कार इतके बलवत्तर की, श्रावण मासातील पहिल्या सोमवारी भल्या पहाटे केलेले गंगास्नान आणि शिवदर्शन मनास अपूर्व समाधान देऊन गेले! न्याहारी करून प्रथम हिंदु विश्वविद्यालया-कडे वळलो आणि अर्ध्याएक तासानंतर त्या रस्त्याने मालवीयजींच्या प्रचंड कर्तृत्वासमोर आणून उभे केले. हिंदु विश्वविद्यालयाचा आसमंत खऱ्या गुरुकुलास साजेसा आहे. मात्र त्या विस्तीर्ण आवारात प्रशालांच्या प्रचंड इमारती, निवासांच्या भव्य इमारती आणि प्राध्यापक-प्राचार्यांना राहाण्यासाठी बांधलेल्या टुमदार वसाहती पाहाताच जुन्या गुरुकुलापेक्षा काही निराळे रेखीव आधुनिक पाहात आहोत असे वाटते. सर्वच योजना प्रचंड आहे. आणि हे सारे एका महामना मालवीयजींचे कर्तृत्व आहे! बनारस शहरातून हिंदु विश्वविद्यालयाकडे नेणारा रस्ता प्रथम मालवीयजींची ओळख करून देतो आणि आपण जसजसे

विद्यालयाच्या आवारांत शिरू लागतो तसतसे ते प्रचंड व असंख्य वृक्ष, हिरवी कुरणे, देवालयासारख्या दिसणाऱ्या तुटक तुटक इमारतींची रांग, यामुळे बनारस सोडून आपण दुसऱ्याच एखाद्या शहरी आल्याचा भास होतो. जगात लहान-मोठ्या ज्या गोष्टी घडतात व कामे उभी राहतात ती संघटनात्मक असोत किंवा सरकारने पार पाडलेली असोत, मुळात कुठेतरी ते एकाच व्यक्तीचे कर्तृत्व असते, हे अगदी निर्विवाद होय ! 'योजकस्तत्र दुर्लभः' हे जसे खरे, तसेच 'योजक' असतो म्हणूनच कार्यांचा डोंगर उभा राहतो हेही खरे आहे. राजकारण असो वा समाजकारण असो, धर्मकारण असो किंवा ज्ञानसंशोधन असो; कोणत्याही क्षेत्रात प्रथम "मीच एकटा देशास वाचवू शकेन, दुसरा कुणीही वाचवू शकणार नाही" असा थोरल्या पिटच्या तोंडी उमटलेला प्रचंड आत्मविश्वास जन्मावा लागतो, आणि मग त्याच्या प्रकाशात वा ललकारीत हजारो तरवारींचा खणखणाट होतो किंवा शेकडो हात काम करू लागतात. चिकाटीच्या परिश्रमाने माणूस काय उभवू शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजेच विश्वविद्यालयाचे ते आवार आणि त्यातील तो प्रपंच !

पण त्या आवारात त्याहूनही अधिक अचंबित करणारे आणखी काहीतरी आहे. ते आहे एक प्रचंड शिवालय ! बिर्लाशेटजींनी अमाप पैसा खर्चून 'प्रतिताज' उभा करण्याच्या ईर्षेने बांधलेले ते शिवमंदिर आहे. आज एक तपाहून अधिक वर्षे झाली, त्याचे बांधकाम आपले चालू आहे. आणि ते संपतच नाही ! बांधकामाचा एक उत्कृष्ट नमुना. भव्यतेच्या अडणीवर मांगल्याचे तुरे लेवून त्या शांत-प्रशांत विद्यासागरात देवभाव उभा आहे ! त्या मंदिरात काय नाही ? संगमरवरी भिंती आणि जमीन असलेले सभामंडप आहेत. संतांच्या प्रतिमा त्यांच्या शिकवणुकीचे सार काढून त्यासहित विखुरलेल्या आहेत. नगारखाने आहेत. भजनमंडळास भजन करण्यास जागा आहेत. एकट्यास एकान्तवासात तपस्या करावी वाटली तर तशी ठिकाणे आहेत. बागा आहेत. कारंजी आहेत. सारे भव्य आहे, प्रचंड आहे, विशाल विस्तीर्ण आहे. विश्वविद्यालयाच्या परिसरात विश्वात्मा नांदत आहे आपले 'सत्यं, शिवं, सुंदरम्' घेऊन.

नवी दिल्ली, मदुराई आणि वाराणशी या तीन अर्वाचीन नगरातील हे तीन रस्ते तीन व्यक्तींशी निगडित आहेत. त्या तीन असामान्य हयात वा मृत व्यक्तींचे आकाशाएवढे व्यक्तिमत्त्व त्यांनी सावरले आहे. या रस्त्यांनी जाणारा इसम कोणा एका ठिकाणी किंवा एखाद्या घरी पोचत नाही. तो त्या तीन 'थोर जीवितांना' जाऊन पोचतो; जिथे व्यक्ति संस्था बनतात आणि त्या संस्था विश्वप्रपंच चालवतात, अशा असामान्यांच्या कर्तृत्वनगरीस ते रस्ते आपणास घेऊन जातात. त्या जीविताकडे पाहून आपण थक्क होतो. दोन हातांची

कमाई दोन डोळ्यांत मावत नाही. रस्त्यावरील मैलाचा आणि फर्लांगाचा प्रत्येक दगड ' त्या ' व्यक्तित्वाची पाकळी आणि पाकळी उलगडून दाखवतो.

...आणि मग या तीनही रस्त्यांना ओलांडून एक आकाशपथ नजरेसमोर तरळतो. तो कधी डोंगरकडांना वळसे घालीत गिरिकुहरात नाहीसा होतो. हरिपूरच्या चिंचेच्या वनातून जाताना त्या थंडगार पर्णराजीतच विहरतो. जुहूच्या विस्तीर्ण किनाऱ्यावर एकदा मला तो अचानक सापडला होता. आणि माडांच्या झावळ्यातून वाट काढीत झपाट्याने मी चालू लागलो तों पुन्हा तो रस्ता हरवला होता! रत्नागिरीच्या ' पांढऱ्या समुद्रा 'वर आणि मद्रासच्या प्रदीर्घ बीचवर त्या रस्त्याची पावले उमटलेली स्पष्ट दिसली होती. पण त्या पावलांवर पाऊल टाकून चालण्याचा अल्पसा प्रयत्न करू गेले तरी चुकामूक व्हायची हे ठरलेलेच! मग त्या रस्त्याने तसेच पुढे जाऊन अज्ञाताच्या ' अश्वत्था ' खाली घडीभर विसावण्याची आंस अर्धवट सोडून द्यावी लागते आणि पुनश्च ' दहा बाय दहाच्या ' या दोन खोल्यांच्या मुक्कामावर येऊन उतरावे लागते! एकदा ' रामनाथ ' आणि ' भंडारा ' टेकडयांना वळसे घालून जाताना पुन्हा ती ओळखीची पावले दिसली आणि फार दिवसांपूर्वी चुकलेली वाट गवसली म्हणून बरे वाटले. तसाच पुढे गेलो तेव्हा लामणदिव्याच्या उजेडात एक लांब लांब जटाधारी ज्ञानी पुरुष दहापांच बाळांना ज्ञानाची संथा देताना पाहिला. थोडा वेळ तिथेच टेकलो आणि वाटले की, याच ठिकाणी मुक्काम करावा. किंबहुना, आज कैक दिवस चाललेली ही ' भ्रमणगाथा ' आता गुंडाळावी. रामप्रहरात उठून धुक्याच्या दर्यात स्नान करावे आणि वृक्षवल्लरींची पाने क्रमशः वाचण्यास सुरवात करावी. अमळशाने रान-पंक्षी जागे झाले की, त्यांच्या सुरात सूर मिसळून काकडआरती गावी आणि मग उगवत्या भास्कराला अर्घ्य देऊन वाटल्यास पुन्हा ती वाट चालू लागावे. पण इतका विचार होईतोच मुळी ती वाट आणि तो रस्ता हरवला. तो धूर्जटीही कावरे-बावरे इकडे तिकडे पाहाताना आढळला. तो आपल्या शिष्यगणांच्या शोधात असावा. असेही कानावर आले की, आपल्या गुरूच्या शिकवणीचा प्रत्यय जेव्हा प्रत्यक्षात ते शिष्य घेऊ लागले तेव्हा त्यांना आढळून आले की, शब्दांचे अर्थ कल्पनेपलीकडे बदलले आहेत. आणि लामणदिव्याच्या प्रकाशात चौखूर उधळलेले शब्द पकडून चपखल एकत्र बांधणे शक्य नाही! शेवटी तो जटाधारी, तो लामणदिवा आणि तो ' भंडारा ' सोडून पुन्हा ही मळलेली पाऊलवाट जवळ केली. अचानक ओळखीची पाऊलवाट दिसते तर लगेच ' घाटी ' चढताना ' दमछाटी ' होते. आणि दमले भागले विमनस्क मन म्हणत राहाते,

" घाटीनंतर गडग्यापाशी
पार असावा बसण्यासाठी "

असाच एकदा वाटचालीने थकलेला आणि त्या रस्त्याच्या चुकवा-चुकवीस कंटाळलेला मी महाबळेश्वरच्या डोंगरकपारीत हरवलो होतो. वाटले की, ' रस्ता चालणे ' हे काही साध्य नव्हे. तर मग या साधनातच का बरे असे गुंतून पडावे ? या विचारांना त्या कडेकपारींनी लगेच प्रतिसाद दिली. ' ऑर्थर सीट ' च्या खालील त्या रौद्र दऱ्याखोऱ्यातून एकच प्रतिध्वनी उमटला : " मुक्कामावर पोचण्याच्या उत्सुकतेमुळे रस्ता विघ्नरूप वाटतो. पण तोच मुक्कामावर पोचण्याचे साधन आहे हे विसरू नये. लवकर पोचण्याची तळमळ असेल, तर पावले वेगाने टाकावी. " वेगाने टाकावी ? म्हणे वेगाने टाकावी ! हा वेगच आता आत्म्यास खाण्यास उठला आहे. केवळ वेगच तेवढा आहे. पुढचा रस्ता दिसत नाही. वाटेत कोणी ओळखीचे भेटत नाही. ही तक्रार जेव्हा मी मनात घोळवू लागलो, तेव्हा फारच अस्वस्थ वाटू लागले. असाच एका झाडाखाली पडशी उतरून विमनस्क बसलो होतो. तो समोरून ' तो ' वाटसरू आला. मला पाहाताच त्याने मला ओळखले असावे. नैराश्याच्या गर्तेत मी पार बुडाल्याचे पाहाताच त्यानेच वाचा विटाळली:

' कोण अतिथी ? '

' एक भटक्या '

' नांव ? '

' अनामिक '

' कुठे पोचायचे ?

' तेच तर समजत नाही. हा रस्ताच भ्रामक आहे. क्वचित् ओळखीचा वाटतो, क्वचित् तो गाढ अंधारमय दिसतो. पुढचे जंगल कापून वाट दाखविणारा कोणी वाटाड्या भेटत नाही. नाकासमोर रस्ता दिसत नाही. जसा तो दिल्लीत, मदुराईत अथवा वाराणशीत त्यांना स्पष्ट दिसला ' मी म्हणालो.

' बाबारे ! अग्नीसाठी जंगल तोडून रस्ता तयार करावा लागत नाही. तोच आपला रस्ता पाहून घेतो, भक्ताला परिस्थिती कधीच प्रतिकूल नसते.'

इतके—जणू स्वगत बोलूनच—तो चालू लागला.

मीहि उठलो. पडशी उचलली आणि ' माझ्या रस्त्याने ' ती अनंताची वाट चालू लागलो. मागे न पाहाता, पुढे कुठे विश्रांती न घेता...

● ● ●

१०

# दगड बोलले !

कधी कधी दगड बोलतात. वृक्षलता लहरताना नेहमीच दिसतात. तृणाची थोरवीही अनेकदा पटते. पण दगड बोलतात तेव्हा अचंबा वाटतो. कधी कधी त्या दगडावर कलेची कुसर उमटलेली असते. कधी कधी अगदी उघड्या बोडक्या प्राकृत अवस्थेत ते दिसतात. आंध्र प्रदेशात हैद्राबादच्या आसपास प्रचंड पाषाण इतस्ततः भेटले. शहाबाद आणि वाडीच्या परिसरात अशा दगडांच्या फरशा मैलन् मैल पसरलेल्या आहेत. बेंगळूरला जाताना तुमकूर, अरसिकेरीजवळ याच दगडाच्या लांबलचक लाद्या दिसतात. त्यांचेच खांब, त्यांचेच छप्पर, त्यांचेच सभोवार कुंपण. वरंगळ, हनमकोंडानजीक हजार दगडी खांबांचे देवालय, तर मदुरेत त्या मीनाक्षि-मंदिरात अष्टदिशांना केवळ दगडांचेच साम्राज्य. हे अनेक दगड बोलले. कधी कुजबुज, कधी आर्त विलाप, कधी प्रखर मुखरता. आणि ऊन-पाऊस किंवा वादळ-वीज यांची तमा न बाळगता आकाशापर्यंत अचल उभे असलेले ते गिरिवर ! उजाड गिरनार, कणखर सह्याद्रि, धवलमस्तक हिमाद्रि, अथवा गूढगंभीर विंध्याचल ! तेही बोलतात, खुणावतात. सूर्योन्मेषांत डोळ्यांचे पातेही न लवविणारे ते पाषाण चंद्रम्याच्या रुपेरी प्रकाशात घळघळ विरघळतात !

तामिळनाडातील एक महत्त्वाचे शहर मदुरा. सकाळी ८ वाजता मदुरेच्या मोठ्या स्टेशनात उतरलो आणि शहरात अमळ न्याहारी करून आठ-बारा मैलांवर असलेल्या एका खेड्यात मुक्कामासाठी गेलो. मद्रास राज्यातील बहुतेक मोठे रस्ते कॉंक्रीटचे आहेत आणि दुय्यम दर्जाचे सगळे रस्ते

डांबरी पाठीचे तरी आहेतच. राज्य सरकारच्या मालकीची मोटर-वाहतूक वक्तशीरपणे आणि आरामाने धावत आहे. मदुरेच्या T. V. S. बसेसना तर अखिल भारतात गुणपरितोषिक मिळाले आहे. आणि ते खरोखरच योग्य आहे अशी माझी खात्री झाली आहे. मदुरा ते कलुपट्टी या प्रवासात बसमध्ये बसलेल्या तमीळ बंधूंना मी निरखीत आहे. त्यातले जे थोडेफार सुशिक्षित आहेत त्यांच्या शुभ्र लुंग्या आणि लांड्या बाह्यांचे शुभ्र खमीस मोठे आटोपशीर आणि साधे दिसतात. अतिउष्ण हवामान असूनही अतिदाक्षिणात्य जितका कामसू, चलाख व उत्साही आढळला तितका सुखासीन उत्तरवासी दिसला नाही. गुडगुडी कधी दक्षिणेस दिसत नाही त्याचे कारण हेच असावे. पण हे थोडे सुशिक्षित वगळले तर उर्वरितांच्या अंगावर पुरता धडोता दिसणार नाही. काळ्याकुट्ट वर्णावरची वस्त्रहीनता फार भडक दिसते. त्यातच स्त्रियांची वक्षेही जेव्हा वस्त्रहीन दिसतात तेव्हा मेंदू बधिर होतो. किंचित् जाड ओठ आणि पांढऱ्या केसांच्या डोईवर विस्कटलेल्या झिंजोट्या अशा श्रमिकांची उन्हांत तळपणारी ती काळी शरिरे पाहिली की, त्यांच्या द्रविडकुलोत्पन्न जातीविषयी शंका राहात नाही. बसमध्ये बसलेली ही पहा एक तमिळ स्त्री. दरिद्री, श्रमिक आणि प्रौढा. वर लिहिलेले सारे प्रकृतिविशेष ठळकपणे इथे दिसतात. पण अन्यांना ती सौंदर्यहीन वाटली तरी तिची सौंदर्यदृष्टि शाबूत आहे! कानांच्या दोन्ही पाळ्यांना असलेल्या तळातील भोकातून तिने लांबलचक अर्धवर्तुळाकृति दोरा ओवला आहे आणि त्यात हाताच्या मुठीएवढे, लिंगायताच्या गळ्यात असते तसे काही भूषण बांधले आहे. त्या साऱ्याच वजनाने तिचा कान दोन इंच तरी लांबला आहे आणि तरीही ते अवजड, सौंदर्यहीन भूषण ती किती ऐश्वर्याने मिरवीत आहे. बसमध्ये बसलेल्या निम्याहून अधिक रोजगारी पुरुषांच्या अंगावर खादी दिसते आहे. मद्रासमध्ये सरसहा खादीचा प्रसार अधिक दिसतो. गावठाण्यावर, बसच्या अड्ड्यावर आणि मासळी बाजारात वावरणाऱ्या कामकऱ्यांच्या अंगावर एखादा तरी खादीचा धडोता दिसायचाच. चरखा, कातणे, विणणे आणि स्वावलंबनासाठी खादी-उत्पादन हे मद्रास राज्यातील खेडोपाडी भरपूर पसरले आहे. बेकारी सर्वत्र भयानक, शिस्तबद्ध कामसू वृत्ति सार्वत्रिक व थोड्यात समाधान मानण्याची प्रथा लोकांच्या अंगी. त्यामुळे नवा विचार इथे रुजला की, लोकांच्या रक्तात रुजतो आणि अल्प मोबदल्यासाठीही भरपूर श्रम ते करीत राहातात.

आज मदुरेतील गोपुरे आणि इतर शिल्प पहाण्यासाठी बाहेर पडलो आहे. मीनाक्षी-मंदिराच्या चार प्रवेशद्वारांवर आकाशात उंच गेलेली ती गोपुरे मन थक्क करतात. आपल्या इकडील देवळांवरूनही उंच निमुळते होत गेलेले

कळस व शिखरे असतात. तरीही या गोपुरांची नवलाइ विशेषच. पहिली गोष्ट जाणवते ती त्यांची विपुलता. कुठेतरी एखाद्या देवळावर उभे असलेले एखादे शिखर आणि त्याच्या अंगावर लादलेले चार ओबडधोबड प्राणी किंवा मानवाकृति देव हे आमच्या देवळांचे वैशिष्ट्य. पण इथे पहावे तो निळ्या आकाशात सुळक्या मारणारी गोपुरेच गोपुरे. एखाद्या गिरणगावात गिरण्यांची धुराडी जशी उंचउंच दिसतात तशी आपली ही गोपुरे उभी आहेत. त्यांचा उंच खांब अतिशय प्रमाणबद्ध आहे. पायऱ्या-पायऱ्याने उंचावत गेलेल्या त्यांच्या निमुळत्या स्तरावर देव, दानव, राक्षस आणि त्यांची अनेक प्राण्यांच्या रूपांची वाहने यांचा जो शिल्पोत्सव आहे तो पाहिल्यानंतर इतक्या प्राचीन काळीहि कारागिरीत जो बारकावा होता, प्रमाणाचे जे गणित होते आणि जीवनाविषयी जो एक अदम्य उत्साह होता त्याची आश्चर्यकारक दडस मनावर उतरते. ढोबळपणा इथे औषधालाहि सापडत नाही. केवळ चित्राकृतींचा बारकावा किंवा ढोबळपणा मी म्हणत नाही. कलाकारांचा आत्मविश्वास त्यांच्या बोटाबोटातून प्रगट झालेला या शिल्पावर पहावा. अतिशय थोड्या वेळात मी एका बाजूच्या हत्तीच्या आकृति पाहिल्या. हत्तीची बैठक किंवा आपली शुंडा हवेत फेकण्याची त्याची लकब आणि लहर दोन चित्रांत एकसारखी आढळली नाही. तो स्थिरप्रकृति गजराज प्रत्येक आकृतीत आपले अस्थिर मानस नव्या उन्मेषाने प्रकट करीत होता. चित्रांचे डोळे बोलके असतात नव्हे ? येथे डोळ्यांच्या खाचा केवळ अंधच नव्हे तर आदर्शनीयही होत्या आणि तरीही त्या आकृतीची प्रत्येक रेखा आणि रेखा बोलत होती, जिवंत वाटत होती. दोन हत्तींच्या उभारलेल्या शुंडांमध्ये एक पुष्पहार होता आणि मधोमध एक हिमकन्या नतमस्तक उभी होती. त्या दोन हत्तींच्या डौलात केवढे राजविलासी खानदान ओसंडत होते. आपली उन्मत्त शुंडा हवेत फेकून समोरून बेभान धावत येणाऱ्या एखाद्या मदांधाक्षाच्या पायी आपलाच चुरा होईल की काय हे भय वाटत होते. कृशकटि तनुमध्येचा वेग आणि पददलिताच्या आक्रोशाविषयी वाटणारी बेफिकीरी दोन लयबद्ध चित्राकृतींच्या अंगप्रत्यंगातून ओसंडत होती. बाजूच्या एका कोपऱ्यातील हत्तींच्या त्या शिल्पाकृति अनेकविध होत्या, तशाच अनेकरूप होत्या. एखाद्या ठिकाणचा गजसमूह ' गजैश्च घनसंनिभैः ' असा ढगांचा समूह दिसे; एखादा एकटादुकटा द्विप ' सततैव प्रसुस्त्रुवुः ' असा आपला मद ठिबकत चाललासा दिसे; राजर्षी आणि देवर्षी यांच्या सान्निध्यात मोठ्या गौरवाने ते नागाधिराज बसलेले असत. तर कुठे कुठे मुरगजाची ती स्थिराकृती इतकी बेभान आणि गतिमान भासे की, ' त्याजितैः फलमुत्खातैर्भग्नैश्च पादपैरिव दान्तिनः ' हे त्याने वाताहात केलेल्या त्या अरण्याचे वर्णन त्याच्या त्या चालीबरोबरच आठवे.

हत्तींच्या आकृतींचे आणि त्यातून प्रणीत होणारे त्यांच्या अनेकविध भावविभावांचे हे दृश्य पाहिले म्हणजे वाटे की, तत्कालीन जीवनाची समृद्धि आणि शांती हीच या कलेची खरी मातापितरे होत. आणि इतकेच नव्हे तर या कलेस कुठेही विजिगिषु वृत्तीच्या मदाचा स्पर्श झालेला नाही. तत्कालीन राजे आणि त्यांचा पराक्रम ठायी ठायी उमटलेला या दक्षिणेत दिसतो. विजयनगरचे साम्राज्य म्हणजे शौर्य-धैर्याचा केवढा इतिहास. तरीपण कलाकाराच्या प्रतिभेस कुठेही वेठीला धरलेले नाही आणि त्या सौंदर्योपासकांनीही भयावहतेच्या किंवा राजप्रीती जिंकण्याच्या बाजारी वृत्तीपोटी आपली सौंदर्यदृष्टी विकलेली नाही.

मदुरेचे मीनाक्षीचे देवालय ही एक वसाहतच आहे. देवालयातून पहिल्या दिवशी धावता फेरफटका मारण्यासच सुमारे दोन तास पुरले नाहीत. कोणत्याही एका वेळी त्या देवालयाच्या आवारात सहस्रावधि दर्शनोत्सुक गोळा झालेले असतात. त्याशिवाय अगदी बाह्य चार भिंतींच्या आतल्या अंगाच्या ओवऱ्यात अनेक दुकाने—पुस्तके, कापड, खेळणी, फुलें, पूजासाहित्य—उघडी असतात आणि त्या निमित्ताने हजारो लोक तिथे गर्दी करून असतात. माणसांचा केवळ समुद्रच उसळलेला असतो आणि तो तसा दिवसभर असतो. इतक्या गर्दीचे देवालय (यात्रेनिमित्त उसळणारी पंढरपूरची गर्दी सोडून) भारतात दुसरे नसावे. आणि गर्दी असूनही शिस्त, शांतता व स्वच्छता वाखाणण्यासारखी होती. मीनाक्षीच्या मूर्तीपर्यंत प्रवेश करण्यास आम्हास अंगावर फक्त धोतर ठेवता आले, पण मूर्तीचे दर्शन घेऊनही कोणत्याही पुजाऱ्याने अडवले नाही किंवा पळभर दर्शन घडताच हाताने पुढे ढकलले नाही. आणि माझ्या पुढे आणि मागे असलेली रांग अशाच शांततेने दर्शन घेऊन बाहेर पडली तेव्हा नवल वाटल्याशिवाय राहिले नाही. प्रसाद म्हणून मीनाक्षीच्या गळयांतील गेंदवाज फुलांचा सबंध हार पुजाऱ्याने दिला आणि इच्छा असूनही रुपया आठ आणे देवीसमोर ठेवण्यास सवड मिळाली नाही किंवा दडपण आले नाही यावर विश्वासच बसेना. अगदी सरळ, शांत वातावरणात हजारो भक्त मीनाक्षीचे दर्शन घेऊन बाहेर पडत होते.

मीनाक्षीच्या मधल्या देवालयातून बाहेर पडले की त्या अवाढव्य आवारांतील शिल्पसमुद्र आपली मती गुंग करतो. एक औरसचौरस भिंत अशी नाही की जिच्या पाटीवर उण्यापुऱ्या मानवी आकृतीचे कोरीव व लयबद्ध शिल्प नाही. पुन्हा ते पुतळे नाहीत; त्या समस्या आहेत. स्त्री-पुरुष युगुले इतक्या अनेकविध आकारात आणि बैठकात (Poses) उभी आहेत की, तो शृंगार, वीर, करुणादि रसराजांचा मिलाफ पाहून मानवी जीवनाविषयी नव्यानेच प्रेम पोसते; आसक्ती बळावते. वाटते की, आपल्या पाठीवरचा बोजा किती जुना आहे आणि

तरीही शतकानुशतके किती लीलया तो अनेकांनी पेलला आहे. कुठे कुठे केवळ रतिसमान असलेले निर्मल तारुण्य ‘ आराधय सपत्नीकः प्रीता कामदुधा हि सा ’ म्हणून आळवले जात आहे; कुठे कुठे स्त्रीची मादक शरणता पुरुषास पुन्हा पुन्हा भूल पाडते आहे. उमा-शंकराच्या रागीट, विरागी आणि तांडव जीवनाचाच बोलबाला फार झाला आहे. पण त्या प्रीतिमधुर जीवनकथेची रसभरित मानवी बाजू अनेक शिल्पाकृतीत चितारलेली आहे.

“ हित्वा तस्मिन्भुजगवलयं शंभुना दत्तहस्ता
क्रीडाशैले यदि च विचरेत्पादचारेण गौरी ”

अशी त्या गौरीहराची सुकोमल अवस्था एखाद्या शिल्पात दिसे तर क्रोधाविष्ट तांडवाच्या आहारी गेल्याने ज्याची उभी मूर्ती केवळ आग ओकते आहे त्याला आपल्या देवदत्त स्त्रीसुलभ भावविभ्रमाने शांत करणारी शैलजा,

‘ मस्तवाल ती नाचण मोठी
वाऱ्यासंगे स्वये खेळते
फुगडी, पिंगा आणि झपूर्झा
भिरभिरते अन् जशी नर्तकी
—केवळ पंखच केवळ डंखच !
मंथर डावा पाय तिचा तो,
आगीचा की खांबच, कोंभच...’

अशी भासते. भरत नाट्यातील मुद्रा अन् मुद्रा त्या शिल्पावर विलसत होत्या आणि नृत्यांतील ओघ आणि लय प्रत्येक शिल्पाकृतीतून असा वहात होता की, प्रत्येक आकृती पुतळ्यासारखी आपल्याच ठिकाणी स्थाणुवत् स्थिर नसून मानवी जीवनातील सारा रसौघ इथे वहात चालला आहे असा प्रत्यय येई. एका ‘ स्त्री ’ आकृतीची अनेकविधता, पहावी तेव्हा नवी दिसत होती.

“ तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिंबाधरोष्ठी
मध्ये क्षामा चकितहरिणीप्रेक्षणा निम्ननाभिः ।
श्रोणीभारादलसगमना स्तोकनम्रा स्तनाभ्यां
या तत्र स्याद्युवतिविषये सृष्टिराद्येव धातुः । ”

या कविकुलगुरूंच्या अक्षरशब्दांचे ते मूर्त शिल्प पाहून क्षणभर विचार करावा लागे की, हे शिल्प काव्यानुसारी म्हणावे की ते काव्य शिल्पानुगामी म्हणावे ?

एखाद्या पद्मनाभस्वामींच्या देवळांतील शिल्पाचा थोडा अधिकच होणारा उत्तानप्रकार सोडला तरी वाटते की, यौवनाची इतकी मादक उधळण चौफेर करणारे ते राजर्षी आणि त्यांचे ते प्रजाजन भाग्यवान खरेच. मीनाक्षीच्या देवालयात चारदोन तास फिरले म्हणजे खात्री पटते की, 'वित्तेशानां न च खलु वयो यौवनादन्यदस्ति'. शूरांचा शृंगार काय असतो ते या सौंदर्यसागरात येऊन पहावे. धनिकांच्या साधनसंपन्नतेस अनेक वळणांच्या वाटा मिळतात. कोणी स्त्रीशरीराभिलाषी झनाने गोळा करतात. कोणी इंद्रियसुखलालसेने मदिरा-मदिराक्षींच्या सहवासात स्वतःचे मनुष्यपणही विसरतात आणि आपल्याबरोबर सारी कला आणि संस्कृति शेणात कालवतात. पण निरोगी सुखवाद आणि सौंदर्यदृष्टि स्वतः सारे भोग भोगतेच आणि वर काळाला जिंकून शतकानुशतके उरणारी अशी सुंदरता पाषाणातही खोदून ठेवते. आपल्या एकेका अवयवाच्या लालित्याने ग्रंथाची पाने भरकटू शकेल असे सामर्थ्य घेऊन येथली शिल्पस्त्री उभी आहे.

'सभ्रूभङ्गप्रहितनयनैः कामिलक्ष्येष्वमोघै
स्तस्यारम्भश्चतुरवनिताविभ्रमैरेव सिद्धः'

असे भ्रुकुटीभंग पहावेत. 'सरसकदलीस्तम्भगौर' अशा नितळ मांड्या पहाव्यात; 'धवलमधुरसुग्धा दुग्धकुल्येव दृष्टिः' पहावी; 'संगमात्किंचिदूनः' अशी मीलनाचे सौख्य व तृप्ति सांगणारी युगुलचित्रे पहावीत; 'अङ्गेनाङ्गं प्रतनु तनुना गाढतप्तेन तप्तं' असे विरहदुःख बोलणारे, जवळ असून दूर आणि दूर असून जवळ, प्रेमिक पहावेत आणि पहातच राहावेत. उन्मत्त पण मर्यादशील यौवन हेच काळावर मात करणारे एक चिर सौंदर्य आहे. आणि साऱ्या सुखाची तशीच साऱ्या शोकाची आरंभिका ज्या स्त्री-पुरुष-संयोगात होते तो मीलनोत्सव हाच सर्वांना सर्वकाळी जीविताची प्रेरणा देत राहिला आहे. त्या मधुर वातावरणात मीनाक्षी-मंदिरातील हे उत्कृष्ट शिल्प पहाताना ते लयबद्ध शरीर, अस्थिर नेत्र, पूर्ण विकसित मुख, भरदार केशकलाप चंचल विभ्रम सारे पाहिले की, पुन्हा कालिदासाची 'अक्षरेच मिळवावी' लागतात.

'श्यामास्वङ्गं चकितहरिणीप्रेक्षणे दृष्टिपात
वक्त्रच्छायां शशिनि शिखिनां बर्हभारेषु केशान्
उत्पश्यामि प्रतनुषु नदीवीचिषु भ्रूविलासा-
न्हन्तैकस्मिन्क्वचिदपि न ते चण्डि सादृश्यमस्ति'

वेलींच्या वेलांटीत तुझी कृशकटि पाहातो, भयभीत हरिणींच्या नेत्रांत तुझी नजर देखतो, चंद्रिकेवर तुझा मुखचंद्र दिसतो, मोराच्या पिसाऱ्यात केशभार लकाकतो आणि नदीच्या लहरीतून तुझे भ्रूविलास न्याहाळतो तरी हे उग्रचंडि, या कशांतहि तुझे साधर्म्य दिसत नाहीं !

एकच एक दगड. जगाने लाथाडलेला पाषाण. त्याला हृदय नसल्याचा चभ्रा आहे. त्याला बुद्धी म्हणजे काय ते ठाऊक नसते म्हणतात. म्हणून त्याचा अव्हेर, उपमर्द, उपहास. पण या पाषाणविश्वातील प्रत्येक दगड माझेशी बोलला. झऱ्याइतकेच झुळझुळ गाणे त्याने म्हटले. हिरवळीइतकीच कोमलता त्याने दाखवली. एका बाजूने पंचमहाभूतांचा अत्याचार आणि दुसऱ्या बाजूने जगाचा उपहास साहून दुःखास पाठ देऊन उभा असलेला हा पाषाण माझेशी बोलला !

फिरत फिरत तुम्ही एका भव्य मंडपात येता. एका ब्रह्माचा जसा हा पसारा तसा एका दगडाचा या मंडपातील पसारा पाहून अचंबा वाटतो. नक्षी-दार आणि कोरलेले सुमारे हजार तरी दगडी खांब या मंडपात आहेत. ( आणि तरीही हा अख्खा मंडप अनेक असल्या मंडपांसह मीनाक्षीच्या देवालयातच आहे. ) खांबावरून आडव्या टाकलेल्या कोरीव लाद्यावर पुन्हा कोरीव शिल्प आहेच. ज्या काळात हे मंदिर, ही गोपुरे आणि हे शिल्प उभारले गेले त्या काळी, मला वाटते, लोकांना छिन्नी-हातोडा घेऊन ठोक् ठोक् करण्याशिवाय दुसरा उद्योगच नसावा. आबालवृद्धांच्या या अदम्य उत्साहाशिवाय हे प्रचंड कोरीव काम उभे राहणेच शक्य नाही. दृष्टीस भोवळ यावी इतक्या आकारांच्या, प्रकारांच्या आणि विषयांच्या शिल्पाकृति चारी दिशांस आपल्या उभ्या आहेत. ओठांच्या मुडपलेल्या जिवणीतून सारी आधि-व्याधि बाहेर पडत आहे. बांधेसूद शरीराकृतीतून जीवन लवलवत आहे. हाताची तालबद्ध बोटे आणि पावलांचा नूपुरविरहित झंकार आपला ठेका सोडीत नाही. उभार वक्षाची मादकता आणि कृशकटियुक्त मत्त नितंबाची गोलाई रक्ताचा थेंब आणि थेंब नाचवू लागते ..

“ किती अधरांच्या थरकापांतुन धावत ही आली
एक वेगळी अधीरता अन् भिवयांवर लपली
तव हास्यांतिल स्निग्ध अकल्पित व्हावे शिल्प पुरे
काय थांबले म्हणून येथे कालाचे वारे ! ”

या दगडी खांब असलेल्या प्रशस्त सभामंडपातून तुम्ही बाहेर पडता आणि मग एका दुसऱ्या कोपऱ्यात असलेले कवि–संमेलन पहाता. तामीळ भाषेतील आम् कविवृंद येथे गोळा झालेला आहे आणि एका कविश्रेष्ठाच्या अध्यक्षतेखाली त्यांची सभा इथे भरली आहे. आमचे स्थानिक मित्र किती अभिमानाने आम्हांस तामीळ कवि व त्यांचे काव्य यांविषयी माहिती देत आहेत. त्यांचा अभिमान व तीव्रतेने जाणवणारे त्यांच्या भाषेविषयीचे प्रेम वजा केले तरीही एक गोष्ट खरीच की, आमच्या देशी भाषेतील कवि आणि लेखक व त्यांचे वाङ्मय याविषयी आम्ही किती अनभिज्ञ आहोत. पुनः ही अनभिज्ञता केवळ अज्ञानातच संपते असे नाही. परभाषेविषयी अज्ञान असूनही स्वभाषेचा अभिमान अगदी कळसास पोचला आहे आणि इथेच काय ते अमर, अक्षर वाङ्मय आहे, अन्य ते सारे शिळोप्याच्या गप्पा असा आमचा ठाम समज झालेला आहे.

या देवालयाच्या आवारात एक उभा दगडी खांब आहे आणि गोल वर्तुळाकृति असे लहान लहान खांब मधल्या मोठ्या खांबाभोवती आहेत. मधल्या आणि बाजूच्या खांबाचे मिळून एकच अखंड शिल्प उभे आहे. या खांबांचे वैशिष्ट्य असे की, ते दगडी असूनही त्या प्रत्येकावर आघात केला की, त्यातून 'सरगम'ची सप्तसुरावट ऐकू येते. आश्चर्याची गोष्ट खरीच. कारण प्रत्येक खांबाची लांबीरुंदी सारखीच आहे आणि त्यांचा मूळ पाषाण एकाच रंगा-जातीचा आहे. मी हाताच्या मुठीने प्रत्येकावर प्रहार केला आणि पुनः पुनः ती सप्तसुरांची मौज चाखली. 'ताज'मधल्या कबरीजवळ ललकार ठोकली की, पांच-एक मिनिटे तिचा प्रतिध्वनी घुमटात घुमत राहातो. महाबळेश्वरच्या 'प्रतिध्वनि टोका'वर उमटवलेला शब्द अधिक मोठ्या आवाजात आपल्याकडे परत येतो. पण फारसा मोठा आरडाओरडा न करता एकाच दगडातून एकाच प्रकारच्या आघाताने सप्तसुरांची ललकार काढणाऱ्या दाक्षिणात्यांचे नृत्यसंगीतप्रेम अधिक मधुर आणि मोलाचे आहे हे निश्चित. काहीतरी वेगळे करण्याचा दाक्षिणात्यांचा खटाटोप अभिजात कलेची कांस धरतो; केवळ अचंबित करणाऱ्या भव्य भयानकाचा मागोवा घेत नाही. याच विचारात मी पुनः एकदा ती सरगम् छेडली आणि पुढे सरकलो.

आता मीनाक्षी-मंदिरात पहाण्यासारखे काही राहिले नाही, म्हणून मंदिराचा फेरफटका संपवून मी एका गोपुराखाली स्वस्थ बसलो आहे. दृष्टी त्या रम्य आणि उंच मनोऱ्यावरून उतरत नाही आणि मनात अनेक विचार-तरंग उठतात ते काबूत आणता येत नाहीत.

मदुरा नगरीतील बहुतेक शिल्प असे बारकाव्याचे आहे. त्यात ढोबळ-पणा आणि सब घोडे बारा टक्के हा भाव फारसा सापडावयाचा नाही. शहराच्या

दुसऱ्या टोकास तिरुमलनायकाचा एक प्रचंड वाडा आहे. त्या वाड्यात तसे आश्चर्यजनक काही नाही. पण कवेत न मावणारे त्याचे ते प्रचंड व उंच खांब केवळ मातीचे केले आहेत ही कल्पनाच थक्क करणारी आहे. गावातीलच एका तळ्यातील माती आणून हे खांब उभे केलेत. आज शेकडो वर्षे त्यांचा भक्कमपणा व नितळपणा भंग पावलेला नाही. वास्तुकला व स्थापत्यशास्त्र यांना पुरून उरलेली ही त्या काळातील प्रगती संशोधकांचे डोळे उघडावयास पुरेशी आहे. असे अनेक प्रकारचे लहानमोठे चमत्कार कधी कधी भग्न व उध्वस्त शिल्पकलेत पहावयास सापडतात. तेलंगणातील वरंगळनजीक असलेल्या हनमकोंडा भागात असेच भग्न शिल्पावशेष पहाण्यास मिळाले. वरंगळ किल्ल्याच्या त्या लांबरुंद लाद्या मुस्लिम टोळधाडांनी जमीनदोस्त केल्या होत्या आणि तशाच अवस्थेत ते ऐतिहासिक अवशेष सध्याच्या सरकारने राखले होते. उध्वस्त झालेल्या त्या दगडावरील कोरलेली चक्रे, कमळे, प्राण्यांच्या आकृती यांची कलाकुसर पाहून त्या कारागिरांची रसिकता व त्या राजांचे सौंदर्यप्रेम वानावे की, अधिकाराच्या आणि बलाच्या उन्मत्त कैफात जितांच्या साऱ्या कर्तुकीवर एकच एक वरवंटा फिरवणाऱ्या मदोन्मत्तांचा बेदरकार ताठा वानावा ते कळेनासे होते.

निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर ही उंच गोपुरे मोठी रम्य दिसतात. अगदी शेंड्यावर असलेले बैलांच्या शिंगासारखे अर्धचंद्र किंवा सोनेरी कळसांच्या रांगा मात्र, निमुळत्या होत गेलेल्या त्या शिल्पावर मला जरा अस्थानी वाटल्या. त्यापेक्षा मंदिरावर असतो तसा केवळ एक सुनेरी कळस अधिक सुंदर व एकजिनसी दिसला नसता काय? पण एक मात्र अगदी खरेच. उत्तरेच्या मुस्लिम संस्कृतीत जन्मास आलेले शिल्प आपल्या माथ्यावर जे प्रचंड गोलघुमट घेऊन बसते त्यापेक्षा गोपुरांचे आकाशात घुसणारे हे मुळके अधिक चांगले दिसतात. एक तर त्या गोलघुमटावर, त्यांच्या प्रचंडतेपेक्षा, अधिक सूक्ष्म कला किंवा बारकावा काहीच नसतो. अगदी ताजमहलचा गोलघुमट पाहिला तरी त्याच्या भव्य शुभ्रतेपेक्षा अधिक रम्य त्यात काही नाही. आणि दुसरे असे की, त्या घुमटाकडे पाहिले की, राज्यकर्त्यांच्या एका प्रवृत्तीचा आठव मला नेहमी होतो. धाऊक विध्वंस ही ती वृत्ती. एखाद्याच्या टाळूवरून हात फिरवावा तशी सौंदर्यदमनाची मुस्लिमवृत्ती त्या गोलघुमटावरून तात्काल प्रत्ययास येते. उलट, हे दाक्षिणात्य शिल्प पाहिले की, स्तंभित सौंदर्यासक्ति, मनाचा बारकावा व तरलता आणि सौंदर्य टिपून घेण्याचा हव्यास मनावर ठसतात. ‘सुंदर ते टिकावे’ अशी मनोधारणा या राज्यधुरंधरांची आहे. ‘माझे ते टिकावे’ ही असुंदर महत्त्वाकांक्षा इकडे फारशी नाही. निदान परक्यांच्या सुंदर

कृतीस नेस्तनावूत करून आपल्या नावाचा घोडा त्यावर मारलला तरी इकडे कुठे दिसत नाही. तिकडे सोमनाथ आणि वाराणशी येथील शिल्पाशिल्पावर बुत्शिकन आपले घण घालून गेल्याचे स्पष्ट दिसते.

...आता सायंकाळ होत आली. उठले पाहिजे. हे नयनरम्य शिल्पकले, तुला त्रिवार नमन असो. पिढ्यान् पिढ्यांना तू आपल्या सौंदर्याच्या चमच्याने जीवनासक्ति भरवीत आली आहेस. दैनंदिन जीवनकलहाच्या पलिकडे काही करण्यासारखे आहे हे ही उंच गोपुरे सतत जाहीर करीत आली आहेत. दगडांची संगत संपवून माणसात आलो, पण दगड दृष्टीपुढून हालेनात. ते सघन पाषाण सारखे बोलतच राहिले. शिल्प, संगीत, नाट्य आणि नृत्य यांच्या चौफेर गजबजाटात ते अनेक पाषाणसुहृद् बोलले. मृदुंगाची धिक् धा, सतारीची दिड् दा, घुंगरांची छननन् छन्. बेभान अवस्थेत नर्तकीने आपल्याच भोवती मारलेली लयबद्ध गिरकी! डोळे मिटून त्या पाषाण शिल्पसाम्राज्यातून बाहेर पडलो तेव्हा कानात ही लयकारी गुंजत राहिली, डोळ्यापुढे नटराजाच्या त्या घोटीव नृत्यबैठकीतील लय नाचत राहिली आणि मनाच्या आरसे-महालात गळ्यात मृदुंग अडकवून एक तापस तांडव करीत राहिला!

● ❦ ❦

११

★

# दक्षिणेश्वरचा एक फकीर....

कलकत्त्यास पोचण्यापूर्वी लागणारे एक मोठे जंक्शन खरगपूर. बलराम-पूरहून कलकत्त्यास जाण्यासाठी इथे आलो आहे. स्थानकाच्या प्रशस्त विश्रांति-गृहात वाचीत बसलो आहे. हाती एक संतचरित्र आहे. आत्मसाक्षात्कार झालेल्या विसाव्या शतकातील एका मानवाचे हे जीवित मन थक्क करणारे आहे. मनात विचारांची गर्दी चालली आहे.

" आः आय्, आय् ! " काळीज चराचर कापीत एक कर्कश हाक मृत्यूच्या दारातून कुणी तरी मारली ! स्थानकाचे सारे आवार चपापले. आपापल्या जागा सोडून प्रत्येकजण बाहेर धावला. एक माणूस काळाच्या दाढेत गवसला होता व त्याचा दोन दातांच्या कैचीत पूर्ण चुरा होण्यापूर्वी त्याने अखेरचा टाहो फोडला होता आणि क्षणाचाही विचार न करता—जणू शारीरिक प्रतिक्रियेने ( Reflex action )— स्टेशनमास्तर, हमाल, यांत्रिक, गार्ड, सारे धावले होते ! माणसाच्या मदतीला माणसे धावली. कारण तत्क्षणी माणुसकीशिवाय अन्य कोणताही विचार त्यांच्या डोक्यात नव्हता. केवळ प्रसंग, केवळ प्रश्न, माणसांना क्षणभरात एकत्र आणतात. विचार सुरू झाला की, तीच माणसे त्याच प्रसंगातही पांगू लागतात ! हात झाडून मोकळी होतात. आपण त्या गावचेच नाही असे दाखवतात.

मी उठून बाहेर आलो. एक कलकत्ता लोकल प्लॅटफार्मवर येत होती आणि माझ्यासमोरच फलाटावर एक मळकी छत्री, पिशवीत सकाळी बांधून

आणलेला डबा व एक चप्पल अस्ताव्यस्त पडली होती. दुसरी चप्पल दोन हात मागे उडाली होती. ओरिसातील एक लक्तरांकित मजूर जवळ पैसा नाही म्हणून विनातिकिट चालला होता. रोजच्या सवयीप्रमाणे गाडी फलाटावर शिरताच उडी टाकून उतरावे व मागच्या मागे पळून जावे या विचाराने त्याने उडी टाकली होती आणि गाडी व फलाट यामध्ये तो पडला होता. गाडी चालत होती. त्याची मिळकत चौफेर उधळली होती. प्राणाच्या आकांताने त्याने चीत्कार केला होता आणि ते दृश्य पहाणारे एक दोन प्रवासी जोराने ओरडले होते. ' मिस्किल सिंगल, भोळा सांधा, सिधे रुळ नी खडी गोमटी ' स्तब्ध होती. पहात होती !

मी विश्रांतिगृहातून बाहेर आलो. क्षणभर अतिशय अस्वस्थ वाटले. जीवाच्या आकांताने त्या मजुराने ठोकलेली आरोळी सर्वांचीच हृदये कापीत गेली होती. आणि आता समोर हे दृश्य होते ! धावपळ झाली. गाडी एकदम थांबली. चार जणांनी त्या माणसाला ओढून वर काढले. रेल्वेच्या स्ट्रेचरवर निजवले. भोवती लोक गोळा झाले. दोन अतिशय केविलवाणे डोळे, काठोकाठ भरलेल्या कृतज्ञतेने सभोवार पाहात होते. मृत्यूच्या उंबरठ्यावरून सहीसलामत परतल्याचा भाव त्यात दिसत होता ! कोणीही चकार शब्द बोलत नव्हते. यमाला पिटाळून लावल्याबद्दल वातावरण एक समाधान भोगीत होते.

मी दरवाजात उभा होतो. समोर एक गुजराती गृहस्थ पळत आला. मी न विचारताच माझ्याकडे पाहून म्हणाला,

" भगवान है ! "

फक्त दोन शब्द, दोनच शब्द !

दोन हातांपलीकडे एक सूटबूट घातलेला बंगाली उभा होता. अचानक त्याच्याही ओठावर शब्द आले आणि ते प्रकट झाले,

" God is Great "

— एक ओरिया मजूर. नाव माहीत नाही. गाव तर त्याला नसावेच ! दोन शिळे तुकडे त्याच्या ' कोणीतरी ' ने त्याला सकाळी बांधून दिले होते. दिवसभर कुठेतरी पाट्या टाकून तो रात्री घरी परतणार होता. दारिद्र्याने त्याला आज यमाच्या जबड्यात ढकलला होता. त्याच्या घरवालीची आज संध्याकाळी त्याशी भेट झाली नसती. आणि एका ' अज्ञात अंगुलीने ' आज त्याला त्या क्रूर जबड्यावाहेर खेचले होते. त्या भयानक आर्त चीत्काराचा शेवट एका

मृत्यूत झाला नव्हता; आणि म्हणून बालकांच्या भोळ्या भावाने तो गुजराती, तो बंगाली, आईची आठवण काढावी, तशी देवाची आठवण काढीत होता. आणि ते न बोलणारे दोन दरिद्री निरागस डोळे केवळ लुकलुकत होते. एका पाच मिनिटांचे सारे नाटक! पण उत्स्फूर्तपणे ते अनेकांच्या अंतरातला देव जागा करून गेले. गुजरात, बंगाल, महाराष्ट्र, ओरिसा; गरीब, श्रीमंत, अशिक्षित आणि विद्वान्! दोन घास प्रत्येकास देण्याची हमी घेता येत नाही, पण मृत्यूच्या दाढेतून माणूस माणसाला ओढून काढील, आणि ते देवानेच केले असे अगदी सहजपणे म्हणेल!

खरगपूरहून कलकत्त्यास आलो. हौरा स्टेशनवरून महाराष्ट्र भवनाच्या टोलेजंग इमारतीत गेलो. मुंबईपेक्षाही मोठे, अधिक गजबजाटाचे कलकत्ता शहर. इंग्रजांची पहिली राजधानी. फ्लोरा फाउंटनसारखा एस्प्लेनेडचा गर्दीचा भाग. रस्त्याच्या कडेने जोराने पळणारी व पहिला, तिसरा वर्ग असणारी ट्रामगाडी. विस्तीर्ण हिरवी कुरणे आणि रस्त्यालगतची ती सरोवरे! बंगाली खमीस व धोतर पेहेरलेले आणि खमीसाच्या डाव्या खिशात धोतराच्या सोग्याचे टोक खोवलेले ते बंगाली बाबू. मोठे भावनाप्रधान आणि अभिमानी. तुम्ही बंगवासीयाशी हिंदीत बोला, ते बंगालीतच प्रत्युत्तरे देतील! मात्र लोक कसे सुशिक्षित, प्रगत, सुसंस्कृत वाटतात. बंगाल्यात आले की मराठी माणसास परके वाटत नाही!

प्रथम कालीमातेच्या मंदिरात गेलो. मंदिर अगदी गावात व लहानसेच आहे. बाहेरच्या अंगणात बळी दिलेल्या बोकडांचे अवशेष दिसत होते! मातेची मूर्ति चांगली मोठी आहे. अत्यंत संतापजनक दृश्य म्हणजे मूर्तीच्या हाताशेजारी, पायाशेजारी, एकेक पुजारी उभा राहून लिलाव पुकारल्यागत पैसा गोळा करतो आहे! गांभीर्य व पावित्र्य यांचा मागमूसही नाही. एक भव्या दाराजवळ दर्शनार्थ आला. त्याच्याकडून प्राप्तीची आशा नव्हती. एका पुजाऱ्याने त्याची मानगूट पकडून एकदम उंबरठ्यावर दाबली आणि हा सक्तीचा व त्वरित नमस्कार होताच त्याला पलीकडे ढकलले! मला तेथे अधिक वेळ उभे राहवेना. प्रदक्षिणा घालून बाहेर पडलो.

बेलूर मठ आणि दक्षिणेश्वर यांकडे डोळे लागले होते. बसने स्टेशनवर आलो. दुसऱ्या बसने बेलूर मठाकडे आलो. एक रिक्शा केली आणि गंगेवरील प्रदीर्घ पूल ओलांडून दक्षिणेश्वरी आलो.

.. या विशाल मंदिरातील सभामंडपात आसन ठोकून मी बसलो आहे. दक्षिणेश्वरचे हे मंदिर भव्य आहे. कसे गंभीर आहे. साधे आहे. डाव्या अंगास

मंदिराचा घाट आहे. घाटाच्या पायऱ्या धूत शुभ्र गंगा वहात आहे. गंगामाईच्या हंसधवल तुषारांचा मुक्त संचार चालू आहे. दुपारचा बाराचा सुमार आहे. एकटक ती मूर्ती पाहात मी बसलो आहे. मूर्तीच्या पायाजवळ, जवळजवळ वस्त्रहीन अशी त्या फकिराची ती भव्य तसवीर आहे! अर्धोन्मीलित नेत्रद्वय. मानवी आकाराच्या देहात बंदिस्त असलेली पण तो बंदिवास न मानणारी आणि विश्वैक्याची तहान लागलेली त्याची ती चेतना! ज्याला माती आणि सोने यांतला फरक दिसत नव्हता; ज्याला संग्रहाचा डंख विंचू डसल्यासारखा लागत होता. क्रूर पशू आपला क्रौर्याचा 'स्वधर्म' टाकीत नाही तर 'दया, क्षमा, शांति, प्रेम' हा माणसाचा धर्म त्याने कसा बरे टाकावा असे सांगणारी, अत्यंत भावोत्कट, परम कारुणिक अशी ती परमहंस मूर्ती समोर आहे. त्या फकिराच्या चित्रामागील आशयघन असे त्याचे ते जीवन स्मरत मी शांत बसलो आहे.

काय बरे या जीविताचा अर्थ? अनादि—अनंत अशा काळाच्या कढईत असंख्य मानवी पिढ्या आल्या, आटल्या, फेसाळल्या आणि शेवटी त्यांची वाफ होऊन आकाशात पसार झाली. त्यांची नामनिशाणीही उरलेली नाही. 'या दुःखाच्या कढईची गा अशीच देवा, घडण असू दे' असे म्हणत म्हणत 'जळून गेल्या लोखंडांतही, जळण्याची पण पुन्हा ठसू दे, कणखर शक्ति, ताकद जळकट' अशीच सायंप्रार्थना करावी लागत आहे. आणि 'जळून गेलेले हे लोखंड' खरेच पुन्हा पुन्हा जळत आहे. जाळत आहे. या विश्वातील जीवनाचा एक अंश अशा या मानवी जीवनाची दोनच शब्दांतील ही एक कहाणी आहे!

काय तिचा अर्थ! काय या जीविताचा आशय? कशासाठी जगायचे? कोणीतरी या देहात ही चेतना ओतली म्हणून आपोआप तिचा एक दिवस अंत होईपर्यंत, 'वाळले पाले-पाचोळे' त्यात स्वाहून जीवनाची ही धुगधुगणारी शेकोटी पेटवीत बसायचे, असेच ना? मानवी जीवनाचे ईप्सित काय? या आयुष्याचा हेतु काय? इतिहास हरतऱ्हेच्या, हरप्रकारच्या जीवनांनी भरगच्च आहे. त्याकडे नुसता दृष्टिक्षेप केला तरी अनेक नमुने सहज दिसतात आणि त्यातील प्रत्येकाचे वैय्यर्थ कळून येते. त्यांच्यापैकी अनेकांना ते तसे कळून आले होते. जीवनान्ती त्यांची झालेली तगमग जगजाहीर आहे. आपला स्वतःचा पराभव त्यांनी बोलून दाखविलेला आहे. 'देवा त्यांना क्षमा कर; का की, आपण काय करतो ते त्यांना कळत नाही.' ही त्या करुणाघन खिस्ताची अशरणावस्था. आणि नौखालीच्या निबिड अंधारात एका रात्री एकटाच ओक्साबोक्शी रडणारा तो कालपरवाचा महात्मा! 'माझा पराभव झाला, पण ज्या प्रेमाची

पताका मी हाती धरली त्या प्रेम-ज्योतीचा तो पराभव नाही. प्रेमाची पताका फडकविण्यासाठी माझ्याहून अधिक समर्थ माणूस हवा, इतकाच त्याचा अर्थ.' ही ती त्याची कबुलायत. प्रेमाच्या परमेश्वराचा अट्टाहास धरणाऱ्यांची ही कथा. सत्तेचा 'व्होडका' प्राशून झिंगलेल्या मदोन्मत्तांचा हैवानी जल्लोश तर त्यांच्या प्रेतांनाही आज आपल्या थडग्यात स्वस्थ बसू देत नाही ! हुकुमशाहीचे जुलमी 'कुत्रे'ही ठार मारून टाकले होते ना ? पण आज तीच कस्यार इतकी जुलमी होऊन थयथयाट करीत आहे की, त्या जुलमास आपण साक्षी उरलो नाही म्हणून त्या मृतश्वानानेही आनंदाने आपल्या थडग्यात नाचावे ! सारा सत्तापिपासूंचा नंगा नाच ! 'जनहिताय' 'जनसुखाय' हाती कंकण खरे, पण कोण 'जन' जिवंत ठेवायचे आणि कोणाच्या शिरकाणावर उर्वरितांचा संसार उभारायचा ते मात्र 'मी' ठरवणार ! बुद्ध गेला, खिस्त गेला, लिंकन गेला, स्टालिन गेला आणि स्टालिनचे थडगेही गेले. खलास झाले !

'अशीच जावी काही वर्षे
आणि महात्मा यावा पुढचा
आम्हास आम्ही पुन्हां पहावें
काढुनि चष्मा डोळ्यावरचा'

परमहंसा, या वेळापत्रकाचा अर्थ सांग. आज एकीकडे जीविताचा अर्थ इतकाच दिसतो आहे की, जाणीव जागृत झाली की, विधिनिषेध न बाळगता धनसंचयास सुरवात करावी. सत्तेची पूजा बांधावी. असत्य, फसवणूक, अन्याय यांचा दशोगुणी विडा चवीने चघळीत साऱ्या परीटघड्यावर पचापच थुंकत जावे ! तो अल्लाउद्दिन खिलजी म्हणाला होता, "मुसलमानांनी हुकूम करताच हिंदु काफिराने आपले तोंड उघडावे आणि मुस्लिमांनी त्यात थुंकावे असा दरारा आणि शिस्त मला राज्यात निर्माण करायची आहे !" त्या धर्मवेड्याला हिंदु-मुस्लिमांचा विवेक होता. 'मी' विसाव्या शतकातील प्रगत मानव असल्याने जातीयता तुच्छ मानतो, आणि म्हणून माणूस दिसला की, त्याच्या तोंडावर मदोन्मत्त पिचकारी टाकावी असा 'सेक्युलर' ध्येयवाद उरी बाळगतो ! पोलिसाचा दंडुका हीच माझ्या मते मानवी ध्येयाची निशाणी. खडी दाबणारा रूळ ही विचारप्रणाली. उंच हवेल्या, तऱ्हेतऱ्हेचे रसनास्वाद, मदिरा आणि मीनाक्षी यांची संगत, नृत्य-गान-संगीताचा झंकार आणि अहर्निश इंद्रियसुखाच्या गिरद्यांवर लोळण. काय वाईट आहे यात ? कशासाठी याला त्याज्य म्हणावे ? सत्तेच्या टाचेखाली अन्यांना रगडण्याची या नसानसातील ऊर्मि कशासाठी दाबावी ! हे परमहंसा, तुझ्या त्या अर्धोन्मीलित नेत्रद्वयांतून असा प्रेमळ कटाक्ष माझ्यातील

सैतानावर तू टाकू नकोस. मला त्याची भीती वाटते. किंचित् रोष, तिरस्कार, तामस्य यांची झलक तिथे चमकू दे की, 'जितं मया'च्या आसुरी ललकारीत मी येथून पिसाटासारखा धावतो आणि माझ्यातील अदम्य जीवनेच्छा जगाच्या प्रत्ययास आणून देतो. तुझ्या या फाकिरी तसविरीचा चक्काचूर करूनच मी माझ्या तांडवास प्रारंभ करीन! हे जीवन्मुक्ता, मला जीविताशयाची एवढी ही भीक घालच!

या निःस्तब्ध भर दुपारी रामकृष्णांच्या समोर हे सैतानी विचार उसळत आहेत. पण त्यातील व्यर्थता मनोमन पटली असल्याने दुसरे मन त्यांना दाबून टाकत आहे. डाव्या हाताने वाहणारी गंगा गंभीर ध्वनी करीत आहे. मागेच एक भक्त एकतारीवर भजन गाऊ लागला आहे. समोर माता उभी आहे. तिचा तो अनन्यसाधारण भक्त शेजारी आहे. एक समई तेवत आहे. तिची ती बदामी ज्योत कशी संथ, मंद जळत आहे. पहाता पहाता ती ज्योत वाढली. मोठी झाली. एका तांबड्यालाल अग्निगोळ्याने सारा गाभारा व्यापला. डोळ्यासमोर एक रक्तरंगी अग्निगोल चमकला...

...असाच एक अग्निगोल युगानुयुगे अंतरिक्षात भ्रमत होता. हळूहळू तो थंड होऊ लागला. एक एक ग्रहगोल त्यापासून सुटू लागले. थंड होत गेले. त्यावर सागर उधाणले. पर्वत स्थिरावले. सागराच्या तळाशी जलचर सृष्टि जागी झाली, आणि त्या जीवांची आपसात लढाई जुंपली. लहानांना मोठे खाऊ लागले. खेळास रंग भरू लागला. मग त्या जीवयोनीत माणूस जन्मला! त्याने आपल्या बरोबर विवेक आणला. सतत कशाची तरी पूजा करावी, ही पिपासा त्याला जाळू लागली. चौफेर सारे क्षणभंगुर दिसत होते. नश्वर भासत होते. एका सर्वभक्षक काळाच्या कराल दाढाखाली सारे भरडले जाणार आहेत, याची जाण त्यास आली. तो पुटपुटला, 'मला समजत नाही. पण या साऱ्यामागे काहीएक हेतु असला पाहिजे. एक नियती असली पाहिजे. जगाचा सांभाळ करणारी, त्याला जोजवणारी, त्याचे संगोपन करणारी. मला तिची पूजा केली पाहिजे. शरणागताचे अर्घ्य तिला दिले पाहिजे.' आणि मग तो नित्य जगरहाटीपासून दूर झाला. गिरिकुहरी जाऊन त्याने तपस्या आरंभली. चार साध्या जीवांप्रमाणे हातून वर्तन झाले की तो 'पाप', 'पाप' म्हणून भुई धोपटू लागला. ईश्वराची क्षमा चाहू लागला. त्याची खात्रीच झाली की, तो जगजेठी आपणास क्षमा करणार नाही. मग त्याने भाविष्यत् कालातील त्या अगम्य ध्रुवपदासाठी व चिरसुखासाठी वर्तमानातील साधी सुखे अव्हेरली. व्रते स्वीकारली. देहदमन व शरीरपीडा यांचाच ध्यास घेतला. त्याची ती निरानंदावस्था पाहून परमेश्वर हसला. मानवी भक्ती विरक्तीत न्हात असलेली त्याने पाहिली आणि पहाता

पहाता पुन्हा एक प्रतिसूर्य त्याने सोडून दिला. तो मानवाच्या सूर्यावर येऊन आदळला आणि पुनश्च सारी सृष्टि त्या आद्य अग्निगोलात विलीन झाली !

आणि ईश्वर पुटपुटला, 'हा खेळ तर चांगलाच रंगला. पुनश्च एकदा खेळून पाहिला पाहिजे. ...'

रसेलने रंगवलेले हे चित्र किती खरे आहे ! जीवनाचा अर्थ काय, हा प्रश्न सतत जाळत आहे आणि मग वेड्या मानवाची अंधारात पिसाट धावपळ सुरू होत आहे. केवळ दिवसांमागे दिवस ढकलून त्याचे समाधान होत नाही. अर्थ-संचयाचे स्वतःस एक यंत्र बनवण्याचा हास्यास्पद खेळ त्याला आता रसदार वाटत नाही. सत्ता, संपत्ती, कीर्ती ही आपल्याच हातातील अणुगोळ्याने राख होण्याची वाट पाहात आहेत. एका व्यक्तीची जुलमी राजवट व सैतानी गुलामगिरी होती तेव्हा मानवी स्वातंत्र्यासाठी देवालाही जन्म घ्यावा वाटला. आजची जुलूम-जबरदस्ती आता आम्हांसच हास्यास्पद वाटते आणि तिच्या नाशासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची आच मात्र वाटत नाही.

दिवसामागे दिवस जातात आणि या अर्थहीन संसाराचा उलगडाच होत नाही. जीविताचा अर्थ काय, त्याचा हेतु काय, हा प्रश्न कृष्णजीनाही विचारला होता. ते म्हणाले, "जीवित म्हणजे तरी काय? क्षुद्र मनास जीवनाचे ज्ञान होईल का? दुःख आणि सुख, हास्य आणि लास्य, ते अश्रू, तो अविरतचा झगडा—प्रत्येक लहानमोठ्या गोष्टीतील अपूर्व सखोलता आणि सौंदर्य अथवा कशातीलही नसलेले ते सौंदर्य म्हणजे जीवन. जीवन म्हणजे फारच मोठा आशय. ते क्षुद्र मनास कसे कळावे? हाताच्या मुठीत वारा पकडण्यासारखे ते हास्यास्पद. अनंत अपरिमित जीवन एखाद्या तसबिरीत ठोकून त्याची पूजा करण्याइतके ते अर्थशून्य. स्वतःच्या मनाचा गोंधळ कसा आहे ते पहा. जीवनाचा अर्थ काय, हा प्रश्न विचारणारे मन कसे आहे ते पहा. स्वतःचा व्यामोह पहाणे, समजून घेणे हाच अधिक महत्त्वाचा भाग आहे. एकदा स्वतः-च्या मनाचा गोंधळ समजला, आपला व्यामोह कळला, की हा प्रश्न पुन्हा आपण विचारणार नाही. मग आपण जगूं. कोणत्याही प्रकारच्या जुलमी समाज-रचनेत आपण अडकून पडणार नाही. उलट गोंधळलेले मन उत्तर शोधू लागले की, ते अधिक गोंधळ, गुंतागुंत यांचीच पैदास करणार. आम्ही आतून भ्रमलेले आहोत—लौकिकार्थाने, राजकीयदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या आणि पारमार्थिक दृष्ट्याही. म्हणून बाहेरून सूचना–संदेश अपेक्षितो; आणि असे बाहेरून येणारे संदेश–सूचना म्हणजे आपल्याच भ्रमित मनाचे प्रक्षेप असतात. शोधा-शोध थांबवा. ध्येयार्थी अपेक्षा नको. गडबडलेले मन शोध थांबवते तेव्हा

गोंधळही संपतो आणि तेथे नूतन, अपूर्व, चिरसत्य जन्मते. विहिरीच्या पाण्याची खळबळ शांत झाली की, तिचा निखळ तळ स्पष्ट दिसावा तसे दिसते. "

याच विचाराच्या ओझ्याखाली या सभामंडपात आजची दुपार संपली. अजूनही गंगा वहात आहे, घंटा वाजत आहेत, समई तेवत आहे. परमहंसातील मुक्त फकीर मातेच्या पायाशी स्थिर आहे.

सूर्य आता कलत आहे. चटके देणाऱ्या त्याच्या तापाने आता सोनपिवळी झाक घेतली आहे. समोरच्या गाभाऱ्यात एक किरणशलाका डावीकडून घुसली आहे. मंदिराबाहेरील तो पिंपळ सळसळत आहे. पानापानावर तकाकी दिसत आहे. संध्याछाया आहेत पण अजून त्या भेडसावत नाहीत. दिवसाची उग्र उभारी आता कलली आहे. जरेच्या सुरकुत्या दिनमणीच्या चेहऱ्यावर पसरत आहेत. वाऱ्याची एक झुळुक दूरवरून आली. वामांगाने वहाणारी भागीरथी त्या झुळुकेशी बोलली. 'शब्दावाचुन कळले सारे, शब्दांच्या पलीकडले !' पहातां पहातां त्या घनतम शांतीच्या पोटी चित्ताची पाकळी अन् पाकळी तद्रूप झाली.

हा झाला अस्त रवि, घनतम उजळे बघा
ग्रस्त त्यात संसृति, आकण्ठ बुडाली पहा
किणकिणल्या घंटा, ही हाक मला आली
विद्ध शरीरी प्रज्ञा, का उगाच व्याकुळली !
हा चुकला फकीर मशिदी, झाला चुकलासे
मी पिसाट मजला, प्रकाश तिळ न दिसे !...

• • •

१२

★

# विजयदुर्गचा खाडीकाठ

वऱ्हाडातील भर उन्हाळा अंग करपवून टाकीत आहे. सकाळी ८-९ वाजताच दृष्टी ठरणार नाही, असे चकचकीत उन्ह पडते आहे आणि मग आसमंत जो तापत जातो त्याला सुमारच राहात नाही. घरे गरम होतात, कपडे गरम होतात, फर्निचर गरम होते, चारी बाजूंनी गरम उन्हाच्या झळया सारख्या मारत राहातात त्या रात्री १० वाजेपर्यंत. या उन्हात काम करवत नाही. डोके बाहेर काढवतच नाही. वाटते की, जरा गारवा येईपर्यंत थांबावे आणि तो गारवा मात्र कधीच येत नाही. केवढा विदारक शाप आहे ही जीवघेणी उष्णता म्हणजे! डोळ्यापुढे मृगजळासारखे इंग्लंडच्या हवामानाचे दृश्य खेळू लागते. ती सारखी थंडी. बर्फाचा मंद मंद पाऊस. अनेक प्रकारच्या पेयांनी शरीरात उष्णता आणायची आणि काम करीत राहायचे. दिल्लीतही मी पाहिले आहे. नखशिखांत गरम कपड्यांचा सूट घालून दिल्लीत हिवाळ्यात तमाम जनता किती स्वच्छंदाने विहार करते. ऑफिसातला साधा टायपिस्टही आपल्या गरम कपड्यात किती खुशीत असतो. भर बाराच्या उन्हात असल्या गरम कपड्यात हिरव्या कुरणावर उन्ह खात लोळणे डिसेंबर-फेब्रुवारीत दिल्लीत किती सुखाचे वाटे. नाहीतर ही उष्णता. या चारी दिशांस सपाट असलेल्या प्रदेशात एकदा का भास्कराचार्य तापू लागले, की त्यांना जसा चेवच येतो, आणि खाली चौफेर कपाशी पिकवणारी काळीभोर जमीन. तिला तापायला काय उशीर? रखरखीत आणि वैराण या विशेषणांची आठवण होते उन्हाचा हा ‘ तडका ’ पाहिल्यावर. मग थंडाव्याच्या भोगलेल्या सुखद स्मृती जाग्या करीत चटके देणारा हा उन्हाळा कसा तरी सह्य

करायचा. मन इतके तापलेले असते की, अवचित एखादी गार झुळूक मनाच्या माळावर लहरते आणि आठवणी जाग्या करते. तिथे माथेरान–महाबळेश्वरावरील मोलाने घेतलेली थंडाई आठवत नाही. मनाच्या स्मृतिलहरी चाळवल्या की, ' शीतोष्णमर्यादित ' गृहाची आठवण कधी होणार म्हणता काय? तेथे अस्सल तेवढेच आठवते. नक्कल आणि विकाऊ चिजा मनातून हद्दपार होतात.

आणि मग थंडाईचा रम्य अनुभव देणारे कोकणातील ते घर आठवते. बोटीत बसून एक रात्र आणि अर्धा दिवस काढल्यावर सकाळीच विजयदुर्गाच्या पहाडाशी बोट येऊन थांबते. पुन्हा मोटरलाँचमध्ये बसून खाडीच्या ताणाबरोबर वीस एक मैल वहात गेले की, आंब्यांच्या राईतून डोकावणारा लाल धक्का दिसतो. तिथे उतरून वरची घाटी चढायची. वरून खाली उतरणारा गोपाळा आपल्या बारीक डोळ्यांनी तुम्हांस न्याहाळतो आणि आश्चर्याने विचारतो,

' कंवा इलंस ? '

जाणारी लाँच त्याला दिसते. तिकडे बोट करून तो गाऱ्हाणे गातो की,

' लांच आज उशीरा इली. हा कां येण्याचा वखुत ? '

पण तुम्ही अचानक अशा स्वर्गात उतरलेले असता की, गाऱ्हाणी आणि विषाद यांना मनात थाराच मिळत नाही. पश्चिमेकडील एका उंच डोंगराच्या पायथ्याशी आंब्यांच्या आणि फणसांच्या राईत तुमचे घरकुल उभे आहे. माड आणि पोफळी अपवादानेच आढळतात. पण त्यांची जागा घेतली आहे डोंगरांच्या मुळक्यांनी आणि त्यांना उभे-आडवे वळण घालून वाहणाऱ्या खाडीच्या प्रवाहांनी. दोन आडव्यांच्या सापटीत असलेला आणि डोंगरकडेच्या उतरणीवर पायऱ्या-पायऱ्यांनी वसलेल्या वाड्यांच्या पुंजक्यांनी बहरलेला गाव म्हणजे निसर्गाने केलेली कायमची वानप्रस्थाश्रमाची सोय आहे. हिरव्यागार झाडांच्या राईत उभे असलेले कौलारू घर जवळ आल्याशिवाय दिसायचेच नाही. ते चौसोपी घर आपल्यापुढे एक छानदार मांडव घेऊन उभे असते. त्या विशाल मंडपाखाली वेताच्या चटया टाकून पडले की, निसर्गाच्या तादात्म्यतेची परिसीमा झाली. केळींचा रसदार हिरवा गाभा आपल्या पानांची पाखे मंद मंद ढाळतो आहे. मोसम असेल तर फळभाराने पक्व व जड झालेला आम्रवृक्ष संथ उभा आहे, आपल्या साथी-सोबत्यांकडे अविचल पहात. बुंध्याची आणि वर पर्णसंभाराची एकही जांघ हिरव्या लठ्ठ फणसाच्या गोळ्याविना रिकामी नाही असे भरगच्च फणस उभे आहेत. जांभळीचे वृक्ष आहेत खूप. पण आंबे-फणसांच्या ऐश्वर्यापुढे त्यांचेकडे कुणाचेच लक्ष लागत नाही. सरळसोट साग

आपल्या पानांची शिखरे घेऊन एरंडासारखे खडे आहेत. एखादा वड आणि गावच्या मूळपुरुषाला ' धरायला झाड ' हवे म्हणून एखादा पिंपळ अधूनमधून दिसतो. पण कडुनिंबाचे रोपटे मात्र शोधून सापडायचे नाही. झाडामाडांच्या संगतीत माणूस घर करतो आणि गावे उभी राहतात खरी. पण आपल्या आजूबाजूस सर्व प्रकारची रम्य वनश्री घेऊन जन्मास येणारी ही कोकणातील घरे पाहिली की, माणसापेक्षा तीच आपणास अधिक जवळची आणि जिव्हाळ्याची वाटू लागतात.

आता तुम्ही इथे येऊन उतरलात. शांत शांत वाटते आहे. ही केवळ बाह्य गडबड-गोंधळाच्या अभावाची शांती नाही. आतच कुठेतरी सारे कसे शांत, स्तब्ध, प्रसन्न झाले आहे; आणि वरवरच्या उथळ लाटा आणि त्यांचा धुमाकूळ स्तब्ध झाला असल्याने त्या शांततेच्या राईत ' काहीतरी ' उगवू लागले आहे. आडव्याच्या पायथ्याकडून वाऱ्याची एक मंद झुळूक खाडीचा गारवा घेऊन तरंगत येते आणि कानात काहीतरी कुजबुजून जाते. त्या शांततेत गवताच्या मांडवाखाली रात्रीच्या गाढ विश्रांतीनंतर सकाळी जाग येते, तेव्हा एकामागोमाग एक अनेक तऱ्हेचे आणि आवाजाचे लहानमोठे पक्षी किलबिलत असतात. कोकिळा गाते, न दिसणारा एक पक्षी ' क, क, क ' आवाज करतो, तर आपल्या क्षणिक लहरीबरोबर एक ललकार ठोकून एक रंगीत पक्षी एका झाडावरून दुसऱ्यावर पळतो. या दोनतीन स्पष्ट आवाजात चिल्लरांचे अनेक स्वरागातील शब्दोच्चार ऐकताना वाटते की, आपण आज खरे खरे गावाकडे आलो आणि निसर्गबाळांच्या घरी उतरलो. थड थंड प्रातःकाळी त्या पक्षिराजांची ती अस्सल ' मंगलप्रभात ' कोणत्याही प्रकारच्या तज्ज्ञ संगीत साजाला घेऊन येणाऱ्या शहरी प्रातःकाळाच्या कृत्रिमतेपेक्षा किती सरस, किती सुखद आणि प्रसन्नकारक. ' किलबिललेले उजाडताना ' असे कधी पाहिले नव्हते ! आणि ते पाहिल्यावर उठून मावळतीच्या डोंगराकडे पाहिले तेव्हा दिसले की, पूर्वेचे सुनेरी तेज नखशिखांत पांघरून तो अविचल गिरी आपल्या तेजाची मंद प्रभा सगळीकडे विखुरतो आहे. डोंगरावरचे उन्ह मग अलगद झाडांच्या शेंड्यावर उतरते. पण उंचसखल पसरलेल्या त्या गांवच्या सर्व राई एकदम कधीच तेजाळत नाहीत. उन्ह-सावल्यांचा हा खेळ कोकणातील गावात दिवसभर चालूच असतो आणि सबंध गावावरच आम्रपर्णांचा एखादा मांडव घातला आहे, असा सुखद व शीतल प्रत्यय देतो. वाटते की,

**" असा विसरलो, विसावलो अन**
**नीरवतेच्या गुप्त सभेवर "**

तांबड्या मातीच्या पार्श्वभूमीवर दिसणारी हिरवीगार सृष्टी मनाच्या हिरव्या मखमलीवर आपली पावले उमटवून जाते. घराच्या पश्चिमेस पायऱ्या-पायऱ्याने उतरत गेले, की आंबेघाटीचा पायथा लागतो आणि मुख्य समुद्रापासून आत घुसलेली ती अर्धचंद्राकृती खाडी दिसते. खाडीच्या पैलतीरावर कुंभवडा आहे. खाडीच्या अलिकडील काठावर भटवाडी, प्रभूवाडी आहे. दूरवर दुसऱ्या टेकाडावर राणेवाडी आहे. सुमारे चार फर्लांग चालत गेले, की प्राथमिक शाळेची इमारत लागते. असल्या खेड्यातील प्राथमिक शाळेस शिक्षणशास्त्रास संमत असलेली आधुनिक उपकरणे आणि अवजारे मिळत नसतील, पण त्याबदली निसर्गरायाच्या अस्खल सौंदर्याची एक अभिनव बैठक मात्र त्यांना उपलब्ध झालेली असते की, जी शहरी शाळांच्या वाट्यास कधीच येणार नाही. कोकणातील या खेड्यातील ही एक प्राथमिक शाळा पहा. उंच टेकाडावर ती उभी आहे. पश्चिमेस नजर टाकली, की क्षितिजापर्यंत पसरलेला तो निळा सागर नाचताना दिसतो. उत्तरेस पाहिले, तर विजयदुर्गाच्या मुख्य दरवाजातून आत घुसलेली ती अर्धचंद्राकृती खाडी दूरवर वाहात गेलेली दिसते. पूर्वेस हा गाव चढउतारावर आपल्या कौलारू टोप्या सावरीत उभा आहे आणि दक्षिणेस उंच डोंगर आपली पाठ गावाकडे करून समुद्रावरून येणारा वारा आणखीनच थंडगार करून घराघरा-वर पाखरतो आहे. डोंगर, समुद्र, खाडी, झाडी आणि यांना लपेटून राहिलेली तांबडी माती यांच्या एकत्रित संयोगाने ज्याचे चित्त स्थिर झाले आहे असा हा कोकणचा गाव, वऱ्हाडातील रखरखीत सपाटीशी तोलून पहाता केवळ स्वर्गाची आठवण करून देतो. तप्त व त्रस्त मनोभूमीवर त्या आठवणीनेच एक मंद झुळूक वाहून येते आणि खळखळ पाटाच्या पाण्याची एक धार त्यावर वाहू लागते. ठायी ठायी निसर्गाने हे केवढे स्वयंभू सौंदर्य निर्माण केले आहे! आपल्या विशाल व आजानुबाहू हातांनी तो सतत बाहतो आहे, बोलावतो आहे. कृतिमतेची आवरणे फेकून मने उघडी केली पाहिजेत आणि त्याच्या असीम सौंदर्याचे तीर्थ प्राशिले पाहिजे.

एक दिवस सकाळी उठून तो दक्षिणेचा डोंगर चढू लागलो. अंमळ चढण चढल्यावर पूर्वेस एक पायवाट लागली. त्या वाटेने थोडी चाल केल्यावर एक मोठी ओहोळ दिसली. तिच्या बुडात, मधोमध पाण्याचा लोट वाहात होता. वरून अर्धाकच्चा पूल बांधला होता. पूल ओलांडल्यावर एक शिवमंदिर लागले. अगदी प्राकृत अवस्थेत. मंदिराच्या दारी दोन पांढऱ्या चाफ्याचे वृक्ष उभे होते. पांढऱ्या चाफ्याचे पोकळ झाड एवढे वृक्षरूप झालेले कधी पाहिले नव्हते. आपल्या पिवळ्या-पांढऱ्या फुलांचा सडा जमिनीवर घालून ती झाडे शिवाच्या दारी राखण करीत होती. मंदिराच्या उत्तरेस पुन्हा पाण्याच्या काठाकाठाने

चालून गेल्यावर ओहोळाचा उगम दिसला आणि निसर्गाच्या त्या अस्सल स्नान-गृहावर दृष्टी जी खिळली ती कायमच. पुरुषभर उंचीवरून पाण्याची भली मोठी धार खाली पडलेल्या मोठमोठ्या धोंडीवर पडत होती आणि पडताना फुटून तिच्या पांचसहा अलग धारा झाल्याने शुभ्र पाण्याचा कापूस वाहात होता. चारी बाजूंस डोंगरकपारी, झाडी आणि घनदाट एकांत. आत्म्याच्या गाभ्यातून हाक घातली तर त्या स्थानेश्वरास ती जाऊन भिडलीच पाहिजे अशा नीरव एकांत. त्या पाण्याच्या धारेखाली पद्मासन घालून बसलो. वर डोक्यावर तो थंडगार अभिषेक. वाटले की, या अवस्थेच्या पलिकडे काही जग नाहीच. ती धावपळ, कृत्रिम कार्यव्यापृतता, अविरत चाललेली आपली व इतरांची फसवणूक हे सारे खोटे. जे दोन व्यक्तीत तेच दोन गट, कुटुंबे, समाज, राष्ट्रे यात. एकच एक अहंकार, आग्रह, अत्याचार आणि विध्वंस. आणि त्या पसाऱ्याचे सतत उमटणारे या मेंदूतील हे प्रतिध्वनि. हे शिवशंकरा, तुझ्या या अमृततुल्य जल-धारेने मेंदूतील तप्त कणन् कण थंड थंड कर. हे शुभंकरा, या धारेच्या सहज प्रवाहाबरोबर अंतरांतील विमनस्कतेचे सारे किल्मिष धुऊन जाऊ दे. आनंदमय असे श्रद्धेचे एक पाखरू अलगद कुठूनसे आले आणि खांद्यावर बसले. कोकणातील त्या रम्य गावांतील स्थानेश्वराचे ते ठिकाण आणि अगदी उघड्या निसर्गाच्या पार्श्वभूमीवर थंडगार पाण्याच्या धारेखाली बैठक ठोकून केलेले ते दीर्घ स्नान कधी विसरणार नाही. अशा अनेक आनंददायी क्षणांचा एक गुच्छ सदैव मनात फुललेला असतो आणि मोदाचे तुषार हवेत फेकीत असतो.

भल्या दुपारचे जसे हे स्नान तसेच चांदण्या रात्री केलेला त्या खाडीतला नौकाविहार. भरतीचा ताण भरपेट झाल्यावर दुसऱ्या तीरावरून एक ' पगार ' संथ डुलत ऐलतीरावर आला. ' पगार ' म्हणजे ओळीने पाचसहा माणसे ज्यात बसू शकतील असे एक छोटे होडगे. भरतीच्या ताणावर ते प्रवाहित होते आणि काठाला अगदी शेवटपर्यंत जाऊन पोचते. भरती पूर्ण भरात होती. दोन्ही तीरांवर शेवटपर्यंत पाण्याची पातळी चढली होती. गाळ, खडक संपूर्ण बुजून गेले होते. वर आकाशात चंद्रबिंब पूर्णाकाराने तळपत होते. निरभ्रतेमुळे नक्षत्रांची लुकलुकही स्पष्ट व ठाशीव दिसत होती. हे सप्तर्षी, ही कृत्तिका, हा मृग आणि हा तांबूस मंगळ असे सहजपणे दाखविता येत होते. तसाच तो वारा. वाऱ्यालाही कधीकधी आचके असतात, हिसके असतात. पण खालच्या पाण्याच्या नितळ आणि तट्ट पातळी-सारखाच मंद मंद झुळझुळणारा वारा अतिशय सह्य व आल्हादक वाटत होता. अशा रम्य वातावरणात ती प्रदीर्घ खाडी पसार केली. वाऱ्याने दिशा दाखविली,

भरतीच्या प्राण्याने वेग दिला, चंद्रम्याने उत्साह भरवला आणि अगदी सहज-लीलया खाडी पार झाली. किती रम्य, आल्हादक आणि ताजा प्रवास होता तो !

अशा अनेक छोट्या छोट्या प्रवासांची स्मरावली ओढीत राहावे वाटते. कोइमतूर ते उटी ते म्हैसूर केलेला सलग बारा तासांचा आराम बसचा प्रवास, चांदण्या रात्री विजयदुर्गानजीक केलेला खाडीतला 'पगार' विहार, गीरच्या जंगलांत अंधुक प्रकाशांत भटकत काढलेली रात्र, बैलगाड्या जोडून केलेली पंचवीस मैलांची नीरा-नरसिंगपूर संगमाची सफर...

...अकोल्याच्या आसपास भर मे महिन्यातील उष्णता डोके तापवून टाकते आहे. हात लावावा ते आपले गरम. रात्रीही थंडगार नाहीत, सुखाच्या नाहीत. मग मनाच्या माळावर अवचित मृगजळाच्या लहरी विहरू लागतात आणि तिथे कोकणातील डोंगरमाथ्यावरील झुळुक थरथरते, महाबळेश्वरावरील उत्साहवर्धक गारवा मनास जाणवतो किंवा सागरावरून वहात येणारी गार गार लहर आठवणी जाग्या करून जाते.

त्या थंडाईचा मारा या रखरखीत वऱ्हाडावर करायचा आणि पुढे चलायचे !

• • •

१३

★

# " त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं— "

ज्या वेळी राष्ट्रपतिभवनात प्रथम पाऊल टाकले तेव्हा त्या भव्य वास्तूत आणि दालना-दालनातील त्या ऐश्वर्यात काही रस वाटला नाही. कारण ते महाभवन खरे पण ते कुणाचेच घरकुल नव्हते. तेथे ऐश्वर्य होते, पण ते कोणत्याही कुटुंबाने मिळवलेले नव्हते. प्रत्येक वस्तु प्रेक्षणीय होती, पण ती कुणीही येऊन पहावी असा मामला होता. मी थेट त्या ठिकाणावर असलेल्या बगीचात गेलो आणि दोनएक तास कसे गेले ते समजलेच नाही. त्यानंतर सहा महिन्यांतच वृन्दावनाची सजीव हिरवी मखमल दृष्टीस पडली आणि तेथील रंगीत फुलांच्या आणि जिवंत कारंजांच्या तालासुरावर मन नाचले. हिरव्यागार केरळात ऐन पावसाळ्यात फिरलो तेव्हा सारी समजच पाना-फुलाइतकी हलकी-फुलकी आणि जिवंत झाल्याचा भास होत राहिला. या मोठमोठ्या बागांची ही तऱ्हा. लहानसहान कितीतरी पुष्पवाटिका मन रिझवून गेल्या होत्या. ताजमहाल समोरील बाग 'ताज' पेक्षा अधिक प्रामाणिक, निदान मला तरी, वाटली होती. बनारस हिंदु विश्वविद्यालयाच्या आवारातील वनस्पतिविश्व निःसंशय आल्हादक वाटले होते. पण या आखीव-रेखीव झाडाफुलांना मन रिझवता आले तरी अंतर हेलावता येत नाही असाच अनुभव आला. आत खोल कुठेतरी वसंताची कोवळीक उमलते, आंब्याचा मोहोर फुलतो, पारिजात सडसडतो आणि रात-राणी गुंगवून टाकते आणि ही किमया होते ती वृन्दावनाच्या मयसभेत नाही, राष्ट्रपतिभवनाच्या पर्णराजीत नाही किंवा केरळाच्या नयनरम्य रंगसंगतीत नाही. कोणी म्हणाले होते,

" जेथे हिरवळ जेथे पाणी
तेथे सुचती मजला गाणी "

हिरवळ मर्यादित होती आणि पाणी मुबलक होते, पण ते सायासाने वर खेचावे लागत होते, अशा एका दुष्काळी कुग्रामाने पाना-फुलांची आणि हिरवळींची जी मोहिनी वयाच्या बारा वर्षांपर्यंत घातली होती तीच आजही वृन्दावनादि बगीचांना पुरून उरली आहे. इथे आता हजारो फुले आणि कारंजी नाचताहेत. डोळ्यांना मोठा आनंद होतो आहे आणि चित्तास खचित प्रसन्नता वाटते आहे. पण तरीही मन एकदम हजारो मैल दूर जाते, वर्षांचा पाचोळा भराभर उधळून टाकते आणि तो काळ, ती झाडे, ती फुले आप्तस्वकीयां-प्रमाणे येऊन भेटतात. गूज बोलतात. चित्त हेलावतात...

...असेच दक्षिणेस हजार मैल जायचे. गावाबाहेरच्या मोटारतळावर उतरले की, घराची वाट चालू लागावी. तळावरचा हमाल हा पहिला सुहृद्. तो सामान घेऊन बरोबर घरी येईल. घराची वाट म्हणजे ' पडकी खिंडारे आणि ढासळलेले बुरूज ' यातूनच. पण या ढासळल्या बुरुजांनीच सारे सावरले आहे ! ते ओलांडून पुढे जावे. गावकोसाचा तो तट लागेल. कडुनिंबाची ती दोन झाडे दिसतील आणि मग त्या चौरस-चौरस जागेतील अनेक रोपटी, वेल, फुलझाडे, वृक्ष एकदम येऊन मिठी मारतील.

' न क्षुद्रोऽपि प्रथम सुकृतापेक्षया संश्रयाय
प्राप्ते मित्रे भवति विमुखः किं पुनर्यस्तथोच्चैः '

ही फुलझाडे मी लावली आहेत, त्यांना खतपाणी घातले आहे, त्यांची वाढ दिवस-मास पाहिली आहे. मग ती का भेटणार नाहीत ? त्यांना ओलांडून अमळ पुढे जावे आणि त्या ओसरीवर पडशी टाकावी. पस्तीस वर्षांपूर्वीचा काळ क्षणशः निरखीत त्या ओसरीवरच्या जोत्यावर खांबाच्या तळखड्याला टेकून बसावे. काय उमटू लागले आहे मनांत—

...हा वेळपर्यंत पौषाची पहाट वाजू लागली आहे. वडिलांनी सकाळी उठून बाहेरच्या चुलवणात पेटत घातले आहे आणि विहिरीच्या घागरी काढून ते आतल्या हांड्यात ओतीत आहेत. पहाटेची साखरझोप पहिली चाळवली ती, हांड्यात पडणाऱ्या पाण्याच्या धबधब आवाजाने. कोणीतरी येणाऱ्या-जाणाऱ्याने पुण्याहून आणलेला भरड लोकरीचा हिरवा मफलर तिकोणी करून डोक्यावरून हनुवटीखाली बांधला आहे. त्याच्या खरखरीत स्पर्शाने कानाची पाळे लाल झाली, दुखली. अगदी कोरडी, गार, विश्रब्ध शांती. तिच्या पोटी काहीही

लिहिता येईल अशी. मोठ्याने शब्दोच्चार करण्यासही संकोच वाटावा अशी. स्वर असावेत पण शब्द नको असे आत वाटत आहे. आणि शब्द येत नाहीतच. गोठ्याशी एक घंटा किणकिणते, थांबते. दूरवर 'वासुदेवा'ची घंटा अशीच थांबत थांबत कानी येते. आणि मग अचानक चौघड्यावर टिपरी पडते. वाटते, सारे तीन हजार वस्तीचे ते गाव स्तब्धपणे मांडी घालून आणि हात जोडून बसले आहे आणि उंच टेकाडावर पांढुरक्या दिसणाऱ्या चांदखनबोवाच्या पीरवजा मशिदीतील सकाळचा चौघडा आपली धून उभ्या गाव-शिवेवर पसरीत आहे.

अशा अनेक गार प्रभाती तेव्हा पौषातील सकाळच्या थंडीत उगवल्या आणि मनात घर करून बसल्या !

मग उठावे वाटे. स्नान होई. फुलांची परडी भरण्याची कामगिरी प्रथम हाती घ्यावी लागे. बाहेरच्या एका चौरसात फुलझाडे होती. ती केवळ फुलझाडे नव्हती. दहा वर्षांपर्यंत मित्रासारखी त्यांनी सोबत केली. आजही इथे इतके दूर असताना सतत याद येते ती त्यांची. त्यांना भेटावे वाटते. ती सुकली नसतीलच. ती अफूल-अफळ झाली असली तरी त्यांनीही भेटीसाठी आपल्या कृशकाया उभ्या ठेवल्या असतील याची मला खात्री आहे. भाद्रपदातील तिसऱ्या प्रहरी फुलणारी ती गुलबक्षीची रांग मला कशी बरे विसरेल? त्या वेड्या झाडांचीही कमाल खरीच. भाद्रपदातील गजाननाची षोडष पूजा आटोपली की, ती झाडे दोन दिवसही राहात नसत. मग वर्षभर त्यांचे कांदे एकदम गुप्त होत ते पुनः आपला रंगीन शिडकावा घेऊन दुसऱ्या भाद्रपदी हजर. बोलावणे धाडल्यागत. घरी कार्य निघाले आहे या जाणिवेगत. तिसऱ्या प्रहरी फुलून गणेशाच्या सायंपूजेचा सोहळा त्यांच्या त्या निरुपम गजऱ्याने पार पडायचा खरा; पण मला गुलबक्षीची याद येते तेव्हा एकदम एक गंभीर भय आत उमटते. पोटात धसका उठतो. अशीच एक भाद्रपदी संध्याकाळ. फुले तोडून हार करण्याचे काम चारचौघे करीत होते. संध्याछाया लांबवर पडल्या होत्या आणि क्षणाक्षणाला त्या लांब लांब होत होत्या. विस्तीर्ण गावकोसाच्या आत अभंग शांतता पसरली होती आणि एक 'जनाजा' आपल्या ठिकाणावर चालला होता. प्रथम दूरवरून पण हळुहळु जवळ जवळ सरकत ते 'फातेहा' ऐकू आले. अन्वय कशाचाच कळत नव्हता तेव्हा. पण प्रसंगाचे गांभीर्य व दडपण मनावर उतरले. पाठ वाकल्या म्हातारीसारख्या कडुलिंबाच्या बुडख्यावर चढून मी महादेवाच्या देवळावर चढलो व आवाजाच्या दिशेने नजर फेकली. बावड्याच्या सडकेस फर्लांगाच्या अंतरावर दोन-चार पांढऱ्या थडग्यात एकजण खड्डा खणीत होता आणि "जनाजा" त्या दिशेने जवळ जवळ सरकत होता.

...*खाली उतरलो. त्या टवटवीत, रसदार रंगीन गुलबक्षीच्या हाराचा प्रदीर्घ वास घेतला, तो अजून, आता, इथे नाकात आहे.*

कोपऱ्यात ती एक गोकर्णाची वेल आहे. निळ्या रंगाचे, बोंडल्याच्या आकाराचे, ते फूल सहसा मिळत नसे. आधी रोज त्याची कळी सकाळी उठून पहायची. ती वाढत वाढत एक दिवस फुलायची. फूल तोडून परडीत टाकवत नसे. तेच उत्तरेच्या कोपऱ्यातील मधुमालतीचे घोस पहा. रात्र असो, दिवस असो, त्या फुलांचे ते रसरशीत घोस अजरामर उभे असत आणि चौफेर आपला धुंद खुश्बू उधळीत असत. ते फूलही कधी एकटे नसे. एका ठिकाणी घोस आणि असे घोसच्या घोस. फुलताना व नंतर एखादा दिवस स्वच्छ पांढरे. जून होताना नंतर तांबडेलाल. द्राक्षाच्या घोसागत त्या नाजूक गौरकाय वेलीवर धुंद वासाचे ते घोस लटकलेले असत आणि उभा परिसर वेडा होई. त्यांच्या वासाने, रूपाने, फुलांच्या त्या सुबत्तेने.

श्रावणझड सुरू झाली की ओट्यावरचा प्राजक्त चारी अंगाने फुलून येई. आदल्या रात्री ओट्यावर जाजम पसरून पडले की त्याच्या वासाची नोम तोम सुरू होई. मग अचानक झड येई. बैठक गोळा करून ओसरीवर पसार होताना वाईट वाटे ते हे की, उद्याचा प्राजक्त 'धूर्जटि' दिसणार म्हणून. आणि तसेच होई. रात्रभर पन्हळ गळत असे. पाण्याचा तांबूस रपाटा उशीर-पर्यंत धार धरी. सकाळी उठून पहावे तो ओटा चिखलेश्वराच्या आधीन झालेला आणि ती इवली इवली नाजूक फुले मातीमोल झालेली. माना मुरगळलेल्या खऱ्या, पण तरीही मधूनच सुवासाची सम गाठणाऱ्या. श्रावणातल्या कोवळ्या उन्हाच्या सकाळी मात्र प्राजक्ताची लयलूट लुटली ती विसरत नाही. झाड फुललेले. फटफटले की ते नुसते हलवल्यासारखे करायचे. खाली फुलांचा सडा पडे. ती ताम्रदेठी नाजूक मोती मातीच्या हाताने गोळा करताच येत नसत. त्याला श्वासांचेच हात हवेत आणि रेशमाची बोटे हवीत. फारच झाले तर एखाद्या लोहचुंबकाने ती स्पर्शाविना गोळा करावीत आणि डोळ्यांनीच त्यांचा सुवास चाखावा. ओट्यावरील झाडांची फुले अंमळ लहान होती. पलिकडल्या आळीत एक न्हाव्याचे घर होते. त्याच्या परसदारी एक प्राजक्त होता. रुपया-एवढया फुलांचा आणि मोत्यांच्या राशीसारखा चमकणारा. त्या धनाची त्या घरी अपूर्वाई नव्हती. ते झाड तेथे कसे आले, कोणी लावले, माहीत नाही. पण मुद्दाम उठून त्या घरी जावे आणि फुलांचा ढीग गोळा करावा हा छंदच लागला. प्राजक्ताच्या मधुर वासाने अनेक श्रावण शिरवे मनात येतात. पहाता पहाता मनावर एक जोराचा शिडकावा करून तप्त भूमी गार करतात. आत रेंगाळतो तो फक्त तांबड्या देठांच्या पांढऱ्या फुलांचा एक वेडा दरवळ...

विहिरीच्या समोरच जाईचा मांडव आहे. दर उन्हाळ्याच्या दीर्घ सुटीत मांडव पक्का बांधण्याचा कार्यक्रम होई. मांडव घालायचा. ती वेल तिच्या तुंदिल-तनु पसाऱ्यासह वर चढवायची आणि मग विहिरीच्या बादल्या काढून पाटाने ते पाणी तिच्या आळ्यात साठवायचे. मे महिन्यातील तिसऱ्या प्रहरी सारी भूमी कशी तप्त होई. मग विहिरीचे पाणी काढून ते साऱ्या झाडां-वेलांवर शिंपडायचे. मुळात पाणी, झाडावर पाणी. सारा परिसर गारीगार होई. रखरखलेल्या जमिनी-वर पडणारा पाण्याचा तो शिडकावा भूमिगंध पसरे तो सकाळी दरवळणाऱ्या अनेक फुलांच्या एकत्रित गंधापेक्षा अधिक धुंद वाटे.

आषाढ-श्रावणात जाईच्या सफेत फुलांनी विहिरीवरील पाण्याची डोण भरत असे. कसा निष्कलंक सफेता दिसे तो. मधुर सुवास म्हणजे सात्त्विकतेची परिसीमा. जाईच्या उजव्या हातास डेरेदार मोगऱ्यांची एक रांग असे. मोगऱ्या-च्या त्या कळयाही दोनदोन चारचार दिवस झाडावर राहात व पाकळी-पाकळीने आपला शुभ्र सुगंध आसमंतात पसरीत. जाईच्या शुभ्रतेत व मोगऱ्याच्या सफेतीत एक मोठाच फरक असे. जाईचा वेल पांढऱ्या पंचपाकळी फुलांनी अगदी झांकून जाई खरा. पण जाईची पाने हिरवीगार, रसरशीत कधी वाटलीच नाहीत. किंचित् मळकी अशी ती पाने व त्यावर पांढरे वस्त्र अंथरल्यासारखे ते फुलांचे पहुडणे. याच्या उलट मोगऱ्याचे हिरवेपण. प्रत्येक झाड बांधीव, सुबक, डेरेदार. पानाचा आकारही लहानसर पण प्रमाणबद्ध आणि वरची ती रसरशीत नितळ, हिरवीगार लकाकी. या पार्श्वभूमीवर मग ते लहानसेच पण पाकळ्यांचा गुच्छ असलेले डेरेदार फूल उमले. ते आपल्या गंधाची दाद आगावूच पुढे पाठवीत असे. मोगऱ्याची कळी भरात आली की, लगेच तोडावी व माठातील पाण्यात टाकावी. चैत्र-वैशाखाच्या रखरखीत दिवसात माठातील ते थंडगार पाणी दोन-तीन दिवस मोगऱ्याचे फूल संभाळीत असे आणि बरोबरच कसा मधुर सुगंध पाण्यास बहाल करीत असे. वसंताचे आगमन भासत असे ते त्या मोगऱ्याच्या वासाच्या थंड पाण्याच्या चवीने किंवा दिवसभर तापलेल्या परिसरा-वर पाणी शिंपडून सायंकाळी निर्माण केलेल्या गारव्याने. खरेच, त्या वैराण प्रदेशातील हाच चौरस-चौरस परिसर इतका गारीगार होई की, कुठून तरी अवचित् कोकिळेचा सूर कानी येई. आंब्याचे झाड कुठे दृष्टीसमोर दिसत नसे, तरीही.

पण आंब्याच्या मोहरास चारीसुंडे चीत करील असा कडुलिंबाच्या मोहराचा सुवास दरवळे. सारा परिसर त्या निरोगी वासाने शुद्ध होई. सतेज होई. ते मोहोरलेले निंबाचे झाडही मोठे ऐश्वर्यसंपन्न भासे, दिसे. गार सावली. हिरवी पर्णराजी. अंगासरसाच आटोपशीर पसारा. झाडात कडुलिंबाचे झाड म्हणजे

मित्रमंडळीत गाववाला मित्र भेटावा तसे वाटते. त्या झाडाच्या अंगाखांद्यावर सुरपारंब्या खेळून खेळून दमलो. गुढीपाडव्यादिवशी त्याचा सुगंधित मोहर आपलेपणाने खाल्ला, त्याच्या डहाळ्या जाळून डासांचा उपद्रव किती वेळा तरी नष्ट केला. आणि पिवळ्याजर्द टपोऱ्या लिंबोण्यांची रास एकदा जमू लागली की त्या साध्यासुध्या झाडाची बहुप्रसवता आणि वात्सल्य पाहून नवल वाटे. वाईट इतकेच वाटे की, एरव्ही इतके निगर्वी असणारे ते उपयुक्त झाड पक्ष्यांना आपली घरटी बांधण्याच्या कामी कधीच सोईचे नसे. त्या पक्ष्यांनी यावे आणि त्याच्या फांद्यांवर चार क्षण मनसुराद नाचावे. आपल्या हृदयात कोणास स्थान द्यावे असे त्या कडुलिंबास कधी भावलेच नाही.

अलिकडील कोपऱ्यावर बुचाचे एक उंचच उंच झाड आहे. त्या एका प्रौढ झाडाने असंख्य रोपटी त्या परिसरात निर्माण करून ठेवली आहेत. इतकी की, त्यांची दुसऱ्या लहानमोठ्या वनस्पतींच्या वाढीस अडकाठी यावी. त्यातील विशिष्ट जागी उगवलेली काही झाडे मग मुद्दाम राखून ठेवण्यात आली आणि त्या परिसरात चार कोपऱ्यांवर चार आता ती उभी आहेत. त्या झाडाचा बुंधा नेहमीच सुसरीच्या पाठीसारखा खरखरीत असतो. पानांचीही विशेष अपूर्वाई नाही. सरळसोट उंच ते वाढत जाते. पण एकदा का त्याच्या फुलांचा मोसम आश्विन–कार्तिकात आला की, “ मेघाचे अंग झील । की वारेनि जैसे जाईल । परी वर्षतिये नवल । घनवट ते ॥ ” असा फुलांचा खच पडे. लांब दांडा आणि पुढे पांढऱ्या चार-पाच पाकळ्या. सौंदर्य फारसे नाही. पण मोठा मधुर वास. दूरवर पोचणारा आणि रेंगाळत राहाणारा. त्या लांब दांड्याच्या फुलांचा हारही करता येत असे. देठ एकात एक गुंतवून हवा तितका लांब तो होई. त्या फुलांचा खाली सडा पडे आणि ती वेचण्यास लहानग्यांची एकच धमाल होई. त्या लहानशा जागेतील फुल-झाडावर एकच एक अधिसत्ता त्या झाडाची असे.

पश्चिमेच्या बाजूस एक पांढऱ्या चाफ्याचे झाड आहे. पावसाळ्यात हिरव्यागार प्रशस्त पानांचा खच आणि उन्हाळ्यात निष्पर्ण झाडावर फुलांचे गुच्छ. पिवळसर फुलांच्या पांढऱ्या पाकळ्या मागील देठात गुंतवून त्यांची अंगठी किती सुरेख होई. लांब बांबूच्या टोकास किंचित् भेग पाडून एकेक फूल खुडून घेणे फक्त चाफ्याच्या फुलांचे बाबतीतच शक्य असे. घरच्या चाफ्याची फुले काढून पाच वाचता वेशीबाहेरील रामाच्या देवळात तेथील चाफ्याची फुले काढण्यासाठी जायचे. ते झाड अधिक टणक होते. पंचा भरून फुले काढायची, रामाच्या देवळातला तो उघडाबंब प्रचंड नगारा दोन्ही हातांनी बडवायचा आणि परतायचे. तेव्हा चांगली संध्याकाळ होई. त्याच बाजूने

गुरांचा एक तांडा गावात शिरे. देवळाच्या बाहेरच्या पडवीत दोन लहान नगाऱ्या-वर चौघडा सुरू होई. एक मुसलमान तो वाजवीत असे. त्याच्या त्या दोन छोट्या टिपऱ्या ' कुडुम् ' ' कुडुम् ' हलत असत. तिथे जरा वेळ घोटाळायचे. त्या वृद्ध वादकाचा सुरकुतलेला चेहरा, लहान चौघड्यावरचा कुडुम् कुडुम् आवाज, अधूनमधून येणारी घंटांची किणकिण ! वाजवून झाल्यावर तो दोन्ही हातांनी रामास नमस्कार करी आणि सामान आवरून बाहेर पडे. पहाटे चांदखनबोवाच्या मशिदीतील चौघड्याने जाग येई. सायंकाळी राम-मंदिरातील तो चौघडा आणखी एक दिवस अंधारात ढकली !

घरी येऊन जोत्यावर बसावे तर रातराणीचे एकटे एक झाड अंधारात किंचित् कडवट, पण धुंद सुवास पसरून बसलेले असे. पिवळ्या धमक रंगाच्या आणि घट्ट सुवासाच्या शेवतीच्या कुंड्या होत्या. निशिगंधाचे कांदे चारदोन कुंड्यात उभे होते. चमेली आणि जुई अजून फुलायच्या होत्या. मध्येच एक जास्वंदीचे लालभडक झाड उभे होते. दुर्वांकुराचे रान किती होते त्याची मोजदाद करता येत नाही.

विहिरीवरच एक मोठे चिंचेचे झाड आहे. त्याच्या फांद्या विहिरीवर आल्या आहेत. शिशिरात ती पाने झडून आत पडतात, पाणी खराब होते म्हणून त्या फांद्या तोडाव्या लागतात. चिंचेचे झाड म्हणजे गार-घट्ट सावलीचा तंबू. भरगच्च भरलेले झाड. ते गार, त्याचा परिसर गार. पण त्याची खरी गंमत दिसे ती वसंतातच. कोवळ्या उन्ही सकाळी पहावे तो सारे झाड कसे रसरशीत हिरवेगार दिसे. चिमुकली पाने पूर्ण उमललेली आणि त्यांचा आनंद त्याच्या मनात मावेनासा झालेला. दुपारभरच्या उन्हाने ती पाने कोमेजत आणि संध्याकाळी सारी पाने मिटून जात, काळवंडत, माना टाकत. सकाळी पूर्णोन्मी-लित रसदार असे ते झाड सायंकाळी एखाद्या सर्पणाच्या मोळीसारखे उभे असे. पुन्हा दुसऱ्या सकाळी त्याचा डेरेदार गुच्छ हसत हसत स्वागतास सज्ज होई. किती काळ त्या चिंचेखाली पसार झाला. किती कथा त्यास माहीत आहेत, किती प्रसंग त्याने पाहिले आहेत. किती विसावे त्याने दिले, घेतले आहेत...

याच चिंचेच्या झाडाखाली
वर्षे पस्तीस पसार झाली
जीवन उधळले चौबाजूंनी
आणि स्मृति मागे रेंगाळली...

आवर्जून ध्यानात ठेवावे असे या झाडाफुलात आणि त्यांच्या या वैराण दुष्काळी प्रदेशात काय आहे ? पण बालपणीच्या पाहिल्या दशकातील

त्यांनी मनावर केलेले संस्कारच इतके बलवत्तर आहेत की ती झाडे नात्यागोत्याची वाटतात, रक्ताचा संबंध असल्यासारखी ती बोलतात. आपली सुखदुःखे त्यांना सांगावी वाटतात! पस्तीस साली डेहराडूनच्या कारागृहातून पत्नीस लिहिलेल्या एका पत्रात भाई मानवेन्द्रनाथ रॉय लिहितात, "...इथे दृष्टि पोचते तेथवर माझे साम्राज्य आहे. इतक्या लहान प्रदेशावर जरी माझी ही अधिसत्ता असली तरी मला त्यात आनंद वाटतो. माझ्या या राज्यांत भिंतीलगत काही फुलझाडे मी लावली आहेत. कशी लालभडक, जांभळी, पांढरी ती चकाकतात! किती सुंदर दिसतात! दुर्दैवाने पावसाळा सरताच ती मरून जातील! इतकी सुंदर फुले मरावीत हे किती दुःखदायक वाटते. त्यांना आत्मा असेल काय? मी त्यांना पुनः पुनः विचारतो, पण ती बोलतच नाहीत!" हा दिलासा वृन्दावनाच्या बागेत मिळाला नाही, राष्ट्रपतिभवनाच्या नयनरम्य बगीचात आढळला नाही, हरितस्नात केरळात त्यामुळे अंतर हेलावले नाही. आज इथे राष्ट्रपतिभवनाच्या बागेतील 'फुलांचा उत्सव' डोळ्यांनी पहात आहे खरा, पण मन मात्र हजारो मैलांवर उभ्या असलेल्या त्या रोपट्यावरच खिळून गेले आहे. ती माझी रोपटी, ती लहानमोठी फुले, झाडे आणि त्यांना वेढून राहिलेल्या आठवणी, सुवास, प्रसंग, काळ!

"...So to my home under falling daylight and the silent magic of the stars."

● ● ●

१४

★

## झाड डुलले!

रस्त्यावरच्या भिकाऱ्यालासुद्धा मन चाहेल तेव्हा मनमुराद लुटता यावे असे अमाप सृष्टिसौंदर्य निसर्ग अष्टदिशांना पेरीत असतो. पहाणारे पाहिजेत. आणि पहाणाऱ्यांचे अंतश्चक्षू उघडे पाहिजेत. दिवसांच्या सुखदुःखमय क्षणांना त्या त्या रसाचा परिपोष व्हावा इतका अर्थगर्भ 'मॉंटाज' निसर्गाने मुक्तहस्ताने बहाल केलेला आहे. आपल्या मनोव्यापाराकडे खुल्या दिलाने आणि निर्लेप साक्षिवृत्तीने पहाण्याचे श्रम घेतले पाहिजेत. त्याकडे अवधान दिले पाहिजे. वादळग्रस्त सागराच्या प्रचंड बेहोष लाटा कधी कधी बोलत नाहीत इतका आक्रोश विशाल सागरतीरावरील रुक्ष वाळवंट कधी कधी करते. आणि रेल्वेचा फलाट त्या एका कविमनास किती अस्वस्थ करून गेलाच होता नव्हे! माडांच्या झावळ्यांतून ठिबकणारे शरदाचे चांदणे बोलके अधिक की वर्षाऋतूतील त्यांची दिनरात चाललेली सचैल स्नाने बोलकी अधिक? आणि पिसाटासारखे कमरेवर हात घेऊन आणि पसरलेल्या झिंजांची राकट मस्तके कमरेपर्यंत घुमवून ते एकदा का चक्रीवादळात थैमान घालू लागले की, पहाणाऱ्यांना लय साधता साधता आणि समेवर येता येता भोवळ येते. वसंतातील पिंपळाची रेशमी सळसळ ज्याच्या मलिन मानसी घुसत नाही तो मुक्त असावा किंवा चक्क पाषाण तरी असावा. आता हा फाल्गुन–चैत्र आहे ना! कोरड्या प्रदेशातील असंख्य कडु-लिंबांचा मधुर मोहर हृदयात उसळतो आहे आणि नाकापाशी घोटाळतो आहे. कोकणपट्टीवर जशी माडांची मौज तशी कोरड्या देशावर कडुलिंबांची. आणि कडुनिंब हे खरे राष्ट्रीय झाड वाटते. सुपीक व सपाट पंजाबात, धिप्पाड

पंजाब्यासारखीच कडुलिंबांची झाडेही प्रशस्त असतात. तर तामिळनाडच्या उष्ण प्रदेशात कडुलिंबांची खोडे थोडी अधिक काळी दिसतात. सह्य असो वा विंध्य असो, हरिद्वार असो वा मदुरा असो, या प्रदेशातील हे ' आदिवासी झाड ' ' साधी राहाणी उच्च विचारसरणीचे ' द्योतक भासते.

मदुरेहून असा अस्तमानी निघालो आणि दुसऱ्या दिवशी अर्घ्य दिले ते भल्या सकाळी त्रिवेंद्रमच्या भास्कराला. ' पश्चिम घाटा'च्या पोटातून गाडी रात्री पसार झाली म्हणून सह्याद्रीचा दक्षिणभाग पहाता आला नाही. पण भारताच्या दक्षिणोत्तम टोकापर्यंत पोचलेला सह्यगिरी महाराष्ट्राचे हृदयच असल्याने केरळाशी ओळखच काय, अगदी नाते असल्यासारखे वाटले. जेव्हा प्रत्यक्ष केरळात शिरलो तेव्हा मात्र ' आजची सकाळ या कोणत्या भल्या मुलुखात उगवली ' असा प्रथमदर्शनी अचंबा वाटला. गाडीच्या दोन्ही बाजूंस हिरव्या रंगाची जी सुरवात झाली ती पार दृष्टि पोचेपर्यंत हिरवीगारच राहिली. भात खाचरे आमच्या ज्वारी-बाजरीच्या रानापेक्षा अधिक आटोपशीर असतात, अधिक घनदाट असतात आणि हिरवीगार दिसतात. त्यांच्या चौरसचौरस तळाच्या चौकडीत पाणी साठवावे लागत असल्याने ही छोटी छोटी तळी आणि वर लहरणारी मुंडा हात उंचीची हिरवीगार भातशेती डोळ्यांना असे काही सुख देते की, बोलता येत नाही. पालघाट जिल्ह्यात इरिगेशन मुबलक असल्याने मैलचे मैल हिरवे चौरस तुकडे व अधूनमधून खळाळणारे कालवे पाहिले, की तांबड मातीत रुतून बसलेला हा हिरवागार रंग केवळ पाण्याच्या जादूने असा बाहेर काढता येतो हे खरेच वाटत नाही ! अशा मोकळ्या हिरव्या माळावर गावची वेस मागे टाकून हिंडावे, पाण्याची मधुर खळखळ हिरव्या झुळुकेत मिसळून कानी येईल ती ऐकावी, अनुभवावी आणि मनास विचारावे की, हे अमोल सौंदर्य निसर्ग अकृपणपणे उधळतो आहे ते कोणत्या उद्देशाने ? आनंद हा त्याचा स्थायीभाव आहे म्हणूनच ना ? त्याच्या डोळ्यातून केवळ सौंदर्य ओसंडते आहे म्हणूनच ना ? माणसाविषयी त्याला नितांत प्रेम आहे, एवढ्याचसाठी ही ' हिरवी झाडे शामल डोंगर ' त्याने चौफेर उधळले आहेत नव्हे काय ?

**सेव्यमानौ सुखस्पर्शैः शालनिर्यासगन्धिभिः ।**
**पुष्परेणूत्किरैर्वातैराधूतवनराजिभिः ॥**

शालतरूंच्या सुवासाने बहरलेला, पुष्पपरागांचा सडा शिंपणारा आणि ताडमाडांच्या शेंड्यांना दोलायमान करणारा मंद मंद, सुखस्पर्शी वारा वहातो आहे ! डुचमळतो आहे !

केरळाच्या प्रवेशद्वारापासूनच केरळ आणि अकेरळ मुलुखांतील एक फरक जाणवतो. केरळातील जमिनीची कमतरता आणि लोकसंख्येची गर्दी विख्यात आहे. याचा परिणाम म्हणून रेल्वेच्या दुतर्फा झोपड्यांची अखंड रांग जी दिसते ती संपतच नाही. तिला खंड कसा तो नाहीच. 'आंबे, नारळी, पोफळी आणि केळी' याचे वन पहावे तिकडे आहेच. हिरव्यागार हातभर उंचीच्या भातशेतीसह हे हिरवे वन पाहिले, की माणूस मुग्ध होऊन जातो. मनात विचार येतो की, चौफेर दिसणारा हा रंग हिरवा आहे हे किती सयुक्तिक. इतक्या अफाट आणि विस्तृत हिरवेपणामुळे शांतता, अंतर्मुखता आणि चिंतनशीलता वाढते. हाच जर तांबडा किंवा अन्य एखादा भडक रंग असता तर पहाणाऱ्याला पळता भुई थोडी झाली असती. निसर्गाची रंगसंगति साधण्याची ही पराकाष्ठा आहे.

त्रिवेंद्रम् हे शहर आटोपशीरच आहे; पण आहे स्वच्छ आणि सुंदर. या कोकणपट्टीतील शहरांना माडांच्या घनदाटपणामुळे आगळीच शोभा येते. लग्नोत्सवप्रसंगी आपल्याकडे मांडव घालतात आणि त्या मांडवाखाली प्रकाश आहे पण ऊन नाही, छाया आहे पण अंधेरा नाही अशी एक सौम्यशी आनंदोत्साहाची झलक प्रत्ययास येते, तशीच मंगल आनंदमयता माडांच्या गर्दीमुळे शहरभर भासते. इतक्या पुष्कळ माडांच्या गर्दीमुळे शहराचा अकृत्रिम सहजपणा एकदम डोळ्यात भरतो; मनात घर करतो. माडांच्या एवढ्या गर्दीऐवजी अन्य वृक्षवल्लरींची जर अशी गर्दी असती तर हा प्रदेश जंगलातच जमा झाला असता. माडांचे वैशिष्ट्य ते हेच की, असंख्य माड हारीने, गटागटाने, घनदाटीने एकत्रित असूनही त्यांचे जंगल माजत नाही. कारण उंच उंच डोलकाठी हाच त्यांचा मुख्य परिवार. शेंड्याला पानांचा चक्रीगुच्छ असला तरी त्याचा अडथळा तळातील पादचाऱ्यांना होत नाही. शेंड्यावरील बेचक्यात नारळांचा पुंजका असला तरी ते एक दृश्य सौंदर्यच ठरते. जमिनीवर पाय घट्ट रोवून अंतराळात भराऱ्या मारणारे असे दुसरे झाड नाही. आणि त्याने पाय घट्ट रोवावेत म्हणजे किती ! महापुरात आणि झंझावातात वटवृक्ष उन्मळून पडले पण ही डोलकाठी आपली कृशकटि लवलवीत उभी ती उभीच. 'मोडेन पण वाकणार नाही' हा तिखट पण व्यवहारशून्य बाणा या झाडास मंजूर नाही. ते वाकेल—आणि जरूर पडली तर भूमी चुंबेलही—पण मोडणार नाही. सौंदर्यशास्त्राचा निकष लावला तर माथ्याच्या प्रमाणबद्ध झिंजोटीचा पिंजारा सोडला तर त्यात काय सुंदर आहे ? डेरेदार आम्रवृक्ष, घनदाट भरलेली चिंच आणि चिंचेचे वन, सळसळणारा पिंपळ आणि जाडजूड वड यांच्या आखीव-रेखीव रचनेत सौंदर्य पहावे. सुवास सोडला तरी बकुल लक्षात राहातो. आणि कडुनिंब पाहिला की आपण घरीच आहोत असे वाटते. या वृक्षांशी तोलता माड म्हणजे कोणत्या झाडाचा पाला ?

पण सौंदर्याची पूर्ति ज्या एका भावावाचून सहसा होत नाही असा एक भाव केवळ माडांच्या बनातच आढळतो. तो भाव म्हणजे एक अद्‌भुतरम्यतेचे वलय. पिंपळ हे पिशाचयोनीचे निवासस्थान असले तरीही हे अद्‌भुततेचे वलय माडांच्या बनासच वेढून असते. मला आवडणारे प्रदेशचित्र म्हणजे माडांच्या पुंजक्यांतून डोकावणारे कौलारू घर आणि झावळ्यांचा फटकारा सोशीत राहिलेली बीजेची चंद्रकोर. या चित्राचे दर्शन झाले की, पायपिटीने थकल्या-मुळे अंमळ विसावल्यासारखे केले होते ते पुनश्च उठून, पडशी खांद्यावर घेऊन पुढच्याच्या शोधात मूकपणाने चलावे लागते ! व्यवहाराची दडस मनावर पडते. अद्‌भुताच्या झालरीने नटलेली वास्तविकता मनास दूर दूर हाकारे घालते आणि आपणाकडे पाहून माड परस्परांना डोळे मिचकावीत राहातात. तरीही त्या हाकाऱ्यांचा मागोवा घेण्याचा मोह टळत नाही. स्थाणुवत् स्थिर असलेल्या भल्यामोठया वटवृक्षाखाली आशय आत्मसुखात मशगुल होऊन ध्यानस्थ बसलेला असतो; तर तोच माडांच्या गर्दीत हुलकावण्या देत पळत राहातो. क्वचित् त्याच्या पावलांचा ठसाच दिसतो, क्वचित् माडाच्या भुईसपाट बुंध्यावरून तारेवरची कसरत करीत तो चालल्याचा भास होतो आणि अजाणतेपणे आपण आपलाच तोल सावरू लागतो. गतिमानता हे माडबनाचे खरे वैशिष्ट्य ! एखाद्या अत्याधुनिक मोटरगाडीचे वर्णन करतात तसे मला माडांच्या बनांत 'Fluid drive' अनुभवल्यासारखे वाटते. अन्य झाडांच्या जंगलात राहुटी ठोकून तुम्ही मुक्काम ठोकता तर माडांच्या बनांत तुमच्या मनाच्या 'म्हाताऱ्या' हवेवर तरंगत उंच उंच जातात आणि त्या गगनचुंबी झावळ्यांना लोंबकळत त्रिशंकुत्व पत्करतात ! ठामपणाचा निर्बुद्धपणा देशी झाडांच्या घनदाटीत जीवन आळवून टाकतो तर सहजतेचा पिसारा पसरून प्रवृत्तिहीन वस्तुनिष्ठता (Detached Objectivity) माडांच्या संगतीत कुठेही नसून सर्वव्यापी होते...

"हे माडांनो,
सायंकाळी
सुरवातीस मृगाच्या
दर्यावरचे वादळ पिऊनी चढतो कैफ तुम्हांला
आणिक त्या धुंदीतच
सर्वांगाला घुसळीत
डोक्यावरच्या झिंजोट्या पिंजारित
वाळवंटाच्या उघड्या व्यासपीठावर

सागर निर्मित-पार्श्वगीत-उत्तेजित
कल्पांतीचे प्रचंड तांडव तुम्हि मजला दावित !
कधी न केले निराश तुम्हीं मजला
सौंदर्याच्या अद्भुततेतुन जीवनरस मज दिधला "

मदुरेहून त्रिवेंद्रम्, त्रिवेंदम् ते अर्नाकुलम्, कोचीन अशा बंदरपट्टीत माडांची जी शोभा पाहिली ती ही अशी होती. पहावे तिकडे माड आणि माड. एका ठिकाणी त्यांची घनचक्कर दिसली, ओळीने त्यांच्या ओळीच ओळी दिसल्या, चार-सहा माडांची आपापसात झालेली कालवाकालव दिसली; तर हाताच्या अंतरावर उभ्या असलेल्या मित्रांच्या मेळाव्यातील कुजबुजीत अचानक लांबच्या एखाद्या माडाने डोके खुपसल्यासारखे दिसले. माड आणि पोफळींचा निःपात केला तर हिरव्यागार केरळातील सारी जादू एकदम संपुष्टात येईल. माडांच्या झावळ्या कातरलेल्या असतात म्हणूनही माडांच्या सौंदर्याद्भुततेत भर पडते. आपल्या प्रमाणबद्ध तेजस्वी कुंचल्याने आसमंतात फरफटे ओढत राहाणारे हे माड मनावर कोणत्याही आग्रही पूर्वग्रहाचा ठसा उमटूच देत नाहीत. 'आकाशातिल अधोरेखिते' पुनः पुनः ते रेखीत राहातात ! सारा जीवनव्यापार सहजलीलया स्वीकारावा असाच संदेश जणु ते देतात. अगदी दूरवर क्षितिजापर्यंत या माडांची गर्दी पाहून आणि सोसाट्याच्या वांदळातील त्यांचे भयानक थैमान पाहून मन धुंद होते, बेहोष होते.

अर्नाकुलमच्या परिसरात या माडांची दाटी अधिक नाट्यमय वाटावी अशी आणखी एक गोष्ट आढळली. चर्चेसचे क्रॉस आणि ती उंच निमुळती होत आकाशात गेलेली त्यांची टोके. सारा देखावाच रंगीत चित्राप्रमाणे दिसत होता. तांबडमातीच्या पार्श्वभूमीवर हिरवागार रंग, अधूनमधून आटोपशीरपणे उभी असलेली ती गंभीर चर्चेस, रेखीव रस्ते, गडबड-गोंधळ किंवा शहरी बाजारपेठेतून दिसणारा शुष्कं आणि गंधहीन व्यवहार यांचा पूर्णतया अभाव. मी पश्चिमेस तोंड करून शहरातून चालत गेलो. बैठ्या आणि छोट्या घरांची आणि ऑफिसच्या इमारतींची ओळ सोडून दूरवर आलो. सकाळी १० चा सुमार पण अतिशय उकडत होते आणि घामाने चिंब झालो होतो. रस्त्यावर पादत्राणविहीन पादचारी, लुंगी आणि खमीस या वेषात दिसत होते. केरळात साक्षरता फार आहे, बेकारी खूप आहे; बसचे ड्रायव्हर-कंडक्टरसुद्धा पदवीधर सापडतात याचा अचंबा वाटत नाही. रस्त्याने, हॉटेलात किंवा बसमध्ये दिसणाऱ्या समाजाची टापटीप, सफाई व सर्वसाधारण ज्ञान इतर राज्यीय लोकांपेक्षा अधिक जाणवते. मात्र रिक्षावाले, हॉटेलातील पोरे किंवा तत्सदृश जनतेची दाणादाण व दैन्यावस्था

मन पिळवटून टाकते. इतक्या सुंदर प्रदेशातील माणूस असा दीनवाणा असावा याचे फार वैषम्य वाटते. खरेच, आमच्या प्रयत्नांची पराकाष्ठा होऊनही सुटू नये असाच हा प्रश्न आहे की आमचे आलस्य त्याच्या मुळाशी आहे ? केरळात उभेआडवे हिंडताना प्रकर्षाने एक विचार माझे मनात आला. मानवी जीवनाची परिणती ज्या एका उच्चतम आध्यात्मिक संशोधनाने व सत्याच्या प्रत्यक्ष साक्षात्काराने व्हावयाची ती होण्यास ही भूमी किती योग्य आहे. आद्य शंकराचार्यांची कलाडी इथेच आहे ना ? घरात जसा दिवाणखाना, अभ्यासिका आणि देवघर असावे तशी देशातही अनेक दालने असतात. पण या सर्व दालनांचा एकच उपयोग—भोवतीचे व्याप वाढवून कालापव्यय करण्याचा—आम्ही काय म्हणून करावा ? जीवनाच्या प्राथमिक गरजा सर्वांच्या भागाव्यात, कोणत्याही स्वरूपाची व कोणत्याही पातळीवरील पिळवणूक अस्तित्वात असू नये, हे अगदी मूलभूत प्रश्नच सुटकेसाठी आमच्या सर्व पिढ्या कामास आणणार काय ? ते सहजी सोडवून जो मूलभूत प्रश्न उरेल–माणूस व विश्व यांचा संबंध-तो सोडवण्यास आम्ही केव्हा लागणार ? आणि त्यासाठी ही उत्कृष्ट चिंतनभूमी उपलब्ध असताना येथील रिक्षावाल्यांना अंगभर कपडा आम्हास देता येऊ नये व तो कसा देता येईल या विवंचनेतच आमचा काळ जावा हे आमचे केवढे दळभद्रेपण आहे ! निसर्गाच्या या आव्हानात्मक पार्श्वभूमीवर माणसातील निर्बुद्ध पशुता संताप आणते. येथील दरिद्री जनतेच्या पशुतुल्य जीवनाचा संताप मी म्हणत नाही. सहस्रावधी जनतेची अशी दुर्दशा व्हावी यासाठी कारण झालेल्या समाजाच्या कर्मदरिद्रीपणाचा संताप, समाजपुरुषाच्या स्वार्थी व जुलमी वर्तनाचा संताप मला म्हणायचा आहे. खाडीच्या काठावर, आत घुसलेल्या डोंगरपट्टीच्या आडोशास, निस्तब्ध वातावरणात मी बुडून गेलो असताना अर्नाकुलमच्या माडांचा सागर तेथील माणसांना खदखदून हसताना मी पाहिला आहे !

त्रिवेंद्रम्, इरिंजालकुडा, कोचीन आणि तेथून परत कोइमतूर असा संचार केरळात केला. कलापट्टी नावाचे हे एक खेडे. तालुक्याच्या गावाहून बसने वीस-पंचवीस मैल गेलो. आणि मुख्य रस्त्यावर उतरून दोनएक मैल जीपने जावे लागले. करवंदांच्या जाळ्या, माडांची गर्दी, हिरवी भातखाचरे आणि दोन्ही बाजूंस खळखळणारे पाण्याचे ओघळ यांच्या संगतीत निवांत पहुडलेले एकदोन हजार वस्तीचे गाव म्हणजे कलापट्टी. गावातील चार प्रतिष्ठित टाळकी सोडली तर उर्वरितांच्या अंगावर दारिद्र्याची लक्तरेच दिसली. जीवघेणे दारिद्र्य आणि उष्णकटिबंधाचा प्रदेश. पण लोक-संख्येच्या वाढीस मात्र यातले कोणतेच बंधन आड येत नव्हते. हे एका शिक्षणसंस्थेचे प्राचार्य. राहाणी तशी साधीच. सुशिक्षित, समजदार आणि बहुश्रुत गृहस्थ. पण आपल्या चौदा अपत्यांचा ( सर्व

लहानच ) प्रतिपाळ करताना त्याना विश्व आठवत होते. शालागृहाच्या विद्यार्थ्यांसाठी चाललेल्या भोजन-गृहातच ते आपली मुले घेऊन जेवत असत आणि उकडल्या भाताचे गोळे त्यांना भरवीत असत. त्याना आळशी म्हणता आले नसते. बेजबाबदारही नव्हते. पण परिस्थितीने त्याना असा काही खोडा घातला होता आणि त्याचे धागेदोरे इतके दूरवर सामाजिक यंत्रणेत गुंतले होते की, एकट्याची ताकद अत्यंत तोकडी वाटावी. त्या विद्यालयातील सुमारे चाळीस विद्यार्थी व तितक्याच विद्यार्थिनी वयस्कर होत्या. त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल आणि हुशारीबद्दल मुळीच शंका नव्हती आणि त्यांची शिस्त व उत्साहही चांगला होता. पण ते जे शिक्षण घेत होते त्यात त्यांचा उद्देश निदान तेवढी एक-दोन वर्षे तरी चिंता नाही म्हणून ते घ्यायचे इतकाच होता. कारण त्यांना शिष्यवृत्ती मिळत होती. साधने आणि संधी मिळाली तर समाजाच्या डोळ्यात भरेल अशी कामगिरी हातून व्हावी इतकी हुशारी व सामर्थ्य त्यांचे अंगी होते अशी माझी खात्री झाली. पण ही तरुण, कर्तबगार पिढी खचत होती. त्यांना राहाण्यास धड जागाही नव्हती. जिथे वर्ग चालावा तिथेच डेस्के काढून जेवावे, तिथेच विणकामाची अवजारे उभी करून काम करावे आणि रात्री कुठेही एवढी तेवढी जागा शोधून झोपी जावे इतक्या हलाखीत ही मंडळी दिवस ढकलीत होती. आणि केरळात कुठेही जागेच्या टंचाईचे चित्र असेच दिसत होते. नियोजनाच्या दहा वर्षांनंतरही दिसणारे ते कमालीचे ढिले चित्र पाहून चीड आली. क्रांती केवळ प्रगतीस जन्म देत नाही हा जरी आता पक्का अनुभव पाश्चात्य क्रांतीनंतर आला आहे, तरी असे वाटते की, काही काही गोष्टींवर क्रांती हाच एकमेव उपाय आहे. समाजाच्या शरीरातील सांध्या-सांध्यातून गाठाळून बसलेली ही दुखणी क्रांतीच्या झपाट्यातच, निघाली तर, निपटून निघायची: एरव्ही नाही.

त्या खेड्यातून बाहेर पडलो आणि संध्याकाळी उघड्यावर फिरायला गेलो. एक गाडीवाट भातखाचरातून गेली होती. पुढे गेल्यावर एक भरपेट वहाणारा कालवा लागला. त्याच्या काठावर अंमळ विसावलो. जवळजवळ मैलभराच्या परिघात कोणी माणूस नव्हते. संथ हवेत कुठल्यातरी आकाराच्या लहानलहान पाखरांचा एक थवा मजेत विहरत विहरत चालला होता. कालव्याच्या एका काठावरून पाच-सहा म्हशी आत उतरल्या आणि फक्त डोकी वर ठेवून पाण्यात बुडून राहिल्या. तुरळक माडांची एक रांग माथ्यावर रेंगाळणाऱ्या चार सोनेरी शलाकांना झिजाडून टाकीत होती. आणि खाली आक्षितीज हिरवळीचा

दर्या लहरत होता. हे भारताचे अगदी दक्षिण टोक. उत्तरेस हजारो मैल गेल्यावर नगाधिराज हिमालय आढळतो. आणि ही काळी माणसे, ही वस्त्रहीनता, हे माड आणि हे हिरवेगार आवार हळुहळु बदलत बदलत जाऊन त्यात दुसऱ्या टोकाची अतिउत्तरेची नवलाई दृष्टीस पडते. हे हिरवेगार केरळ हिमाच्छादित शुभ्र हिमालयाशी केवढे विसंगत! पण त्या विसंगतीचा त्याहून काही जास्त अर्थ आहे काय? नाही. कोणी सांगितले की, येथून हिमालयापर्यंत तेवढाच भारत आणि हिमालय ओलांडताच ज्यांचेकडे पाठ फिरवावी असा देश आणि प्रदेश? निसर्गाच्या या मुग्धमधुर दर्शनाने खात्री पटते की, निसर्ग भेदाभेद जाणत नाही, तुकडे पाडू इच्छित नाही. निळ्या निळ्या आकाशाखाली पंचमहाभूतांचे तांडव दिन-प्रतिदिन चालले आहे. त्यातून जन्मते ते हे सौंदर्य! पण त्याची दखल कोणी घेत नाही. भेदाभेदाचे डोंगर बळेच उत्पन्न केले जातात आणि मग कच्छच्या रणाकडे पाठ फिरवून हिरवेगार केरळ तेवढे आपलेसे म्हणावे वाटते.

अंधार पडू लागला म्हणून उठलो. परत निघालो. उद्या सकाळी केरळाहून परतणार आहे. अंगाने लहान पण सौंदर्याने महान असणाऱ्या या हिरव्या भूमीची आठवण फार काळ राहील. हिरवी भूमी आणि हिरवेगार केरळ. आद्य शंकराचार्यांच्या चर्पटपंजरीचा ताल धरून इथे माड डुलले, डुलतच राहिले!

१५

*

# भरतवाक्य

> ‘ आता यापरी जे बोलणे । ते येणेचि बोले शहाणे ।
> जे मौनाचेही निपटणे । पिकून गेले ॥ ’

अशी ही एका विमनस्काची यात्रा. एका भटक्याची शतपावली. यात हेतु नव्हता. त्यातून निष्कर्ष नाही. प्रदेश पहावा ही आस नव्हती. देश, लोक, जीवन, समाज यांबद्दल माहिती गोळा करावी ही तृष्णा नव्हती. माझे मन, माझे चरण; हेतुशून्य असे हे चंक्रमण. जशी माणसे जोडावी तसे डोंगर जवळ केले; नद्यांचे काठ तुडविले, ध्यानमंदिरे तपासून पाहिली, सारनाथाजवळच्या उत्खननात डोकावून पाहिले, गर्द झाडपाला आणि अरण्ये विसाव्यासाठी निवडली. कधी कोकणातील आडव्याच्या पाख्यात खाडीकाठी, तर कधी गिरनार-विंध्याद्रीवरच्या नीरव स्तब्धतेत जीवितहेतु हुंगून घेण्याचा प्रयत्न केला. त्या तसल्या एकांतातही केवळ अस्तित्वाच्या अडणीवर मनाची प्रगल्भ शांती स्थिरावू शकली नाही. हा समोरचा उत्तुंग गिरिराज. तो कसा केवळ ‘ आहे. ’ हा गिरि आणि ती नदी, हे व्यापक आकाश आणि ती गर्द राई—ही सारी केवळ ‘ आहेत.’ आपल्या गुणदोषांची जाण त्यांना नाही. जाण नाही म्हणूनच हुंकार नाही, अहंकार नाही. त्यांचे असे हे ‘ असणे ’ हाच खरा, समर्थ, सर्जनशील एकांत. अन्यांपासून स्वतःस वेगळे काढून त्यांनी तो एकांत ‘ मिळव-लेला ’ नाही. अकरणात्मक विचारातून त्यांचा हा एकांत पैदा झालेला नाही. असा एकांत म्हणजे लोकांताचा अभाव नव्हे. वस्तुमात्रांना अव्हेरून त्याची निर्मिती करणे नव्हे. तसे केल्यास जो मिळेल तो एकांत नव्हे, तर तो एकल-

कोंडेपणा. खरा एकांत हा एकात्म असतो. स्वतःस सभोवतालात एकजीवपणे अनुभवणे हा खरा एकांत. तो आनंददायी असतो. एकलकोंडेपणातील भय, वेदना, दुःख अशा एकात्मतेत नसते. अशा एकांताची अनुभूती हवी आहे. अशा समग्र, सर्व समावेशक एकात्मतेची भूक आहे.

अतीव संवेदनक्षम मन असणे हा शाप की वरदान? बाकी तो शाप असो वा ते वरदान असो, ते तसे असेल तर पुढचे प्रश्न उरणारच आणि ते छळणारच. मग मन पाषाणवत् करावे का? तसे करता येते काय? हळुवार मन व्यवहाराच्या पाषाणचक्रावर घासत राहून प्रत्यही अधिकाधिक धारदार बनते. आणि ती धार त्यालाच सतत कापीत राहाते. घर्षणामुळे उडणाऱ्या ठिणग्यांचा तोबरा त्यालाच रोज रोज पचवावा लागतो. पण मन संवेदनक्षम आहे, अतीव हळुवार आहे हे तरी खरे का? हृषीकेशासमीप गंगामाईकाठी आनंदाने डोलणे, धवलशीर्ष हिमाद्रीला नेत्रात सामावून घेणे, आणि लाल किल्ल्यातील भिंतीवरचे अरुवार शिल्प पहाणे म्हणजे ब्रह्मानंद खरा. पण ते संवेदनक्षम आहे तर गंगाकाठी वाराणशीच्या घाटाघाटावर गोळा झालेल्या रक्तपिती, मांसगोळेरूप भिकाऱ्यांना पाहून—काही न पाहिल्यासारखे—ते जलद पाय का उचलते? खेड्याखेड्यातील अमंगळ नाकझऱ्यांकडे पाठ फिरवून रुपेरी गंगेचा अवखळ ओघ तेवढा ते का जवळ करते? सौंदर्यास सामोरे जाणे आणि कुरूप, अमंगळाकडे पाठ फिरविणे म्हणजे मनाची संवेदनक्षमता टाकणे की टिकवणे? खरे तर मन जड आहे. विरोधात्मक प्रतिक्रिया मनात सतत उठत आहे. मग ते झगडा पैदा करते आणि तिथे 'रात्रंदिन युद्धाचा प्रसंग' आमच्या कपाळी येतो.

ही अविरतची युद्ध्यमान अवस्था नको आहे. संकटे असोत, ताप असो, दुःखही असो. पण ते चिकटू नये. प्रत्येक वेळी ते 'शायलॉकचा वाटा' घेऊन जाऊ नये. 'सुखं वा यदि वा दुःखं' कसे स्थिर मन, अविचल भाव हवेत. स्थितप्रज्ञता की काय ते ठाऊक नाही. ग्रंथांतरी वर्णन केलेल्या एखाद्या आदर्श वा रेखीव अवस्थेमागे लागण्याची इच्छा नाही. पण रोज रोज धडपडत असताना हे मन व्यवहाराच्या शेणाबरोबर वेदनेची माती उचलून घेत राहाते ते व्हायला नको. कसे निर्लेप अलिप्तपणे जगता यावे. 'लोकान्नोद्विजते च यः' ही अवस्था एकवेळ येईल; अनेक महात्म्यांना ती प्राप्त झाली होती. पण 'यस्मान्नोद्विजते लोको' हे आजवर कुणाच्या बाबतीत खरे झाले आहे? उलटपक्षी एखादे मन जितके अधिक स्वच्छ, उंच, समर्थ तेवढी समाजास त्याची अडचणच अधिक झालेली नाही काय? प्रत्यक्ष रक्तसंबंधित कौरव कृष्णामुळे उद्विग्न होते; तेच गौतमाविषयी, तेच खिस्ताविषयी व तुकाराम, ज्ञानेश्वर, गांधी यांचेविषयी. या सर्वांमुळे जनलोक उद्विग्न झाले नव्हते का? त्यांच्या अस्तित्वामुळे काय निर्भेळ

आनंदच वावरला होता ? रोजच्या जीवनक्रमातील हे एक जाचक दुःख असते. लोकांच्या सत्कारसमारंभाची आवश्यकता नाही, कुणाच्या शिफारसपत्रांची अपेक्षा नाही, काही लभ्यांशाची हाव नाही. तरी जगात वावरताना भोवतीचे लोक तुम्हांमुळे उद्विग्न असतात. त्यांना तुमचा कंटाळा वाटतो. अडचण वाटते; कारण तुम्ही चाकोरीबाहेर जाऊन त्यांची वाहवा चाहत नाही. त्यांच्या आवडी-निवडी, वर्तनसूत्रे आणि कृत्रिम आचार-विचार यांच्याशी समरस होत नाही. तसे वर्तन त्यांना हवे असते. ते तुम्ही देत नाही म्हणून त्यांना तुमच्यामुळे उद्विग्नता. इथे काय करावे ?

तो महापुरुष म्हणतो, "सन्मान्यता हा एक शाप आहे. मन आणि अन्तःकरण यांवर गंज चढवणारी ती एक गोष्ट आहे. सन्मान्य असणे म्हणजे यशस्वी असणे. यशाची जाण असणे. जगात आपणांसाठी एखादे स्थान कोरणे. स्थैर्य व शाश्वत सुरक्षितता यांची एखादी भिंत स्वतःभोवती उभी करणे. पण यामुळेच तुम्ही इतरांपासून स्वतःस वेगळे काढता आणि त्या वेगळेपणातूनच दुःख व वैर, द्वेष व मत्सर यांची निपज होते. ... कार्पण्य आणि निस्पृहता यांची जात एकच. दोन्हीहीमुळे माणूस आत्मकेंद्रित बनतो. अहंतेचा तो एक अकरणात्मक आविष्कार. लोभ आणि हाव म्हणजे धडपड, सततची कार्यरतता, स्पर्धा, चढाईखोरी. असले कर्तेपण वा धमक अंगी नसेल तर तुम्ही स्वतःस सांगता की, 'तू लोभीपणापासून मुक्त आहेस.' पण तसे नसते. तुम्ही आत्मकेंद्रित असता. तुम्ही कोष करून स्वतःस बंदिस्त करून घेतलेले असते. बाह्य धडपडीचा व्यवहार कष्टाचा असतो, मनस्वास्थ्य बिघडवणारा असतो म्हणून निर्लोभपणाच्या नावाखाली अहंतेचे दरवाजे लावून घेऊन आत स्वतःस कोंडून घेतलेले असते."

खळखळ पाणलोटाच्या काठावर वृक्षवल्लरीच्या संगतीत असे विचार उसळतात. पक्क व संचित विचारांची मनपाटी पुसून पुन्हा सगळे नव्याने सुरू करावे वाटते. चिंतन-मनन सुरू होते. वेदविद्येचे शब्दभांडार, मागीलांची आप्तवचने, असामान्यांचे अनुभव, महामनांचा सांगोवा सारे समोर नाचू लागतात. ते खरेही वाटू लागते. किंचित् समाधान पण पुष्कळशी ग्लानी-गुंगी मनावर येते. शब्द, शब्द, शब्द. तो महामना म्हणतो की, "आंतरिक दारिद्र्य, पोकळी, शुष्कता ही आपण शब्द, ध्वनी, धडपड यांनी भरून काढतो. एकटे-पणाचे भय वाटते. एखादे पुस्तक हवे, काही व्याप हवा, काही व्यवधान हवे. पण अशा शब्दांनी व धडपडीने स्तब्ध केलेले मन कधी तत्पर नसते. जागरूक नसते. त्याची साक्षीवृत्ती राहात नाही, स्वातंत्र्य टिकत नाही. मनास बधिर करीत राहाणे म्हणजे चिंतन नव्हे. स्वतःभोवती हरतऱ्हेचे भ्रमाभास निर्माण

करण्याचे मनाचे जे सतत कार्य चालू असते त्याची, मनाच्या मार्गांची, अगदी हेतुशून्यतेने, निःसंग साक्षीवृत्तीने जाण घेणे ही चिंतनाची सुरवात होय."

बेगुमानपणे जगणे हा जगण्याचा एक प्राथमिक प्रकार. जगले तर पाहिजेच. तेव्हा मग्रूरपणे जगायचे. प्रतिक्षणी आवाज मोठा करायचा. दमदाटी करायची. आपले खिसे भरीत राहायचे. ऐषआराम जिंकायचा. मानमरातब विकत घ्यायचा. सर्वांची पिळवणूक करायची. अगदी पति-पत्नी, अपत्ये अशा स्वजनांची देखील. आपल्या वृद्धीसाठी, अभ्युदयासाठी, चक्रचिन्हांकित राजपदासाठी, जग राबवायचे.

हेही नसे थोडके आणि हे सोपेही नाही. हे ऐरा गबाळ्याचे काम नाही. पण असले जगणे खरे आहे असे मात्र असल्या पिसाट जीवनवेड्यानांही भावलेले नाही हे मी हळूच पाहिलेले आहे. हा मार्ग अनुसरणाऱ्यांना मग तो बदलण्याचे स्वातंत्र्य उरत नाही. त्यांना सततची टोचणी सलते. तिची धार असह्य होऊ लागली, की मग पुन्हा अधिक काम, अधिक दंगा, अधिक मोठा आवाज, अधिकाधिक झोटिंगशाही. स्वतःच्या मनासही सक्तीने फसवीत राहण्यासाठी व ती फसवणूक त्याने बिनतक्रार मान्य करावी यासाठी असले साधक (!) कोण यातायात करतात ! सारा केविलवाणा प्रकार, की जो पाहावत नाही.

**फसव्या हास्याच्या या पोटी**
**इर्षा फिरते संधि पहात**
**उसन्या गांभीर्याच्या पोटी**
**चुराच सगळा भग्न मनांचा !**

हे कसले जगणे ? हे म्हणजे 'जगून थोडे अखेर मरणे !'

एकदोन पिढ्यांमागे आयुष्याचे गणित इतके बिकट नव्हते. इमाने-इतबारे वीस वर्षे नोकरी करून सेवानिवृत्त व्हायचे आणि पोट बांधून शिल्लक टाकलेल्या जिंदगीतून एखादे घर बांधायचे. मग वाटल्यास उर्वरित दिवसात दासबोध जवळ करायचा, वाटल्यास नातवंडे अंकावर खेळवायची. बरोबरीच्यांनी म्हणायचे, 'धन्यास्तदंगरजसा मलिनी भवन्ति ।' नंतर एक दिवस सुखाने शेवटचा श्वास घ्यायचा. मुखी रामनाम, ओटी तुळशीपत्र, खेळ खलास.

आज यातील प्रत्येक तपशिलावर टचाटच ठेचा लागतात. आज 'इमान-इतबार' आमच्याकडे पाहून फिदी फिदी हसत राहाते. निवृत्तीनंतरच्या बांध-कामास मुलांनी केलेल्या वाळूतील किल्ल्याचे आयुष्यही उरलेले नाही. तमाम मनुष्ययोनी एका ढेंगाड्या होडग्यातून खवळलेल्या दर्यावर दिशाहीन मुशाफिरीस

निघाली आहे! पोरस्त्यांच्या नाठाळ खोड्या असाव्यात तशा खोड्या त्यातील अनेक मोठी पोरे करीत आहेत. कोणी होडग्यास भोके पाडताहेत, कोणी प्रवाहाविरुद्ध वल्ही मारताहेत, कोणी सारे लटांबर समोरच्या खडकाच्या दिशेने हाकारताहेत. केव्हा एकदा ते त्यावर आपटते आणि 'समुद्रास्तृप्यन्तु' होते याच एका नादात ते आहेत. हा असला प्रवास आणि हे सहप्रवासी. 'माणसांचे सारे, माकडांच्या हाती!' तुताऱ्या फुंकल्या आणि टिपऱ्या पडघमवर बडवल्या म्हणून मर्तिकेस विजयमोर्चाचे रूप आल्याचे ऐकिवात नाही!

मग वाटते, या खटाटोपात ध्यान देऊच नये. म्हणजे तंत्र करीत राहावे, ते चुकत नाही. पण मन त्यात गुंतवू नये. रोज मी दात घासतो आणि स्नान करतो. शरिराच्या अस्तित्वासाठी हे आचार किती आवश्यक. पण त्यात मन गुंतल्याचे, अडकल्याचे कधी कोणी ऐकले आहे काय? तसेच ते व्यक्तिगत व सामाजिक आचार आटोपावे. कर द्या म्हणाले, द्यावा. देशाच्या कायद्याने बद्ध आहे म्हणून तो कायदा पाळावा. शत्रूने स्वारी केल्यावर लढा म्हणाले, लढावे. पण अहर्निश दृष्टी केंद्रित करावी 'हे काय आहे' ते जाणून घेण्यावर. वुल्झीने राजाची सेवा ज्या तत्परतेने केली त्याच्या निम्म्याने देवाची केली असती तर देव त्याला भेटला असता म्हणे. त्या तळमळीने आपण नादावे, विश्वातील पसाऱ्यात आपले काय स्थान आहे नि काय प्रयोजन आहे ते पहाण्यात. ते चिरंतन समाधान आणि शांती कदाचित् भेटून जाईलही! कारण

**'अन्य देवाहुर् विद्यया**
**अन्य दाहुरविद्यया।**
**इति शुश्रुम धीराणां**
**ये नस् तद् विचचक्षिरे॥'**

'(आत्मतत्त्व) जाणिवेहून वेगळेच म्हटले आहे, आणि नेणिवेहून वेगळे म्हटले आहे. ज्यांनी आम्हांला त्याचे दर्शन करविले, त्या धीर पुरुषाकडून आम्ही असे ऐकिले आहे'.

पण ही शांती आणि स्वास्थ्य असते तरी कसले? आणि ते कोणाला मिळाले होते? आपल्याच भक्ताने ठोकरलेल्या ख्रिस्तास की जळणाऱ्या रोमवर सारंगी वाजवणाऱ्या नीरोस? हजारोहजार निरपराध बांधवांचे शिरकाण करून, 'ते आवश्यक होते' इतकेच थंडगार भाष्य त्यावर करणाऱ्या स्टॅलिनला, की 'ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे' म्हणत फांशी जाणाऱ्या आइकमनला? सद्भावाने प्रेरित होऊन रक्त आटविणाऱ्यांना अपयशाचे धक्के सोसावे लागले आहेत आणि

प्रखर तामसीपणाने वागलेल्या रक्तपिपासूंना मात्र शांती लाभली आहे, जशी ती नीरोस लाभली, चेंगिझखानास लाभली !

जुलूम, अन्याय व पिळवणूक यांची एक भरभक्कम चौकट अस्तित्वात आहे ती मान्य करूनच आतल्या आत मारे तत्वज्ञानाच्या गप्पा माराव्या लागतात. या बाह्य पिंजऱ्याच्या खूप आत आपले घरकुल असल्याने असहाय-तेच्या वेदना सहसा स्वतःपर्यंत प्रत्यक्षपणे पोचत नाहीत आणि म्हणून वाटल्यास म्हणावे की, विनाकारण नैराश्याच्या खाईत बुडून जाण्याऐवजी आपल्याच घरी वेदपठण करावे, सौंदर्ये गोळा करावीत, ऋचा रचाव्यात आणि सूत्रे सृजावीत. पण तरीही आत एक लांछन जाचत राहातेच की, हे सत्यस्थितीस धिक्कारणे आहे. हे उगीच पिंजऱ्यावर रंगरंगोटी करणे आहे.

**" जाणिवेच्या पिंजऱ्यात किंचाळते माझी मैना**
**तरी मुके तिचे दुःख हीच दैना हीच दैना "**

देश बदलला, स्थान बदलले म्हणून दुःखाचे रंग पालटले नाहीत. कावेरीहून भागीरथीचा झपाटा बेभान असला तरी काठावर साचत राहिलेल्या गाळाचा प्रकार आगळा नव्हता. ते दुःख दाही दिशांना एकच.

अशा तऱ्हेने विचार करताना अचानक मन म्हणते की, ' तू कोण अस हा महनीय पुरुष ? तू, तुझे दुःख, मनःशांती मिळावी हा तुझा अटाट, आणि ही सारी तडफड काय मोलाची ? किती सहस्र असे जीव आजवर नाहीसे झालेत ! तुझ्या तडफडीची विश्वचक्राला पर्वा नाही. न्याय-अन्यायाची तमा नाही. ते रहाटगाडगे चालूच आहे. कोणी काहीही म्हणो '.

मान्य आहे. इतिहास, विश्व, उत्पत्ति-स्थिति--लयाचा झपाटा आणि कालाचा चक्रनेमिक्रम यात एखादा जीव म्हणजे काय होय ? पण एवढ्या य पसाऱ्यात अतिउत्साहाने मला माझा काल घालवणे, व आत्यंतिक वस्तुनिष्ठतेने दैनंदिन व्यवहार करणे का अशक्य व्हावे ? अपरिहार्य गोष्टी पाहूनही चित्ताची मासोळी इतकी का तडफडावी ? आणि मनाची घडण ही इतकी न बदलता येणारी गोष्ट असेल तर जन्मतःच जीविताचे दरवाजे कित्येकांना बंदच झाले म्हणायचे.

पण हे असले विचार करणारे माझे मन, माझा मेंदू एकाच गर्तेत घुमत नाही का ? आणि त्याच त्या खातेऱ्यात कितीही धडपड केली म्हणून त्यास काही नवीन, मूलगामी, सत्य मिळेल का ? ही सारी धडपड नष्ट झाल्यावाचून

त्या नवागताचा उदय कसा होईल ? अत्यंत प्रगाढ स्तब्धतेत मी केवळ साक्षी म्हणून राहिलो तरच पूर्वेला सुनेरी शलाकांच्या मागोमाग तो भास्वान् उदयास येत असलेला कदाचित् दिसेल.

त्यासाठी या मेंदूची जाण विश्व सामावून घेईल का ?

.. कधी कधी वाटते
या कवटीच्या चार भिंती उडवुन द्याव्या
आणि हिरव्यागार धरित्रीवरील
निळ्याभोर व्योमाची
व्यापक घुमटी
कवटी म्हणून धारण करावी !
या मुठीएवढ्या कवटीच्या
चार भिंतीआड
एक किराकिरा उंदीर
असतो सतत उकरीत
मेंदूतील मज्जेचा वाढता उकीर
ज्याचा स्मृतिरूप ढिगारा सरता सरत नाही !
म्हणून वाटते
खोलावी ही कवटी
फिरवावा नितळ हात
धगधगत्या मेंदूवर
झोपवावीत गाढ सारी
स्मृतीची लेकरे
हळुच नंतर पडून बाहेर
घ्यावी लावुन कडी
आणि विस्मृतीच्या स्तब्धतेत
उगीच बसावे पायरीवर
निराखित काहीतरी !
सान्त मनावर
अनन्ताचा माथा

विश्वाची कपास
हीच मेंदूची गाथा
आर्त हृदयांवर
निळावंतीच्या लाटा
एक चंक्रमक चित्त
निरखित उगीचता...

● ● ●

23606

REFBK 0013676

REFBK-0013676